पांडव वीरानें गुह्यकांस सामानेंच आपलेसें केलें; व नंतर मानस सरोवरावर जाऊन, तेथें ऋषिगणांनीं जे लहान लहान कालवे काढिले होते, ते त्यानें अवलोकन केले. नंतर त्यानें हाटक देशाच्या समीप असलेल्या व गंधर्वांनीं रक्षण केलेल्या प्रदेशावर चाल करून तो प्रदेश जिंकून घेतला. त्या स्थळीं त्यास तित्तिरिकल्मष व मंडूक ह्या नांवांचे उत्तम उत्तम अनेक अश्व खंडणीबद्दल मिळाले. तेथून तो लोकोत्तर वीर हरिवर्षांत प्रविष्ट झाला; आणि तोही देश हस्तगत करून घ्यावा असें त्यानें मनांत आणिलें. राजा, त्या देशांतल्या राजधानीसमीप जेव्हां अर्जुन गेला, तेव्हां त्या नगराचे द्वारपाळ अर्जुनाजवळ प्राप्त झाले. ते मोठे पराक्रमी व बलिष्ठ असून त्यांचे देह अतिशय विशाल व पुष्ट होते. अर्जुनास पाहून ते मोठ्या आनंदानें त्यास म्हणाले, "हे पार्था, हें पुर तुझ्यानें जिंकवणार नाहीं. ह्यास्तव तूं आतां परत जा. हें पुर तुझ्याशीं लढण्यास समर्थ आहे; अर्जुना, जो पुरुष ह्या नगरावर चाल करून येईल, त्याचा खचीत अंत होईल; ह्याकरितां, तूं आपला हा दिग्विजय येथेंच पुरा कर. ह्या पांडुतनया, तुझ्याविषयीं आमच्या मनांत प्रेम आहे, म्हणून आम्ही मोठ्या कळकळीनें तुला सांगत आहों कीं, येथें जिंकण्यास योग्य असें कांहींएक द्रव्य नाहीं, व ह्या उत्तरकुरु देशांत युद्ध म्हणून केव्हांही होत नसतें! ह्यास्तव, हे कुंतीपुत्रा, जरी तूं ह्या नगरांत प्रवेश केलास, तरी तुला कांहींएक दिसणार नाहीं; ह्या स्थळीं मनुष्यदेहानें कोणतीही वस्तु दृश्य नाहीं. हे पुरुषव्याघ्रा, जर तुला हें नगर जिंकण्याव्यतिरिक्त दुसरें कांहीं कर्तव्य असेल तर तें तूं आम्हांस सांग, म्हणजे तुझ्यासाठीं आम्हीच तें कार्य करून टाकितों."

राजा जनमेजया, नंतर अर्जुन प्रसन्न मुद्रेनें त्या द्वारपालकांस म्हणाला, "द्वारपालहो, धर्मराजाला साम्राज्यपद प्राप्त व्हावें, हीच माझी इच्छा आहे. जर तुमच्या देशांत मानव प्राण्याचा प्रवेश होत नसेल, तर मी प्रवेश करीत नाहीं पण तुम्ही इतकेंच करा कीं, तुम्ही युधिष्ठिराला कांहीं करभार अर्पण करून त्याच्या सार्वभौम आधिपत्यास तुम्ही आपली संमति द्या." राजा जनमेजया, नंतर हरिवर्षांतील त्या द्वारपाळांनीं दिव्य वस्त्रें, दिव्य अलंकार, दिव्य दुकूलें, दिव्य अजिनें इत्यादि अनेक वस्तु करभार म्हणून अर्जुनास दिल्या. असो.

राजा पारिक्षिता, ह्याप्रमाणें त्या वीरपुंगवानें उत्तर दिशा जिंकून घेतली. त्यानें त्या प्रसंगीं बहुत क्षत्रियांजवळ आणि लुटारू व चोरट्या लोकांजवळ युद्ध केलें. त्यानें अनेक राजांस हस्तगत करून त्यांवर खंडणी बसविली, आणि त्या सर्वांपासून बहुविध रत्नांचे राशि ग्रहण केले. तसेच त्यानें शुकोदरवर्णाचे तित्तिरिकल्मष व मयूराच्या वर्णाचे वायूप्रमाणें वेगवान असे दुसरे अश्व करादाखल मिळविले; आणि अखेरीस फारच अवाढव्य चतुरंग सैन्यासह तो आपल्या इंद्रप्रस्थ राजधानीस परत आला. नंतर अर्जुनानें रत्नें, अश्व वगैरे सर्व करभार धर्मराजाच्या स्वाधीन केला, व त्याची आज्ञा ग्रहण करून तो आपल्या मंदिरांत प्रविष्ट झाला.

अध्याय एकोणतिसावा.

—:०:—

भीमसेनाचा दिग्विजय.

वैशंपायन सांगतातः–राजा जनमेजया, महाधनुर्धर अर्जुन उत्तर दिशेस दिग्विजय करण्याकरितां गेला असतां, त्याच वेळीं महाबलिष्ठ भीमसेन धर्मराजाच्या आज्ञेनें पूर्व दिशेस दिग्विजय करण्यांत गुंतला होता. त्याच्याबरोबर चिलखतें घातलेलें मोठें अवाढव्य सैन्य असून,

त्यांत अश्व, गज व रथ हे अतिशयित होते. राजा, तो पराक्रमी भीम अशा सैन्यासहित ज्या ज्या शत्रूंच्या राज्यांत जाई, त्यांस तात्काळ अतिशय भीति पडे. जनमेजया, अशा मोठ्या सेनेसहित भीम प्रथम पंचालांच्या विस्तीर्ण राजधानींत प्रविष्ट झाला. तेथें त्यानें सामादिक विविध उपाय योजून पंचालांना आपल्या अधीन करून घेतलें. नंतर त्या शूर भारतश्रेष्ठानें थोडक्याच काळांत गंडक व विदेह हे देश जिंकिले, आणि दाशार्ण देशही आपल्या ताब्यांत आणिला. त्या प्रसंगीं दाशार्ण देशाच्या सुधर्मा नामक राजानें भीमसेनाशीं अंगावर कांटा येण्यासारखें घोर मल्लयुद्ध केलें. अखेरीस त्या युद्धांत भीमानें सुधर्म्यास जिंकिलें. पण त्या महात्म्याचा अपूर्व पराक्रम अवलोकन करून भीमानें त्यास आपल्या सैन्याचें आधिपत्य दिलें.

राजा जनमेजया, नंतर तो महाबलाढ्य भीमसेन पूर्व दिशेस वळला. राजा, त्याजबरोबर इतकें अफाट सैन्य होतें कीं, तें चालूं लागलें म्हणजे पृथ्वी अगदीं थरथर कांपूं लागे! पूर्व दिशेस वळल्यावर भीमसेनानें अश्वमेधाधिपति रोचमान राजावर हल्ला केला, व त्या राजास सेवकांसहवर्तमान मोठ्या पराक्रमानें जिंकून घेतलें. पुढें भीमसेनानें पूर्व दिशेस दुसरे अनेक राजे हस्तगत करून घेतले. पण त्यांस जिंकण्यास त्याला फारसें भयंकर कर्म करावें लागलें नाहीं.

जनमेजया, ह्याप्रमाणें पूर्व दिशा भीमाच्या हस्तगत झाल्यानंतर तो दक्षिण दिशेला पुलिंद नामक मोठ्या नगरास गेला, आणि त्यानें सुमित्र नामक सुकुमार राजाला वश करून घेतलें. राजा, पुढें तो महापराक्रमी वीर युधिष्ठिराच्या आज्ञेप्रमाणें महाबलाढ्य शिशुपालावर चालून गेला. तेव्हां भीमसेनाचा हेतु मनांत आणून चेदिराज शिशुपाल नगराच्या बाहेर आला, व त्यानें भीमसेनाचा सत्कार केल्यावर त्या उभयतांनीं एकमेकांस आप्तस्वकीयांची कुशलता विचारिली. नंतर चेदिराजानें 'सर्व राज्य तुझेंच आहे,' असें भीमसेनास म्हटलें, व त्यास 'हा एवढा प्रयत्न कशाबद्दल आहे?' म्हणून मोठ्या आनंदानें विचारिलें. तेव्हां भीमानें शिशुपालास धर्मराजाची इच्छा कळविली; व शिशुपालानें ती मान्य करून भीमसेनास करभार अर्पण केला. राजा जनमेजया, नंतर भीम तेरा दिवस तेथें राहिला; व शिशुपालानें बहुमान केला तो स्वीकारून सैन्यादिकांसमवेत तेथून पुढें गेला.

अध्याय तिसावा.

—:०:—

भीमाचा दिग्विजय.

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, नंतर भीमसेनानें कुमार देशांत श्रेणिमान् राजाला आणि कोसल देशांत बृहद्बल राजाला जिंकिलें. पुढें तो अयोध्येस गेला, आणि तेथें त्यानें महाधार्मिक व महाबलवान अशा दीर्घयज्ञ राजास फारसें भयंकर कर्म न करितां आपल्या हस्तगत केलें. नंतर त्यानें गोपालकक्ष व उत्तरकोसल हे देश स्वाधीन करून मल्लांच्या अधिपतीचा पराभव केला. मग तो हिमालय पर्वताच्या सन्निधभागीं असलेल्या जलोद्भव देशांत शिरला, व त्यानें तो सर्व देश फार थोड्या काळांत जिंकून घेतला.

राजा जनमेजया, ह्याप्रमाणें अनेक देश त्या विजयशाली भीमसेनानें स्वाधीन करून घेतल्यावर भल्लाट व शुक्तिमान् ह्या पर्वतांच्या भोंवतालचा सर्व प्रदेश त्यानें जिंकिला. पुढें त्या वीराग्रणीनें, युद्धापासून कधींही निवृत्त न होणाऱ्या सुबाहु राजाला युद्धांत जर्जर केलें, व त्यापासून करभार ग्रहण करून तो सुपार्श्व देशावर चालून गेला. जनमेजया, तेथें त्या देशाचा महापराक्रमी राज क्रथ हा भीमसेनाशीं युद्ध करण्यास उभा राहिला

असतां, भीमसेनानें त्या ऋथ राजाचा पराभव करून सुपार्श्व देश पादाक्रांत केला. नंतर तो भीमपराक्रमी पांडुपुत्र महाबल मत्स्य, मलद, अनघ व अभय हे. देश आणि पशुभूमिप्रदेश हे पूर्णपणें हस्तगत करून मदधार पर्वताकडे परत आला; आणि तेथें सोमधेयांचा पराजय करून तो उत्तर दिशेस चालता झाला. तिकडे गेल्यावर त्यानें मोठ्या पराक्रमानें वत्सभूमि जिंकून घेतली, आणि भर्गांचा अधिपति, निषादांचा अधिपति व मणिमान् आदिकरून बहुत राजे ह्यांचा त्यानें पराभव केला.

राजा जनमेजया. नंतर भीमसेनानें केवळ मोठ्या वेगानें फारसे आयास न पडतां दक्षिणमल्लदेश व भोगवान् पर्वत हे हस्तगत केले. पुढें तो शमक व वर्मक राजांवर चालून गेला, आणि त्यानें केवळ त्यांची समजूत घालून त्यांजपासून करभार घेतला. मग त्या महाबलिष्ठ भीमसेनानें विदेह देशाच्या जनक राजास अनायासें जिंकिलें; आणि शकांस व बर्बरांस फसवून आपलेसें केलें. राजा जनमेजया, भीमसेन विदेह देशांत असतानाच त्यानें इंद्र पर्वताच्या समीप वास करणाऱ्या सातही किराताधिपतींना जिंकिलें. पुढें त्यानें सुह्म व प्रसुह्म राजे व त्यांच्या पक्षांचे अनेक योद्धे ह्यांचा पराभव केला, आणि मागध देशावर खंडणी बसविली. जनमेजया, नंतर भीमसेनानें दंड, दंडधार व इतर भूपाल ह्यांस हस्तगत करून घेतलें, आणि त्यांसहवर्तमान गिरिव्रज पुराकडे प्रयाण केलें. तेथें गेल्यावर भीमसेनानें जरासंधाचा पुत्र सहदेव ह्याचें सांत्वन करून त्यापासून करभार घेतला; आणि दंड, दंडधार, सहदेव इत्यादि राजांसमवेत तो पुढें कर्णावर चालून गेला. राजा, त्या समयीं भीमसेनाच्या चतुरंग दळानें मही अगदीं थरारत होती. असो. त्या कर्णाचें व भीमाचें तुमुल युद्ध सुरू झालें, आणि त्यांत कर्णाचा पराभव होऊन तो भीमाच्या हस्तगत झाला.

राजा जनमेजया, नंतर भीमसेन पर्वतवासी राजांवर चालून गेला, व त्यांस जिंकून त्यानें मोदागिरीवर असणाऱ्या एका महाबलिष्ठ राजाचा युद्धांत बाहुबलानें वध केला. पुढें भीमानें पुंड्राधिप वासुदेव नामक महावीर व कौशिकी नदीच्या काठीं राहणारा दुसरा एक बलिष्ठ राजा ह्यांवर स्वारी केली, आणि त्यांस हस्तगत करून तो वंग देशांत शिरला. तेथें त्यानें समुद्रसेन, चंद्रसेन, ताम्रलिप्त, कर्कटाधिप व सुह्मराज ह्यांचा पराभव करून सागरवासी सर्व म्लेच्छांना जिंकिलें. हे जनमेजया, ह्याप्रमाणें त्या वायुपुत्रानें बहुविध देशांचे राजे हस्तगत केले, व त्यांजपासून करभार घेऊन तो लौहित्य देशास गेला. तेथें गेल्यावर, सागरतीरीं अनूप देशांत वास करणाऱ्या म्लेच्छ राजांपासून विविध रत्नें, चंदन, अगुरु, वस्त्रें, हिरें, मोत्यें, गालिचे, सुवर्ण, रौप्य व उंची पोंवळीं हीं करभार म्हणून ग्रहण केलीं; आणि ह्यांशिवाय त्या समयीं त्या म्लेच्छ राजांनीं पांडुपुत्र भीमसेनावर अपरंपार धनाची वृष्टि केली! राजा जनमेजया, ह्याप्रमाणें दिग्विजय करून तो महापराक्रमी भीमसेन इंद्रप्रस्थास परत आला, व त्यानें तो सर्व धनकोश धर्मराजाच्या स्वाधीन केला.

अध्याय एकतिसावा.

—:०:—

सहदेवाचा दक्षिणदिग्विजय.

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, त्याप्रमाणेंच धर्मराजापासून प्रोत्साहन मिळाल्यावर सहदेव हा मोठें सैन्य बरोबर घेऊन दक्षिण दिशा जिंकण्यास गेला. तिकडे त्यानें प्रथम शूरसेन देश पूर्णपणें हस्तगत करून घेतला; आणि मत्स्यराजास मोठ्या पराक्रमानें जिंकिलें.

नंतर तो महाबळवान राजश्रेष्ठ दंतवक्त्रावर चालून गेला, आणि त्याचा पराजय करून त्यास मांडलिक म्हणून राज्यावर स्थापिलें व त्याजपासून करभार घेतला. नंतर सुकुमार सुमित्र राजा, पश्चिम मत्स्य, चोरदेश, निषादभूमि, श्रेष्ठगिरि, गोशृंग व श्रोणिमान् राजा ह्या सर्वांस त्यानें केवळ मोठ्या सामर्थ्यानेंच जिंकिलें, आणि तो नरराष्ट्र जिंकून कुंतिभोज राजाकडे गेला. राजा जनमेजया, कुंतिभोज राजाचें पांडवांच्याविषयीं अत्यंत प्रेम असल्यामुळें सहदेव त्याच्याकडे जातांच त्यानें धर्मराजाची आज्ञा मान्य केली. पुढें सहदेव तेथून निघाला, तो चर्मण्वतीच्या तीरीं गेला. तेथें पूर्ववैरी वासुदेवानें अवशिष्ट ठेविलेला जंभकपुत्र राजा होता, त्याची व सहदेवाची गांठ पडली. मग तेथें त्यांचा संग्राम होऊन त्यांत सहदेवानें जंभकपुत्राचा पराभव केला, व नंतर तो पराक्रमी पांडुपुत्र तेथून दक्षिण दिशेस वळला. दक्षिण दिशेस गेल्यावर त्या पराक्रमी वीरानें सेक व अपरसेक ह्यांचा पराभव केला, व त्यांजपासून नानाप्रकारचीं रत्नें कर म्हणून ग्रहण करून, तो त्या सेकांसह नर्मदेच्या आसमंताद्भागाकडे चालता झाला. तेथें अवन्ती देशाधिपति विंद व अनुविंद राजे मोठ्या सैन्यानिशीं सहदेवाबरोबर लढण्यास आले, परंतु त्यांस त्या प्रतापवान पांडव वीरानें युद्धांत जिंकिलें. पुढें अवन्तीराजापासून करभार ग्रहण करून बहुविध रत्नांसह अश्विनीकुमारांचा तो पुत्र सहदेव भोजकट नामक नगरास गेला. त्या स्थळीं महादुर्जय भीष्मक व तो माद्रीचा पुत्र सहदेव ह्यांचें एकसारखें दोन दिवस अविश्रांत युद्ध होऊन त्यांत भीष्मकास सहदेवानें जिंकिलें. पुढें त्या प्रतापवान पांडवानें कोसल देशाच्या राजाचा व वेण्यातट देशाच्या राजाचा पराभव केला, आणि तो कांतारक देशांत शिरला.

नंतर त्यानें कांतारक, प्राकोसल, नाटकेय व हेरंबक ह्या देशांचे अधिपति एकामागून एक युद्धांत जिंकून घेतले; आणि त्यानें मारुध, रम्यग्राम, नीच व आनर्बुक राजांचा मोठ्या आवेशानें पराभव केला. मग त्यानें सर्व वनाधिपतींना जिंकून वाताधिप राजाला आपल्या अधीन करून घेतलें. नंतर त्याचा पुलिंद राजांशीं संग्राम झाला, व त्यांस जिंकिल्यावर पुनः तो वीर दक्षिण दिशेस गेला. तेथें पांड्य राजांशीं त्याचें एक दिवस घनघोर युद्ध झालें. त्यांत ते राजे पराभव पावल्यावर सहदेवानें दक्षिण दिशेचा आणखी पुढें मार्ग धरिला, व तो लोकप्रसिद्ध किष्किंधा नामक गुहेसमीप प्राप्त झाला. तेथें मैंद व द्विविद नांवाचे वानरराजे सात दिवसपर्यंत त्याजशीं लढले. परंतु तितक्या अवकाशांत त्या वानराधिपतींस क्षीणता वगैरे कोणताही विकार उद्भवला नाहीं. तेव्हां त्या महान थोर मैंदद्विविदांनीं अत्यंत संतुष्ट होऊन मोठ्या प्रेमानें सहदेवास म्हटलें, "हे पांडवशार्दूला, आम्ही तुला विपुल रत्नें करभार म्हणून अर्पण करितों तीं घे, व तूं पुढें जा. विवेकसंपन्न धर्मराजाचें कार्य निर्विघ्नपणें सिद्धीस जावें, असें आम्ही मनापासून इच्छितों."

राजा जनमेजया, नंतर तो महाशूर सहदेव वानरराजांपासून रत्नरूप करभार घेऊन माहिष्मती नगरीस गेला. तेथें नील राजाबरोबर सहदेवाचें घोर युद्ध झालें. राजा, त्या नील राजाला भगवान अग्नीचें साहाय्य होतें, यामुळें सहदेवाच्या सैन्यांतील हत्ती, घोडे, लोक व कवचें हीं अग्नीनें प्रदीप्त झाल्यासारखीं दिसूं लागलीं. सैन्याचा फार संहार झाला, व अगदीं प्राणांतावर प्रसंग येऊन ठेपला! राजा, असा समय प्राप्त झालेला पाहून सहदेव घाबरून गेला, व त्याच्या मुखावाटे एक शब्दही निघेनासा झाला!

जनमेजय राजा विचारितो:—हे ब्रह्मवर्या, भगवान अग्नीनें ह्या प्रसंगीं सहदेवाच्या शत्रूस कां साहाय्य

केलें बरें? महाराज, सहदेव हा युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञाकरितांच म्हणजे अग्नीच्या संतोषाकरितांच यत्न करीत होता; मग अग्नीनें त्याचें शत्रुत्व कां स्वीकारावें?

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, ह्या गोष्टीचें मूळ कारण अग्नीची परकन्यासक्ति हेंच होय. राजा, पूर्वी माहिष्मती नगरामध्यें भगवान अग्नि परदारिकेवर आसक्त झाल्याचें ऐकण्यांत आहे. ती कथा अशीः—

अग्नीची परकन्यासक्ति.

जनमेजया, नील राजाला अतिशय लावण्यवान अशी एक कन्या होती. नील राजा अग्निशाळेंत होमहवन करीत असतां अग्नीला प्रज्वलित करण्याकरितां ती कन्या आपल्या पित्यासमीप तेथें येई. राजा, त्या कन्येनें आपल्या रुचिर ओष्ठपुटांनीं त्या अग्नीला फुंकर घालावा व नंतर त्यानें प्रज्वलित व्हावें, असा तेथें क्रम चालला होता. जर ती राजकन्या आपल्या पित्यासमीप तेथें अग्नीचें धमन करण्यास आलेली नसली, तर विंझण्यानें कितीही वारा घातला तरी ती तेथें येऊन स्वतः फुंकर घालीपर्यंत तो अग्नि प्रज्वलित होत नसे!

राजा जनमेजया, अशा रीतीनें नील राजाच्या त्या कन्येवर अग्नीचें मन बसतां बसतां, अखेरीस त्या सुंदरीचा उपभोग घ्यावा अशी त्या हुताशनास वासना उत्पन्न झाली; आणि त्यानें मानवरूप धारण करून त्या रूपवतीला आपलें मनोगत कळविलें, व त्या कन्येनेंही त्यास अनुमोदन दिलें; पण नील राजाला मात्र ही गोष्ट कोणींही विदित केली नाहीं.

राजा, नंतर तो भगवान अग्नि ब्राह्मणरूप घेऊन त्या सुंदर नीलकन्येशीं यथेष्ट रममाण होऊं लागला असतां, पुढें अग्नीचें तें दुष्कृत्य धर्मनिष्ठ नील राजाला समजलें, व त्यानें त्यास यथाशास्त्र शासन केलें. परंतु त्या समयीं ब्राह्मणरूपधारी भगवान हव्यवाहन क्रुद्ध होऊन इतका प्रज्वलित झाला कीं, त्याला पाहून भयानें नील राजानें त्यापुढें साष्टांग नमस्कार घातला. पुढें कांहीं दिवस लोटल्यावर नील राजानें आपली ती कन्या प्रणिपातपूर्वक ब्राह्मणरूप धारण केलेल्या त्या अग्नीला अर्पण केली, आणि अग्नीनें त्या सुंदरीचा स्वीकार करून त्याजवर प्रसन्न चित्तानें त्यास 'वर माग' म्हणून सांगितलें. तेव्हां नील राजानें 'माझ्या सैन्यास नित्य अभय असावें' असा त्या अग्नीपाशीं वर मागितला, व त्यानें तो तात्काळ दिला. राजा जनमेजया, ह्या कारणानें, जे जे वीर त्या पुरीवर अज्ञानानें स्वारी करून जातात, त्यांस अग्नि मोठ्या बळानें जाळून टाकितो!

राजा जनमेजया, त्या माहिष्मती नगरींत ह्या गोष्टीमुळें स्त्रिया अगदीं स्वच्छंदानें वागूं लागल्या. अग्नीनें त्या स्त्रियांस जणू काय मनसोक्त वर्तनाबद्दल वरच दिला; आणि त्यामुळें पुरुषांस त्यांचें निवारण करितां येईनासें होऊन त्याच बलिष्ठ झाल्या! असो.

जनमेजया, तेव्हांपासून अग्नीस भिऊन राजे लोक त्या नगरावर चाल करून जात नाहींत. सहदेवाच्या सैन्याचा अग्नीकडून दाह होऊं लागला, व त्यामुळें तें अगदीं भयाकुल झालें, तेव्हां प्रथम कांहीं वेळ सहदेव घाबरला खरा; परंतु लवकरच त्यास त्या प्रसंगीं काय करावें हें सुचलें; व त्यानें पर्वताप्रमाणें धैर्य धरून भगवान अग्नीची स्तुति करण्याचा विचार योजिला. नंतर तो स्नान करून शुचिर्भूत झाला, व भगवान वैश्वानराची स्तुति करूं लागला.

अग्नीची स्तुति.

सहदेव म्हणालाः—हे कृष्णवर्त्मन्, माझा तुला नमस्कार असो. देवा, तुझ्या संतोषासाठींच हा सर्व प्रयत्न चालला आहे. हे पावका, देवांचें मुख तूंच होस व यज्ञ हें तुझेंच स्वरूप आहे. तूं सर्वांस पावन करितोस, ह्यामुळेंच तुला पावक हें

नांव आहे; व तूं हविर्भाग देवांना पोहोंचवितोस, म्हणूनच तुला हव्यवाहन असें म्हणतात. हे जातवेदा, वेदांची उत्पत्ति तुझ्यासाठींच झाली आहे; आणि ह्यामुळेंच तुला जातवेद ही संज्ञा मिळाली आहे. हे अग्ने, चित्रभानु, सुदेश, अनल, हुताश, ज्वलन, शिखी, वैश्वानर, पिंगेश, प्लवंग व भूरितेजस् हीं नांवें तुझ्याच स्वर्गसंचाराचें द्योतन करितात. षडाननाचें जन्म तुझ्यापासूनच झालें; व भगवान ही संज्ञा तुलाच आहे. त्याचप्रमाणें, रुद्रगर्भ तूंच असून हिरण्याची उत्पत्ति तूंच केली आहेस. हे वैश्वानरा, अग्निरूपानें तूंच मला तेज दे; वायुरूपानें तूंच मला जिवंत ठेव; पृथ्वीरूपानें तूंच मला बल दे; आणि जलरूपानें तूंच माझें कल्याण कर. देवाधिदेवा, उदकाची उत्पत्ति तुझ्यापासूनच होते; व धैर्याचा उद्गम तूंच होस. तेव्हां ह्या सर्व गोष्टी जर खऱ्या असतील, तर तूं मला पावन कर. हे नारायणा, ऋषि, ब्राह्मण, देव व असुर हे यज्ञांमध्यें नेहमीं तुलाच संतोषवीत असतात, हें जर खरें असेल, तर तूं मला पावन कर. धूमकेतु, शिखी, पापघ्न, वायुसंभव व सर्व प्राण्यांच्या ठायीं सदा वास करणारा असा जर तूंच असशील, तर तूं मला पावन कर; आणि, हे भगवंता, मी प्रेमळ व शुद्ध चित्तानें ही जी तुझी स्तुति करीत आहें, ती ग्रहण करून तूं मला तुष्टि, पुष्टि, ज्ञान व प्रेम हीं अर्पण कर !

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, हें अग्नीचें स्तोत्र पठन करून अग्नीमध्यें जो हवन करितो, त्यास सतत ऐश्वर्य प्राप्त होतें; व तो जितेंद्रिय होऊन त्याचीं सर्व पातकें दग्ध होतात.

सहदेव म्हणालाः—हे हव्यवाहना, राजसूय यज्ञास त्वां अशा प्रकारें विघ्न करावें, हें उचित नाहीं.

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, त्या माद्रीपुत्रानें असें बोलून भयभीत झालेल्या सैन्याच्या अग्रभागीं अग्नीच्या समोर दर्भ पसरले, व त्यांवर तो यथाविधि आसन घालून बसला. राजा, मग, ज्याप्रमाणें समुद्र हा मर्यादेचें उल्लंघन करून पुढें जात नाहीं, त्याप्रमाणें सहदेवरूप मर्यादेचें उल्लंघन करून अग्नि हा सैन्यास जाळण्याकरितां पुढें गेला नाहीं; आणि तो हळू हळू सहदेवाच्या समीप येऊन त्यास सांत्वनपूर्वक म्हणाला, "हे सहदेवा, ऊठ, ऊठ; केवळ तुझी परीक्षा पाहण्याकरितां मीं हें केलें. तुझा व युधिष्ठिराचा सर्व अभिप्राय मी जाणत आहें. परंतु जोंवर नील राजाचा वंश चालत आहे, तोंवर मला ह्या माहिष्मती पुरीचें रक्षण केलें पाहिजे, म्हणून हें सर्व कृत्य मीं केलें. तथापि तुझें इष्ट कार्य मी सिद्धीस नेईन."

राजा जनमेजया, अग्नीचें वचन श्रवण करून सहदेव प्रसन्न अंतःकरणानें त्या दर्भासनावरून उठला, आणि प्रणिपातपूर्वक हात जोडून अग्नीपुढें उभा राहिला. नंतर सहदेवानें अग्नीची पूजा केली, व मग तो अग्नि परत फिरला. इतक्यांत नील राजा सहदेवाच्या समीप प्राप्त झाला. त्या समयीं अग्नीच्या आज्ञेनें नील राजानें रणधुरंधर सहदेवाची पूजा करून त्याचा बहुमान केला. नंतर त्या माद्रीसुतानें नील राजाची पूजा ग्रहण करून त्यास आपल्या अंकित केलें, व अशा प्रकारें विजयी होऊन तो पुढें दक्षिण दिशेस चालता झाला.

नंतर सहदेवानें महाबलाढ्य त्रैपुर राजाला आपल्या अधीन करून घेतलें. आणि मोठ्या शौर्यानें पौरवेश्वरास जर्जर केलें. पुढें सुराष्ट्र देशाचा अधिपति कौशिकाचार्य आकृति राजा ह्याला मोठ्या प्रयासानें वश करून घेऊन तो वीरशिरोमणि सहदेव सुराष्ट्र देशांतच राहिला, आणि त्यानें भोजकट देशाच्या रुक्मी नामक थोर व बुद्धिमान राजाकडे करभार मागण्याकरितां दूत पाठविले. राजा जनमेजया, त्या धर्मात्म्या रुक्मी राजासच भीष्मक असें नांव होतें व तो राजा प्रत्यक्ष इंद्राचा सखा होता. सहदेवाचे दूत

रुक्मी राजाकडे जातांच त्यानें 'भगवान् श्रीकृष्ण हा पांडवांस साहाय्य करीत आहे,' असें मनांत आणून तात्काळ आपल्या पुत्रांसहवर्तमान मोठ्या प्रेमानें सहदेवाची आज्ञा मान्य केली, आणि कर म्हणून बहुत रत्नें त्यास अर्पिलीं.

राजा, नंतर तीं रत्नें ग्रहण करून तो वीर-श्रेष्ठ सहदेव आणखी पुढें चालूं लागला. मग शूर्पारक, तालाकट, दंडक, समुद्रद्वीपवासी म्लेच्छ, निषाद, पुरुषाद, कर्णप्रावरण, नरराक्षसयोनि, कालमुख, संपूर्ण कोल्लगिरी, सुरभिपट्टण, ताम्र-द्वीप, रामक पर्वत व तिमिंगल राजा ह्या सर्वांस त्या महाबुद्धिमान पांडुतनयानें हस्तगत करून घे-तलें. पुढें त्यानें एकपाद पुरुष, वनवासी केरळ, संजयंती नगरी, पाषंड, करहाटक, पांड्य, द्रविड, उंड्रकेरल, अंध्र, तालवन, कलिंग, उष्ट्रकार्णिक, र-मणीय आटवी पुरी व यवनपुर हीं सर्व दूतांकरवीं जिंकून त्यांजपासून करभार वसूल केला.

राजा जनमेजया, नंतर समुद्रतीरास पोहोंच-ल्यावर त्या परमचतुर व महाधार्मिक माद्रीतनयानें महात्म्या बिभीषणाकडे सलगीच्या नात्यानें दूत पा-ठविले असतां,त्या विचारी व शक्तिमान बिभीषणानें कालाच्या कृतीवर लक्ष देऊन मोठ्या प्रेमानें सह-देवाची आज्ञा मान्य केली; आणि त्याजकडे नाना-प्रकारचीं रत्नें, चंदन, अगुरु, दिव्य अलंकार, उंची वस्त्रें, मूल्यवान हिरे वगैरे उत्तमोत्तम वस्तु पाठवून दिल्या. राजा जनमेजया, ह्याप्रमाणें दाक्षिण दिशे-च्या सीमेपर्यंत पोहोंचल्यावर तो प्रतापशाली सह-देव तेथून परतला व पुनःइंद्रप्रस्थास प्राप्त झाला. राजा, ह्या प्रकारें त्या सहदेवानें कोणाकोणाशीं युद्ध करून व कोणाकोणाशीं सामोपचारानें वा-गून दक्षिण दिशेकडील सर्व राजे जिंकिले, आणि त्यांस धर्मराजाचे मांडलिक करून त्यांजपासून विपुल करभार ग्रहण केला. असो. त्या विजय-शाली सहदेवानें इंद्रप्रस्थास आल्यावर आपल्या-समवेत आणिलेली रत्नादिक सर्व संपत्ति धर्म-राजास अर्पण केली, व तो कृतार्थ होऊन सुखानें राहिला.

अध्याय बत्तिसावा.

नकुलाचा पश्चिमदिग्विजय.

वैशंपायन सांगतात:-जनमेजया, मी आतां नकुलाचीं कर्मे व त्यानें मिळविलेला विजय कथन करून, भगवान श्रीकृष्णानें जिंकिलेली पश्चिम दिशा नकुलानें कशी जिंकून घेतली त्याचें सवि-स्तर वर्णन करितों. राजा, तो महाबुद्धिमान नकुल खांडवप्रस्थांतून मोठ्या सैन्यासह संपूर्ण पश्चिम दिशा जिंकण्याच्या इच्छेनें बाहेर पडला; आणि योद्ध्यांची गर्जना, महान महान सिंहनाद, व रथचक्रनेमींचा घोष ह्यांच्या योगें वसुधेस कांपवीत पश्चिमेस गेला. पहिल्यानें तो नकुल रोहितक पर्वताप्रत प्राप्त झाला. राजा, तो रम-णीय पर्वत धनानें संपन्न, धेनूंनीं भरलेला व धान्यानें समृद्ध असा असून कार्तिकेयास मोठा प्रिय आहे त्या पर्वतावर मत्तमयूर नांवाचे शूर क्षत्रिय व पांडुपुत्र नकुल ह्यांचें घोर युद्ध झालें, आणि त्यांत नकुलानें मत्तमयूरांस जिंकिलें. पुढें त्यानें सर्व मरुभूमि, बहुधान्यक, शैरीषक व महत्थ हे देश आपल्या अधीन करून घेतले. नंतर त्याचें आक्रोश राजर्षीशीं मोठें युद्ध झालें, आणि त्यांत आक्रोशाचा पराभव होऊन तो नकुलाच्या हस्तगत झाला. मग त्या पांडुनंद-नानें दशार्ण देश जिंकिला; आणि पुढें चाल करून शिबि, त्रिगर्त, अंबष्ठ, मालव, पंच-कर्पट, मध्यमकेय, वाटधान व द्विज हे देश हस्तगत करून तो पुनः परत फिरला. नंतर त्यानें पुष्कर देशांतील अरण्यामध्यें राहणाऱ्या रानटी लोकांच्या टोळ्या जिंकून पुढें चाल केली मग त्यानें सिंधु नदाच्या कांठीं राहणारे महा बलिष्ठ ग्रामणीय, सरस्वतीच्या कांठीं वास्तव्य

करून मस्त्यादिकांवर उपजीविन करणारे शूद्र व अभीर, तसेच पर्वतावर वास करणारे लोक, सर्व पंचनद देश, अमर पर्वत, उत्तर ज्योतिष, दिव्यकटपूर व द्वारपाळ ह्यांस मोठ्या पराक्रमानें जिंकिलें. नंतर रामठ, हारहूण व पश्चिमेकडील नृप ह्या सर्वांस नकुलानें धर्मराजाच्या आज्ञेप्रमाणें हस्तगत करून घेतलें; आणि तेथें असतां त्यानें श्रीकृष्णाकडेही करभाराकरितां दूत पाठविले, व तदनुसार यादवांसहवर्तमान श्रीकृष्णानें नकुलाची आज्ञा मान्य केली. पुढें नकुलानें मद्र देशामध्यें शाकल नगरींत जाऊन आपल्या मातुलास म्हणजे शल्यास सामोपचारानें वश करून घेतलें. जनमेजया, तेथें मद्रराजानें त्या श्रेष्ठ नकुलाचा मोठा सत्कार केला, व पुष्कळ रत्नें वगैरे त्यास दिलीं. ह्याप्रमाणें मद्राधिपतीपासून करभार ग्रहण करून तो वीरपुंगव नकुल, अत्यंत भयंकर व सागरतीरीं राहणारे पल्हव, बर्बर, किरात, यवन, शक वगैरे म्लेच्छ राजांवर चालून गेला, आणि त्यानें त्यांस जिंकून त्यांजपासून रत्नरूप करभार घेतला. जनमेजया, नंतर तो चित्रविचित्र मार्ग जाणणारा कुरुश्रेष्ठ नकुल मागें परतला. ह्या समयीं त्याजपाशीं इतका धनकोश जमला होता कीं, दहा हजार उंटांनाही तो वाहून नेण्यास पंचाईत पडली ! असो. ह्याप्रमाणें पश्चिम दिशेकडील सर्व राजे जिंकून तो महापराक्रमी नकुल इंद्रप्रस्थास गेला, व त्यानें सर्व करभार युधिष्ठिरास अर्पण केला.



राजसूयिकपर्व.

अध्याय तेहतिसावा.

—:०:—

श्रीकृष्णाचें आगमन

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, धर्मराजा प्रजेचें परिपालन करीत असतां त्याच्या राष्ट्रांत उत्तम प्रकारचें सत्य वास करीत होतें; आणि संपूर्ण शत्रूंचा नाश होऊन प्रजाजन आपआपल्या कामांत निमग्न असत. तो प्रजेपासून विहित तितकाच कर घेई, व राज्यकारभार धर्मशास्त्राप्रमाणें चालवी; त्यामुळें पर्जन्य विपुल पडे व सर्व देश सुसमृद्ध असे. गोरक्षण, कृषिकर्म, व्यापार इत्यादि सर्व व्यवसाय उत्तम रीतीनें चालत; आणि ह्या सर्वांस मुख्य कारण धर्मराजाची उत्कृष्ट राज्यव्यवस्था हेंच होय.

जनमेजया, युधिष्ठिर राज्य करीत असतां सत्य इतकें उत्तम नांदत होतें कीं, चोर, वंचक व राजाच्या प्रीतींतले दुष्ट लोक ह्यांनींही असत्याचा त्याग केला होता. त्यांच्यामध्यें आपसांत किंवा दुसऱ्यांशीं कोणत्याही प्रकारचें अयोग्य आचरण होत नसे. त्या महाधार्मिक युधिष्ठिराच्या राज्यांत अवृष्टि, अतिवृष्टि, रोगांच्या सांती व अग्नीचें भय हीं सर्व नष्ट झालीं होतीं. युद्धादिकांच्या योगें प्रजांचा नाश व्हावा व त्यामुळें विनाकारण राष्ट्रीय आपत्ति उद्भवावी, हें तेथें बिलकूल घडेनासें झालें. राजे लोक, आपलें राज्य सोडून बाहेर जावयाचें झाल्यास—ते केवळ एकमेकांस भेटावें, व अवश्य तो करभार धर्मराजास अर्पण करावा—इतक्याच उद्देशानें ते जात असत; परदेश हरण करण्यासाठीं किंवा दुसऱ्या कांहीं स्वार्थाकरितां ते केव्हांही बाहेर जात नसत.

जनमेजया, युधिष्ठिराच्या धार्मिक राज्यव्यवस्थेमुळें त्याच्यापाशीं धनसंपत्ति अतिशयित वाढली होती. शेंकडों वर्षें जरी तिचा व्यय केला असता, तरी ती वेंचली नसती. धनसंपत्तीप्रमाणें धान्याचा संग्रह, वस्त्रादिकांचा पुरवठा, व इतर अनेक वस्तु ह्यांचीही अत्यंत समृद्धि झाली होती. तेव्हां ह्या सर्व साधनांचा योग्य उपयोग व्हावा, असें मनांत आणून धर्मराजानें राजसूय यज्ञ करण्याचा विचार ठरविला. त्याचे जे आप्तसुहृद् होते; ते सर्व पृथक्पणें जमून त्यास हेंच सांगू लागले कीं, “राजा, ह्या समयीं त्वां राजसूय क्रतुच करावा; हेंच कर्म प्रस्तुत तुला उचित आहे.” ह्याप्रमाणें धर्मराजाचे आप्तसुहृद् सल्ला देत आहेत, इतक्यांत पुराण ऋषि, वेदात्मा, केवळ ज्ञात्यांना मात्र जाणतां येणारा, स्थावरजंगम विश्वाचा अधिपति, जगाचा उत्पादक व संहारक, त्रैकालिक कार्यांचा ईश, केशि दैत्याचा नाश करणारा, यादवांचें संरक्षण करणारा केवळ दुर्गच, भक्तांची आपत्ति हरण करणारा व त्यांच्या शत्रूंचा उच्छेदकर्ता भगवान श्रीकृष्ण हा, द्वारकेंत सेनापतीच्या पदावर वसुदेवाची स्थापना करून व तिकडील सर्व व्यवस्था उत्तम लावून इंद्रप्रस्थास प्राप्त झाला. त्यानें येतांना लहान मोठा सर्व धनकोश व मोठें सैन्य हीं धर्मराजाकरितां बरोबर आणिलीं होतीं. जनमेजया, श्रीकृष्णाच्यासमवेत असलेला तो धनसंचय म्हणजे रत्नांचा केवळ अक्षय्य व अगाध असा सागरच होता! असो. अशा मोठ्या अवाढव्य संपत्तीसह भगवान यादवाधीश श्रीकृष्ण, रथांच्या घोषानें आकाश दणाणून टाकीत त्या श्रेष्ठ इंद्रप्रस्थांत प्रविष्ट झाला; आणि आधींच अपरंपार असलेल्या धर्मराजाच्या धनभांडागारांत आणखी भर टाकून त्यानें त्या योगें शत्रूंस अधिकच भीति उत्पन्न केली! राजा जनमेजया, अंधकारग्रस्त प्रदेशावर सूर्यप्रकाश पडला असतां, किंवा निर्वात प्रदेशीं वायूची झुळूक आली असतां जसा अत्यंत आनंद होतो,

तसा आनंद इंद्रप्रस्थ नगरांत भगवान श्रीकृष्णाची स्वारी प्राप्त झाली तेव्हां सर्व पौरजनांस झाला! राजा जनमेजया, भगवंतांची स्वारी आल्याचें श्रवण करून धर्मराजास अत्यंत समाधान वाटलें, आणि त्यानें सामोरें जाऊन त्यांचा यथाविधि सत्कार केला; व ह्यांस राजमंदिरांत आणून कुशलप्रश्न वगैरे विचारल्यावर ते सुखानें स्थित असतां, धौम्यद्वैपायनादि ऋत्विज व भीमार्जुनादि भ्राते ह्यांच्यासमवेत धर्मराजानें भगवंतांशीं असें भाषण केलें.

युधिष्ठिर म्हणाला:—देवा श्रीकृष्णा, तुझ्यामुळें ही सर्व पृथ्वी माझ्या हस्तगत झाली आहे; आणि तुझ्या कृपेमुळेंच हें सर्व विपुल धन मला प्राप्त झालें आहे. ह्यास्तव, हे देवकीसुता, ह्या सर्व धनाचा, अग्नीच्या व ब्राह्मणवर्यांच्या संतोषाकरितां विनियोग करावा, अशी माझी इच्छा आहे; आणि ह्यासाठीं तुझ्या व भीमादिक भ्रात्यांच्या साहाय्यानें राजसूय यज्ञ करण्याचा माझा विचार आहे, तर ह्या गोष्टीला तुझी आज्ञा मिळावी. अथवा, हे अनंतवीर्या श्रीकृष्णा, तूं स्वतांच यज्ञदीक्षा घे. देवाधिदेवा, तुझ्या हातून जर हा यज्ञ घडला, तर माझीं सर्व पातकें दग्ध होतील. हे श्रीकृष्णा, जर असें करणें तुला इष्ट वाटत नसेल, तर मग ह्या भ्रात्यांसमवेत मला यज्ञ करण्याची आज्ञा कर. हे लोकनायका, तुझी आज्ञा मिळाल्यानें माझा हा क्रतु यथासांग सिद्धीस जाईल.

वैशंपायन सांगतात:—राजा जनमेजया, युधिष्ठिराची प्रार्थना ऐकून भगवान श्रीकृष्णानें त्याची फार स्तुति केली.

श्रीकृष्ण म्हणाला:—हे राजशार्दूला युधिष्ठिरा, तूंच सार्वभौम नृपति राजसूय क्रतु करण्यास योग्य आहेस; ह्यास्तव तूं तो महाक्रतु कर, म्हणजे आम्ही कृतार्थ होऊं. राजा, तुझें कल्याण करण्यास मी तुझ्या समीप उभा आहें, ह्यासाठीं तूं आपल्या मनोदयाप्रमाणें यज्ञ कर. यज्ञांत मला कोणतेंही काम सांग, मी तुझ्या वचनाप्रमाणें तें पार पाडीन.

युधिष्ठिर म्हणाला:—श्रीकृष्णा, माझा संकल्प सिद्धीस गेला, आतां मला सिद्धि प्राप्त झाली; कारण, हृषीकेशा, मी जें सांगेन तें करण्यास जर तूं सिद्ध आहेस, तर मी आरंभिलेल्या कार्यांत विघ्नें कशीं येतील बरें?

यज्ञसामग्रीसंपादन.

वैशंपायन सांगतात:—राजा जनमेजया, ह्याप्रमाणें श्रीकृष्णाकडून अनुमोदन मिळतांच, भ्रात्यांसह युधिष्ठिरानें राजसूय यज्ञ करण्यासाठीं साधनें जमविण्याचा प्रारंभ केला. नंतर त्या रिपुसंहारक युधिष्ठिरानें महाधनुर्धर सहदेवास व सर्व अमात्यांस आज्ञा केली कीं, 'ह्या क्रतूची सांगोपांग सिद्धि होण्याकरितां ब्राह्मणवर्य जीं जीं साधनें संपादन करण्याविषयीं आज्ञा करतील, तीं तीं सर्व साधनें तुम्ही मिळवा, व सर्व मंगलप्रद गोष्टी सिद्ध ठेवा; आणि त्याप्रमाणेंच, ह्या यज्ञासंबंधानें धौम्य गुरु जी जी सामुग्री आणा म्हणून सांगतील, ती ती सर्व सामुग्री सेवकांकडून फार लवकर, योग्य प्रकारें व क्रमवार आणून त्यांच्या स्वाधीन करा. माझें मत असें आहे कीं, इंद्रसेन, विशोक व अर्जुनसारथि पूरु ह्यांस तुम्ही अन्नादिक आणण्याचें काम सांगावें; आणि त्यांनीं ब्राह्मणांस मनापासून आवडतील असे सरस व स्वादिष्ट भक्ष्यभोज्य पदार्थ सिद्ध ठेवावे.'

वैशंपायन सांगतात:—राजा जनमेजया, युधिष्ठिराची आज्ञा श्रवण करितांच वीरशिरोमणि सहदेवानें, 'महाराज, सर्व यथास्थित तयारी आहे,' असें धर्मराजास निवेदन केलें. राजा जनमेजया, नंतर सत्यवतीसुत भगवान वेदव्यासांनीं, साक्षात् मूर्तिमान वेदच अशा महाभाग द्विजांची ऋत्विजांच्या अधिकारावर योजना केली. कृष्णद्वैपायनांनीं त्या यज्ञांत स्वतः ब्रह्मत्व स्वीकारिलें. धनंजय गोत्रांतील विप्रोत्तम मुनि सुसाम हे उद्गाते झाले.

वेदवेदांगपारग याज्ञवल्क्य ऋषि मुख्य अध्वर्यु बनले. धौम्य व वसुपुत्र पैल ह्यांनीं होतृकर्म पतकरिलें; आणि ह्या सर्वांचे वेदवेदांगनिपुण सर्व शिष्य व पुत्र हे होत्रग झाले. नंतर त्या सर्व ब्रह्मवर्यांनीं पुण्याहवाचन करून यज्ञकर्माचा संकल्प केला, आणि यज्ञशालेकरितां वगैरे उत्कृष्ट भूमीचें यथाशास्त्र पूजन केलें; आणि पुढें शिल्पी लोकांस आज्ञा झाल्यावर त्यांनीं देवांच्या मंदिरांप्रमाणें विशाल व सुगंधि अशीं पत्नीशाला आदिकरून गृहें तेथें बांधिलीं.

राजा जनमेजया, ह्याप्रमाणें सर्व सिद्धता झाल्यावर तात्काळ राजश्रेष्ठ युधिष्ठिरानें मंत्री सहदेव ह्यास, 'आतां तूं आमंत्रण करण्यासाठीं शीघ्रगामी दूत फार त्वरित पाठव.' अशी आज्ञा केली; व तिजप्रमाणें ताबडतोब 'सर्व राष्ट्रांतील ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व सन्मान्य शूद्र ह्या सर्वांस लवकर बोलावून आणा.' असें सांगून सहदेवानें सर्वत्र दूत पाठविले.

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, सहदेवाच्या आज्ञेनें ते शीघ्रगामी दूत देशोदेशीं गेले, आणि ब्राह्मणादिकांस आमंत्रणें देऊन, व दुसऱ्याही इतर आप्तस्वकीयांस आमंत्रणें करून त्यांस फार सत्वर घेऊन आले.

राजा जनमेजया, नंतर राजसूय यज्ञ करण्यास उद्युक्त झालेल्या त्या विप्रांनीं यथाकाळीं कुंतीपुत्र युधिष्ठिराला यज्ञदीक्षा दिली; व तो यज्ञशाळेंत गेला. राजा, त्या समयीं धर्मराजाबरोबर सहस्रावधि ब्राह्मण, भ्राते, आप्त, सुहृद्, सचिव, नानाविध देशांहून आलेले क्षत्रिय राजे व अमात्य वगैरे मंडळी होती; आणि ह्यामुळें, ह्या सर्व परिवारासह प्रत्यक्ष मूर्तिमान धर्मच त्या यज्ञशाळेंत जातो आहे, असें सर्वांस वाटलें!

राजा जनमेजया, धर्मराजाच्या राजसूय यज्ञाकरितां सर्व विद्यांत निष्णात व वेदवेदांगांत प्रवीण असे ब्राह्मण अनेक देशांहून आले होते; व त्यांच्यासाठीं युधिष्ठिराच्या आज्ञेवरून शिल्पी लोकांनीं सहस्रावधि गृहें विपुल अन्नाच्छादनांनीं युक्त व सर्व ऋतूंतील गुणांनीं संपन्न अशीं, वेगळ्या वेगळ्या समुदायाकरितां पृथक् पृथक् सिद्ध केलीं होतीं. जनमेजया, युधिष्ठिरानें आदरसत्कार करून त्या ब्राह्मणांस त्या गृहांत राहण्यास सांगितलें होतें, आणि ते त्याप्रमाणें तेथें राहून नटनर्तकांच्या क्रीडा अवलोकन करीत व बहुत कथा एकमेकांस सांगत मोठ्या आनंदानें काळ घालवीत होते. राजा, त्या स्थळीं ते महात्मे ब्राह्मण भोजन, संभाषण वगैरे करीत असतां एकसारखी गजबज ऐकूं येत असे; आणि 'ह्यांस द्या, द्या,' आणि 'वाढा,वाढा,' अशा प्रकारचे शब्द मात्र नित्य कानीं पडत. राजा जनमेजया, त्या प्रसंगीं लक्षावधि गाई, सुवर्णाच्या शय्या, दासी वगैरे धर्मराजानें ब्राह्मणांस पृथक् पृथक् दिल्या, आणि अशा मोठ्या थाटानें स्वर्गांतील इंद्राच्या यज्ञाप्रमाणें त्या वीरशिरोमणि धर्मराजाचा यज्ञ सुरू झाला. राजा, नंतर युधिष्ठिरानें भीष्म, द्रोण, धृतराष्ट्र, विदुर, कृप, सर्व भ्राते व इतर जे आपल्यावर प्रेम करीत असत त्या सर्वांस बोलावून आणण्याकरितां हास्तिनापुरास नकुलाला पाठविलें.

अध्याय चौतिसावा.

निमंत्रित राजांचें आगमन.

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, धर्मराजाच्या आज्ञेप्रमाणें तो रणधुरंधर नकुल हस्तिनापुरास गेला; आणि त्यानें भीष्म, धृतराष्ट्र इत्यादि सर्व मंडळीस बहुमानपुरःसर निमंत्रण केलें. नंतर ती सर्व मंडळी, द्रोणाचार्यादिक द्विजवर्यांस पुढें घालून, मोठ्या आनंदानें इंद्रप्रस्थास आली. जनमेजया, धर्मराज युधिष्ठिर राजसूय यज्ञ करीत आहे, असें ऐकून इतर शतावधि यज्ञवेत्ते पुरुष उल्लसित चित्तानें त्या

समारंभासाठीं प्राप्त झाले. तसेंच, धर्मराजास प्राप्त झालेली ती सभा व यज्ञदीक्षा घेतलेला तो युधिष्ठिर ह्यांस अवलोकन करावें म्हणून देशोदेशांहून सर्व क्षत्रिय नानाविध महान महान रत्नें बरोबर घेऊन इंद्रप्रस्थास आले. धृतराष्ट्र, भीष्म, महामति विदुर, दुर्योधनादिक सर्व भ्राते, गांधारराज सुबल, महाबल शकुनि, अचल, वृषक, रथिश्रेष्ठ कर्ण, बलिष्ठ शल्य, महाबल बाल्हीक, कुरुकुलोत्पन्न सोमदत्त, भूरि, भूरिश्रवा, शल, अश्वत्थामा, कृप, द्रोण, सिंधुदेशाधिप जयद्रथ, पुत्रांसहित द्रुपद, शाल्व राजा, प्राग्ज्योतिषाधिप भगदत्त, समुद्रतीरीं अनूप देशांत वास करणारे म्लेच्छ राजे, पर्वतदेशीय भूप, बृहद्बल राजा, पौंड्रकराज वासुदेव, वंग, कलिंग, आकर्ष, कुंतल, मालव, आंध्र, द्रविड व सिंहल ह्या देशांचे राजे, काश्मीर देशाचा राजा, महापराक्रमी कुंतिभोज राजा, गौरवाहन राजा, बाल्हीक राजे व दुसरे त्या दिशेचे अनेक शूर राजे, पुत्रांसहवर्तमान विराट राजा, महाबल मावेल्ल राजा, आणि दुसरे नाना देशचे राजे व राजपुत्र, पुत्रासह बलाढ्य शिशुपाल, तसेच बलराम, अनिरुद्ध, सारणासहित कंक, गद, प्रद्युम्न, सांब, वीर्यवान चारुदेष्ण, उल्मुक, निशठ, वीर अंगावह व इतर सर्व महारथ यादव हे व मध्यदेशांतील दुसरे पुष्कळ राजे धर्मराजाचा यज्ञसमारंभ पाहण्याकरितां इंद्रप्रस्थास मिळाले होते.

राजा जनमेजया, धर्मराजाच्या आज्ञेनें अधिकाऱ्यांनीं त्या सर्वांस राहण्याकरितां, भक्ष्यभोज्य पदार्थांनीं सुसमृद्ध आणि वापी व वृक्ष ह्यांनीं सुसंपन्न अशीं सुंदर सुंदर गृहें नेमून दिलीं. पुढें धर्मराजानें स्वतः त्यांची पूजा व आदरातिथ्य केलें, आणि नंतर ते सर्व महात्मे आपआपल्या गृहांत जाऊन राहिले. राजा, तीं गृहें कैलास पर्वतासारखीं उंच असून रुचिर वस्तूंनीं शृंगारल्यामुळें मोठीं मनोहर झालीं होतीं. त्यांच्या सभोंवतीं श्वेतवर्णाचे उंच प्राकार (कोट) उत्तम प्रकारें बांधिले होते. त्यांतील भूमि रत्नखचित असून त्यांत सभोंवार सुवर्णाच्या जाळ्या केल्या होत्या. सुखानें आरोहण करितां यावें म्हणून त्यांत उत्तम उत्तम पायऱ्या केल्या असून बहुमोल आस्तरणें व पडदे ह्यांची तेथें विपुलता होती. पुष्पमालांनीं तीं गृहें अगदीं झांकून काढिलीं असून, त्यांत उत्तम अगुरु चंदनाचा सुवास एकसारखा चालू होता. तीं हंसाप्रमाणें किंवा चंद्राप्रमाणें शोभत असून एका योजनावरूनही दृग्गोचर होत असत. त्यांचीं द्वारें सारखीं असून त्यांत विपुल जागा व लहान मोठ्या सर्व सोई होत्या; आणि हिमालयाच्या शिखरांप्रमाणें त्यांच्या भिंती अनेक प्रकारच्या धातूंनीं बनविलेल्या होत्या. राजा जनमेजया, अशा प्रकारच्या सुसंपन्न गृहांत जाऊन ते राजे उतरले; आणि नंतर त्यांनीं धर्मराजास जेव्हां जेव्हां अवलोकन केलें, तेव्हां तेव्हां तो अनेक सदस्यांनीं परिवेष्टित असून पुष्कळ दक्षिणा वांटीत आहे असेंच त्यांच्या दृष्टीस पडे. पारिक्षिता, महर्षींनीं, ब्राह्मणांनीं व राजांनीं गजबजून गेलेला तो यज्ञमंडप, अमरांनीं गजबजून गेलेल्या स्वर्गमंडलाप्रमाणें शोभत होता !

अध्याय पस्तिसावा.

—:०:—

यज्ञानुष्ठान.

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, युधिष्ठिर हा भीष्मादिकांस सामोरा गेल्याबद्दल मीं तुला पूर्वीं सांगितलेंच आहे. नंतर त्यानें हस्तिनापूरच्या गुरुजनांस अभिवंदन करून भीष्म, द्रोणाचार्य, कृपाचार्य, अश्वत्थामा, दुर्योधन व विविंशति ह्यांस म्हटलें कीं, "आपण सर्वांनीं ह्या यज्ञांत माझ्यावर सर्व प्रकारें अनुग्रह करावा. येथें हें जें माझें विपुल धन आहे, तें आपलेंच होय.

ह्यास्तव माझी आपणांस इतकीच प्रार्थना आहे कीं, आपल्या इच्छेस येईल, ती आज्ञा तुम्ही मला करा."

राजा जनमेजया, ह्याप्रमाणें भाषण करून, यज्ञासाठीं दीक्षा घेतलेल्या धर्मराजानें त्या सर्वांना यथायोग्य अधिकारावर नेमिलें. त्यानें भक्षभोज्याच्या कामावर दुःशासनाची योजना केली; ब्राह्मणांचें स्वागत करण्याचें काम अश्वत्थाम्याला सांगितलें; राजांचें आदरातिथ्य संजयावर सोंपविलें; आणि कोणतीं कामें झालीं, व कोणतीं कामें राहिलीं, हें पाहण्यासाठीं महाबुद्धिमान भीष्म व द्रोण ह्यांची प्रार्थना केली. उत्तम सुवर्ण व रत्नें ह्यांवर नजर ठेवणें आणि दक्षिणा वगैरे अर्पण करणें ह्या कामावर कृपाचार्यांस नेमिलें; आणि ह्याप्रमाणेंच इतर सर्व कामांवर तदनुसार योग्य कारभाऱ्यांची योजना केली.

राजा जनमेजया, बाल्हीक, धृतराष्ट्र, सोमदत्त, जयद्रथ वगैरे नकुलानें हस्तिनापुरांतून आणिलेली मंडळी यजमानासारखीच वागत असे. सर्व धर्म जाणणारा विदुर खर्च करण्याच्या कामावर होता; व अहेर गोळा करण्याचें काम दुर्योधन पाहत होता. सर्व लोकांनीं परिवेष्टित असलेला व उत्तम फलाची आकांक्षा करणारा भगवान श्रीकृष्ण स्वतः ब्राह्मणांचें पादप्रक्षालन करीत होता!

राजा जनमेजया, धर्मराजा व त्याची सभा हीं पाहावीं म्हणून तेथें जे राजे आले होते, त्यांपैकीं एकानेंही सहस्रापेक्षां कमी किंमतीचा अहेर आणिला नव्हता. जो तो बहुविध रत्नें अर्पण करून धर्मराजाची संपत्ति वाढवीत होता. युधिष्ठिराचा राजसूय क्रतु केवळ माझ्या संपत्तीनेंच कसा सिद्धीस जाईल, अशी ईर्षा तेथें प्राप्त झालेल्या प्रत्येक राजास उत्पन्न झाली होती; आणि त्यामुळें प्रत्येक राजा इतरांपेक्षां अधिक संपत्ति मी देईन अशी स्पर्धा करून धर्मराजास अहेर समर्पीत असे!

राजा जनमेजया, युधिष्ठिराच्या त्या दिव्य यज्ञशालेचें वर्णन काय करावें? तेथें उत्तम उत्तम मंदिरें असून त्यांचीं शिखरें अंतरिक्षांत संचार करणाऱ्या देवविमानांस भिडलेलीं होतीं. त्या यज्ञमंडपाच्या भोंवतालीं मोठमोठे बुरूज व मनोरे असून त्यांवर रक्षकांचा पहारा होता. वरतीं आकाशांत देवांचीं विमानें उतरलीं होतीं. त्या मंडपांत ब्राह्मणांचे अनेक आश्रम होते. इतर लोकांकरितांही त्यांत विमानतुल्य अनेक सुंदर सदनें बांधिली होतीं; आणि तीं सर्व गृहें रत्नादिकांनीं व इतर समृद्धीनें युक्त असल्यामुळें त्यांची मनोहर कांति चोहोंकडे झळाळत होती. जनमेजया, असा तो दिव्य यज्ञमंडप महान महान सुसंपन्न राजांनीं गजबजून गेला होता; व त्यामुळें, ऐश्वर्यानें धर्मराजा वरुणाशींच स्पर्धा करीत आहे, असा भास होत होता! असो.

राजा जनमेजया, अशा प्रकारें सर्व सिद्धता झाल्यावर युधिष्ठिरानें सहा अग्नींला आहुति देऊन तो राजसूय यज्ञ शेवटास नेला, व ब्राह्मणांस अतिशयित दक्षिणा दिली. नंतर त्यानें यज्ञसमारंभासाठीं प्राप्त झालेल्या लोकांच्या सर्व इच्छा परिपूर्ण करून त्यांस विपुल भक्ष्यभोज्य पदार्थ अर्पिले, आणि त्यांस नानाविध रत्नें वगैरे देऊन संतुष्ट केलें. जनमेजया, मंत्र, शिक्षा व अनुष्ठान ह्यांत विशारद असलेल्या ऋत्विजांनीं इडा, घृत व सोम ह्यांच्या आहुति देऊन वैश्वानराची तृप्ति केली, आणि त्या योगें त्या यज्ञांत देव संतुष्ट झाले; आणि ह्याप्रमाणें त्या यज्ञांत देव जसे तृप्त झाले, तसे अन्न, दक्षिणा व विपुल धन ह्यांच्या योगें ब्राह्मण व इतर सर्व लोकही तृप्त झाले.

अर्घाभिहरणपर्व.

अध्याय छत्तिसावा.

श्रीकृष्णाची अग्रपूजा.

वैशंपायन सांगतात:—राजा जनमेजया, नंतर राजसूय यज्ञाच्या अंगभूत असलेल्या सोमयागाच्या दिवशीं महान महान सत्पात्र ब्राह्मण राजेलोकांसहवर्तमान अंतर्वेदीमध्यें प्रविष्ट झाले. त्या समयीं नारदप्रमुख महात्मे राजर्षींसह तेथें स्थित असतां, जणू काय ब्रह्मसभेंत देव व देवर्षिच स्थित आहेत, अशी शोभा दिसूं लागली ! तेथें यज्ञानुष्ठानाच्या मध्यंतरीं जी फुरसत मिळाली, तींत महातेजस्वी ब्रह्मवर्य अनेक विषयांचें प्रतिपादन करूं लागले. कांहींनीं म्हणावें 'ही गोष्ट अशी आहे.' व कांहींनीं म्हणावें 'ही गोष्ट अशी नाहीं.' त्यावर पहिल्या पक्षानें म्हणावें, 'ही गोष्ट अशी असलीच पाहिजे.' व दुसऱ्या पक्षानें म्हणावें 'ही गोष्ट अशी असावयाची नाहींच.' अशी तेथें पुष्कळ 'भवति न भवति' झाली. त्या सभेंत कित्येक पंडित शास्त्रवचनांचे आधार दाखवून दुर्बळ गोष्टी सबळ करीत, व कित्येक आपल्या अंगच्या दौर्बल्यानें सबळ गोष्टींनाही दुर्बलत्व आणीत; आणि आकाशांत आमिष सांपडलें असतां श्येन पक्षी जसे त्यावर झडप घालून त्याचा विध्वंस उडवितात, तसे कित्येक महाबुद्धिमान पुरुष साधार गोष्टीवर सुद्धां झडप घालून तिचा विध्वंस उडवीत ! राजा जनमेजया, त्या सभेंत कित्येक लोक धर्म व अर्थ ह्यांत कुशल होते; कित्येक महान महान व्रतें आचरणारे होते; आणि कित्येक भाष्यादि ग्रंथांत निष्णात असून संभाषण करण्यांतच व्यग्र होते. सारांश, राजा, नक्षत्रांच्या समुदायांनीं ज्याप्रमाणें आकाश शोभतें, त्याप्रमाणें वेदपारग देवांच्या, द्विजांच्या व महर्षींच्या समुदायांनीं ती यज्ञवेदी शोभत होती. राजा जनमेजया, त्या अंतर्वेदीमध्यें युधिष्ठिराच्या सन्निधभागीं कोणीही शूद्र अथवा व्रतहीन द्विज नव्हता. असो. त्या विवेकसंपन्न व महाभाग्यवान धर्मराजाचें ऐश्वर्य व यज्ञानुष्ठान अवलोकन करून भगवान नारद मुनींस मोठा संतोष झाला; परंतु त्या स्थलीं सर्व क्षत्रियांचा समुदाय पाहून मात्र त्यांस चिंता पडली ! जनमेजय राजा, श्रीकृष्णाचा अवतार होण्याच्या आधीं ब्रह्मसभेमध्यें जी गोष्ट घडली होती, तिचें त्यांस स्मरण झालें; आणि 'ह्या सभेंत बसलेले हे सर्व देवच आहेत,' असा त्यांनीं उद्गार काढिला. नंतर नारदांनीं भगवान महाविष्णूचें ध्यान केलें आणि म्हटलें, "अहो, दैत्यांचा व शत्रूंचा नाश करणारा तो साक्षात् भगवान सर्वव्यापक नारायणच, भूभार हरण करण्याची आपली प्रतिज्ञा शेवटास नेण्याकरितां क्षत्रियकुलांत अवतीर्ण झाला आहे. अहो, पूर्वी ह्या विश्वोत्पादक प्रभूनेंच देवांस सांगितलें होतें कीं, 'तुम्ही एकमेकांचा वध कराल व पुन: स्वर्गलोकीं याल.' अहो, हा भगवान नारायणच ब्रह्मदेव व शंकर होय; ह्यानेंच सर्व देवांना भूलोकीं जन्म घेण्याची आज्ञा केली व आपण स्वत: यदुगृहीं अवतार घेतला. अहो, नक्षत्रांमध्यें ज्याप्रमाणें चंद्र, त्याप्रमाणें यादवांमध्यें हा कुलदीपक श्रीकृष्ण आपल्या दिव्य वैभवानें शोभत आहे. अहो, ज्याच्या बाहुबलानें इंद्रप्रमुख सर्व देवांस बाहुबल प्राप्त होतें, तो शत्रुनाशक श्रीहरि मनुष्यासारखा ह्या भूतलावर वागत आहे ! अहो, हें प्रत्यक्ष स्वयंभू परब्रह्मच श्रीकृष्णस्वरूपानें आपल्यापुढें उभें आहे ! आतां हें पुन: महाबलिष्ठ क्षात्रसमुदायाचा आपसांत कलह उत्पन्न करून संहार करणार आहे !"

जनमेजया, भगवान नारद ऋषींना ह्याप्रमाणें चिंता पडली; आणि यज्ञादिकांनीं ज्याची पूजा करावयाची, तो भगवान नारायण ईश्वरच हा

श्रीकृष्ण होय, असा त्यांचा निश्चय झाला. राजा, त्या महाबुद्धिमान युधिष्ठिराच्या त्या महायज्ञांत, धर्मवेत्त्यांत अत्यंत श्रेष्ठ अशा त्या नारद मुनींस फारच बहुमान मिळत असे.

राजा जनमेजया, यज्ञानुष्ठान आटोपल्यावर भीष्मानें धर्मराज युधिष्ठिराला म्हटलें, "हे धर्मा, आतां राजांची यथोचित पूजा कर. युधिष्ठिरा, आचार्य, ऋत्विज्, आप्त, स्नातक, मित्र व नृप हे सहाजण पूजार्ह होत. हे प्रत्येक संवत्सरास प्राप्त झाले असले, तरी त्यांची पूजा करावी. मग ज्या अर्थी हे किती तरी वर्षांनीं येथें आले आहेत, त्या अर्थी ह्यांतील प्रत्येकाची पूजा केली पाहिजे, हें उघड आहे. धर्मराजा, ह्या सर्वांत जो वरिष्ठ असेल, त्याची तर आधीं पूजा करावी."

युधिष्ठिर म्हणालाः—अहो पितामह, ह्या मंडळीपैकीं कोणाची पूजा मीं प्रथम करावी, तें मला सांगा.

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, युधिष्ठिराचा प्रश्न श्रवण करून महाबलवान शांतनुपुत्र भीष्म ह्यानें नीट विचार केला, व 'वृष्णिकुलोत्पन्न श्रीकृष्ण ह्याच ह्या सर्व भूतलावर पूज्यतम होय,' असा आपला अभिप्राय धर्मराजाला सांगितला. आणखी त्यानें असेंही सांगितलें कीं, "सर्वांमध्यें एक सुद्धां तेज, बल व पराक्रम ह्या गुणांनीं श्रीकृष्णाची बरोबरी करणारा नाहीं. नक्षत्रांत जसा सूर्य, तसा ह्या सर्व जनांमध्यें श्रीकृष्णच होय. अहो, अंधकारग्रस्त प्रदेशावर सूर्याचा प्रकाश पडावा, किंवा निर्वात प्रदेशीं वाऱ्याची झुळूक वाहावी, तद्वत् ह्या यज्ञमंडपावर श्रीकृष्णरूप सूर्याचा प्रकाश पडला आहे, किंवा वाऱ्याची झुळूक वाहात आहे."

राजा जनमेजया, ह्याप्रमाणें भीष्माकडून अनुमोदन मिळतांच प्रतापवान सहदेवानें वृष्णिकुलोत्पन्न श्रीकृष्णाची उत्तम प्रकारें यथाविधि पूजा केली, आणि श्रीकृष्णानें यथाशास्त्ररीत्या त्या पूजेचा अंगीकार केला. परंतु सहदेवानें श्रीकृष्णाची प्रथम पूजा केली ही गोष्ट शिशुपालाला सहन झाली नाहीं, आणि त्या महाबलाढ्य चेदिराजानें भीष्म, युधिष्ठिर व श्रीकृष्ण ह्या सर्वांचा त्या सभेंत उपहास केला!

अध्याय सदतिसावा.

—:०:—

शिशुपालाचा क्रोध.

शिशुपाल म्हणालाः—हे धर्मराजा, येथें मोठमोठे भूपति अधिष्ठित असतां तूं राजेलोकांप्रमाणें ह्या यदुकुलोत्पन्न कृष्णाची पूजा करावीस, हें योग्य नव्हे. अरे, ह्याची योग्यता राजेलोकांप्रमाणें आहे काय? तेव्हां अशा समयीं तूं केवळ आपल्याच इच्छेनें पांडवांस अनुचित असें निंद्य आचरण करावेंस, हें अगदीं गर्ह्य होय. अहो पांडुपुत्रांनो, तुम्ही अद्यापि अज्ञान बालकें आहां; धर्म हा फार सूक्ष्म आहे; आणि हा मंदबुद्धि भीष्म तर अगदींच भ्रमिष्ट झाला आहे! हे कुंतीपुत्रा, कृष्णाची व्यर्थ महती वाढविण्याची वासना धरून हा भीष्म तुझ्याप्रमाणेंच अधर्माचरण करण्यास प्रवृत्त झाला आहे; पण ह्या त्याच्या दुर्वर्तनानें सत्पुरुषांकडून त्याची अधिकाधिक हेलना होईल, हें पक्कें लक्षांत ठेव. अरे, तुम्हीं ह्या दाशार्ह कृष्णाची राजेलोकांमध्यें आधीं पूजा केली, परंतु हा राजा तरी आहे कीं नाहीं, ह्याचा विचार केलात काय? पहा—ज्याला राजा हें नांव सुद्धां नाहीं, त्याची सर्व राजांमध्यें प्रथम पूजा होते, हें केवढें साहस! हे पांडुतनया, कृष्ण हा राजा नसला तरी सर्व सभाजनांत तो वृद्ध आहे, असें समजून मीं त्याची पूजा केली, असें तुझें म्हणणें असल्यास तेंही सत्य नाहीं; कारण, वृद्ध वसुदेव येथें स्थित असतां, त्याचा पुत्र त्याच्या आधीं पूजेला कसा पात्र होईल बरें? अहो, द्रुपद राजा

येथें अधिष्ठित असतां पांडवांनीं कृष्णास अग्रपूजा समर्पावी, व कृष्णानें ती स्वीकारावी, ह्यांत दोघांचेही हातून प्रमाद घडले आहेत; पांडव हे पूजा करण्यास सिद्ध झाले, तरी कृष्णानें ती अवश्य नाकारावयास पाहिजे होती !

हे पृथापुत्रा, कृष्ण हा आपला आचार्यच होय, असें तूं मानितोस काय? जर असें असेल, तर येथें द्रोणाचार्य बसले आहेत ते कोण? अरे, द्रोणाचार्यांच्या पूर्वी कृष्णाची पूजा करावी, हा विचार तुला कसा रुचला बरें? अथवा, हे कुरुनंदना, कृष्ण हा ऋत्विज् आहे, अशी तुझी समजूत आहे काय? बरें तर, वृद्ध व्यास येथें बसलेले असतां, त्यांची पूजा करावयाची सोडून ह्या तरुण ऋत्विजाची पूजा करावीस, हें तरी अनुचितच होय. अरे, मृत्यूलाही आपल्या इच्छेच्या अधीन ठेवणारा भीष्म येथें असतां तूं त्यास न पूजितां कृष्णाला पूजिलेंस, तेव्हां तुला म्हणावें तरी काय? हे कौरवेश्वरा, सर्वशास्त्रपारंगत महाबलिष्ठ अश्वत्थामा येथें असतांना त्वां त्याची पूजा आधीं करावयास नको होती काय? अरे, राजाधिराज पुरुषश्रेष्ठ दुर्योधन ह्या सभेंत आहे, हें तुला माहीत नाहीं काय? तसेच भारतकुलाचे आचार्य कृप येथें प्रत्यक्ष विराजत असतां त्यांचाही तुझ्या हातून अवमान कसा झाला? अरे, किन्नरांचा गुरु द्रुम ह्याची योग्यता तूं कशी जाणिली नाहींस? पांडुराजाप्रमाणें विजयशाली भीष्मक राजास त्वां कसें अवमानिलें? आणि तसेच रुक्मी, एकलव्य व मद्राधिप शल्य हे सर्व महान महान भूपाल कृष्णापेक्षां तुच्छ आहेत काय?

बा पांडुपुत्रा, कर्णासारखा महापराक्रमी वीर येथें विद्यमान असतां त्याकडे तुझी दृष्टि गेली नाहीं, हा केवढा घोर अपराध! अरे, ह्या कर्णाप्रमाणें बलिष्ठ असा एकही राजा ह्या भूमंडलावर नाहीं; प्रत्यक्ष भार्गवरामाचा हा पट्टशिष्य ! ह्यानें स्वताच्या बलानें सर्व राजांस युद्धांत जिंकून टाकिलें ! आणि असें असतां तूं त्या बलाढ्य वीराची अग्रपूजा न करितां त्या यःकश्चित् कृष्णाची पूजा करावीस, हें अगदीं लांच्छनास्पद होय ! हे कुरुनंदना, कृष्ण हा ऋत्विज् नसतांना, आचार्य नसतांना, व राजाही नसतांना केवळ त्याचें मन संतुष्ट करण्यासाठीं तूं त्याची प्रथम पूजा केलीस, हें तुझें अगदीं अश्लाघ्य आचरण आहे! जर तुझ्या मनांत सदसद्विवेक सोडून देऊन केवळ कृष्णाचीच पूजा करावयाची होती, तर त्वां हे राजे येथें बोलावून आणून त्यांचा अपमान करावयाचें तरी प्रयोजन काय होतें! अहो, ह्या महात्म्या कौन्तेयाच्या भीतीनें, किंवा कांहीं लोभानें, अथवा ह्याचें मन संतुष्ट राखावें म्हणून आम्ही सर्व ह्यास करभार देण्यास सिद्ध झालेलों नाहीं; तर या धार्मिक युधिष्ठिराची सार्वभौमपदाची इच्छा परिपूर्ण व्हावी, एवढ्याकरितांच आम्हीं ह्यास करभार अर्पिला; आणि आतां तर हा आम्हांस अगदीं तुच्छ मानूं लागला, तेव्हां ह्यास काय म्हणावें! हे युधिष्ठिरा, छत्रचामरादि राजचिन्हांनीं विहीन अशा कृष्णाची अग्रपूजा तूं राजसभेंत करावी, त्यापेक्षां आम्हां राजांचा आणखी अपमान तो कोणता पाहिजे? अहो, युधिष्ठिर हा धर्मात्मा आहे, असा ह्याचा हा लौकिक व्यर्थ गेला! जर हा खरोखरीच धर्मात्मा असता, तर ह्या धर्मच्युत कृष्णाची अग्रपूजा कशी करिता! अहो, ह्या दुष्ट कृष्णानें त्या महात्म्या जरासंधास अन्यायानें ठार मारिलें, ही गोष्ट धर्मराजास विदित असतां त्यानें कृष्णाची अग्रपूजा केली, तेव्हां ह्याची धर्मात्मता आज नष्ट झाली, यांत संदेह नाहीं! कृष्णाची पूजा करून त्यानें आपल्या मनाचा केवळ नीचपणा मात्र व्यक्त केला आहे!

हे माधवा, हे भित्रे पांडव अगदीं मूर्ख व दीन बनले, आणि त्यामुळें त्यांनीं तुला ही अग्रपूजा अर्पण केली; पण आपण अशा पूजेस पात्र

आहों कीं नाहीं ह्याचा विचार तूं तरी करावयास नको होता काय? अरे, ह्यांनीं बुद्धिभ्रंश झाल्यामुळें तुझ्या समीप जरी पूजा आणिली, तरी आपण ती स्वीकारण्यास अपात्र आहों असें मुनांत आणून तूं तिचा अव्हेर कां केला नाहींस? अरे, निर्जनस्थानीं चुकून पडलेल्या हविर्भागाचा अंश मिळाल्यावर कुत्र्यास जसा आनंद होतो, तसा ह्या चुकून घडलेल्या अग्रपूजेच्या योगानें तुला आनंद होत आहे; पण हें अत्यंत निंद्य होय! हे जनार्दना, पांडवांनीं ह्या दुराचरणानें ह्या सभेमध्यें अधिष्ठित असलेल्या राजसमूहाचा अपमान केला आहे, असें म्हणण्यापेक्षां, त्यांनीं स्पष्टपणें तुझाच अपमान केला आहे, असें म्हटलें पाहिजे! बा कृष्णा, क्लीबाला कन्या दिली असतां किंवा अंधाला तसबीर दाखविली असतां, त्यापासून जशी त्या क्लीबाची किंवा अंधाचीच अवमानता होते, तशी राजचिन्हविवर्जित अशा तुझी राजाप्रमाणें पूजा झाल्यानें तुझीच अवमानता झाली आहे! हे कृष्णा, पांडवांच्या ह्या अनुचित वर्तमानें युधिष्ठिर राजाची योग्यता कळली, भीष्माचें स्वरूप निदर्शनास आलें, व तुझीही पूर्ण कसोटी झाली! तेव्हां झालें हें सर्व ठीकच होय!

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, असें भाषण करून शिशुपाल राजा आपल्या आसनावरून उठला, व दुसऱ्या कित्येक राजांसह त्या यज्ञमंडपांतून बाहेर चालता झाला!

अध्याय अडतिसावा.

—:o:—

भीष्माचें भाषण.

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, शिशुपाल सभेंतून उठून चालता झाला, असें पाहतांक्षणींच धर्मराजा त्याच्या मागून धावत गेला, आणि त्यानें शिशुपालास सांत्वनपूर्वक मधुर वाणीनें म्हटलें, "हे शिशुपाल राजा, तूं जें हें भाषण केलेंस, तें योग्य नाहीं. विनाकारण एखाद्याविषयीं निष्ठुरपणा दाखविणें हा केवळ अधर्म होय. अरे, शांतनव भीष्माला श्रेष्ठ धर्माचें ज्ञान नाहीं, अशी गोष्ट कधींही होणार नाहीं; ह्यास्तव, तूं त्याचा व्यर्थ अवमान करूं नको. हें पहा—तुझ्यापेक्षां वयोवृद्ध राजे ह्या सभेंत बहुत आहेत; आणि त्यांस श्रीकृष्णाची पूजा केल्यामुळें यत्किंचितही वैषम्य वाटत नाहीं. ह्यास्तव, श्रीकृष्णाची ही अग्रपूजा त्या राजांप्रमाणें तूही सहन कर. हे चेदिराजा, भीष्माला श्रीकृष्णाचें यथार्थ स्वरूप कळलें आहे; बाबा, तुला मात्र भीष्माप्रमाणें श्रीकृष्णाचें तत्त्व विदित झालेलें नाहीं!"

भीष्म म्हणालेः—हे धर्मराजा, तूं शिशुपालाचें सांत्वन करण्याच्या भरीस पडूं नको. अरे, सर्व लोकांत श्रेष्ठ असणाऱ्या भगवान श्रीकृष्णाची पूजा ज्यास सहन होत नाहीं, त्या खलाचें सांत्वन करून तरी उपयोग काय! अरे, जो महापराक्रमी क्षत्रिय रणांत दुसऱ्या क्षत्रियास जिंकतो व त्यास अंकित करून सोडून देतो, तोच क्षत्रियश्रेष्ठ समजला पाहिजे. पहा—ह्या श्रीकृष्णानें आपल्या तेजानें ज्यास जिंकून अंकित केलें नाहीं, असा एकही भूपति ह्या यज्ञमंडपांत मला दिसत नाहीं; तेव्हां ह्या सभेमध्यें श्रीकृष्णाव्यतिरिक्त अन्य कोणी श्रेष्ठ आहे, असें म्हणावें तरी कसें? अरे, हा भगवान अच्युत श्रीकृष्ण केवळ आम्हांसच अत्यंत वंदनीय आहे असें नव्हे, तर हा दिव्य पुरुष सर्व त्रिभुवनास अत्यंत वंदनीय आहे! बा धर्मा, महान महान अनेक क्षत्रिय वीर युद्धांत श्रीकृष्णानेंच जिंकिले आहेत, व सर्व जगाच्या सामर्थ्याचा मूळ प्रभव ह्याच्यापासूनच होत आहे! ह्यास्तव, हे कुंतीनंदना, येथें कितीही जरी वृद्ध वृद्ध राजे अधिष्ठित असले, तरी माझ्या मतें श्रीकृष्ण हाच अग्रपूजेस पात्र; इतर कोणीही त्या बहुमानास पात्र नाहीं! हे शिशुपाला, श्रीकृष्णाविषयीं तूं जे निरर्गल

प्रलाप काढिलेस, तसे प्रलाप त्वां काढणें हें अगदीं अनुचित होय. बाबारे, बुद्धीला असा मोह पडूं देऊं नको. हे चेदिराजा, अनेक महाज्ञानी लोकांचा सहवास मला झाला आहे, आणि त्यांच्या वादविवादामध्यें, सत्पुरुषांस अत्यंत मान्य असे ह्या भगवान गुणशाली श्रीकृष्णाचे अनेक गुण त्यांच्या मुखांतून मीं ऐकिले आहेत. शिशुपाला, त्याप्रमाणेंच, ह्या अद्वितीय पुरुषानें जन्मापासून जीं जीं अनेक लोकोत्तर कृत्यें करून दाखविलीं, तीं तीं कृत्येंही मीं लोकांच्या तोंडून वारंवार श्रवण केलीं आहेत; आणि ह्या कारणानेंच भगवान श्रीकृष्ण हा अग्रपूजेस खरा अधिकारी असें मी मानितों. चेदिराजा, श्रीकृष्ण हा आमचा आप्त आहे, किंवा त्यानें आमचें कांहीं हित केलें आहे, अथवा त्याच्यापासून आम्हांस कांहीं स्वार्थ साधावयाचा आहे, म्हणून आम्ही त्यास प्रथम पूजिलें, असें तूं समजूं नको. बाबारे, सत्पुरुषांस तो अत्यंत पूज्य, प्राणिमात्रास तो अत्यंत सुखावह, त्रैलोक्यांत तो अत्यंत यशस्वी, शौर्याचें तो मोठें निधान, जयलक्ष्मीचा तो प्रियभर्ता इत्यादिक गोष्टींचा विचार करूनच आम्हीं त्याची अग्रपूजा केली! अरे, ह्या यज्ञमंडपांतील प्रत्येक पुरुषाची आम्हीं कसोटी केलेली आहे. येथें एक मूल सुद्धां असें नाहीं, कीं ज्यास आम्हीं यथार्थत्वानें जाणिलें नाहीं; तेव्हां आम्हीं केवळ अज्ञानानें श्रीकृष्णाची पूजा केली, हें तुझें म्हणणें अगदीं व्यर्थ होय.

हे शिशुपाला, श्रीकृष्णाची अग्रपूजा करण्याचा जो विचार आम्हीं ठरविला, ह्यास कारण श्रीकृष्णाच्या अंगीं ह्या मंडळींपेक्षां अधिक ज्ञान आहे, हेंच होय. बाबारे, ह्या स्थळीं वयानें अधिक असे लोक आहेत खरे, पण त्यांच्या अंगीं जर श्रीकृष्णाच्या इतकें ज्ञान नाहीं, तर ते पूजार्ह कसे ठरतील? चेदिराजा, द्विजांमध्यें ज्ञानवृद्धास, क्षत्रियांमध्यें बलश्रेष्ठास, वैश्यांमध्यें धनधान्यसंपन्नास, आणि शूद्रामध्यें केवळ वयास अधिक मान द्यावा, असा नियम आहे. राजा, भगवान गोविंदाच्या पूज्यापूज्यतेचा विचार करितांना, त्याच्या ठायीं वेदवेदांगज्ञान व बळ हीं दोन्हीही अत्यंत आहेत, असें आम्हांस दिसतें; आणि ह्यास्तव, मनुष्यलोकामध्यें भगवान केशवाव्यतिरिक्त अन्य पुरुष अग्रपूजेस योग्य नाहीं असेंच आम्हांस वाटतें! बाबा, दातृत्व, दक्षता, श्रुत, शौर्य, ऱ्ही, कीर्ति, उत्तम बुद्धि, विनय, वैभव, धैर्य, तुष्टि व पुष्टि हीं सर्व भगवान श्रीकृष्णाच्या ठिकाणीं शाश्वत आहेत. ह्यास्तव, ज्ञानसंपन्न, आचार्य, पिता व गुरु असा जो भगवान वासुदेव, तोच परमवंदनीय व पूजार्ह असें मानून त्यास आम्हीं प्रथम पूजिलें, ह्याजबद्दल आम्हांस सर्वांनीं क्षमा करावी. सभासदहो, ऋत्विज्, गुरु, विवाह्य पुरुष, स्नातक, भूप व मित्र ह्या सर्वांची योग्यता एका भगवान मधुसूदनाच्या ठिकाणीं असल्यामुळें आम्हीं ह्याचीच प्रथम पूजा केली. अहो, हा श्रीकृष्णच सर्व लोकांचा उत्पादक व क्षय करणारा आहे; आणि हें सर्व चराचर विश्व श्रीकृष्णाच्यामुळेंच दृग्गोचर होत आहे! अहो, ह्या विश्वाची अव्यक्त प्रकृति हा सनातन भगवान श्रीकृष्णच असून ह्याचा उत्पादकही हाच आहे; आणि असें असतांही हा सर्व भूतांपासून अगदीं अलिप्त राहतो; तेव्हां अशा ह्या लोकनियामक व सच्चिन्मय ज्ञानमूर्तीचें आधीं पूजन करावें हें सर्वथैव इष्ट होय. अहो, बुद्धि, मन, महत्तत्त्व, पृथ्वी, अप, तेज, वायु, आकाश व चतुर्विध भूतसृष्टि ह्या सर्वांस मूळ आधार श्रीकृष्णाचाच आहे. त्याप्रमाणेंच आदित्य, चंद्रमा, ग्रह, नक्षत्रें, दिशा व विदिशा हीं सर्व भगवान श्रीहरीवरच अवलंबून राहतात. अहो, वेदांमध्यें जसें अग्निहोत्र मुख्य, छंदांमध्यें जसा गायत्री मंत्र मुख्य, मनुष्यांमध्यें जसा राजा मुख्य, जलाशयांमध्यें जसा सागर मुख्य, नक्षत्रांमध्यें

जसा चंद्र मुख्य, तेजांमध्यें जसा सूर्य मुख्य, पर्वतांमध्यें जसा मेरु मुख्य, व पक्ष्यांमध्यें जसा गरुड मुख्य, तसा भगवान श्रीकृष्ण हा वर, मध्यंतरीं व खालीं जगाच्या जितक्या म्हणून स्थिति आहेत, त्या त्या स्थितींतील प्राण्यांमध्यें व देवप्रमुख सर्व लोकांमध्यें अत्यंत श्रेष्ठ आहे! अहो, हा मूर्ख शिशुपाल, ह्या सर्वव्यापक व शाश्वत अशा श्रीकृष्णाचें सत्य स्वरूप जाणत नाहीं, म्हणून ही अशी जल्पना करीत आहे! अहो, उत्तम धर्माच्या स्वरूपाचा जो बुद्धिमान पुरुष विचार करील, त्यास धर्माचें स्वरूप जसें कळेल, तसें ह्या अविचारी चेदिराजाला कळणार नाहीं! अहो, ह्या आबालवृद्ध महान महान सर्व भूपालांमध्यें भगवान श्रीकृष्ण हा अग्रपूजेस योग्य नाहीं व त्याची अग्रपूजा करूं नये, असें म्हणणारा हा एकटा शिशुपालच होय! आतां इतक्या उपरही, आम्हीं श्रीकृष्णाची पूजा केली हें अयोग्यच झालें, असें शिशुपालास वाटत असेल, तर ह्याजबद्दल त्यास यथान्याय जें कांहीं कर्तव्य असेल तें त्यानें खुशाल करावें!

अध्याय एकुणचाळिसावा.

—:०:—

राजांची मसलत.

वैशंपायन सांगतातः-राजा जनमेजया, ह्याप्रमाणें तो महापराक्रमी भीष्म भाषण करून उगाच राहिल्यावर शिशुपालादिक विरोधी राजांना सहदेवानें मोठें निक्षून उत्तर दिलें: सहदेव म्हणालाः—अहो शिशुपालप्रमुख राजांनो, केशि दैत्याचा वध करणाऱ्या अतुलपराक्रमी भगवान श्रीकृष्णाची जी अग्रपूजा मीं केली, ती तुम्हांपैकीं ज्यांस सहन होत नसेल, त्या सर्व बलिष्ठ राजांच्या मस्तकांवर हा मी आपला पाय ठेवीत आहें पहा! आतां हे माझे शब्द ऐकून तरी जर तुम्हांस कांहीं उत्तर द्यावयाचें असेल तर तें द्या. जो राजा भगवान वासुदेवाच्या पूजेविरुद्ध भाषण करील, त्यास मी खचीत यमसदनीं पाठवीन! अहो सभासदांनो, आपणांपैकीं जे विचारी असतील, त्यांनीं आचार्य, गुरु, पिता, परमपूज्य व मधुपर्कास योग्य अशा ह्या श्रीकृष्णाची मीं अग्रपूजा केल्याबद्दल मला अनुमोदन द्यावें!

राजा जनमेजया, असें भाषण करीत असतां, त्या शहाण्या, थोर, मानी व बलिष्ठ अशा राजांच्या भरसभेंत सहदेवानें आपला पाय पुढें ठेविला; तरी त्यांपैकीं एकानेंही सहदेवाला उत्तर दिलें नाहीं; तेव्हां सहदेवाच्या मस्तकावर वरून पुष्पवृष्टि होऊन 'वाहवा! वाहवा!' अशी आकाशवाणीही झाली! नंतर, भूतभविष्य सांगणाऱ्या, सर्व संशय छेदिणाऱ्या, व त्रैलोक्याला जाणणाऱ्या अशा नारद मुनींनीं भगवान श्रीकृष्णाला उद्देशून असें स्पष्ट भाषण केलें कीं, "अहो, कमलनेत्र श्रीकृष्णास जे पुरुष पूजीत नाहींत, ते जिवंत असून मृतच आहेत, असें समजावें! त्यांच्याशीं कोणीं संभाषणही करूं नये!"

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, नंतर, त्या सभासदांमध्यें कोण पुरुष कसा आहे, ह्याचें ज्ञान सहदेवास उत्तम प्रकारें झालें; आणि त्यानें सत्पात्र ब्राह्मण व सत्पात्र क्षत्रिय ह्यांची पूजा करून तें कृत्य संपविलें. असो. अशा प्रकारें श्रीकृष्णाचीच अग्रपूजा करण्यांत आलेली पाहून तो महाबलाढ्य शिशुपाल राजा अगदीं संतप्त झाला; व अत्यंत क्रोधाविष्ट होऊन राजांस म्हणाला, "अहो राजांनो, मी येथें सेनानायक उभा असतांना तुम्ही विचार कसला करीत आहां? अहो, आपण सर्व राजे युद्धार्थ सिद्ध होऊन ह्या यादवपांडवांशीं रण करूं या!" राजा जनमेजया, त्या सभेंत बसलेल्या सर्व राजांना शिशुपालानें ह्याप्रमाणें उत्तेजन दिलें, व नंतर धर्मराजाच्या राजसूय यज्ञाचा विध्वंस कर-

ण्याविषयीं त्या चेदिराजानें इतर राजांपाशीं गोष्ट काढिली. जनमेजया, यज्ञसमारंभाकरितां बोलावून आणिलेल्या शिशुपालपक्षीय सर्व राजांस शिशुपालाचें भाषण ऐकून अतिशय क्रोध चढला, व त्यांची मुद्रा बदलून जाऊन ते लागलेच शिशुपालाच्या बरोबर मसलत करण्याकरितां यज्ञमंडपांतून बाहेर पडले, आणि त्यांनीं ठरविलें कीं, "युधिष्ठिराचा राजसूय यज्ञ व कृष्णाची अग्रपूजा हीं कधींही सिद्धीस जाऊं द्यावयाचीं नाहींत."

राजा जनमेजया, क्रोधानें क्षुब्ध झालेल्या त्या राजांना, आपल्या अंगीं अतिशय बळ आहे, शी खातरी वाटत होती; आणि अपमानानें म्हणून राहावयाचें नाहीं असा त्यांचा अगदीं निर्धार होता; ह्यास्तव त्यांनीं जिवावर उदार होऊन यादवपांडवांशीं युद्ध करण्याचा विचार योजिला. त्या प्रसंगीं त्यांच्या आप्तसुहृदांनीं त्यांचा तो विचार बदलण्याचा प्रयत्न केला, पण तो सर्व व्यर्थ जाऊन त्यांच्या मुद्रेवर क्रोधाची अधिकच रक्तिमा चढली; आणि ते, हातांतून आमिष सुटून गेलें असतां सिंह जसा गर्जना करूं लागतो, तसे गर्जना करूं लागले! असो. राजा जनमेजया, पुढें राजसागररूप तो अगाध व अक्षय सेनासमुदाय युद्धाची मसलत करीत आहे, असें श्रीकृष्णास समजलें!



शिशुपालवधपर्व.

अध्याय चाळिसावा.

—:०:—

भीष्मांचें भाषण.

वैशंपायन सांगतात:—राजा, नंतर, प्रळयकाळच्या झंझावातानें महासागर अगदीं खवळून जातो, त्याप्रमाणें तें समुद्रासारखें राजमंडळ क्रोधानें क्षुब्ध झालेलें पाहून, बृहस्पतीशीं भाषण करणाऱ्या शत्रुनाशक इंद्राप्रमाणें, कुरुवृद्ध व बुद्धिमानश्रेष्ठ अशा पितामह भीष्मांस युधिष्ठिर म्हणाला, "हे पितामह! हा प्रचंड नृपसमूह तर आज रागानें अगदीं खवळून गेलेला दिसतो. तर आतां ह्यास काय करावें, तें मला सांगा. हे पितामह! यज्ञांत तर विघ्न होऊं नये, व प्रजेचें तर सर्वस्वीं हित व्हावें, असें जें काय असेल तें सर्व मला सांगावें." राजा, धर्मज्ञ धर्मराज युधिष्ठिर ह्याप्रमाणें बोलला, तेव्हां कुरुपितामह भीष्म ह्यांनीं त्यास उत्तर दिलें.

भीष्म म्हणाले:—हे कुरुश्रेष्ठा, तूं कांहींएक काळजी करूं नको. कुत्र्याच्यानें सिंह कधीं मरत असतो कीं काय? पूर्वीं मी ज्या मार्गानें गेलों, तोच नीतीचा व कल्याणाचा मार्ग होय. सिंह गाढ झोंपेंत असला म्हणजे साऱ्या कुत्र्यांनीं जमून त्याच्याजवळ जाऊन एकदम कोल्हेकुई करावी, त्यांतलीच ह्या राजांची आज अवस्था झाली आहे! बा युधिष्ठिरा! हा यादवसिंह श्रीकृष्ण खुशाल घोरत पडला असतां, सिंहाजवळ येऊन कुत्र्यांनीं भोंकावें, त्याप्रमाणें हे रागानें संतप्त होऊन अद्वातद्वा बडबड करीत आहेत; आणि निजलेला सिंह जागा झाल्याप्रमाणें हा अच्युत जागा झाला नाहीं, तोंपर्यंतच हा पुरुषश्रेष्ठ चेदिराज त्या राजांना सिंह बनविण्याची खटपट करीत आहे! अर्थात् हा मूर्खशिरोमणि शिशुपाल कृष्णाच्या विरुद्ध युद्ध करण्याविषयीं त्यांच्या अंगांत स्फुरण चढवीत आहे; आणि, धर्मा, हा ह्या सर्व राजांना यमाच्या घरीं नेण्याची मात्र इच्छा करीत आहे असें समज. हे भारता, ह्या शिशुपालामध्यें जें कांहीं तेज-प्राणकलिका-वसत आहे, तें काढून घेण्याची आज अधोक्षजाला इच्छा झाली आहे, असें दिसतें. हे बुद्धिमतामध्यें श्रेष्ठ असणाऱ्या कुंतीपुत्रा! हा चेदि देशचा राजा शिशुपाल—ह्याची व ह्या सर्व राजांची बुद्धि फारच वहावत सुटली आहे! हा पुरुषोत्तम श्रीकृष्ण ज्याचा नाश करावयाचें मनांत आणतो, त्याची बुद्धि या चेदि देशच्या राजाप्रमाणेंच वहावत सुटते! हे युधिष्ठिरा, ह्या त्रैलोक्यामध्यें जारज, अंडज, स्वेदज व उद्भिज्ज म्हणून जे चार प्रकारचे प्राणी आहेत, ते सर्व ह्या श्रीकृष्णापासूनच होतात, आणि ते शेवटीं श्रीकृष्णामध्येंच लय पावतात.

वैशंपायन सांगतात:—राजा, हें त्याचें भाषण ऐकतांच तो चेदि देशचा राजा शिशुपाल ह्यानें भीष्मावरही तोंड सोडलें!

अध्याय एकेचाळिसावा.

—:०:—

शिशुपालकृत भीष्मनिंदा.

शिशुपाल म्हणाला:—हे कुलकलंका! तूं आतां म्हातारा झाला आहेस; आणि अशा नानाप्रकारच्या बुजगावण्यानें सर्व राजांना भेवडावितांना तुला लाज कशी नाहीं वाटत? पण ह्यांत आश्चर्य तरी कसलें! तुझ्यासारख्या षंढाला तें योग्यच आहे! अरे, तूं कुरुवंशांतला मोठा ढुढ्ढाचार्य म्हणवितोस, आणि धर्माला काळिमा लावण्यासारखें बोलतोस काय! भीष्मा, तूं पुढारी झाल्यामुळें, एका नावेला दुसरी नाव अडकवावी, किंवा एका अंधळ्याच्या मागें दुसऱ्या अंधळ्यानें जावें, त्याप्रमाणें ह्या कुरुवंशाची स्थिति

झालेली आहे: म्हणजे पुढची नाव फुटून बुडूं लागली म्हणजे मागचीही आपोआप बुडणारच! पुढचा अंधळा खड्ड्यांत पडला म्हणजे मागचा अंधळाही खड्ड्यांत पडणारच! त्याप्रमाणें तुझ्यासारख्या अविचाऱ्याच्या मार्गानें जाणारे कुरुवंशज तुझ्याबरोबर खड्ड्यांतच पडावयाचे! अरे, ह्या कृष्णाच्या पूतनावधादिक कृत्यांबद्दल तूं बढाई सांगू लागलास, म्हणजे आम्हांला आश्चर्य वाटावयाचें तर बाजूसच राहो, पण उलट ह्याने स्त्रीहत्या केल्यामुळें ह्याची कींव मात्र येते! भीष्मा, असा जो हा दुराचारी कृष्ण, त्याची स्तुति करण्याची तूं इच्छा करतोस, तेव्हां तुझ्यासारख्या गर्विष्ठाच्या व मूर्खाच्या जिव्हेचे शेंकडों तुकडे तरी कसे होत नाहींत? अरे, आम्हींचसे काय, पण लहान पोरें सुद्धां त्याची छी-थूच करतील; पण तूं तर ज्ञानमत्तेविषयीं मोठा टेंभा मिरवितोस, आणि त्या गुराख्याचें स्तुतिस्तोत्र गातोस! तेव्हां तुला काय म्हणावें? त्यानें लहानपणीं काय म्हणे पांखरें मारलीं! आणि ज्या बिचाऱ्यांना युद्ध कशाशीं खातात हें सुद्धां माहीत नाहीं असले घोडे आणि बैल मारले! म्हणून, भीष्मा! ह्यांत तुला शतकृत्य तें कोणतें वाटतें! त्यानें म्हणे पायानें एक गाडा उधळून टाकला! पण त्या निर्जीव लांकडाला ढकलून देण्यांत मोठासा पुरुषार्थ तो कोणता केला? तसेंच, भीष्मा! वारुळांनीं पोकळ झालेला गोवर्धन पर्वत त्यानें सात दिवस उचलून धरला, परंतु ह्यांत सुद्धां मला विशेष असें कांहीं वाटत नाहीं! त्याचप्रमाणें, पर्वताच्या माथ्यावर खेळतांना त्यानें किती तरी अन्न खाल्लें असें तुझ्या तोंडून ऐकलें म्हणजे इतरांना मोठाच चमत्कार वाटत असेल; पण, भीष्मा, मला तर त्याबद्दल कांहींच वाटत नाहीं. अहो धर्मशास्त्रवेत्ते! ज्या बलाढ्य कंसाचें अन्न ह्यानें भक्षण केलें, त्याच कंसाचा त्यानें प्राणघात केला, ह्या कृतघ्नपणाच्या कृत्याचें सुद्धां आपणास विशेष आश्चर्य वाटत नसेलच. हे कुरुकुलाधमा धर्मज्ञानशून्या भीष्मा! तुला आतां मी जें वचन सांगणार आहें, तें तूं सज्जनांच्या तोंडून कधींही ऐकिलेलें नसशील. कारण, ऐकिलें असतेंस तर स्त्रीहत्येसारख्या घोर दुष्कृत्याची तूं प्रशंसाच केली नसतीस! तें वचन हें: "स्त्रिया, ब्राह्मण, गाई, अन्नदाता, आणि आश्रय देणारा ह्यांच्यावर कधींही शस्त्र उचलूं नये," असा धार्मिक, साधु, सुजनलोक सदासर्वदा उपदेश करीत असतात. परंतु, भीष्मा! ह्या जगांत तुझ्या ठायीं मात्र तें सर्व व्यर्थ असल्याचें दिसून येतें. हे कौरवाधमा! तूं "हा मोठा ज्ञानी आहे, तो मोठा थोर आहे" म्हणून माझ्यापाशीं बडेजाव मारितोस. जणू काय मला त्याची ओळखच नाहीं! अरे! तो गोहत्या तर करणारा आहे; स्त्रीहत्या करणारा आहे; मग त्याचे तूं इतके पवाडे तरी गातोस कसे! आतां, तूं म्हणशील ती पूर्वदिशा असेंच जर असेल,तर मात्र तो पूजेला पात्र आहे खरा! "हा जनार्दन म्हणजे काय, साऱ्या बुद्धिवानांतला बुद्धिमान; साऱ्या जगाचा स्वामी जो काय तो हाच!" वगैरे असंबद्ध भाषण तूं बोलतोस, म्हणून तोही आपल्या मनांत मांडे खातो कीं, मी खरोखरी तसाच आहें, पण हें तुझें म्हणणें निवळ खोटें आहे. मी तुला एक सांगून ठेवितों कीं, पोकळ पांडित्याचा कोणीं कितीही जरी उपदेश केला, तरी भूलिंग नांवाच्या पक्ष्याप्रमाणें प्राणी हे अखेर आपल्या जातिस्वभावावरच जावयाचे. तें चुकावयाचें नाहीं! पण तुझा मूळचा स्वभावच नीच पडला, ह्यांत शंका नाहीं. तेव्हां या पांडवांच्या स्वभावाची तर तुझ्याही वर ताण असलीच पाहिजे! त्यांचें परमपूज्य दैवत कोण? तर कृष्ण; आणि त्यांचा मार्गदर्शक कोण? तर जेथें धर्माच्या नांवानें आंवळ्याएवढें पूज्य, व जे सन्मार्गाला पायाखालीं तुडविणारे, असे पिता-

मह भीष्म ! तेव्हां त्या पांडवांचें सौजन्य काय विचारावें ? भीष्मा ! खरा धर्म म्हणजे काय याचें ज्ञान ज्याच्या अंतःकरणांत बिंबलें, तोच खरा खरा सज्जन होय. आपल्यासारख्या धर्मज्ञानमुगुटमण्यानें जसें वर्तन केलें, तसें कोण बरें करील ? धर्म म्हणजे काय हें तुला जर माहीत होतें, धर्मज्ञानाचें रहस्य जर तुझ्या बुद्धीला कळलेलें होतें, आणि मी ज्ञानी म्हणून जर तू आपल्याला म्हणवून घेतोस, तर दुसऱ्यावर मन ठेवणाऱ्या अंबा नामक कन्येचा तू स्वतांच कसारे अपहार केलास ? भीष्मा ! तूं हरण करून आणलेल्या कन्येचा, तुझा भाऊ जो विचित्रवीर्य, त्यानें अभिलाष धरिला नाहीं. कारण, तो सन्मार्गानें वागणारा होता. आपत्कालीं ज्येष्ठ भ्रात्यानें कनिष्ठ भ्रात्याच्या स्त्रियेच्या ठिकाणीं संतति उत्पन्न करणें हा मार्ग सज्जनसंमत आहे. असें असतां, तुझा धाकटा भाऊ विचित्रवीर्य ह्याच्या स्त्रियेच्या ठिकाणीं तुझ्या समक्ष दुसऱ्यानेंच अपत्योत्पत्ति केली ! तेव्हां, भीष्मा! असा तुझा धर्म तरी कोणता? ब्रह्मचर्याची प्रतिष्ठा सांगत असशील, तर तीही फुकटच! हें ब्रह्मचर्य तूं जें धारण केलें आहेस, तें निःसंशय मूर्खपणानें धारण केलें असावें एक, किंवा तू नपुंसक तरी असावास हें एक; ह्याशिवाय त्यांत कांहींच अर्थ नाहीं. हे धर्मवेत्त्या ! ह्या तुझ्या ब्रह्मचर्यापासून मला तर कोणतीच फलप्राप्ति दिसत नाहीं, आणि ह्यालाच धर्म म्हणून तूं नाचत आहेस, ह्यावरून ज्ञानवृद्धांचा सहवास तुला कधीं घडला नाहीं असें वाटतें. हवें तें दान द्या, हवी तेवढी पूजा करा, हवें तितकें अध्ययन करा, किंवा दाक्षिणेची लयलूट करून यज्ञयाग करा, इतक्या सौऱ्यांची मिळून योग्यता पाहिली तर ती अपत्याच्या एका सोळाव्या हिश्शाबरोबर सुद्धां होणार नाहीं. कितीही व्रतें करून, कितीही उपोषणें करून, पुण्य संपादन केलें, तरीं जर एक अपत्य नसेल तर तें सर्व निष्फळ होतें. ह्याकरितां, तू निपुत्रिक म्हातारा व मिथ्या धर्माचरण करणारा आहेस; तेव्हां तुझाही एका गोष्टींतल्या हंसाप्रमाणें स्वजातीयांकडून वध होणेंच उचित आहे. हे भीष्मा ! कित्येक ज्ञानवेत्ते पुरुष पूर्वींची एक कथा सांगत असतात, ती तुला मी साद्यंत कथन करितों. ती तूं ऐकून ठेव.

हंसाची गोष्ट.

पूर्वीं कोणी एक म्हातारा हंस समुद्रकांठीं राहत असे. तो 'लोकां सांगे ब्रह्मज्ञान; आपण कोरडा पाषाण!' अशांपैकीं होता. म्हणजे, तो बोले तें धर्मास अनुसरून बोले, आणि वागणूक करी ती मात्र त्याच्या अगदीं विरुद्ध. तो इतर पक्ष्यांना नेहमीं असा उपदेश करी कीं, 'बाबांनो, धर्मानें वागा बरें; धर्माविरुद्ध कधींही वर्तन करीत जाऊं नका;" आणि ते सत्यास अनुसरणारे पक्षी, तो त्याचा उपदेश ऐकून मुकाट्यानें माना डोलवीत. इतकेंच नव्हे, तर कित्येक समुद्रजलांत संचार करणारे पक्षी, त्याला धर्मार्थ म्हणून भक्षही आणून देत असत. भीष्मा ! ते त्यास धर्म करणारे पक्षी त्याच्यावर विश्वास ठेवून आपलीं अंडीं त्या हंसापाशीं ठेवीत, आणि त्याला भक्ष्य आणण्यासाठीं समुद्रजलांत बुडण्याकरितां जात; आणि तसे ते निर्धास्तपणें गेले, म्हणजे इकडे तो स्वकर्मदक्ष पातकी हंस त्या अंड्यांपैकीं रोज थोडथोडीं खाई ! असें होतां होतां तीं अंडीं जेव्हां कमी कमी होऊं लागलीं, तेव्हां ती गोष्ट एका वृद्ध व बुद्धिमान पक्ष्याच्या एके दिवशीं लक्षांत आली व त्या हंसाचें तें दुष्ट कर्म पाहून त्याला फार वाईट वाटलें. नंतर त्यानें ती गोष्ट बाकीच्या साऱ्या पक्ष्यांस सांगितली. तेव्हां मग जवळ असलेल्या पक्ष्यांच्याही ती गोष्ट प्रत्यक्ष दृष्टोत्पत्तीस येऊन, त्यांनीं त्या अनन्वित कर्म करणाऱ्या हंसाचा प्राण घेतला.

त्याचप्रमाणें, हे भीष्मा ! तूंही त्या हंसाप्रमाणें अधर्मानें वागत आहेस; ह्याकरितां, पक्ष्यांनीं जसा त्या हंसाचा वध केला, तसा हे सर्व क्रुद्ध झालेले राजे तुझाही वध करतील. हे भरतकुलोत्पन्ना भीष्मा ! त्या गोष्टीविषयीं पुराणवेत्ते लोक जो एक श्लोक सांगत असतास, तोही तुला यथावत् कथन करितों. त्यांतील भावार्थ असा: " हे हंस पक्ष्या, अंतःकरण कामादिकांनीं व्याप्त झालें असतांही वाणीनें मात्र तूं धर्म-सांगतोस, पण हें तुझें अमंगळ अंडभक्षणकर्म तुझ्या वाणीला विरुद्ध आहे ! "

अध्याय बेचाळिसावा.

—:०:—

शिशुपालकृत कृष्णनिर्भर्त्सना.

शिशुपाल म्हणाला:—हे भीष्मा, हा केवळ दास आहे, असें म्हणून याच्याशीं युद्ध करण्याचें ज्यानें नाकारिलें, तो बलशाली जरासंध राजा मला फार फार मान्य आहे. अरे, जरासंधाच्या वधाच्या वेळीं ह्या कृष्णानें, भीमानें आणि अर्जुनानें जें कृत्य केलें, त्याला कोणी तरी चांगलें म्हणेल काय ! जरासंध राजाचा प्रभाव कृष्णाला पूर्वींच यथास्थित माहीत झालेला होता. म्हणूनच, मी ब्राह्मण आहें, असें कपटानें सांगून भलत्याच मार्गानें ह्याला तेथें प्रवेश करावा लागला. तो धर्मात्मा जरासंध ह्याला ब्राह्मण असें समजून अर्घ्यपाद्यादि अर्पण करूं लागला, परंतु आपण ब्राह्मण असल्याबद्दल ह्याची ह्यालाच खातरी नव्हती, म्हणून ह्या दुरात्म्यानें तें घेण्याचें नाकारिलें. त्या जरासंधानें कृष्ण, भीम व अर्जुन ह्या तिघांनाही, आपण भोजन करावें, अशी प्रार्थना केली असतां कृष्णानें त्याच्यावरच शस्त्र उपसलें ! हे मूर्खा ! तूं समजतोस त्याप्रमाणें हा जर खरोखरच जगाचा कर्ता असेल, तर याला स्वतांलाच आपण ब्राह्मण आहों किंवा नाहीं ही शंका कां रे आली ? खरें म्हटलें तर पांडवांना तूं सन्मार्गापासून भ्रष्ट केलेंस. असें असतां, ते तुझ्या कृति अद्यापिही उत्तमच मानतात, ह्याचा मला मोठाच चमत्कार वाटतो ! हे भरतकुलोत्पन्ना, तूं मूळचाच म्हातारा आणि बायक्या; त्या तुझ्या तंत्रानें असणारे पांडव; तेव्हां ह्यांत चमत्कार तरी कशाचा ?

क्रुद्ध भीमाचें निवारण.

वैशंपायन सांगतात:—जनमेजया, मर्मभेदक शब्दांनीं व अर्थानें भरलेलें हें शिशुपालाचें भाषण श्रवण करून, सर्व बलवानांमध्यें श्रेष्ठ व महापराक्रमी जो भीमसेन, तो अतिशय क्रुद्ध झाला. त्याचे नेत्र मूळचेच कमलांप्रमाणें विस्तृत व लाल होते; त्यांत आणखी क्रोधयुक्त झाल्यामुळें ते अधिकच विस्तृत व लाल दिसूं लागले ! त्रिकूटाचलावर त्रिवेणीसंगम असतो त्याप्रमाणें त्या भीमसेनाच्या कपाळावर भोंवयाला तीन अठ्या पडलेल्याही सर्व राजांना स्पष्ट दिसत होत्या. प्रलयकालसमयीं प्राणिमात्राचा स्वाहा करूं इच्छिणाऱ्या कृतांतकाळाप्रमाणें त्याचें मुख दिसूं लागलें; आणि तो रागानें दांतओठ खाऊं लागला. अशा प्रकारें तो क्रुद्ध झालेला मानी भीमसेन, मोठ्या वेगानें त्या शिशुपालाच्या अंगावर धावून जाऊं लागला. तेव्हां, स्कंदाला जसें शंकरांनीं आवरून धरिलें, तसें महापराक्रमी भीष्मांनीं म्हणूनच त्याला आवरिलें. हे भरतकुलोत्पन्न जनमेजया ! त्या भीमाला भीष्मांनीं आवरून धरल्यानंतर पुष्कळ प्रकारें बोध केला, तेव्हां तो थोडासा शांत झाला. पर्जन्यकाळामध्यें कितीही पाणी आंत येऊन भरलें तरी समुद्र आपली मर्यादा उल्लंघन करीत नाहीं, त्याप्रमाणें, शत्रूचें यथास्थित पारिपत्य करण्याची त्याच्या अंगांत धमक होती खरी, तरी त्या भमिसेनानें भीष्माची आज्ञा उल्लंघन केली नाहीं. हे जनमेजया ! भीमसेन ह्याप्रमाणें रागानें लाल झाला तरी आपल्याच हिमतीवर अवलंबून असणारा वीर शिशुपाल तिळमात्रही ड-

गमगला नाहीं. त्या भीमसेनाला पुनःपुनः रागाची उसळी येऊन तो पुनःपुनः चवताळून उठत असे; तरी, पिसाळलेल्या मृगाची सिंहाला जशी खिसगणती वाटत नाहीं, तशी शिशुपालालाही त्याची पर्वा वाटली नाहीं. इतकेंच नव्हे, तर तो महापराक्रमी भमिसेन रागानें अगदीं लाल झालेला पाहून तो प्रतापी चेदि देशाचा राजा शिशुपाल हसत हसत त्याच्याकडे पाहून म्हणाला, "हे भीष्मा! सोड त्याला, सोड, आणि अग्नि जसा पतंगाची राखरांगोळी करितो, त्याप्रमाणें तो माझ्या प्रभावानें जळून खाक झालेला ह्या राजांना एकदा पाहूं दे!" हें चेदि देशच्या राजाचें भाषण श्रवण करून कुरुवंशजश्रेष्ठ व बुद्धिमानांत अग्रगण्य जे भीष्माचार्य ते भीमाशीं बोलूं लागले.

अध्याय त्रेचाळिसावा.

—:०:—

शिशुपालाची जन्मकथा.

भीष्म म्हणतातः—अरे! हा शिशुपाल चेदि देशच्या राजकुलामध्यें जन्मास आला, तेव्हां त्याला चार हात व तीन डोळे असून हा गाढवासारखा ओरडूं लागला. तें पाहून ह्याच्या मातापितरांनीं व इतर आप्तइष्टांना फार वाईट वाटलें; व हें विद्रूप ध्यान जन्मास आलेलें आहे, त्या अर्थी ह्याला बाहेर फेकून द्यावें, असें लोकही म्हणूं लागले! तेव्हां आतां काय करावें म्हणून राजा, राणी, मंत्री, व पुरोहित हीं सारीं एके ठिकाणीं जमा झालीं; व त्या विलक्षण चिंतेमुळें त्यांस कांहींच सुचेनासें झालें. इतक्यांत आकाशवाणी झाली कीं, "हे राजा! हा तुझा पुत्र मोठा बलाढ्य व भाग्यशाली होईल. ह्याकरितां ह्याची कोणत्याही तंऱ्हेची भीति न बाळगतां ह्याचें नीट रीतीनें पालनपोषण कर. याच्या मृत्यूचा काल आजच आलेला नाहीं; आणि तूं त्याचा त्याग करण्याचें मनांत आणलेंस, तर तशा रीतीनें त्याला मृत्यु येणारही पण नाहीं. त्याचा मृत्यु शस्त्रानें होणारा असून, तो शस्त्रधारी आधींच उत्पन्न झालेला आहे!"

भीष्म म्हणतातः—ही आकाशवाणी श्रवण करून, पुत्रवात्सल्यानें व्याकूळ झालेली त्याची आई त्या अदृश्य पुरुषाला अनुलक्षून म्हणाली, "ज्या माझ्या पुत्रासंबंधानें ज्या कोणीं हें भाषण केलें, त्याला मी हात जोडून नमस्कार करितें. माझ्या पुत्राला मृत्यु येणार तो देवाच्या हातून येणार आहे, का दुसऱ्या कोणाच्या हातून येणार आहे, तेवढें ऐकण्याची मला इच्छा आहे. ह्याकरितां त्या भगवंतानें पुनः एक वेळ मी विचारितें त्याचें खरें असेल तसें उत्तर द्यावें, अशी त्यास माझी प्रार्थना आहे."

ह्याप्रमाणें मातेनें प्रार्थना केली तेव्हां पुनः एकदा आकाशवाणी झाली कीं, "ज्यानें ह्याला मांडीवर घेऊन ह्याच्याकडे पाहिलें असतां पांच फडांच्या नागाप्रमाणें अधिक असलेले त्याचे हात गळून पडतील, आणि ह्या मुलाच्या कपाळावर असलेला तिसरा डोळा जागच्या जागीं जिरून जाईल, तोच याच्या मृत्यूला कारणीभूत होईल!" असो.

इकडे, चेदिराजाला तीन डोळ्यांचा, चार हातांचा व गर्दभस्वराचा विचित्र पुत्र झाला आहे, असें जेव्हां ऐकिलें, तेव्हां पृथ्वीतलि झाडून सारे राजे त्याला पहावयाला आले. तेव्हां चेदि देशच्या राजानेंही त्यांचा यथायोग्य सत्कार करून, आपल्या पुत्राचा शत्रु कळावा म्हणून तो त्या प्रत्येकाच्या मांडीवर आपला पुत्र ठेऊं लागला. अशा प्रकारें क्रमाक्रमानें त्या हजारों राजांच्या मांड्यांवर त्यानें त्यालां ठेविलें, परंतु त्याचे अधिक असलेले हात किंवा डोळा ह्यांपैकीं कांहींच कमी झालेलें दिसून आलें नाहीं. इतक्यांत ही सारी

घडलेली विलक्षण गोष्ट द्वारकेमध्येंही जिकडे तिकडे पसरली. तेव्हां महाबलाढ्य बलराम व कृष्ण हे उभयतां यादवही आपल्या यादवांच्याच कुळांत उत्पन्न झालेली, आपल्या पित्याची भगिनी जी चेदिराजाची राणी आपली आत, तिला भेटावें म्हणून चेदिनगरांत प्राप्त झाले. नंतर लोकाचाराप्रमाणें त्या चेदि देशच्या राजाला व आपल्या आतेला अभिवंदन करून क्षेमकुशल विचारून बलराम व कृष्ण हे तेथें बसले. तेव्हां प्रेमामुळें त्या वीरांचें इतरांहूनही विशेष आदरातिथ्य केल्यानंतर त्याची आत्या जी राजपत्नी, तिनें आपला पुत्र स्वतः उचलून कृष्णाच्या मांडीवर ठेवला. तिनें तसें केलें मात्र, तोंच त्याचे अधिक असलेले दोन हात गळून पडले, व कपाळावर असलेला डोळाही अदृश्य झाला. हा चमत्कार पाहून त्याच्या आईस फार दुःख होऊन ती अगदीं व्याकूळ झाली; आणि तिनें कृष्णाची प्रार्थना केली कीं, "हे कृष्णा ! हे पराक्रमपटो ! भयानें माझ्या अंगांत कांपरें भरलें आहे. तर तूं मला एक वर दे. कारण, आर्तजनांना आश्वासन व भ्यालेल्यांना अभय देणारा तूंच आहेस."

आपल्या आतेची प्रार्थना श्रवण करून यदुनंदन श्रीकृष्ण तिला म्हणाले, "हे धर्मज्ञ देवि ! भिऊं नको. माझ्यापासून तुला कोणतेंही भय प्राप्त होणार नाहीं. हे पितृभगिनि, मी तुला कोणता वर देऊं ? आणि तुझें कोणतें काम करूं ? सांग. होण्यासारखें असो किंवा नसो; कसेंही असलें तरी मी तुझें मागणें तडीस नेईन."

याप्रमाणें कृष्णांनीं अभिवचन दिल्यानंतर ती त्या यदुनंदन श्रीकृष्णाला म्हणाली, "हे महाबलाढ्य प्रभो, हे यदुश्रेष्ठा, माझ्याकडे पाहून तूं ह्या शिशुपालाचे अपराध क्षमा कर, एवढाच काय तो तुझ्यापाशीं मला वर मागावयाचा आहे हें लक्षांत ठेव."

श्रीकृष्ण म्हणाले:—अहो आत्याबाई ! हा तुमचा मुलगा म्हणाल तर देहांत शासनालाच योग्य आहे. तथापि तुमच्याकडे पाहून मी त्याला त्याच्या शंभर अपराधांची क्षमा करीन. ह्याकरितां आपण आतां कोणत्याही प्रकारें मनांत खंती बाळगू नका."

भीष्म सांगतात:—भीमा ! अशा प्रकारचा हा पातकी, महामूर्ख, श्रीकृष्णाच्या वरप्रसादामुळें गर्वानें फुगलेला राजा शिशुपाल दंड थोपटून तुला आव्हान करीत आहे !

अध्याय चवेचाळिसावा.

—:o:—

भीष्मांचें भाषण.

भीष्म म्हणाले:—अरे ! हा चेदिराज शिशुपाल तुला युद्धाला बोलावतो, ह्यांत नवल तें कोणतें ? प्रत्यक्ष श्रीकृष्णाला सुद्धां तो युद्धाकरितां आव्हान करीत आहे, पण ही बुद्धि सुद्धां कांहीं त्याची स्वतांची नव्हे. तर सर्व जगाचा संहार करणाऱ्या श्रीकृष्णाचाच त्याचा संहार करण्याचा निश्चय ठाम झालेला आहे. म्हणून तोच त्याला ही अशी बुद्धि देतो ! नाहीं तर, भीमसेना ! ह्या कुलांगार शिशुपालाप्रमाणें माझी निंदा करण्याचें पृथ्वीवरच्या कोणत्या राजाचें सामर्थ्य आहे ? ह्यावरून, हा पराक्रमी शिशुपाल निःसंशय श्रीहरीच्या तेजाचा अंश आहे; आणि तें आपलें तेज आपल्यामध्यें पुनः समाविष्ट करून घेण्याची त्याच सर्वव्यापी श्रीहरीची इच्छा दिसते. म्हणूनच, हे कुरुवंशजश्रेष्ठा भीमा ! आम्हां कोणाचीच पर्वा न करितां, हा दुर्बुद्धि चेदिराज वाघाप्रमाणें मोठमोठ्या डुरकण्या फोडीत आहे !

भीष्माची निर्भर्त्सना.

वैशंपायन सांगतात:—पण त्या भीष्माच्या भाषणाचा विचार मुळींच न करितां तो अधिकच संतापून उलट भीष्मालाच टाकून बोलूं लागला.

शिशुपाल म्हणतोः—भीष्मा, आम्ही तर त्याचे द्वेषी खरेच! पण तूं जो रात्रंदिवस भाटासारखे त्याचे पवाडे गातोस, त्या कृष्णाचा जो काय उजेड पडावयाचा असेल, तो एकदा आमच्यापुढें पडूं द्याच! भीष्मा, दुसऱ्याची स्तुति करण्यांतच जर तुला मजा वाटत असेल, तर त्या कृष्णाला सोडून ह्या येथच्या राजांचे तरी स्तुतिपाठ गात बैस. हा राजराजेश्वर बाल्हीक देशाचा राजा दरद—जो जन्मास आला त्या वेळीं पृथ्वी सुद्धां उकलली होती—ह्याची स्तुति कर; किंवा, हे महच्चाप धारण करणाऱ्या भीष्मा! पराक्रमानें केवळ इंद्रासारखा असा हा अंगवंग देशांचा राजा कर्ण, ह्याची स्तुति कर. हे महाबाहो! ह्याचीं हीं दिव्य कुंडलें देवांनीं तयार केलेलीं असून याला आपोआप प्राप्त झालेलीं आहेत. तसेंच हें बालसूर्यासारखें कवच त्याला जन्मतःच मिळालेलें आहे. जरासंध म्हणजे जिंकावयास किती कठिण! इंद्राचा केवळ दुसरा अवतार. त्यालाही ह्यानें बाहुयुद्धांत जिंकून त्याचा देह फाडून टाकिला. तसेंच, भीष्मा! हा द्रोण आणि हा अश्वत्थामा; ही पितापुत्रांची जोडी; हे दोघेही महारथी आहेत. हे दोघेही स्तुतीला पात्र आहेत म्हटलें तरी चिंता नाहीं. हे ब्राह्मण असून साधुवर्य आहेत. ह्यांची पाहिजे तर तूं अहोरात्र स्तुति करीत बैस. कारण, भीष्मा! मला तर वाटतें कीं, ह्या दोघांपैकीं कोणीही एक जर क्रुद्ध झाला, तर ही स्थावरजंगमात्मक पृथ्वी सुद्धां एका क्षणांत होती का नव्हती अशी करून टाकील. हे भीष्मा! द्रोणाशीं किंवा अश्वत्थाम्याशीं युद्धामध्यें बरोबरी करणारा राजा एकही कोठें दिसत नाहीं. अशा शूर वीरांची स्तुति करावयाला मात्र तुला वासना होत नाहीं. समुद्रवलयांकित पृथ्वीमध्येंही ज्याची बरोबरी करणारा कोणी नाहीं, तो महापराक्रमी राजा दुर्योधन म्हण; किंवा अस्त्रविद्याविशारद अमोघपराक्रमी जयद्रथ राजा म्हण; अथवा ज्याच्या पराक्रमाची कीर्ति गाजत आहे, तो किन्नराधिपति द्रुम म्हण; अशा पराक्रमी पुरुषांना सोडून केशवाचीच प्रशंसा कशाला करीत असतोस! किंवा सर्व भरतकुलाचा वयोवृद्ध आचार्य शरद्वान् गौतम मुनींचा पुत्र कृपाचार्य धनुर्धरांमध्यें मुकुटमणि, पुरुषांमध्यें श्रेष्ठ असा रुक्मी, अशा अशा पराक्रमी वीरांना सोडून तूं कृष्णाची कशाची प्रतिष्ठा सांगतोस? महापराक्रमी भीष्मक, दंतवक्त्र राजा, यूपकेतु, भगदत्त, मगध देशाचा राजा जयत्सेन, उभयतां विराट व द्रुपद, महाबलाढ्य शकुनि, अवंती देशचे राजे विंद व अनुविंद, सर्वोत्तम असा पांड्य देशचा राजा श्वेत, परमभाग्यशाली शंख, मोठ्या मानी स्वभावाचा वृषसेन, पराक्रमी एकलव्य, आणि महारथी असा कलिंग देशचा राजा अशा पराक्रमी पुरुषांला सोडून देऊन त्या कृष्णाची काय म्हणून प्रशंसा करीत बसतोस? भीष्मा, सदासर्वदा दुसऱ्यांची स्तुति करावी हाच जर तुला नाद असेल, तर शल्यादिकांसारख्या राजांची तरी स्तुति तूं कां करीत नाहींस? भीष्मा, आजपर्यंत धर्मवेत्त्या वाडवडिलांच्या तोंडून तूं कांहींच ऐकिलेलें दिसत नाहीं. तेव्हां माझा तरी येथें काय उपाय चालणार? हे भीष्मा, थोर आहेत ते आत्मस्तुति व आत्मनिंदा, आणि परस्तुति व परनिंदा ह्या चार गोष्टी करीत नसतात, ही गोष्ट तूं ऐकिलेली नाहींस; म्हणूनच, स्तुति करण्यास केवळ अयोग्य अशा कृष्णाची अज्ञानानें मोठ्या भक्तिपूर्वक तूं नेहमीं स्तुति करीत असतोस. पण तो कोणाला कधींही मान्य होत नाहीं. अरे, भोजदेशाधिपति कंसाचा जो केवळ यःकश्चित् गुरें राखणारा दास, त्या दुरात्म्याच्या पोटामध्यें साऱ्या जगाचा समावेश केवळ आपला मतलब साधण्याकरितां तूं कसा करतोस? आणि सर्वव्यापी, सर्व जगाचा स्वामी, व जगास आदिकारण परमेश्वर तो तोच असे तरी कसें म्हणतोस?

ह्यावरून, तुझी बुद्धि मूळच्या जातिस्वभावावरच जात नाहीं का ? भूलिंग पक्ष्याप्रमाणें कोणतेही प्राणी झाले तरी ते आपल्या जातिस्वभावावर जावयाचेच हें तुला मीं पूर्वींच सांगून ठेवलेलें आहे. भीष्मा! हिमालय पर्वताच्या पलीकडे पश्चिमेच्या बाजूस 'भूलिंग' नांवाचा एक पक्षी असतो. तो अर्थाशीं व कृतीशीं विरुद्ध अशीं वाक्यें नेहमीं बोलत असल्याचें कानावर येतें. त्या पक्ष्याच्या तोंडांतून 'साहस करूं नका; साहस करूं नका!' या वाक्याची खरोखर सदासर्वदा आवृत्ति चाललेली असते. परंतु तो स्वतः पराकाष्टेचें साहस करीत असूनही तें त्याच्या लक्षांत येत नाहीं. कारण, भीष्मा! खातां खातां अडकून राहिलेला मांसाचा तुकडा सिंहाच्या दाढेंतून तो अविचारी पक्षी नेहमीं काढून घेत असतो. त्या पक्ष्याचें जीवित ज्याप्रमाणें त्या सिंहाच्या इच्छेवर अवलंबून आहे, तद्वत, हे धर्मभ्रष्टा! पोकळ बडबड करणाऱ्या भीष्मा! तुझें जीवितही निःसंशय ह्या साऱ्या राजांच्या इच्छेवर अवलंबून आहे. खरोखर तुझ्यासारखें निंद्य कर्म करणारा दुसरा कोणी नाहीं.

भीष्मांचें लोकोत्तर धैर्य.

वैशंपायन सांगतातः—हे जनमेजया, ह्याप्रमाणें चेदिराजानें केलेलें मर्मभेदक भाषण श्रवण करून तो ऐकत असतांच भीष्म म्हणाले, "होय, खरोखरच मी ह्या राजांच्या इच्छेमुळें जिवंत राहिलों आहें. पण तोच मी ह्या राजांची किंमत कस्पटाइतकी सुद्धां मानीत नाहीं!"

ह्याप्रमाणें भीष्म बोलले, तेव्हां कित्येक राजे क्रुद्ध झाले; कित्येकांस आनंद झाला; व कित्येक भीष्मांची निंदा करूं लागले. भीष्मांचें तें भाषण ऐकून कित्येक मोठ्या धनुर्धरांपैकीं राजे म्हणाले, "गर्वानें बेताल झालेल्या ह्या म्हाताऱ्या पापी भीष्माला आतां क्षमा करणें मुळींच योग्य नाहीं. नृपहो, ह्या दुर्बुद्धि भिष्माला बकऱ्याप्रमाणें कापून टाका; किंवा सर्व मिळून ह्या मस्त झालेल्या म्हाताऱ्यावर गवत घालून आग लावून द्या!"

ह्याप्रमाणें त्यांचीं बोलणीं ऐकून पितामह भीष्म त्या सर्व राजांस संबोधून म्हणाले, "उत्तरास प्रत्युत्तर ह्याप्रमाणें आपण करीत बसलों, तर तें संपावयाचें एके बाजूस राहून उलट वाढेल मात्र. ह्याकरितां, नृपहो! मी आतां एक शेवटचा निश्चय सांगतों, तो तुम्ही सर्व ऐकून घ्या. पशूप्रमाणें मला कापून टाका, किंवा गवताच्या गंजींत घालून मला जाळा, पण मी तर हा आपला सबंधच्या सबंध पाय तुमच्या मस्तकांवर ठेवून उभा आहें; आणि आम्हीं अग्रपूजा केलेला श्रीकृष्ण गोविंदही हा येथें उभा आहे. ह्याकरितां, ज्याची बुद्धि मरणाकडे अधिक धाव घेत असेल, त्यानें ह्या माधवाला—ह्या चक्रगदाधारणकर्त्या श्रीकृष्णाला—युद्धाकरितां आव्हान करावें, आणि त्याच्या हातून मृत्यु पावून ह्या यादवाधिपतीच्याच देहामध्यें प्रविष्ट व्हावें!

अध्याय पंचेचाळिसावा.

—:०:—

शिशुपालाचें कृष्णास आव्हान.

वैशंपायन सांगतातः—हें भीष्माचें भाषण ऐकल्याबरोबर महापराक्रमी चेदिराज शिशुपाल युद्धाची इच्छा धरून म्हणाला, "हे जनार्दना! हा मी तुला आव्हान करितों; तर तूं आतां माझ्याशीं युद्ध कर. म्हणजे आज तुझा आणि पांडवांचा नायनाट करून टाकितों. हे कृष्णा, सर्व राजांचा अपमान करून तूं राजा नसतांही तुझी ज्यांनीं अग्रपूजा केली, त्या पांडवांचाही मला तुझ्याचबरोबर वध केला पाहिजे. हे कृष्णा, तूं राजा तर नव्हेसच, पण केवळ दास आहेस; म्हणून, तुज अपूज्याला पूज्य समजून पूजेला अपात्र असलेल्या तुज दुर्मतीचें ज्यांनीं पूजन केलें, त्यांचा वधच केला पाहिजे असा मीं निश्चय

केलेला आहे !" राजा, इतकें बोलून तो क्रूर नृपश्रेष्ठ गर्जना करीतच उभा राहिला.

श्रीकृष्णाचें भाषण.

जनमेजया, ह्याप्रमाणें शिशुपालाचें भाषण झाल्यानंतर, तो वीर्यवान श्रीकृष्ण, त्या शिशुपाकासमक्ष तेथील सर्व राजांस उद्देशून मृदुवाणीनें म्हणाला, "हे राजेहो! यादवकुलांतील स्त्रीच्या ठिकाणीं उत्पन्न झालेला व निरुपद्रवी यादवांच्याच वाईटावर असलेला हा दुष्ट शिशुपाल आमचा मोठा हाडवैरी आहे ! हे नराधिपहो, आम्ही सारे प्राग्ज्योतिषपुराला गेलों अशी बातमी ठेवून, हा प्रत्यक्ष यादवांचाच भाचा असून या दुष्टानें सारी द्वारका जाळून टाकली ! रैवतक पर्वतावर भोज राजा क्रीडा करीत असतां, त्या सर्वांचा वध करून हा आपल्या नगराला परत आला. अश्वमेधाकरितां बरोबर रक्षक देऊन माझ्या पित्यानें सोडलेला पवित्र अश्व, त्याच्या यज्ञांत विघ्न आणावें म्हणून ह्यानें मुद्दाम हरण केला. बभ्रु नामक यादवाची स्त्री येथून निघून सौवीर देशाला चालली असतां, तिला ह्या मूर्खानें बलात्कारानें हरण केलें ! त्याचप्रमाणें, प्रत्यक्ष आपल्या मामाशींही दुष्टपणा करणाऱ्या ह्या शिशुपालानें, विशाला राजाची भद्रा नामक कन्या करूष देशच्या राजाला दिली असतां कपटानें करूष राजाचा वेष धारण करून त्या बिचारीला पळवून नेलें. इतकें हें असह्य दुःख मी आपल्या आत्याबाईकडे पाहून आजपर्यंत गट्ट केलें; आणि आजचें हें माझ्या विरुद्ध चाललेलें ह्याचें वर्तन तुम्हां सर्व राजांच्या समक्षच चाललेलें आहे, ही एक मोठी संतोषाची गोष्ट होय. माझ्यावर आज तो कसा तुटून पडला आहे, हें आपण प्रत्यक्ष पहातच आहां; आणि आपल्या पश्चात् जें जें काय त्यानें केलें, तें तें सर्व मी तुम्हांला सांगितलेंच. परंतु आज ह्या साऱ्या राजमंडळामध्यें त्यानें गर्वास चढून माझा जो पाणउतारा केला, तो मात्र आज माझ्याच्यानें सहन करवत नाहीं. आज त्याचा वध करणें हेंच योग्य आहे. मृत्यूच्या तोंडांत धाव घेणाऱ्या ह्या मूढाची रुक्मिणीला वरण्याविषयीं फार इच्छा होती. तथापि, शूद्राला ज्याप्रमाणें प्रत्यक्ष वेदांचा तर नाहींच पण नुसत्या वेदश्रवणाचा सुद्धां लाभ घडत नाहीं, त्याप्रमाणें तिचें नखही ह्याच्या दृष्टीस पडलें नाहीं!"

शिशुपालाचें कृष्णास उत्तर.

वैशंपायन सांगतातः—अशा प्रकारचें श्रीकृष्णाचें भाषण ऐकतांच ते सर्व राजे एकदम त्या चेदिराज शिशुपालाचा धिक्कार करूं लागले. परंतु त्या महामति शिशुपालानें तिकडे यत्किंचितही लक्ष न देतां, तो तें श्रीकृष्णाचें भाषण ऐकून मोठ्यानें हसला व म्हणाला, "कृष्णा ! रुक्मिणी पूर्वी माझी बायको होती, असें भरसभेंत आणि त्यांतून या सर्व राजांपुढें सांगतांना तुला लाज तरी कशी वाटत नाहीं ? अरे मधुसूदना ! एखादी स्त्री आपली भार्या होण्यापूर्वी तिला दुसऱ्यानें वरिलें होतें, असें तुजवांचून दुसरा कोणता तरी अब्रूची चाड असलेला पुरुष लोकांना सांगत बसेल काय ? कृष्णा ! ह्याबद्दल तुला कांहीं वाटत असल्यास मला क्षमा कर, नाहीं तर करूं नको. त्याची मी मुळींच पर्वा करीत नाहीं. कारण, तूं माझ्यावर क्रुद्ध झालास, किंवा प्रसन्न झालास, तरी तुझ्या हातून माझें तें काय होणार आहे !"

शिशुपालाचा शिरच्छेद.

जनमेजया, ह्याप्रमाणें शिशुपाल बोलण्यामध्यें गुंतला आहे तोंच भगवान मधुसूदन ह्यांनीं दैत्यांचा गर्व परिहार करणाऱ्या सुदर्शनाचें स्मरण केलें; आणि तें सुदर्शन हस्तगत होतांच ते वक्तृत्वकुशल भगवान मोठ्यानें म्हणाले, "मी काय म्हणतों इकडे सर्व भूपतींनीं लक्ष द्यावें. ह्या शिशुपालाच्या आईनें माझ्यापासून वर मागून

घेतल्यामुळें मला ह्याचे शंभर अपराध सहन करणें भाग होतें. ते मीं आजपर्यंत सहन केले. तेव्हां ह्याच्या आईला जो मीं वर दिला, तो मीं शेवटास नेला. तर आतां, सर्व भूपहो! तुमच्या समक्षच मी याचा वध करितों."

राजा, शत्रुनाशक यदुकुलश्रेष्ठ भगवंतांनीं ह्याप्रमाणें सांगितलें, आणि लागलीच क्रुद्ध होऊन सुदर्शन चक्रानें त्या चेदिराजाचें मस्तक उडविलें! त्याबरोबर वज्राचा आघात झालेल्या पर्वताप्रमाणें तो महापराक्रमी शिशुपाल धाडकर भूतलावर आपटला! आणि आकाशांतून निघणारा जणू काय सूर्यच, अशा प्रकारचें एक दिव्य तेज त्या पतन पावलेल्या शिशुपालाच्या देहांतून निघालेलें सर्व राजांच्या दृष्टीस पडलें. नंतर, राजा, त्या तेजानें जगद्वंद्य, कमलनयन अशा श्रीकृष्णाला वंदन करून लागलीच परमात्म्यामध्यें प्रवेश केला! महाबलाढ्य पुरुषोत्तम श्रीकृष्णाच्या ठिकाणी तें तेज प्रविष्ट झालेलें पाहून सर्व राजांना तो एक मोठा लोकोत्तर चमत्कार वाटला. असो. ह्याप्रमाणें श्रीकृष्णानें शिशुपालाचा वध केला,तेव्हां आकाशांत ढग नसतांच पर्जन्याची वृष्टि झाली, आणि मोठमोठे विद्युत्पात होऊन धरणीकंप झाले! तेव्हां कांहीं राजे चकार शब्दही न बोलतां त्या अनिर्वचनीय कालीं श्रीकृष्णाला अवलोकन करीत स्वस्थ बसले; कांहीं राजे क्रोधानें व्याप्त होऊन हात चोळूं लागले; कांहीं दांतओठ खाऊं लागले; कित्येक राजे वृष्णिकुलोत्पन्न श्रीकृष्णाची प्रशंसा करूं लागले; कांहीं आंतल्या आंतच जळफळूं लागले; व कांहीं अगदीं तटस्थ राहिले. परंतु पुढें हळू हळू मोठमोठे ऋषि आनंदयुक्त होऊन श्रीकृष्णाची स्तुति करीत करीत त्याच्याजवळ आले. तें पाहून, महात्म्या ब्राह्मणांनीं व बलाढ्य राजांनींही तोच मार्ग धरिला: म्हणजे तो श्रीकृष्णाचा शिशुपालवधाचा पराक्रम पाहून बहुतेक सर्वांना आनंद वाटून ते त्याची स्तुति करूं लागले.

नंतर धर्मराजानें आपल्या भावांस सांगितलें कीं, "ह्या दमघोषाचा पुत्र वीर शिशुपाल राजा—ह्याचा अंत्य संस्कार लवकर करा; उशीर लावूं नका." तेव्हां त्या वडील बंधूच्या आज्ञेप्रमाणें त्या बंधूंनींही तें सर्व कृत्य उत्तम रीतीनें पार पाडलें. नंतर तेथें जमलेल्या राजांच्या समक्षच शिशुपाल राजाच्या पुत्राला धर्मराज युधिष्ठिरानें चेदि देशाचा राजा म्हणून राज्याभिषेक केला. असो.

राजसूययज्ञसमाप्ति.

राजा जनमेजया, युधिष्ठिराच्या त्या यज्ञांत धनधान्य यथेच्छ होतें; भक्ष्यभोज्य पदार्थांची समृद्धि होती; तो सर्व सामुग्रीनें युक्त होता; तो सुखानें चालला होता; त्याचें रक्षण प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण करीत असल्यामुळें, शिशुपालरूप विघ्नापासून त्याची मुक्तता होऊन तो निर्विघ्न झाला होता; आणि त्यापासून तरुण पुरुषांना मोठा आल्हाद होत होता. असो. हें सर्व आटोपल्यावर, महाप्रभावी कुरुश्रेष्ठ युधिष्ठिरानें त्या राजसूय यज्ञाची सांगता केली. हे जनमेजय राजा, शार्ङ्ग धनुष्य, सुदर्शन चक्र, व कौमोदकी गदा धारण करणारा, आणि शूरकुलामध्यें अवतीर्ण झालेला जो महापराक्रमी जनार्दन श्रीकृष्ण, तो ह्या यज्ञसमाप्तीपर्यंत संरक्षण करण्यामध्यें दक्ष राहिला होता.

पाहुण्यांची बोळवण.

राजा, नंतर तो धर्मात्मा युधिष्ठिर यज्ञसमाप्तीचें अवभृथस्नान करून आला, तेव्हां जमलेले सर्व राजे त्याच्यापुढें येऊन त्यास म्हणूं लागले कीं, "हे धर्मज्ञा, तुला सार्वभौमपद प्राप्त झालें असून तुझा उत्तरोत्तर अभ्युदय होत आहे, ही मोठी संतोषाची गोष्ट होय. हे आजमीढा, अजमीढवंशाची कीर्ति खरोखर दिगंत केली अशी तूंच. हे राजराजेश्वरा! ह्या यज्ञकर्माच्या योगानें तूं पुण्यही मोठेंच संपादन केलेंस. तूं आमचा उत्तम आदरसत्कार करून आमच्या सर्व इच्छा परिपूर्ण

केल्यास. तर, हे पुरुषश्रेष्ठा! आतां तुझा निरोप घेऊन आम्ही आपल्या राज्यांत परत जातों. आम्हांला आतां अनुज्ञा असावी. "

हें त्या राजांचें भाषण युधिष्ठिरानें श्रवण करून प्रत्येक राजाचें यथायोग्य पूजन केलें, आणि आपल्या सर्व बंधूंना म्हटलें, "हे सर्व राजे प्रेमानें आपल्या येथें आले होते, व आतां ते महापराक्रमी माझा निरोप घेऊन आपआपल्या देशाला चालले आहेत. तर ह्या थोर थोर राजांना देशाच्या सीमेपर्यंत तुम्ही पोहोंचवावयास त्यांच्याबरोबर जा. त्यांत तुमचें कल्याणच आहे."

राजा जनमेजया, धर्मराजाची ही आज्ञा होतांच ते धर्माचरणी पांडुपुत्र ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें एकेकजण सर्व राजांस पोहोंचवावयास गेले. प्रतापी धृष्टद्युम्न लवकर लवकर विराट राजाबरोबर गेला; महात्म्या महारथी द्रुपद राजाबरोबर अर्जुन गेला; भीष्म व धृतराष्ट्र यांना पोहोंचवावयाला महाबलशाली भीमसेन गेला; पुत्रासहवर्तमान असलेल्या द्रोणाचार्यांना पोहोंचवावयाला वीरशिरोमणि सहदेव गेला; राजा, पुत्रासह निघालेल्या सुबल राजाला नकुलानें पोहोंचविलें; महारथी पर्वतप्रदेशांच्या राजाला पोहोंचवावयाला अभिमन्यु व द्रौपदीचे पुत्र गेले. तसेंच इतर सरदार व राजेरजवाडे ह्यांसही पांडवांकडील सरदारांनीं पोहोंचवून दिलें. नंतर हजारों ब्राह्मणांचाही यथायोग्य सत्कार करून त्यांसही निरोप दिला. तेव्हां तेही आपआपल्या ठिकाणीं निघून गेले.

श्रीकृष्णाचें प्रयाण.

जनमेजया, ह्याप्रमाणें सर्व राजे व ब्राह्मण निघून गेल्यानंतर महापराक्रमी श्रीकृष्णही धर्मराजास म्हणाले, "हे कुरुनदना, सुदैवानें हा राजसूय महायज्ञ तुझ्या हातून एकदांचा शेवटास गेला, हें एक मोठें काम झालें. तर आतां मलाही द्वारकेस जावयास निरोप दे."

ह्याप्रमाणें श्रीकृष्ण बोलले तेव्हां धर्मराज त्यांस म्हणाला:—हे गोविंदा, हा एवढा यज्ञ माझ्या हातून पार पडला, ही केवळ तुझी कृपा. तुझ्या कृपेमुळेंच सर्व राजे अनुकूल झाले; आणि मलाच सार्वभौम राजा मानून त्यांनीं मला करभार दिले. तेव्हां, हे निष्पापा! तुला जा म्हणून सांगावयाला माझी जिव्हा तरी कशी धजेल? हे वीरा, तुझ्याशिवाय मला एक क्षणभरही करमावयाचें नाहीं; तथापि द्वारका नगरीला तुला गेलेंच पाहिजे, तेव्हां मीही तुला निरुपायास्तव निरोप देतों.

ह्याप्रमाणें युधिष्ठिरानें सांगितलें असतां, महाकीर्तिमान व धर्मरूप श्रीहरि युधिष्ठिराला बरोबर घेऊन कुंतीकडे गेले; आणि मोठ्या आनंदानें तिला म्हणाले, "आत्याबाई! तुमच्या पुत्रांना सार्वभौमत्व प्राप्त होऊन ते वैभवसंपन्न झाले आहेत. तेव्हां आपण आतां आनंद मानून रहावें. तुमची अनुज्ञा घेऊन मी आज द्वारकेस जावयास निघालों आहें."

ह्याप्रमाणें कुंतीचा निरोप घेतल्यानंतर श्रीकृष्णांनीं सुभद्रेला व द्रौपदीलाही जाऊन विचारलें. तेव्हां त्यांसही आनंद झाला. नंतर धर्मास बरोबर घेऊन ते अंतःपुरांतून बाहेर पडले. मग स्नान करून व जपजाप्य आटोपून ब्राह्मणांकडूनच स्वस्तिवाचन करविलें. इतक्यांत —फारच उत्तम तयार केलेला—केवळ मेघासारखा रथ जोडून महापराक्रमी दारुकही द्वारापाशीं येऊन ठेपला. तो गरुडचिन्हांकित ध्वजाचा रथ पुढें आलेला पाहतांच महात्मा कमलनयन भगवान त्या रथाला प्रदक्षिणा घालून वर बसला, आणि द्वारकेस जाण्याकरितां निघाला. तेव्हां श्रीमान धर्मराजा आपल्या बंधूंसहवर्तमान महाबलाढ्य वासुदेवाच्या पाठीमागून पायांनीं

चालूं लागला. बरेंच लांब गेल्यावर श्रीहरींनीं रथ जरा उभा केला; आणि ते श्रीकृष्ण त्या कुंतीपुत्र युधिष्ठिराला म्हणाले, "हे प्रजाधिपा! तूं सदासर्वदा दक्ष राहून प्रजेचें पालन करीत जा; आणि प्राणी ज्याप्रमाणें पर्जन्यावर जीव ठेवून असतात, किंवा पक्षी ज्याप्रमाणें वृक्षाचा आश्रय करितात, अथवा देव ज्याप्रमाणें इंद्राचा आश्रय करून राहतात, त्याप्रमाणें तुझे बंधुही तुझ्यावर भक्ति ठेवून राहोत."

ह्याप्रमाणें श्रीकृष्णांनीं धर्मराजास सांगून परस्परांनीं परस्परांचा निरोप घेतला, व ते आपआपल्या स्थानांस निघून गेले. असो. हे जनमेजय राजा! यादवश्रेष्ठ श्रीकृष्णही द्वारकेस गेल्यानंतर, त्या दिव्य सभेमध्यें, प्रमुख मंडळींपैकीं एक दुर्योधन व दुसरा सुबकाचा पुत्र शकुनि हे दोघेच काय ते राहिले.



द्यूतपर्व.

अध्याय शेचाळिसावा.

—:०:—

व्यासांचें प्रयाण.

वैशंपायन सांगतातः—राजा, परम दुर्लभ अशा श्रेष्ठ राजसूय यज्ञाची समाप्ति झाल्यानंतर शिष्यमंडलासहवर्तमान व्यास मुनिही पुढें आले. त्यांस पाहतांच धर्मराजानें भ्रात्यांसहवर्तमान आसनावरून उठून त्या पितामहांस आसन दिलें, आणि अर्घ्यपाद्यादिकांनीं त्यांची पूजा करून त्यांचा सत्कार केला. नंतर, धर्मराजानें दिलेल्या त्या सुवर्णाच्या उत्कृष्ट आसनावर विराजमान झाल्यावर भगवान व्यास महर्षीनीं धर्मराजाला 'बैस' म्हणून आज्ञा केली; व बंधूंसहवर्तमान धर्मराज खालीं बसल्यानंतर भाषणचतुर असे ते भगवान व्यास बोलूं लागले.

व्यास म्हणालेः—धर्मराजा, ह्या जगतीतलावर सार्वभौमत्व प्राप्त होणें परम दुर्लभ आहे. तें तुला प्राप्त होऊन दिवसानुदिवस तुझ्या भाग्याला चढती कळा लागत आहे ही मोठी आनंदाची गोष्ट होय हे कुरुवंशजश्रेष्ठा, साऱ्या कुरुवंशाची कीर्ति तूंच वृद्धिंगत केलीस. हे प्रजाधिपते, तूं माझा सत्कारही चांगला केलास. आतां तुझा निरोप घेऊन मी गमन करितों.

व्यासांचें हें भाषण ऐकून त्या युधिष्ठिरानें त्यांस अभिवंदन करून त्यांचे घट्ट चरण धरिले; आणि तो म्हणाला, "हे पुरुषोत्तमा, माझ्या मनांत असा एक संशय उत्पन्न झाला आहे कीं, तो निवारण होणें परम दुर्घट दिसतें; आणि, हे विप्रवर्य ! त्याचें निरसन करण्यास आपल्यावांचून दुसरें कोणीच समर्थ नाहीं. हे पितामह ! भगवान नारद मुनींनीं स्वर्ग, आकाश आणि पृथ्वी ह्या तीन ठिकाणीं होणारे तीन प्रकारचे उत्पात सांगितलेले आहेत. तेव्हां चेदि देशाचा राजा शिशुपाल मरण पावला एवढ्यानेंच ह्या उत्पातांचें अरिष्ट संपलें कीं काय ?"

व्यासकृत भविष्यकथन.

वैशंपायन सांगतातः—राजा, धर्मराजाचा हा प्रश्न ऐकून प्रभु पराशरपुत्र कृष्णद्वैपायन म्हणाले, "हे प्रजाधिपते युधिष्ठिरा ! ह्या उत्पातांचें फळ तेरा वर्षेपर्यंत मोठें अनिष्ट भोगावें लागेल, आणि त्यांत सर्व क्षत्रियांचा फडशा पडेल, हें तुला सांगून ठेवतों. ह्या साऱ्याला तूंच एक कारणीभूत होऊन दुर्योधनाच्या अपराधानें व भीमार्जुनांच्या बळामुळें सारा क्षत्रियसमुदाय एकत्र होऊन त्याचा क्षय होईल. हे नृपश्रेष्ठा, एका पहांटेस तुला एक स्वप्न पडेल, आणि त्यांत वृषभध्वज, नीलकंठ, भव, स्थाणु, कपाली, त्रिपुरांतक, उग्र, रुद्र, पशुपति, महादेव, उमापति, हर, शर्व, वृष, शूल, पिनाकी व कृत्तिवास असा कैलासपर्वताच्या शिखरासारख्या शुभ्र वर्णानें युक्त असलेला शिव नंदीवर बसून दक्षिण दिशेकडे सारखा रोंख लावलेला तुझ्या दृष्टीस पडेल. पण, हे प्रजाधिपते ! अशा प्रकारचें स्वप्न तुला पडलें म्हणून तूं त्याबद्दल कांहीं निदिध्यास घेऊन बसूं नको; कारण, भवितव्य आहे, तें कोणालाच टळावयाचें नाहीं. ह्याकरितां तुझें क्षेमकल्याण असो. मी आतां कैलास पर्वताकडे जातों. तूं जितेंद्रिय व दक्ष राहून पृथ्वीचें पालन कर."

धर्मराजास उद्भवलेली चिंता.

वैशंपायन म्हणालेः—ह्याप्रमाणें युधिष्ठिराला सांगून भगवान कृष्णद्वैपायन मुनि आपल्या वेदाभ्यास करणाऱ्या शिष्यांसह कैलास पर्वताकडे गेले.

जनमेजया, ते पितामह व्यास मुनि गेल्यानंतर युधिष्ठिर राजा चिंताग्रस्त व शोकाकुल होऊन दुःखाचे सुस्कारे टाकूं लागला; आणि 'प्रारब्धानें

जी गोष्ट नेमलेली, तिला पुरुषानें कितीही जंग-जंग पछाडले तरी बाध येणार कसा ? यावयाचाच नाही! तेव्हां त्या महर्षींनीं सांगितलेलें निःसंशय घडून येणारच !' हीच गोष्ट वारंवार त्याच्या मनांत येऊन, तिचा त्याला अगदीं निदिध्यास लागून राहिला. नंतर त्याच विवंचनेंत मग्न असतां महातेजस्वी युधिष्ठिरानें आपल्या सर्व बंधूंस हांक मारिली, आणि तो म्हणाला, "हे पुरुषसिंहहो! मला कृष्णद्वैपायन व्यास मुनींनीं काय सांगितलें तें तुम्हीं ऐकिलेंच. तें त्यांचें भाषण ऐकल्यापासून तर आपण देहत्याग करावा असाच मीं कृतनिश्चय करून ठेविला आहे. कारण, बाबांनो! सर्व क्षत्रियांच्या मृत्यूला कारणीभूत व्हावयाला काळानें जर मला एकट्यालाच नेमिलेलें असेल, तर यापुढें वांचण्यांत तरी अर्थ काय ?"

याप्रमाणें युधिष्ठिराचें भाषण ऐकून त्यावर अर्जुन म्हणाला, "हे राजा! असा बुद्धिविपर्यास करून घेऊन घोर अज्ञानांत शिरूं नको. हे महाराजा! व्यास मुनींनीं सांगितलेलें लक्षांत ठेवून नीट दिसेल अशा रीतीनें वागत जा." त्यावर द्वैपायन मुनींच्या भाषणाचें चिंतन करीत असलेला तो सत्यनिष्ठ युधिष्ठिर आपल्या बंधूंस म्हणाला, "तुमचें देव भलें करो. आजपासून माझी प्रतिज्ञा काय आहे, ती ऐकून ठेवा. बाबांनो! तेरा वर्षे जगून तरी माझा काय उपयोग ? मी आजपासून भावांना किंवा राजांना कठोर म्हणून कधींच बोलणार नाहीं. सर्वदा मृदु असेंच बोलत जाईन; आणि जें काय करावयाचें, तें ज्ञातिबांधवांच्या आज्ञेंत राहून त्यांना सांगूनच करीत जाईन. माझा मुलगा असो, कीं दुसरा कोणी असो; सर्वांशीं अगदीं असाच वागेन. म्हणजे कोणाचाच मतभेद व्हावयाला नको. कारण, मतभेद हेंच जगामध्यें कलहाचें बीज आहे. अशा रीतीनें कलहापासून दूर झालों, लोकांना प्रिय असेल तेंच करूं लागलों, म्हणजे, हे नरपुंगवहो! लोकांमध्यें माझी निंदा तरी होणार नाहीं."

आपल्या वडील बंधूचें हें म्हणणें नीट ऐकून घेऊन त्या धर्मराजाच्या हिताविषयीं तत्पर असलेल्या पांडुपुत्रांनींही तेंच व्रत स्विकारिलें. नंतर, हे जनमेजया! बंधूंसहवर्तमान त्या सभेमध्यें अशी प्रतिज्ञा केल्याबद्दल त्या धर्मराजानें पितर व देव ह्यांचें यथाविधि तर्पण केलें. असो. हे भरतवंशजश्रेष्ठा! सारे मुख्य मुख्य क्षत्रिय परत गेल्यानंतर, सभोंवार बंधु असलेला युधिष्ठिर मंगलकारक व कल्याणप्रद पुण्याहवाचन वगैरे करवून अमात्यांसहवर्तमान आपल्या सर्वोत्तम नगरांत प्रविष्ट झाला; आणि, हे जनमेजया! दुर्योधन व सुबलाचा पुत्र शकुनि हे उभयतां मात्र त्या मनास तन्मय करून टाकणाऱ्या मयसभेमध्यें राहिले.

अध्याय सत्तेचाळिसावा.

दुर्योधनाची मयसभेतें फजिती!

वैशंपायन सांगतातः—राजा, त्या मयसभेमध्यें दुर्योधन राहिलेला होता, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. तो शकुनीला बरोबर घेऊन ती सारी सभा हळू हळू पहात चालला. तेव्हां त्या कुरुनंदनाला कित्येक अद्भुत चमत्कार दिसूं लागले. तसले चमत्कार त्यानें पूर्वीं कधीं आपल्या हस्तिापुरांत सुद्धां पाहिले नव्हते. तो धृतराष्ट्रपुत्र दुर्योधन राजा त्या सभेंतून चालतां चालतां त्याला एके ठिकाणीं एक स्थळ लागलें. तें शुद्ध स्फटिकाचें बनविलेलें होतें. त्यांत अशी चतुराई केलेली होती कीं, तें पाणीच आहे असा भास व्हावा. त्यामुळें दुर्योधन राजास वाटलें कीं, येथें पाण्याचेंच टांकें भरलेलें आहे; आणि त्याच भ्रमानें त्यानें आपलें वस्त्र वर सावरून धरिलें, व तो मोठ्या बेताबेतानें आंत पाय टाकूं लागला, तों आंत काय ? कांहींच नाहीं ! पाय

वरच राहिला! त्यामुळें तो मनामध्यें अतिशय खजील होऊन पुनः त्या सभेंत हिंडूं लागला. याप्रमाणें त्या जागीं तो राजा अगदीं फजीत पावला, आणि खिन्न व लज्जित होऊन एवढेंसें तोंड करून दुःखाचे सुस्कारे टाकीत टाकीत त्या सभेंतून हिंडू लागला; तों दुसऱ्या एका जागीं दुसरी एक फसवणूक करून ठेविलेली होती. ती अशी कीं, त्या ठिकाणीं एक लहानसा स्फटिकाचा हौद केलेला असून त्यांत निवळ शंख असें पाणी तुडुंब भरलेलें होतें. त्यांत स्फटिकाचेंच प्रतिबिंब दिसत असल्यामुळें, तेथें पाणी आहे असें मुळीं वाटतच नसे. दुर्योधनालाही तोच भ्रम झाला; आणि तेथें जमीनच आहे, असें समजून त्यावर त्यानें पाय दिला, तों आपल्या त्या जाम्यानिम्यासुद्धां धाडकर पाण्यांत पडून तो गटकळ्या खाऊं लागला. ती त्याची दशा पाहून महाबलाढ्य भीमसेनाला हसूं आलें. भीमसेन हसला म्हणून जवळचे हुजरे सुद्धां हसावयास लागले. इतक्यांत त्याला राजाज्ञेवरून हुजऱ्यांनीं दुसरीं चांगलीं वस्त्रें आणून दिलीं. तो नवा पोषाख घालून दुर्योधन पुनः आलेला पाहून, पहिल्या गोष्टीची आठवण होऊन भीम, अर्जुन, नकुल व सहदेव हे सारेच पुनः हसावयास लागले. असा हशा पिकलेला पाहून दुर्योधन मनांतून तर अगदीं जळफळत होता. पण त्यानें त्यांच्या हसण्याकडे तादृश लक्ष दिलें नाहीं; इतकेंच नव्हे, तर आपल्या चर्येवर क्रोधाची आलेली छटा सुद्धां दुसऱ्यास न दिसावी म्हणून त्यानें कोणाकडे वर तोंड करून सुद्धां पाहिलें नाहीं; आणि तो तसाच पुढें जाऊं लागला, तों पुनः दुसऱ्या एका ठिकाणीं उदक असल्याचा भ्रम होऊन त्यांतून पलीकडे जाण्याच्या उद्देशानें दुर्योधन राजा आपलें वस्त्र वर आवरून धरून चालूं लागला. तेव्हां पुनः जवळ असलेल्या लोकांत एकच हशा पिकला! त्याच्याकडेही लक्ष दिलें न दिलेंसें करून पुढें जातां जातां, भिंतीवर, स्फटिकाचें हुबेहूब दार उघडलेलें आहे, असें चित्र काढिलेलें होतें; तें खरोखरच दार उघडलेलें आहे, असा त्यास भ्रम पडून तो त्यांतून पलीकडे जाऊं लागला, तों त्यावर धाडकन मस्तक आपटलें, व तिरमिरी येऊन तो मटकर खालींच बसला! जनलज्जेकरितां तितकीही कळ सोसून तो उठून पुढें जाऊं लागला, तों दुसरें एक स्फटिकांच्या तक्त्याचें दार असून तें घट्ट झांकलेलें आहे, असें दृष्टीस पडलें. तेव्हां तें उघडून पलीकडे जावें, अशा हेतूनें तें तो हातानें ढकलावयास गेला, तों तेथें तक्ते वगैरे कांहींच नसल्यामुळें एकदम पुढें तोल जाऊन धाडकन जमिनीवर तोंडघशीं पडला! तरी पुढें जाण्याचा क्रम कांहीं त्यानें सोडिला नाहीं. इतक्यांत एक खरोखरच उघडलेलें द्वार पुनः लागलें. पण ह्यांत कांहीं तरी पूर्वीप्रमाणेंच कपट असेल, म्हणजे खरोखरीच हें द्वार लावलेलें असेल असें समजून त्या द्वाराजवळ गेल्यावर तो सरळ आंत न जातां तेथेंच थबकून राहिला!

दुर्योधनाचा जळफळाट.

हे जनमेजय राजा! ह्याप्रमाणेंच अनेक प्रकारांनीं दुर्योधन राजाची उपहास्यता झाली. नंतर एक दोन दिवस ठेवून घेऊन पांडवांनीं त्यास जावयास निरोप दिला. तेव्हां त्या राजसूय नामक महान यज्ञांतील पांडवांची अपार संपत्ति पाहून त्याच्या मनास आनंद व्हावयाचा एके बाजूस राहून, तो उलट आंतल्या आंत जळफळतच हस्तिनापुरास जावयास निघाला. ह्याप्रमाणें पांडवांच्या वैभवानें मनांत संतप्त होऊन तो दुर्योधन त्याच गोष्टीचा एकसारखा विचार करीत चालला असतां त्याच्या मनांत पापबुद्धि उत्पन्न झाली! हे कुरुकुलोद्धारका जनमेजय राजा! पांडवांना झालेला आनंद; त्यांना वश झालेले सर्व राजे; सारे लोकच नव्हेत—तर आबालवृद्धांसुद्धां त्यांचे हितचिंतक; महात्म्या पांड-

यांची दिगंत कीर्ति; हें सर्व पाहून धृतराष्ट्राचा पुत्र दुर्योधन अगदीं फिका पडला; आणि अंतःकरणांत संतप्त होऊन तो हस्तिनापुरास एकटाच विचार करीत चालला असतां, त्या बुद्धिमान धर्मराजाची लोकोत्तर सभा व अनुपम संपत्ति ह्यांवांचून त्याच्या मनांत दुसरें कांहींच घोळत नव्हतें. तो धृतराष्ट्रपुत्र दुर्योधन ह्या विचारामध्येंच इतका गर्क होऊन गेला होता कीं, सुबलाचा पुत्र शकुनि वारंवार बोलत असतांही तो त्याला कांहींच उत्तर देईना. तेव्हां, ह्याचें चित्त अगदीं व्यग्र आहे, असें पाहून शकुनि विचारूं लागला कीं, "हे दुर्योधना! तूं असे दुःखाचे सुस्कारे टाकीत चालला आहेस, ह्याचें कारण काय?" तेव्हां दुर्योधनानें त्याच्याकडे लक्ष दिलें व तो म्हणाला, "खरोखर ही पृथ्वी जिंकणारा महात्मा अर्जुन; आणि ती सारी आज युधिष्ठिराच्या ताटाखालचें मांजर होऊन राहिली आहे! काय सांगूं मामा! देवांमध्यें झालेल्या इंद्राच्या यज्ञाप्रमाणें त्या महातेजस्वी कुंतीपुत्र युधिष्ठिराचा झालेला तो यज्ञ दृष्टीस पडल्यापासून रात्रंदिवस रागानें माझ्या अंगाची कशी लाही लाही होत आहे. ग्रीष्मऋतु जवळ आला म्हणजे डबक्यांतील पाणी ज्याप्रमाणें आटून जातें, त्याप्रमाणेंच माझी अवस्था झालेली आहे. यदुश्रेष्ठ श्रीकृष्णानें शिशुपालाचा भरसभेंत शिरच्छेद केला असून त्याचा हात धरणारा एकही पुरुष तेवढ्या सभेमध्यें निघाला नाहीं अं! किती आश्चर्याची गोष्ट आहे पहा! पांडवांपासून निघालेल्या अपराधरूपी अग्नीनें सारे राजे होरपळून गेले होते, तरी त्यांनीं तें सर्व सहनच केलें. पण त्यांचें तें वर्तन खरोखर कोणाला तरी सहन होण्यासारखें होतें कारे? महात्म्या पांडवांच्या प्रतापानें तें पचलें ही गोष्ट निराळी! पण कृष्णानें जें कृत्य केलें, तें निखालस अयोग्य होतें. तसेच हे सारे राजे पहा! हिरे, माणकें घेऊन धर्मराजाकडे अगदीं धाव घेत आले! जणू काय सरकारसारा भरावयाला थैल्या घेऊन आलेले वाणीउदमीच! पांडवांना अशी पाण्यासारखी संपत्ति मिळालेली पाहून माझ्या तळव्याची आग अगदीं मस्तकाला जाऊन पोहोंचली आहे; पण मी क्रोधाला वश होऊन नुसता जळफळत बसतों, हें कांहीं बरोबर नाहीं!"

राजा जनमेजया, अशा प्रकारचे विचार मनामध्यें येऊन अग्नीसारखा संतप्त झालेला तो गांधारदेशाधिपति पुनः शकुनीस म्हणाला, "मामा, ह्याकरितां मी आतां अग्निकाष्ठें भक्षण करितों, विष खातों, किंवा पाण्यामध्यें जीव तरी देतों; आतां माझ्यानें जीव ठेववत नाहीं. कारण शत्रूचा उत्कर्ष, व आपला अपकर्ष होत असलेला पाहणें कोणत्या बरें मानी पुरुषाला सहन होईल? पांडवांचें तशा प्रकारचें वैभव पाहून स्वस्थ बसणारा जो मी, त्या माझी स्थिति धड स्त्री नव्हे, धड पुरुषही नव्हे, व धड नपुंसकही नव्हे, अशासारखी झाली आहे! कारण मी स्त्री आहें म्हणावें, तर कित्येक स्त्रिया सवतीमत्सर सहन करून खुशाल राहतात, तसेंही माझ्यानें राहवत नाहीं; बरें पुरुष म्हणावें, तर पांडवांना जिंकून त्यांचा पराभव करण्याइतकें सामर्थ्य माझ्या एकट्याच्या अंगांत नाहीं; आणि नपुंसक आहें म्हणावें, तर माझ्या स्वतांच्या अंगांत मुळींच पराक्रम नाहीं असें नाहीं! तेव्हां माझ्या स्थितीला म्हणावें तरी काय? अरे! साऱ्या पृथ्वीचें आधिपत्य, तशा प्रकारची संपत्ति, आणि राजसूय यज्ञासारखा यज्ञ पाहून माझ्यासारख्या कोणत्या बरें मानी पुरुषाच्या अंगाचा तिळपापड होणार नाहीं? काय करूं रे! ती सर्व राज्यसंपत्ति लुटून आणावयाचें काम माझ्या एकट्याच्यानें निभावयाचें नाहीं. बरें, त्या कामीं कोणी साहाय्य करतील किंवा नाहीं ह्याचाही मला भरवंसा येत नाहीं. तेव्हां आतां मरावें हेंच बरें, असें मला वाटत आहे. ह्या

पांडवांनीं डोकें सुद्धां वर काढूं नये म्हणून मीं काय काय केलें ! परंतु तें सर्व व्यर्थ जाऊन, अखेरीस कुंतीपुत्र युधिष्ठिरालाच ती तसली सोज्वळ राज्यलक्ष्मी प्राप्त झाली ! तेव्हां हीच गोष्ट सिद्ध आहे कीं, ह्या जगामध्यें दैव हेंच प्रधान आहे. पुरुषाचे कितीही दीर्घप्रयत्न असोत, ते सारे व्यर्थ होत. हे शकुने ! ह्याला मारावयाचा सुद्धां मीं पूर्वी यत्न केलेला होता. पण पाण्यांतलें कमल तोडलें म्हणजे तें मागाहून जसें जास्तच फुटतें, त्याप्रमाणें हा आधिकाधिकच उदयाला येत चालला आहे. दैव बलवत्तर आहे व मनुष्याचा प्रयत्न व्यर्थ आहे, असें मी म्हणतों तें याचकरितां ! हेंच का पाहिनास ? कुंतीच्या पुत्रांचा नित्य उत्कर्ष होत चाललेला आहे, आणि धृतराष्ट्राच्या पुत्रांना एकसारखी उतरती कळा लागत चालली आहे. मामा, त्याची ती कुबेरासारखी संपत्ति, ती लोकोत्तर मयसभा, आणि तेथें सभेच्या रक्षकांनीं केलेली माझी टवाळी, हीं मनांत आलीं म्हणजे माझ्या अंगाला अगदीं वणवा लागल्यासारखा होतो. मामा ! हें दुःख माझ्यानें आतां कांहीं सहन होत नाहीं. तेव्हां यांतून सुटका करून घेण्याला मला तूं आज अनुमोदन दे, आणि माझा पिता धृतराष्ट्र, ह्याला ' मला असा असा संताप झाला होता. ' असें जाऊन कळीव."

अध्याय अठ्ठेचाळिसावा.

—:०:—

शकुनीची मसलत.

शकुनि म्हणाला:—हे दुर्योधना, युधिष्ठिराशीं मत्सर करण्याचें तुला कांहींच कारण नाहीं; त्यांच्या प्रारब्धाचें फळ तें भोगीत आहेत. त्यांनीं आपल्यां उत्कर्षाकरितां जितके उपाय केले, त्यापेक्षां खरोंखर तूं त्यांच्या नाशाविषयीं अधिक उपाय योजिलेस; तरी तुझें काम साधलें नाहीं ! आणि, हे शत्रुनाशका, तूं त्यांना पुनः पुनः संकटांत घातलेंस, तरी ते पुरुषश्रेष्ठ दैवाच्या जोरानें त्यांतूनही मुक्त होऊन उदयास आलेच. द्रौपदीसारखी त्यांना भार्या मिळाली; पुत्रासहवर्तमान द्रुपद राजा त्यांच्या बाजूचा झाला; आणि भगवान श्रीकृष्णही त्यांस पृथ्वीचा लाभ होण्यास साहाय्य झाला. सारांश, हे पृथ्वीपते ! त्यांचा कोणताही मनोरथ व्यर्थ झाला नाहीं. शिवाय, त्यांनीं वडिलोपार्जित संपत्तीचा विभाग घेऊन तो आपल्या पराक्रमावर वाढविला, त्याबद्दल तुला इतकें वाईट तरी कां वाटावें ! अर्जुनानें गांडीव धनुष्य, दोन मोठमोठाले अक्षय्य भाते, व कांहीं दिव्य अस्त्रें संपादन केलीं आहेत; आणि त्या श्रेष्ठ धनुष्यानें आपल्या भुजबळावर सारे राजे पादाक्रांत केले. तेव्हां त्याचा तरी खेद कां ? तसेंच त्या शत्रुसंहारक अर्जुनानें अग्नीच्या तापापासून मयासुर राक्षसाला मुक्त करून त्याजकडून ही आपली सभा उभारली. ती अशी कीं, त्या मयासुराच्या आज्ञेबरोबर किंकर नांवाचे जे त्याचे बलाढ्य राक्षस असत, ते ती हवी तिकडे घेऊन जात असत. पण त्याबद्दल आतां हळहळ करण्यांत तरी अर्थ कोणता ? आतां, हे भरतकुलोत्पन्न दुर्योधन राजा, ' मला कोणी साहाय्य करणारा नाहीं,' असें जें तूं म्हणालास, तें मात्र बरोबर नाहीं. कारण, तुझे सारे भाऊ तुझे अगदीं आज्ञांकित आहेत; आणि पुत्रासहवर्तमान महाधनुर्धर द्रोणाचार्य, सूतपुत्र कर्ण, महारथी गौतमाचा मुलगा कृपाचार्य, मी व माझे सारे बंधु, आणि राजा सोमदत्ति हे सर्व तुला पूर्णपणें अनुकूल आहेत, तेव्हां ह्या सर्वांना साहाय्याला घेऊन तूं सर्व पृथ्वीच जिंकून टाक म्हणजे झालें.

दुर्योधन म्हणाला:—हे राजा, तुझें अनुमोदन असेल तर तुझ्या आणि दुसऱ्या महारथ्यांच्या साह्यानें आधीं ह्या पांडवांनाच जिंकावें असें मी म्हणतों. कारण, ह्यांचा एक पराजय

केला कीं ही सारी पृथ्वी, हे सारे राजे आणि ती मूल्यवान सभा, हीं सर्व माझींच होतील.

शकुनीनें उत्तर दिलें:—परंतु अर्जुन, श्रीकृष्ण, भीमसेन, धर्मराज, नकुल, सहदेव आणि पुत्रासहवर्तमान द्रुपद राजा, असल्या महारथी, महाधनुर्धर, अस्त्रपटु, व युद्धांत केवळ अजिंक्य अशा वीरांचा युद्धामध्यें देवगणांच्या हातून सुद्धां पराजय होणें शक्य नाहीं. आतां, राजा! त्या युधिष्ठिराला स्वतांला जिंकावयाला एक उपाय मला माहीत आहे, तो ऐकून घे; व पाहिजे तर करून पहा!

दुर्योधन म्हणालाः—आपल्या आप्तेष्टांना व थोर थोर लोकांना धक्का न लागतां पांडवांना जिंकण्याची युक्ति निघाली तर मग काय मजाच झाली! तर मग, मामा! सांगा, सांगाच काय ती.

शकुनि म्हणालाः—युधिष्ठिराला द्यूत फार प्रिय आहे. पण त्यांत त्याची गति म्हणशील तर तितक्यापुरतीच आहे; आणि त्याला खेळावयास बोलाविलें म्हणजे त्याच्यानें नाहीं असें कांहीं म्हणवणार नाहीं! आणखी द्यूत खेळण्यांत मी इतका प्रवीण आहें कीं, माझ्यासारखा द्यूत खेळण्यांत पटाईत, ह्या पृथ्वींतच नव्हे तर साऱ्या त्रैलोक्यांतही कोणी नाहीं. ह्याकरितां, हे कुरुकुलोत्पन्न दुर्योधना! त्यांना तूं द्यूत म्हणजे जुगार खेळावयाला बोलाव. हे नरपुंगवा राजा दुर्योधना! ह्याप्रमाणें फांसे टाकण्यांत माझा हातखंडा असल्यामुळें, तूं त्यांना बोलावलेंस पुरे, कीं मी तुझ्याकरितां त्यांचें तें राज्य, व त्यांची ती डोळे दिपविणारी सारी संपत्ति तुझ्या घरांत आणून घातलीच म्हणून समज! पण ही सारी गोष्ट आधीं तुझ्या पित्याच्या कानावर घाल; आणि त्याची मात्र ह्या गोष्टीला अनुज्ञा घे, कीं झालीच फत्ते! खात्रीनें त्यांस जिंकितों!

जनमेजया, शकुनीचें हें भाषण ऐकून दुर्योधन म्हणालाः—हे सौबला! कुरुवंशजाधिपति धृतराष्ट्रापाशीं हें सारें तूंच सांग. तूंच तें सारें चांगलें खुलवून त्याला रंग आणशील. मला नाहीं तें नीटसें सांगावयाला जुळावयाचें!

अध्याय एकुणपन्नासावा.

—:o:—

शकुनि, दुर्योधन व धृतराष्ट्र ह्यांचें विकृत.

वैशंपायन म्हणाले:—गांधारीचा पुत्र राजा दुर्योधन ह्याच्यासहवर्तमान युधिष्ठिरानें केलेल्या महान राजसूय यज्ञांतील अनुभव स्वतः घेऊन, व दुर्योधनाचें मत आपल्यास अनुकूल आहे असें पाहून, व त्याचें भाषण श्रवण करून तो सुबलाचा पुत्र शकुनि दुर्योधनाला घेऊन त्या महानबुद्धिमान परंतु अंध अशा प्रजाधिपति धृतराष्ट्र राजाकडे गेला, व त्यास म्हणूं लागला, "हे मनुष्याधिपते महाराज! हा आपला दुर्योधन सांप्रत किती निस्तेज झाला आहे; कसा पांढरा फटफटीत दिसतो; त्याच्या अंगीं केवढी क्षीणता आली आहे; ह्याचें तोंड कसें सुकून गेलें आहे; चिंतेनें हा कसा ग्रस्त झाला आहे; ह्याच्याकडे कांहीं तरी लक्ष पुरवा. आपण ह्याची कधीं विचारपूसच करीत नाहीं, असें वाटतें. कारण, आपण ती करीत असतां, तर शत्रूपासून आपल्या वडील मुलाच्या अंतःकरणांत उत्पन्न झालेला शोक आपल्याला कसा कळला नसता?"

जनमेजय राजा, शकुनीचें हें भाषण ऐकून धृतराष्ट्र विस्मयपूर्वक म्हणालाः—बा दुर्योधना! तूं कोणत्या कारणानें इतका झुरणीस लागला आहेस? हे कुरुनंदना! तुझ्या मनाला टोंचण्यासारखी कांहीं गोष्ट असली, व ती मला सांगण्यासारखी असली, तर ती तूं मला सांग. हा शकुनि सांगतो कीं, तूं हल्लीं अगदीं निस्तेज, पांढरा फटफटीत, व रोड झाला आहेस. अशा तुझ्या दुःखाचें कारण तरी काय असावें म्हणून विचार केला,

तर त्याविषयीं माझा कांहींच तर्क चालत नाहीं. कारण, हे पुत्रा ! गजांतलक्ष्मीसारखें ऐश्वर्य तुझ्या हातांत आहे; कोणत्याही प्रकारची न्यूनता नाहीं; तुझे भाऊ व सखेसोयरेही तुझ्या मनाविरुद्ध कधीं कांहीं करीत नाहींत. बरें, अन्नवस्त्रासंबंधानें म्हणावें, तर त्यासंबंधानें तुला कोणतीच ददात नाहीं. उंची उंची वस्त्रें तूं अंगावर घेतोस; मांसासारखें सुग्रास अन्न तुला वाढून येतें; तुझ्या रथाचे घोडे तर अस्सल जातिवंत आहेत; मग तूं असा वाळत कां चाललास ? तुला निजावयाला खुतनीच्या गाद्या व गिरद्या; तरुण आणि लावण्यसंपन्न स्त्रिया तुला उपभोग घ्यावयाला; हवी तशी यथेच्छ क्रीडा करावयाला नानाप्रकारच्या वस्तूंनीं भरलेलीं क्रीडामंदिरें; देवाप्रमाणें तुझ्या तोंडांतून शब्द निघण्याचा अवकाश, कीं हीं सारीं तुझ्यापुढें निःसंशय हात जोडून तयार; असें असतां, हे अजिंक्य पुत्रा ! तूं एखाद्या अनाथासारखा शोक कां करितोस ? "

दुर्योधन म्हणाला:—महाराज, एखाद्या हातपाय थकलेल्या पुरुषाप्रमाणें मी खातों, पितों, वस्त्राच्छादनांचाही उपभोग घेतों, आणि मनामध्यें दुःसह चिंता करून कसा तरी काळ कंठितों, इतकेंच ! जनांना शत्रूंच्या क्लेशापासून मुक्त करितो, तोच 'पुरुष' ह्या संज्ञेला पात्र होतो. मी तर आपल्या स्वतांच्या प्रजेची कोणतीच पर्वा न करितां माझ्या मनस्तापाच्या यातना मीच भोगीत बसलों आहें ! मनुष्य आहे त्यांतच संतोष मानून बसूं लागला कीं ऐश्वर्यावर व स्वाभिमानावर पाणी पडलेंच ! किंवा दया आणि भय ह्यांचा आपल्यावर पगडा बसला कीं मोठेपणाचें म्हणून पुनः नांवच घ्यावयास नको ! मनुष्य आहे त्यांतच संतोष मानून राहूं लागला म्हणजे त्याला कोणत्याच नव्या कार्याला उत्साह रहात नाहीं; धैर्य, साहस, दीर्घोद्योग हे सारेच गुण नष्टप्राय होतात; त्याला कोठेंच मान मिळत नाहीं; त्याचें कोठेंच तेज पडत नाहीं; आणि त्याला आपल्या अंगची कर्तृत्वशक्ति दाखविण्याचा कधीं प्रसंगही येत नाहीं. त्याच्या अंगचा स्वाभिमान व पीळ लयास जातो. तीच गोष्ट दयेची ! कोणाविषयींही आपल्या पोटांत दया उत्पन्न झाली कीं, आपली सत्ता व सामर्थ्य काय आहे तें दाखविण्याची संधि फुकट जाते. आपलें कोणावरच वजन पडेनासें होतें. भयाची गोष्टही तशीच ! कोणाविषयींही आपल्या मनांत एकदा भय उत्पन्न झालें कीं, आपले सारे स्नायु शिथिल होतात, वीर्याची स्फूर्ति नाहींशी होते, व आपण केवळ निर्माल्यवत् बापुडवाणे निखालस दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणारे असे होऊन जातों. हा कांहीं पुरुषार्थ नव्हे. जगांत जन्म घेतल्याचें हें कांहीं सार्थक नव्हे. सारासार विचार करण्याचें हें कांहीं कर्तव्य नव्हे. ह्याकरितां, कोणीही झाला तरी त्यानें नेहमीं आपल्या उत्कर्षाची हाव धरिली पाहिजे. आपलें तेज अधिक फांकेल, अशी तजवीज केली पाहिजे. केवढाही प्रसंग असो; त्याच्याशीं टक्कर देण्याला नेहमीं कंबर बांधिली पाहिजे. कितीही संकटें आलीं तरी आपलें धैर्य खचूं न देतां, ताजी उमेद धरून साहसानें, धैर्यानें, उमेदीनें, व पराक्रमानें पुरुषानें वर डोकें काढून आपल्या प्रभावाची व वैभवाची एकेक कला वाढविलीच पाहिजे. ह्याशिवाय कोणताच मनुष्य मोठेपणास चढावयाचा नाहीं. हीच ह्या जगांतील खरी इतिकर्तव्यता होय. मला निस्तेज करण्यास कारणीभूत काय ती त्या कुंतीपुत्र धर्मराजाची अपार संपत्ति ! ती पाहिल्यापासून माझें काळीज कसें करपून गेलें आहे. खाल्लें अन्न अंगीं लागत नाहीं: उत्तरोत्तर शत्रूचा उत्कर्ष व आमचा ऱ्हास होत चाललेला मनांत आला म्हणजे, त्या कुंतीपुत्र युधिष्ठिराची संपत्ति जरी सांप्रत माझ्या

डोळ्यांआड पुष्कळ अंतरावर आहे, तरी ती प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांसमोर उभी राहते; आणि तिच्यामुळेंच मी असा निस्तेज, पांढरा फटफटीत, दीन व क्षीण झालों आहे! प्रत्येकाला तीसतीस दासी ह्याप्रमाणें ऐशीं हजार गृहस्थाश्रमी ब्राह्मणांच्या कुटुंबांचें युधिष्ठिर आज पोषण करीत आहे. ह्याशिवाय त्या युधिष्ठिराच्या घरीं सोन्याच्या ताटांमध्यें दुसरे दहा हजार ब्राह्मण नेहमीं षड्रसान्नाचें भोजन करीत असतात. कांबोज देशच्या राजानें त्याच्या देशांत असणाऱ्या 'कदली' नामक मृगाचीं कृष्ण, श्याम व आरक्त वर्णांचीं अजिनें (चामडीं), आणि सर्वोत्कृष्ट ऊर्णावस्त्रें (कांबळीं) पाठवून दिलीं आहेत. हत्तीणी, गाई व घोडे तर त्याच्या येथें शेंकडों हजारों असून, शंभरांची एकेक अशा सांडण्यांच्या व घोड्यांच्या तीनशें पागा आहेत, व त्या युधिष्ठिराच्या घरीं करभार घेऊन आलेले राजेही एके ठिकाणींच राहिले आहेत. हे भूपते! ह्या श्रेष्ठ महायज्ञामध्यें त्या कुंतीपुत्र युधिष्ठिराला देशोदेशींच्या राजांनीं निरनिराळीं असंख्य रत्नें आणिलीं होतीं. त्या बुद्धिमान पांडुपुत्राच्या यज्ञामध्यें आलेली संपत्ति जशी मीं अवलोकन केली, तशी मीं त्याच्यापूर्वीं कधीं डोळ्यांनीं पाहिलीही नव्हती; इतकेंच नव्हे, तर कानांनीं ऐकिली सुद्धां नव्हती. हे प्रजाधिपते! राजा! तो शत्रूचा अपरंपार धनप्रवाह पाहिल्यापासून तीच गोष्ट माझ्या मनामध्यें एकसारखी घोळत राहिली आहे. दुसरें कांहीं सुचत नाहीं. गाईचीं खिल्लारेंच बाळगून राहणारे 'वाटधान' नामक ब्राह्मणांचे समुदाय, तीन खर्वांचा करभार घेऊन युधिष्ठिराच्या दारांत तिष्ठतच उभे राहिले होते; आणि सुवर्णाचे चकचकीत कमंडलु घेऊन आलेल्यांचीही तीच अवस्था झाली होती. म्हणजे इतकें धन घेऊन आलेल्यांनाही आंत प्रवेश झाला नाहीं! फार काय सांगावें? प्रत्यक्ष इंद्राकरितां देवांगनांनाही जो मधुपर्क आणितां येणार नाहीं.' अशा प्रकारचा मधुपर्क काशाच्या भांड्यांत भरून खुद्द समुद्रच घेऊन युधिष्ठिराकडे आला होता. तसेंच, सर्वोत्कृष्ट शंख घेऊन प्रत्यक्ष श्रीकृष्णांनीं युधिष्ठिराला अभिषेक केला. तेथें कावडी होत्या त्या सुद्धां हजारों तोळे सोन्याच्या असून, त्यांला हिरेमाणकें वगैरे अनेक रत्नें जडलेलीं होतीं. तें सारें पाहून माझ्या अंगांत तापच चढला. युधिष्ठिराच्या अभिषेकाला उदक आणण्याकरितां लोक त्या कावडी घेऊन आधींच पूर्व, दक्षिण व पश्चिम ह्या समुद्रांला गेले होते; व त्यांनीं भरून आणलेलें उदक यज्ञाच्या वेळीं तयार होतें. उत्तरसमुद्राकडे मात्र पक्ष्यांवाचून इतरांची गति नाहीं; पण तशा ठिकाणीं सुद्धां अर्जुनानें जाऊन अपार संपत्ति आणिली होती. ह्याशिवाय त्या यज्ञामध्यें आणखी एक अद्भुत चमत्कार दिसून आला, तोही सांगतों, श्रवण करा. एक लक्ष ब्राह्मणभोजन झालें कीं तें लोकांस समजावें ह्याकरितां खुणेसाठीं तेथें नित्य एक शंख वाजत असे. वारंवार वाजत असलेल्या त्या शंखाचा ध्वनि एकसारखा कानांवर पडला म्हणजे माझ्या अंगावर तर कांटाच उभा राहत असे! त्या ठिकाणीं अनेक राजे एकत्र झालेले पाहून पहाणारांना त्या दिव्य सभारूप गगनमंडलांत तीं नक्षत्रेंच चमकत आहेत असें वाटत असे. कायहो चमत्कार सांगावा! त्या बुद्धिमान पांडुपुत्राच्या यज्ञामध्यें वाण्यांउदम्यांप्रमाणें करभार देण्याकरितां सर्व प्रकारचीं रत्नें घेऊन आलेले राजे हे ब्राह्मण जातींना वाटण्याचें काम करीत होते. तात्पर्य काय कीं, राजा! त्या युधिष्ठिराच्या संपत्तीप्रमाणें संपत्ति इंद्र, यम, वरुण किंवा कुबेर ह्यांची सुद्धां नाहीं. ती पांडुपुत्राची अपरंपार संपत्ति अवलोकन करून माझ्या अंतःकरणाचा अगदीं भडका उडून गेलेला आहे. मला स्वस्थता म्हणून कसली ती वाटत नाहीं!

शकुनि बोलूं लागला:—हे अमोघपराक्रमी

दुर्योधना ! ही जी तूं पांडुपुत्र युधिष्ठिर ह्याजपाशीं अपरंपार संपत्ति पाहिलीस, ती तुला मिळण्याची एक युक्ति सांगतों, ऐक. फांसे टाकण्याच्या कामांत माझें कसब इतकें आहे कीं, साऱ्या पृथ्वींत माझा हात धरणारा दुसरा कोणी नाहीं. तसेंच, त्यांत जिंकणारा कोण व हरणारा कोण ह्याचीही माहिती मला आहे. तसेंच, खेळतांना पण कोणता लावावा व कोणता लावूं नये, ह्यांतलें रहस्यही मी पक्कें जाणतों. शिवाय, द्यूत खेळावयाला वेळ कोणती असावी, ठिकाण कसें असावें, ह्या विशेष गोष्टी सुद्धां जाणण्यांत मी वाकबगार आहें. आणखी, कुंतीपुत्र युधिष्ठिर हा द्यूत खेळण्याचा मोठा भक्त; पण तें खेळावें कसें हें मात्र ह्याला समजत नाहीं; आणि त्याला कोणीं युद्धाला किंवा द्यूत खेळावयाला बोलाविलें कीं तो येणार हें ठरलेलें आहे ! तेव्हां, हे राजा दुर्योधना ! मी कपट करून त्याला निःसंशय जिंकीन, आणि ती दिव्य संपत्ति येथें आणीन. तर तूं ह्याला द्यूत खेळावयाला आह्वान कर.

वैशंपायन म्हणाले:—ह्याप्रमाणें शकुनीनें भाषण केल्यानंतर तो दुर्योधन राजा एक क्षणाचाही विलंब न लावितां धृतराष्ट्रास म्हणाला, "हे राजा ! अक्षविद्या जाणणारा शकुनि, हा द्यूतांत पांडुपुत्र युधिष्ठिराची संपत्ति हरण करण्याची हुरूप धरीत आहे. तर त्याला तशी आज्ञा द्यावी."

धृतराष्ट्रानें उत्तर दिलें:—मोठा बुद्धिवान विदुर हा माझा मंत्री असून मी त्याच्या आज्ञेंत राहतों. तेव्हां ह्याची भेट झाल्यानंतर ह्या गोष्टीचा काय तो निकाल करीन. कारण, तो धर्मानें वागणारा असून दूरदर्शी आहे. तो उभयपक्षांचेंही उत्तम हित कशांत आहे ह्याचा विचार करून काय तो निश्चय करील."

दुर्योधन म्हणाला:—बा महाराज ! हें खासें ! म्हणजे विदुरानें जर ह्यांत 'खो' घातला, तर तुम्ही हा बेत मोडणार; आणि तुम्हीं हा बेत मोडिला, म्हणजे, राजाधिराज ! मी कांहीं आपला प्राण ठेवणार नाहीं, हें मी खातरीनें सांगतों. मी मेलों म्हणजे तुम्ही विदुराला घेऊन सुखानें रहा. मग साऱ्या पृथ्वीचा आपल्यालाच उपभोग घ्यावयाला मिळेल. माझ्याशीं आपल्याला काय कर्तव्य आहे ?

वैशंपायन म्हणाले:—तें त्याचें कळवळ्याचें व कडिवाळपणाचें भाषण ऐकून त्या धृतराष्ट्राचें मन दुर्योधनाकडे वळून जवळ असलेल्या सेवकांस त्यानें आज्ञा केली कीं, "माझ्याकरितां, हजारों भव्य स्तंभ व शेंकडों महाद्वारें असलेलें, विस्तीर्ण, प्रेक्षणीय, व मनाला आल्हाद देणारें असें एक सभास्थान शिल्पीलोकांना लवकर तयार करावयाला सांगा. जडावकाम करणारांना बोलावून आणून जिकडे तिकडे रत्नें जडवून टाका, आणि त्याचा थाट वगैरे कळाशीदार साधून जाण्याचीं येण्याचीं द्वारें नीटनेटकीं झालीं म्हणजे मला येऊन सूचना करा !"

वैशंपायन सांगतात:—जनमेजया, दुर्योधनाच्या मनाचें समाधान करण्याकरितां महाराज धृतराष्ट्र, ह्यानें ह्याप्रमाणें निश्चय करून विदुरास बोलाविण्यासाठीं दूत पाठविला. खरोखर विदुराला विचारिल्यावांचून धृतराष्ट्र हा आपण होऊन कोणताच निश्चय करीत नसे. शिवाय, द्यूत खेळण्यामध्यें अनेक दोष आहेत हेंही तो जाणून होता. असें असतांही पुत्राच्या प्रेमपाशांत गुंतल्यामुळें ह्या वेळीं तशा कामाकडेही त्याचें मन वळलें. ह्यावरून, होणार तें कांहीं चुकत नाहीं, हीच गोष्ट खरी. ही गोष्ट विचारशील विदुराच्या कानावर जातांच 'हें कलहाचें मूळ घरांत शिरलें; मृत्यूचें द्वार उघडलें; आणि उतरल्या पायाला अंकुर फुटला !' असें मनांत जाणून तो धृतराष्ट्राजवळ येऊन पोहोंचला; आणि त्या महात्म्या वडील बंधूच्या

सन्निध गेल्यावर त्याच्या चरणांवर मस्तक ठेवून म्हणाला, "हे राजा! हा तुझा बेत मला कांहीं बरा दिसत नाहीं. हे प्रभो! इतक्याउपरही तो सिद्धीस न्यावयाचा असेल, तर त्यापासून पुत्रांपुत्रांमध्यें—कारण, पांडव हेही आपल्या पुत्रांसमानच आहेत—कलह न होईल अशा रीतीनें काय करणें असेल तें करा."

जनमेजय राजा, तेव्हां धृतराष्ट्र म्हणाला, "हे विदुरा! दैवाची आमच्यावर कृपा असली तर पुत्रांपुत्रांमध्यें तंटाबखेडा कांहींएक होणार नाहीं ही खातरी असूं दे. ह्याकरितां, आतां तें शुभ असो कीं अशुभ असो, हिताचें असो कीं अहिताचें असो, स्नेहाच्या नात्यानें द्यूत हें खेळूं याच. इतकाच ज्या अर्थी योग आलेला आहे, त्या अर्थी विधिलिखितही तसेंच असलें पाहिजे, असें म्हणावें लागतें, दुसरें काय? तरी, हे भरतकुलोत्पन्न विदुरा! तूं एक गोष्ट लक्षांत ठेव कीं, मी, द्रोण, भीष्म व तूं इतके जवळ असलों म्हणजे तेथें दुर्दैवानें अन्याय करूं म्हटलें तरी सुद्धां होणार नाहीं. तर वायुवेगानें जाणारे अश्व जोडलेल्या रथांत बसून तूं आजच्या आज खांडवप्रस्थाला जा, आणि युधिष्ठिराला घेऊन ये. आतां ह्या माझ्या आरंभिलेल्या कृत्याला तूं नांवें ठेवीत बसूं नको हें एक माझें तुला सांगणें आहे. कारण, इतका सारा योगच ज्या अर्थी जुळून आलेला आहे, त्या अर्थी दैव हेंच बलवत्तर आहे, असें म्हटलें पाहिजे."

ह्याप्रमाणें त्या विचारी विदुराला धृतराष्ट्रानें सांगितलें, तेव्हां विदुराला अत्यंत वाईट वाटलें; आणि "हें कांहीं चांगल्याचें चिन्ह नाहीं; ह्यांत कांहीं घडगत दिसत नाहीं!" असें मनांत म्हणत म्हणत तो महाज्ञानी विदुर भीष्माकडे निघून गेला.

अध्याय पन्नासावा.

—:०:—

धृतराष्ट्र आणि दुर्योधन यांचा एकांत.

जनमेजय विचारतो:—हे ब्रह्मन्, ज्यामुळें माझ्या पितामह पांडवांना तें वनवासाचें संकट भोगावें लागलें, व जें मोठ्या हानीस कारण झालें, तें द्यूत त्या भावांभावांमध्यें कसें काय झालें? त्या द्यूताच्या वेळीं तेथें कोणकोणते राजे होते? आणि, हे ब्रह्मनिष्ठ! तें द्यूत खेळावयाला कोणींकोणीं अनुमोदन दिलें? व कोणीं कोणीं त्याचा निषेध केला? हे विप्रवर्या, हें सर्व आपल्या मुखांतून सविस्तर ऐकण्याची माझी इच्छा आहे. कारण, साऱ्या पृथ्वीच्या नाशाला मूळ कारण तेंच आहे.

सौति म्हणाला:—ह्याप्रमाणें जनमेजयानें प्रश्न केला असतां वेदवेत्त्या प्रतापी व्यासशिष्य वैशंपायन मुनींनीं तें वृत्त जसें घडलें तसें सविस्तर सांगितलें.

वैशंपायन सांगतात:—हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, आणखीही श्रवण करण्याची जर तुझी इच्छा आहे, तर मीही ती कथा सविस्तर सांगतों, ऐक. विदुराचें काय मत पडतें तें पाहिल्यावर तो अंबिकापुत्र धृतराष्ट्र दुर्योधनाला एकांतीं नेऊन पुन: सांगूं लागला: धृतराष्ट्र म्हणाला:—हे गांधारीपुत्रा, हें द्यूत पुरें कर! कारण विचारी विदुर कांहीं ह्याला बरें म्हणत नाहीं; आणि तो आपल्याला अहिताची गोष्ट कधींच सांगावयाचा नाहीं. तेव्हां विदुर जें सांगत आहे, तेंच आपल्या फार हिताचें आहे, असें मला वाटतें. तेव्हां त्याच्या म्हणण्याप्रमाणेंच त्वां वागावें यांतच तुझें हित आहे असें माझें मत आहे. इंद्राचे गुरु महाबुद्धिमान देवर्षि भगवान बृहस्पति यांनीं बुद्धिमान इंद्राला जें शास्त्र पढविलें, तें सर्व त्यांतील ह्यासहवर्तमान महाज्ञानी विदुर जाणत आहे; आणि मी सदासर्वदा त्या विदुराच्या आज्ञेंत वागणारा आहें. हे दुर्योधन

राजा! कुरुवंशजांमध्यें श्रेष्ठ म्हणून प्रसिद्ध असलेला विदुर, आणि यादववंशजांना पूज्य असलेला महाबुद्धिमान उद्धव, हे दोनच काय ते विचारी पुरुष म्हणून, प्रसिद्ध आहेत. ह्याकरितां नको हें द्यूत. द्युतापासून कलह होत असल्याचे दृष्टीस पडतात; आणि कलहानें राज्यांच्या राज्यें पार बुडून जातात. ह्याकरितां, हे पुत्रा! तें तूं सोडून दे. केवळ संपत्तीकरितांच तूं द्युतासारख्या वाईट फंदांत कां पडतोस? तुला कमी तें काय आहे? पुत्रांकरितां मातापितरांचें मुख्य कर्तव्य काय? तर राज्यपद मिळवून ठेवणें! तें तर पितृपितामहापासून चालत आलेलें तुला कधींच मिळालेलें आहे! तूं स्वतः विद्या शिकला आहेस; शास्त्र पढला आहेस; घरांतून रात्रंदिवस तुझे लाड तर पुरविले जातातच. शिवाय, तूं वडील पुत्र असल्यानें सांप्रत राज्यावरही तूंच आहेस. तेव्हां तुला आतां ह्याच्यापेक्षां अधिक चांगली गोष्ट मिळावयाची ती कोणती राहिली? अरे! इतर लोकांना जें कधीं डोळ्यांनीं पहावयाला सुद्धां मिळावयाचें नाहीं, असलें उत्तमोत्तम अन्नवस्त्र तुला मिळालेलें आहे. तेव्हां तूं कशाकरितां शोक करितोस? वाडवडिलांपासून चालत आलेल्या ह्या विस्तीर्ण व संपन्न राष्ट्रावर निरंतर सत्ता चालविणारा तूं स्वर्गांतील इंद्रच आहेस कीं काय, असा भास होतो. अशा प्रकारें सर्व गोष्टींची तुला अनुकूलता असतां तुला ह्या दुःखशोकमूलक द्यूताची बुद्धि कां बरें उत्पन्न झाली?

दुर्योधन म्हणालाः—अन्न आणि आच्छादन एवढ्यावरच नजर देऊन राहणारा पुरुष पातकी समजला पाहिजे. कारण, केवळ तेवढ्यावरच संतुष्ट राहून परोत्कर्षाविषयीं असहिष्णुता धारण न करणारा पुरुष अधम होय, असें म्हटलें आहे. हे प्रभो, ह्या सामान्य लक्ष्मीनें माझ्या मनास संतोष होत नाहीं. ती डोळ्यांना दिपविणारी पांडवांची संपत्ति पाहिल्यापासून माझ्या अंतःकरणाला अगदीं चटका लागून गेला आहे. ही सारी पृथ्वी युधिष्ठिराची आज्ञांकित होऊन बसली असतांही जेव्हां मी स्वस्थ बसलों आहें, तेव्हां मी शुद्ध पाषाणाचाच बनलों आहें, असें मला वाटतें! हें कळविण्यास सुद्धां दुःख वाटतें, पण उपाय नाहीं. अहो! नीप, चित्रक, कौकुर, कारस्कर व लोहजंघ हे तर युधिष्ठिराच्या घरचे दासच होऊन पडल्यासारखे दिसतात. हिमालय पर्वत व समुद्र ह्यांच्याजवळ असणाऱ्या अनूप प्रदेशावर अंमल करणारे राजे, समुद्रतीरावर राहणारे राजे, आणि देशाच्या सीमेवरील अधिपति, ह्या सगळ्यांची युधिष्ठिराच्या घरीं दाद सुद्धां लागत नाही! हे प्रजाधिपते! मी ज्येष्ठ असून श्रेष्ठही आहें असें समजून युधिष्ठिरानें रत्नें मोजून घेण्याच्या कामावर योग्य अशीच माझी योजना केली होती. त्या वेळीं काय हो सांगू! माझ्यापुढें ज्या मूल्यवान व उत्कृष्ट वस्तूंच्या राशींच्या राशी पडल्या होत्या, त्या एवढ्या मोठ्या होत्या कीं, अलीकडून पलीकडचें व पलीकडून अलीकडचें कांहींएक दिसत नसे. राजांनीं खंडणी म्हणून नजरनजराण्यांच्या रूपानें आणलेलें द्रव्य व रत्नें मोजून घेतां घेतां माझे हात सुद्धां दुखूं लागत; आणि मी थकून विश्रांति घेऊं लागलों म्हणजे दूरदूरच्या पल्ल्यांवरून आलेल्या राजांना तिष्ठत राहावें लागत असे. हे भरतकुलोत्पन्ना, त्यांत बिंदुसरोवरापासून आणिलेलीं रत्नें तर फारच उंची होतीं. त्या रत्नांचें एक पारदर्शक कृत्रिम सरोवर मयासुरानें तयार केलेलें होतें. त्यामध्यें तुडुंब पाणी भरलेलें असून त्यांत कमलेंही प्रफुल्लित झालीं आहेत, असा भास होई. मी त्याच्या जवळ गेलों, तेव्हां तें खरोखर पाण्यानें भरलेलें सरोवरच आहे असें समजून आपलें वस्त्र आवरून घेऊं लागलों असतां, शत्रूंच्या त्या अपरंपार संपत्तीनें गांगरून गेलेल्या मला तो भीमसेन हसला! काय

करूं ? माझ्या अंगांत जर तितकें सामर्थ्य असतें, तर तेथल्या तेथेंच त्या भीमाला उलथून टाकिला असता! पण, महाराज, मी भीमसेनाच्या वधाचें नांव जर तेथें काढिलें असतें, तर शिशुपालाची जी गति झाली तीच माझीही झाली असती यांत तिळमात्रही संशय नाहीं ! त्या शत्रूंनीं केलेल्या उपहासानें माझ्या अंगाची केवळ लाही लाही होत आहे. तसेंच पुनः दुसऱ्या ठिकाणीं पहिल्याच सरोवरासारखें, कमलांनीं परिपूर्ण असें सरोवर पाहिलें, तेव्हां तें पहिल्याप्रमाणेंच खरें सरोवर नसून तेथें संगमरवरी दगडाची फरशीच असेल, असें समजून तिच्यावरून जाऊं लागलों, तो धाडकन पाण्यांत पडलों ! तेव्हां अर्जुन तर आपल्या भावांसहवर्तमान चांगला 'ही ही' करून हसला ! पण त्याहूनही, साऱ्या बायकांसहवर्तमान द्रौपदी हसली ती गोष्ट माझ्या मनाला फारच लागण्यासारखी झाली; आणि माझीं वस्त्रेंप्रावरणें सारीं भिजून चिंब झालीं, तेव्हां राजाच्या आज्ञेवरून त्याच्या हुजऱ्यांनीं मला दुसरीं वस्त्रें आणून दिलीं, त्यामुळें तर मला फारच दुःख झालें. राजा ! आणखीही एके ठिकाणीं माझी अशीच फजिती उडाली ! ती अशी कीं, एका भिंतीला खरोखरी दार नसतां, तिच्यावर, दार उघडलेलें आहे, असें चित्र काढलेलें होतें. तें खरोखरच दार उघडलेलें आहे असें समजून मी त्यांतून पलीकडे जाऊं लागलों, तों धाडकन धोंड्यावर कपाळ आपटून तेथें खोंक पडली ! हें मला लागलेलें पाहतांच लांब असलेले नकुलसहदेव धावत धावत जवळ आले, आणि 'अरेरे ! अरेरे !' असें म्हणत म्हणत त्या उभयतांनीं आपल्या हातांनीं मला उचलून धरिलें. पुढें थोडेंसें हसल्यासारखें करून, 'महाराज ! हें दार, हें दार, इकडून चला, इकडून चला,' असें सहदेव सांगूं लागला. तरी मी पुढें जात नाहीं असें पाहून भीमसेन मोठ्यानें हसला, आणि त्यानें, 'अहो ! धृतराष्ट्राचे चिरंजीव !—अर्थात् अंधाचे पुत्र अंध—हें दार—हें इकडे आहे बरें का !' असे मर्मभेदक उपहासास्पद शब्द उच्चारिले ! असें एक ना दोन; किती म्हणून सांगत बसणार ? तें असो. तेथें माझ्या डोळ्यांपुढें जीं जीं रत्नें आलीं, त्यांचीं नांवें सुद्धां मीं पुरतीं कधीं ऐकिलेलीं नव्हतीं. त्यामुळें माझ्या मनाचा अगदीं संताप झाला आहे !

अध्याय एकावन्नावा.

—:o:—

पांडववैभववर्णन.

दुर्योधन म्हणालाः—हे भरतकुलोत्पन्ना, निरनिराळ्या ठिकाणच्या राजे लोकांनीं पांडवांकरितां जें जें उत्तमोत्तम द्रव्य आणिलेलें माझ्या दृष्टीस पडलें, तें सांगतों, ऐका. ती शत्रूची संपत्ति पाहून माझी छाती तर अगदीं दडपून गेली, आणि माझें देहभानच जाग्यावर राहिलें नाहीं. ती संपत्ति किती होती व कोणकोणत्या देशांतून आली होती, हेंही माझ्या ध्यानांत राहिलें नाहीं ! तथापि त्यांपैकीं कांहीं ठोकळ ठोकळ सांगतोंः कांबोजराजानें बकऱ्यांच्या, खोकडें इत्यादि बिळांत राहणाऱ्या प्राण्यांच्या, व मांजरांच्या लोकरीची कलाबतू घालून तयार केलेलीं वस्त्रें व चर्मांबरें किती तरी दिलीं. ह्याशिवाय, तित्तिर पक्ष्यांप्रमाणें चित्रविचित्र रंगांचे, व राघूच्या चोंचीसारख्या लाल रंगाचे तीनशें घोडे, अक्रोड, शमी व हिंगणबेटें खाऊन माजलेले तीनशें उंट व हत्तिणीही त्यानें अर्पण केल्या. हे महाराजा, गुरेंढोरें बाळगणारे, व दास्यकर्मालाच नेहमीं योग्य असणारे असे खालच्या प्रतीचे ब्राह्मण महात्म्या धर्मराजाची कृपा संपादन करण्याकरितां तीन खर्व करभार घेऊन आलेले आंत जाण्याला प्रतिबंध केल्यामुळें

दारामध्यें तिष्ठत उभे राहिले होते. शेंकडों गुरांढोरांचीं खिल्लारें बाळगणारे वाटधान नांवाचे ब्राह्मण सुवर्णमय चकचकीत कमंडलु घेऊन आले होते, पण त्यांचाही आंत रिघाव झाला नाहीं. त्याचप्रमाणें, शालू नेसलेल्या एक लक्ष दासी करभार घेऊन आलेल्यांचाही आंत प्रवेश झाला नाहीं. तरुण, सुंदर, लांब लांब केसांच्या, व सुवर्णालंकारांनीं भूषित झालेल्या अशा शूद्र जातीच्या स्त्रिया, आणि कर्मनिष्ठ ब्राह्मणांना अत्यंत उपयोगी अशीं 'रंकु' नामक मृगाचीं रोमाजिनें घेऊन आलेल्या राजांचीही तीच दशा झाली! समुद्रतीरीं राहणाऱ्या राजांनीं सारा करभार देऊन, शिवाय गांधार देशांत उत्पन्न होणारे घोडेही दिले. नांगरणी वगैरे केल्यावांचूनच केवळ पर्जन्यावर किंवा नदीच्या पाण्यावर उत्पन्न होणाऱ्या धान्यावर निर्वाह करणारे, समुद्रालगतच्या प्रदेशांत जन्मलेले, व समुद्राच्या पलीकडे राहणारे असे वैराम, पारद, आभीर व कितव ह्या जातींचे लोक निरनिराळा नजराणा म्हणून शेळ्या, मेंढ्या, गाई, सोनें, गाढवें, उंट, फळांपासून तयार केलेलें मद्य, परोपरीच्या कांबळ्या वगैरे अनेक उत्तमोत्तम वस्तु घेऊन आलेले असूनही, आंत जावयास न मिळाल्यामुळें बाहेरच रखडत पडले होते! ह्यांचें तर असोच, पण प्राग्ज्योतिष देशाचा व म्लेच्छांचा स्वामी बलाढ्य व महारथी जो भगदत्त राजा, तो म्लेच्छांसहवर्तमान वायूसारख्या वेगानें चालणारे असे जातिवंत घोडे व भरपूर करभार घेऊन आला असतां त्यालाही 'मज्जाव' झाल्यामुळें तोही दाराबाहेर उभा राहून तेथूनच रत्नखचित अलंकार व शुद्ध हस्तिदंताच्या मुठी बसविलेले खड्ग देऊन परत निघून गेला. द्व्यक्ष, त्र्यक्ष, ललाटाक्ष, औष्णीक, आंतवास, रोमक, पुरुषादक, एकपाद इत्यादि अनेक ठिकाणांहून आलेले राजे, द्वाराशीं प्रतिबंध झाल्यामुळें बाहेर कुचमत बसलेलेही माझ्या दृष्टीस पडले. कित्येक राजांनीं आपआपला करभार आणून शिवाय परोपरींच्या रंगांचे खेंचरही बरोबर आणिले होते. ह्या खेंचरांची संख्या दहा हजार असून ते मोठे धिप्पाड, लांब लांब पाऊल टाकणारे, हुकमी आणि चपळतेविषयीं सर्वत्र प्रसिद्ध असून त्या प्रत्येकाच्या गळ्यांत कृष्णवर्णाचा कंठमाणि असल्यामुळें ते फारच शोभत. उंच व सुंदर रंगाचे गंगाकांठचे लोक नजरनजराणा म्हणून सोन्यारुप्यांच्या राशींच्या राशी युधिष्ठिराला देत असतांना मी पहातच होतों. असा नजराणा जेव्हां लोकांनी दिला, तेव्हांच त्यांचा युधिष्ठिराच्या घरीं प्रवेश झाला. कृष्णगाई, पोपट, इंद्रधनुष्य, सायंकाळचें अभ्र अशांसारख्या अनेक चित्रविचित्र रंगांचे व मनोवेगानें धावणारे जंगली घोडे घेऊन आलेल्या एकपाद देशांतील राजांनीं त्या युधिष्ठिराला मोजदाद सुद्धां करितां येणार नाहीं इतकें सोनेंच अर्पण केलें. तसेच चीन शक, ओड्र, अरण्यांत वस्ती करणारे बर्बर, वार्ष्णेय, हारहूण, कृष्ण, हिमालयावर राहणारे, डोंगराच्या पायथ्याशीं व दलदलींत वस्ती करून असणारे वगैरे अनेक प्रकारचे तेथें आलेले लोक, द्वारांतून प्रवेश होण्याला प्रतिबंध झाला असतांही, त्यांनीं कृष्णकंठमाणि असलेले, बांधेसूद, शेंकडों कदम उडी मारणारे, चालीमध्यें सर्व जगांत नांवाजलेले, आणि हुकमी असे दहा हजार गाढव युधिष्ठिराला अर्पण केले. विस्तीर्ण, लांब, रुंद, रंगदार व मृदु अशीं बाल्हीक व चीन देशांत तयार झालेलीं, रंगारंगाचीं, तलमसुती, व बुट्टीदार रंगारंगाचीं, रेशमी व रंकु नामक मृगाच्या केसांचीं, नानाप्रकारचे गुच्छ व कमळें काढिलेलीं, हातांना गुदगुल्याच व्हाव्या इतकीं गुळगुळीत व ज्यांत कापसाचा एकही धागा नाहीं अशीं बहुमोल वस्त्रें व अजिनें, तीक्ष्ण धारेचे पट्टे, तरवारी, गुप्त्या, कुऱ्हाडी, आणि पाश्चात्य देशांत होणारे

तीक्ष्ण परशु, अनेक प्रकारचे रस, अनेक प्रकारचीं सुगंधि द्रव्यें, हजारों रत्नें इत्यादि वस्तु करभार घेऊन आलेले लोक, आंत जाण्याला परवानगी न मिळाल्यामुळें द्वारापाशींच उभे राहिले होते. तसेंच शक, तुषार, कंक, रोमश, शृंगी हे झपाझप चालणारे मोठमोठे कोट्यवधि हत्ती, नानाप्रकारचे शेंकडों अश्व, पद्मपरिमित सुवर्ण इत्यादि घेऊन आले असतांही द्वारपाळांनीं त्यांस अडविल्यामुळें त्यांस द्वारापाशींच उभे राहावें लागलें! तशींच बसावयाचीं आसनें, सिंहासनें, पाट, चौरंग, मेणे, शिबिका इत्यादि वाहनें, पलंग, चौरंग इत्यादि शय्या, हीं सर्व हस्तिदंताचीं केलेलीं असून त्यांस सुवर्णकोंदणयुक्त रत्नें जडलेलीं होतीं. तशींच परोपरीचीं कवचें, नानाप्रकाचीं हत्यारें, तऱ्हेतऱ्हेच्या आकारांचे रथ, त्याला जोडलेले उत्तम चालीचे अश्राफ घोडे, त्यांत व्याघ्रांबराचें आच्छादन घालून सुवर्णांनीं मढविलेले, त्यांत नाराच, अर्धनाराच हे बाण व इतर आयुधें ठेविलेलीं, हत्तींच्या चित्रविचित्र झुली इत्यादि अपरंपार द्रव्य घेऊन पौर्वात्य देशांतील राजांनीं पांडुपुत्र युधिष्ठिराच्या यज्ञमंडपांत प्रवेश केला.

अध्याय बावन्नावा.

—:०:—

धर्म-करभारवर्णन.

दुर्योधन म्हणालाः—हे निष्पापा! त्या यज्ञाकरितां युधिष्ठिराला त्या वेळीं राजे लोकांनीं खंडणी म्हणून जो अपरंपार द्रव्यसंचय आणून दिला, तो मी सांगतों, श्रवण कर. मेरु व मंदार ह्यांच्यामध्यें शैलोदा नांवाच्या नदीच्या तीरीं कीचक नामक वेणु वृक्षाच्या घनदाट छायेच्या आश्रयास राहणारे खस, एकासन, अर्ह, प्रदर, दीर्घवेणु, पारद, कुलिंद, तंगण व परतंगण, हे राजे, मुंग्यांनीं भूमींतून काढिल्यामुळें पिपीलक ह्या नांवानें प्रसिद्ध असलेल्या मणोगणती सुवर्णाच्या राशी घेऊन युधिष्ठिराकडे आले. काळ्याकुळकुळींत व चंद्रासारख्या पांढऱ्या सफेत अशा मनोहर चंवऱ्या, हिमालय पर्वतावरील पुष्पांपासून तयार झालेला विपुल स्वादिष्ट मध, उत्तरकुरु देशांतून जलप्रवाहांतून वाहून आलेलीं पुष्पें, कैलास पर्वताच्या उत्तर भागांतील अतिशय गुणकारी औषधि इत्यादि करभार घेऊन प्रणामपूर्वक स्थित असलेल्या पर्वतनिवासी राजांना अजातशत्रु धर्मराजाच्या द्वारीं आंत जाण्याचा प्रतिबंध झाल्यामुळें तिष्ठत रहावें लागलें. हिमालय पर्वताच्या पलीकडच्या अंगास, उदयाचल पर्वतावर, कारूष देशामध्यें, समुद्रकांठीं, आणि ब्रह्मपुत्रा नदीच्या तीरीं राहणारे राजे, आणि फळमूळांवर उपजीविका करून, व चामडीं नेसून तीक्ष्ण शस्त्रें धारण करणारे किरात, हेही तेथें दृष्टीस पडत होते. हे राजा! चंदन, अगुरु, कृष्णागुरु इत्यादि लांकडांचे भारेच्या भारे, चामडीं, रत्नें, सुवर्ण, व परिमळद्रव्यें ह्यांच्या राशींच्या राशी, किरात जातीच्या दहा हजार दासी, दूरदूरच्या प्रदेशांत होणारे पशु व पक्षी, आणि दुसऱ्या मनोहर चिजा, अतिशय झगझगणारें असें पर्वतावरून जमा करून आणिलेलें सुवर्ण, आणि सारा करभार घेऊन हे सारे आले असतां आंत जाण्याच्या प्रतिबंधामुळें द्वारापाशींच तळ देऊन बसले होते. कैरात, दरद, दर्व, शूर यमक, औदुंबर, दुर्विभाग, पारद, बाल्हीक, काश्मीर, कुमार, घोरक व हंसकायन येथील अधिपति, शिबि व त्रिगर्त ह्या देशांतील वीर, भद्रकेकय देशांतील राजे, अंबष्ठ, कौकुर, तार्क्ष्य, वस्त्रप, पल्हव, वशातल, मौलेय, क्षुद्रकमालव, पौंड्रिक, कुक्कुर, शक, अंग, वंग, पुंड्र, शाणवत्य व गय ह्या देशांतील शेंकडों कुलीन सरदार व सेनानायक

असे शेंकडों श्रेष्ठ क्षत्रिय अजातशत्रु धर्मराजाकडे द्रव्य घेऊन आले होते. वंग, कलिंग, मगध, ताम्रलिप्त, सुपुंड्रक, दौवालिक, सागरक, पत्रोर्ण, शैशव, कर्णप्रावरण, इत्यादि अनेक देशांतील राजे त्या ठिकाणीं आले असतां, हे भरतवंशजा, राजाच्या आज्ञेवरून द्वारपाल त्यांस म्हणत, "थोडा वेळ वाट पाहून, चांगलासा करभार दिल्यानंतर तुम्हांला आंत सोडूं." त्याचप्रमाणें, काम्पक सरोवराजवळ असलेल्या क्षमाशील व कुलीन राजांचा, प्रत्येकानें एक एक हजार हत्ती दिल्यानंतर, आंत प्रवेश झाला. त्या हत्तींचे दांत नांगराच्या फाळांसारखे असून त्यांना सोन्याचे कट बांधिले होते; आणि त्यांचा आकार पर्वतासारखा अजस्त्र असून वर्ण कमळांसारखा होता. त्यांच्या अंगावर बहुमोल झुली घातलेल्या होत्या, व ते सर्वदा आपल्याच मस्तीमध्यें असत. ह्यांच्याशिवाय अन्यही निरनिराळ्या देशांतून आलेले राजलोक आले होते. त्यांनीं व इतर महात्म्यांनींही राजसूय यज्ञामध्यें अनेक रत्नें आणिलीं होतीं. इंद्राबरोबर असणारा चित्ररथ गंधर्व नांवाचा राजा ह्यानें वायूसारखे वेगवान असलेले चारशें अश्व युधिष्ठिराला आणून दिले. तुंबुरु नामक गंधर्वानें आंब्याच्या पानांच्या रंगाचे, व सोन्याच्या माळा घातलेले शंभर अश्व मोठ्या आनंदानें अर्पण केले. हे कुरुकुलोत्पन्ना प्रजाधिपते! कृति राजानें शंभरशंभरांची एकेक अशा पुष्कळशा उत्तमोत्तम हत्तींच्या पागाच दिल्या. मत्स्य देशाच्या विराट राजानें सुवर्णालंकारानें युक्त असे दोन हजार मदोन्मत्त हत्ती कर म्हणून दिले. पांशु राष्ट्रांतील आलेल्या वसुदान राजानें करभार सारा आणून, शिवाय सव्वीस हत्ती, उत्तम चालीचे, धीट, तरणेबांड व सुवर्णालंकारांनीं युक्त असे दोन हजार घोडे पांडवांना दिले. द्रुपद राजानें चौदा हजार दासी, भार्यांसहवर्तमान दहाहजार दास, शेंकडों उत्तमोत्तम हत्ती, आणि हत्ती जोडलेले सव्वीस रथ दिले. हें वसें काय? पण पांडवांना त्या यज्ञाप्रीत्यर्थ त्यानें सारें राज्यच्या राज्यच अर्पण केलें. पण त्यांत कांहीं विशेष नाहीं. कारण, कृष्ण हा अर्जुनाचा आत्मा असून अर्जुन हा कृष्णाचा आत्मा आहे. अर्जुनाच्या तोंडांतून जें जें निघेल तें तें सर्व कृष्ण हा करावयाचाच, चुकावयाचा नाहीं! फार काय सांगावें? परंतु कृष्ण हा अर्जुनाकरितां स्वर्गावर सुद्धां लाथ मारील. तसेंच अर्जुन हाही कृष्णाकरितां प्राणावर सुद्धां उदार होईल. असो; सुवर्णकलशांत ठेवलेले सुगंधि चंदनाचे रस, मलय व दर्दुर ह्या पर्वतांवरून आणलेले चंदनाचे व आगरूचे ढीग, तेजःपुंज अशीं उत्तम उत्तम रत्नें, सुवर्ण, आणि बारीक विणलेलीं वस्त्रें हीं बरोबर आणिलेल्या चोल व पांड्य देशच्या राजांचाही आंत प्रवेश झाला नाहीं. समुद्रांतील उत्तम उत्तम रत्नें, वैदूर्यमणि, मोत्यांच्या राशी, आणि हत्तींच्या शेंकडों झुली सिंहल देशाच्या राजांनीं अर्पण केल्या. रत्नखचित वस्त्रें परिधान केलेल्या, व आरक्त नेत्रप्रांताच्या तरुण दासी घेऊन आलेल्या पुरुषांनाही आंत जाण्याचा प्रतिबंध झाल्यामुळें द्वाराशीं तिष्ठत राहावें लागलें. ब्राह्मण, जिंकलेले क्षत्रिय, वैश्य आणि शुश्रूषा करणारे शूद्र हे सारेच युधिष्ठिराची प्रीति संपादन करण्याकरितां द्रव्य घेऊन आले होते. एकंदरींत भरतखंडाच्या अलीकडचे, मध्यप्रदेशांतले व पलीकडे राहणारे म्लेच्छ व चारी वर्णांचे लोक युधिष्ठिराची प्रीति संपादन करण्याकरितां, व यास बहुमान देण्याकरितां प्राप्त झाले होते. नानाप्रकारच्या देशांतून नानाजातींचे लोक तेथें आले असल्यामुळें युधिष्ठिर धर्मराजाच्या घरीं त्या वेळीं जणू काय जगच येऊन पसरलें आहे, असें वाटलें. त्या राजांनीं त्या असंख्य देणग्या शत्रूला दिलेल्या पाहून मला तर मरणप्राय दुःख झालें. आतां, हे राजा! युधिष्ठिराकडून ज्यांना शिधा पोहोंचतो किंवा अन्न मिळतें, असे त्याचे किती

सेवक आहेत, तें सांगतों. तीन पद्म घोडेस्वार; दहा हजार माहूत; एक कोटि रथ अर्थात् त्यांच्यावरील सेवकांसुद्धां; आणि पायदळाची तर गणतीच नाहीं, इतके सेवक त्याच्या पदरीं आहेत. शिवाय कामाची शिस्त तरी अपूर्व ! कोठें धान्यांचीं मापें चाललीं आहेत; कोठें शिजलेल्या अन्नांचे ढीग पडलेले आहेत; कोठें अन्न वांटण्याचा धडाका चाललेला आहे; तर कोठें मंगलकारक गायनाचा ध्वनि व वाद्यांचा कडकडाट झडत असलेला कानावर येत आहे. कोणत्याही जातीचा मनुष्य असो, त्याला युधिष्ठिराच्या घरीं खावयाला मिळालें नाहीं, किंवा प्यावयाला मिळालें नाहीं, किंवा त्याला अलंकारभूषणें मिळालीं नाहींत, किंवा त्याचा आदरसत्कार झाला नाहीं, असें घडलेलें मीं पाहिलेंच नाहीं. प्रत्येकाला तीस तीस दासी ह्याप्रमाणें ऐशीं हजार ब्राह्मणांचीं कुटुंबें युधिष्ठिर आज पोशीत आहे; आणि ते सुप्रसन्न व संतुष्ट होऊन शत्रुनाश होण्याविषयी त्याला नित्य आशीर्वाद देत आहेत. तसेंच, दहा हजार ऊर्ध्वरेत्या यतींना धर्मराज युधिष्ठिराच्या घरीं प्रत्यहीं सुवर्णाच्या पात्रांतून भोजन मिळत आहे; आणि, हे प्रजाधिपते ! कोण जेवलें व कोण न जेवलें ह्याची अगदीं लहानापासून तों थोरापर्यंत व अंधळ्यापासून तों कुबड्यापर्यंत सर्व लोकांची प्रत्यहीं स्वतः चौकशी केल्यावांचून द्रौपदी अन्न सुद्धां ग्रहण करीत नव्हती. युधिष्ठिराला कर दिला नाहीं, असे असामी दोनच. ते—एक संबंधी म्हणून पांचाल, आणि मित्र म्हणून अंधकवृष्णि हे होत.

अध्याय त्रेपन्नावा.

—:०:—

अभिषेकवर्णन.

दुर्योधन म्हणालाः—श्रेष्ठ, सत्यव्रती, महाव्रती, विद्यासंपन्न वक्ते, वेदांतरूप अवभृथस्नान करून पुनीत झालेले, धैर्यवान, भिडस्त, धर्मात्मे, कीर्तिमान व मूर्धाभिषिक्त असे राजे युधिष्ठिराची सेवा करीत होते. काशाच्या पात्रांत ज्यांचें दुध काढितात, अशा हजारों वनगाई दक्षिणा देण्याकरितां म्हणून कित्येक राजांनीं आणिलेल्या मीं तेथें पाहिल्या. हे भरतवंशजा ! त्या ठिकाणीं अभिषेकाकरितां लागणारें किरकोळ साहित्य राजांनीं आपण होऊन मोठ्या हौसेनें आणिलें होतें. बाल्हीकराजा सोन्यानें मढविलेला रथ घेऊन आला; सुदक्षिणानें त्याला कांबोज देशांतील पांढरे सफेत अश्व आणून जोडिले; महाबलाढ्य सुनीथ हा ओढणें घेऊन आला; चेदि देशच्या राजानें—शिशुपालाच्या पुत्रानें—ध्वज आणून तो स्वतः उभारला; दक्षिणदेशाधिपतीनें कवच आणिलें; मगध देशच्या राजानें माला व शिरोवस्त्र आणिलें; महाधनुर्धारी वसुदान राजानें साठ वर्षें वयाचा एक मोठा हत्ती आणिला; सोन्याच्या दोरखंडांनीं आवळलेले शकट मलय राजा घेऊन आला; एकलव्यानें पादत्राण आणिलें; आणि अवंती देशच्या राजानें अभिषेकाकरितां नानातऱ्हेचीं उदकें आणिलीं. चेकितान हा बाणांचा भाता घेऊन आला; काश्य राजानें धनुष्य आणिलें; आणि शल्यानें तीक्ष्ण टोंकाचा, उत्तम मुठीचा, व सुवर्णाच्या नकशीचा खड्ग आणिला. तदनंतर, महातपस्वी श्रेष्ठ व्यास व धौम्य मुनि ह्यांनीं युधिष्ठिराला अभिषेक केला. नारद, देवल, असित इत्यादि मुनि व अनेक ऋषिवर्यही मोठ्या प्रीतीनें त्या अभिषेकसमारंभाचे वेळीं हजर होते. स्वर्गामध्यें देवराज महेंद्राकडे सप्तर्षि येतात, त्याप्रमाणें इतरही वेदपारंगत महात्मे जमदग्निपुत्र परशुरामासहवर्तमान समंत्रक व विपुल दक्षिणा घेऊन त्या अभिषेकसमारंभास आले होते. अमोघपराक्रमी सात्यकि ह्यानें त्या युधिष्ठिरावर छत्र धरिलें होतें; पांडुपुत्र भीमसेन व अर्जुन हे त्यास विंझण्यानें वारा घालीत होते; आणि नकुल व

सहदेव युधिष्ठिरावर चंवऱ्या वारीत होते. पूर्वीच्या कल्पामध्यें ब्रह्मदेवानें इंद्राकडे एक शंख पाठविला होता. तो वरुणदत्त नांवाचा अणकुचीदार शंख युधिष्ठिराला प्रत्यक्ष समुद्रानेंच आणून दिला. हा शंख शंभरभार सोनें देऊन ब्रह्मदेवानें बांधविला. त्याच शंखानें युधिष्ठिराला कृष्णानें अभिषेक केला. ते पाहून तर मला घेरीच आली. अहो! पूर्व, पश्चिम व दक्षिण ह्या तीन दिशांकडच्या समुद्रांला लोक जातात, परंतु उत्तरसमुद्राकडे पक्ष्यांवांचून इतरांची गति नाहीं. पण अर्जुनानें तेथूनही द्रव्य आणावयाचें सोडिलें नाहीं. असो. त्या अभिषेकाच्या वेळीं शेंकडों लोकांनीं मंगलकारक शंख वाजविले. त्या शंखांची एकच गर्जना होऊं लागली असतां माझ्या अंगावरही कांटा उभा राहिला; आणि जे कमकुवत राजे होते, ते तर मूर्छा येऊन धाडकर जमिनीवर पडले! तेव्हां एकमेकांचें दर्शनही ज्यांना प्रिय आहे, असे धैर्यवान व वीर्यवान पांडव, धृष्टद्युम्न, सात्यकि व कृष्ण हे त्या मूर्छित झालेल्या राजांना व मला पाहून मोठमोठ्यानें हसूं लागले. हे भरतकुलोत्पन्ना! ह्याप्रमाणें तो अभिषेकाचा समारंभ समाप्त झाल्यानंतर, अर्जुनाला आनंद होऊन त्यानें सोन्यानें बांधविलेल्या शिंगांचे पांचशें बैल ब्राह्मणश्रेष्ठांना दान दिले. हरिश्चंद्र राजाप्रमाणें कुंतीपुत्र युधिष्ठिर राजा राजसूय यज्ञ करून जसा केवळ कुबेर झाला, तसा रंतिदेव, नाभाग, यौवनाश्व, मनु, वेनपत्र पृथु, भगीरथ, ययाति, नहुष इत्यादिकांपैकीं सुद्धां कोणी राजा वैभवसंपन्न झाला नाहीं. कुंतीपुत्र युधिष्ठिराचें तें हरिश्चंद्र राजासारखें वैभव पाहून तसें वैभव नसतांना मी जिवंत राहण्यांत तुला कसें बरें वाटतें? हें द्वापरयुग असूनही ज्या अर्थी ह्यांत कनिष्ठांचा अभ्युदय व श्रेष्ठांचा ऱ्हास होत आहे, त्या अर्थी हें उलट्या गुणधर्मांचें युग अस्तित्वांत आणणारा ब्रह्मदेवच अंधळा असावा, असें मला वाटतें! हे कुरुवंशजश्रेष्ठा, तें युधिष्ठिराचें अनुपमेय वैभव अवलोकन केल्यापासून, कितीही विवेक केला तरी मला सुख म्हणून वाटतच नाहीं. माझ्या अंगीं क्षीणता येण्याला, मी निस्तेज व्हावयाला, व माझ्या दुःखशोकाला कारण काय तें तेंच आहे.

अध्याय चौपन्नावा.

—:०:—

दुर्योधनाची समजूत.

धृतराष्ट्र म्हणालाः—हे पुत्रा! तूं ज्येष्ठ पत्नीचा ज्येष्ठ पुत्र आहेस, ह्याकरितां तूं पांडवांचा द्वेष करूं नको. कारण द्वेषापासून कोणतेंच सुख मिळत नाहीं. उलट द्वेष करणाऱ्याला मरणकाळच्या वेदनांप्रमाणें वेदना मात्र होत असतात! वडिलार्जित राज्याचा भाग तुला व युधिष्ठिराला सारखाच मिळालेला आहे; आणि शिवाय तो निष्कपटी, आणि तुझा द्वेष न करितां तुझ्याशीं मैत्री करणारा आहे. तेव्हां तुझ्यासारख्यानें त्याच्याशीं असा द्वेष करणें योग्य आहे काय? हे राजा, तूं युधिष्ठिराप्रमाणेंच कुलवान व वीर्यवान असतां मोहानें आपल्या भ्रात्यांच्या वैभवाचा कां बरें अभिलाष धरितोस? तर असें करूं नको, शांति धर, आणि दुःख सारें सोडून दे. किंवा तुला जर यज्ञसंपत्तिच पाहिजे असेल, तर सप्तछंदरूपतंतूंनीं युक्त असलेल्या त्या महायज्ञाचें ऋत्विजांकडून तूंही अनुष्ठान कर. म्हणजे तुझ्याकडेही मोठ्या प्रेमानें व बहुमानानें विपुल द्रव्य, भूषणें व रत्नें घेऊन राजे येतील. बाबा! एकसारखी परस्वापहाराची बुद्धि धरणें हें कांहीं थोरांचें लक्षण नव्हे. आपल्यापाशीं असेल त्यांतच संतुष्ट राहून जो स्वधर्मानें वागतो, त्यालाच सुख मिळतें. परधनापहाराच्या फंदांत न पडतां स्वकर्मांविषयींच निरंतर दक्ष राहून संपादन केलेल्या द्रव्याचें रक्षण करणें, हेंच वैभवाचें लक्षण होय. विपत्ति प्राप्त झाली तरी जो दुःख मानीत नाहीं,

सदासर्वदा दक्ष राहतो, दीर्घोद्योगी, सावध आणि नम्र असा जो पुरुष असतो, त्याचें नेहमीं कल्याणच होतें हें ध्यानांत ठेव. अरे, पांडव म्हणजे तुझे हात आहेत. त्यांना तोडणें म्हणजे तू आपले स्वतांचे हात तोडण्यासारखें आहे. ह्याकरितां त्यांना तूं तोडूं नको. ते पांडुपुत्र तसेंच अनुपम वैभव भोगण्यास पात्र आहेत. ह्यास्तव केवळ धनलोभाच्या नादाला लागून तू भ्रातृद्रोह व मित्रद्रोह करूं नको. पांडवांचा द्वेष तूं सोडून दे. मित्रद्रोहाचें पातक फार मोठें आहे. बा दुर्योधना ! ते पांडव तसेच पराक्रमी व योग्य आहेत. आणखी, त्यांची जी संपत्ति आहे, तें सर्व भ्रातृधनच आहे. कारण, त्यांचे वाडवडील ते तुझे वाडवडीलच होत. ह्याकरितां, हे भरतवंशजश्रेष्ठा, तूंही आपल्या द्रव्याचा विनियोग यज्ञाकडेच कर; प्रिय विषयांचा उपभोग घे; आणि निरोगी राहून स्त्रियांशीं क्रीडा कर; व आपल्या संतापाचें शमन करून घे !

अध्याय पंचावन्नावा.

—:०:—

दुर्योधनाचें भाषण !

दुर्योधन म्हणाला:–स्वयंपाकांतील पातळ पदार्थ ढवळण्याकरितां त्यांत पळी घालीत असतात, आणि कढी, खीर, आमटी, सार वगैरे सर्व पदार्थ ती ढवळते; पण हा पदार्थ आंबट आहे, का हा गोड आहे, ह्याची चव तिला कांहीं कळत नाहीं; त्याचप्रमाणें, ज्या पुरुषाला स्वतांची बुद्धि नाहीं, तो कितीही बहुश्रुत असला तरी त्याला शास्त्रांतलें रहस्य कळत नाहीं. आपण स्वतः ज्ञाते असूनही, एका नौकेला दुसरी नौका बांधावी त्याप्रमाणें मला मोहांत घालीत आहां. अहो, स्वार्थ म्हणजे काय, त्याच्यांकडे ढुंकूनही पहावयाचें नाहीं, असा आपण निश्चय केला आहे कीं काय ? नसेल तर आपण माझा द्वेष करतां असें म्हटलें पाहिजे ! आपण असा उपदेश करूं लागलां म्हणजे आम्ही असून नसल्यासारखेंच झालों ! कारण, द्यूतासारख्या युक्तीनें जें द्रव्य लवकर मिळविण्याचा उद्योग आम्ही करूं म्हणतों, त्याला आपण यज्ञासारखीं निमित्तें सांगून लांबणीवर टाकावयास सांगतां! आपणांसारखा दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणारा मनुष्य ज्याचा पुढारी आहे, तो आडमार्गानें जाणारच. कारण त्याच्या अनुयायानें आपल्या पुढाऱ्याला अनुसरून अन्य प्रकारें कसें वागावें ! आपली बुद्धि चांगली पोक्त असून आपण जितेंद्रिय व पोक्त मनुष्यांतच वागणारे आहां. असें असतां, आमच्या कर्तव्याला आम्ही हात घालतों, त्यांत आपण कां आड येतां ? बृहस्पतींनीं तर असें म्हटलें आहे कीं, लोकवर्तन व राजवर्तन हीं अगदीं भिन्न भिन्न आहेत! म्हणून राजानें नेहमीं डोळ्यांत तेल घालून रात्रंदिवस स्वार्थाचेंच चिंतन करीत राहिलें पाहिजे. महाराज ! क्षत्रियाची प्रवृत्ति जयाकडे असणेंच उचित होय. तेव्हां तिच्यांत धर्म असो कीं अधर्म असो, त्याची पर्वा नाहीं. कारण, ती स्वतांचीच वृत्ति पडल्यामुळें तिच्याबद्दल चिकित्सा करीत बसण्यांत अर्थ नाहीं. हे भरतवंशजश्रेष्ठा ! चाबकाच्या योगानें सारथि जसा आपले घोडे आपल्या ताब्यांत ठेवतो, तसे, शत्रूचें देदीप्यमान वैभव संपादण्याची इच्छा करणारानें सारेच मार्ग आपल्या अधीन ठेविले पाहिजेत. शूर वीर असतात ते कांहीं हातपाय तोडणाऱ्या शस्त्राला शस्त्र म्हणत नाहींत, तर गुप्त असो किंवा उघडें असो, ज्या उपायानें शत्रूचा नाश होत असेल, त्या उपायालाच शस्त्र असें म्हणतात. हे राजा! अमका अमका हा शत्रु, व अमका अमका हा मित्र, असा कांहीं कोणावर छाप मारलेला नाहीं, किंवा अक्षरेंही खोदलेलीं नाहींत ! तर ज्याच्यापासून आपल्याला ताप होतो त्यालाच शत्रु असें म्हणतात. असंतोष हेंच वैभवप्राप्तीचें मूळ आहे. ह्याकरितां, त्याचीच मी

इच्छा करितों. कारण, हे राजा ! भाग्योदय करण्याकडे जिची प्रवृत्ति असते, तीच नीति सर्वोत्कृष्ट होय. ऐश्वर्यावर किंवा धनावर ममता अशी ठेवूं नये, असें जें म्हणतात तें खरेंच आहे. कारण, पूर्वी एखाद्यानें धन संपादन केलें असलें तर तो दुसराच कोणी तरी घेऊन जातो. पण त्याला सुद्धां राज्यैश्वर्य असेंच म्हणतात. 'आपण द्रोह म्हणून कोणाचा करावयाचा नाहीं' असा निश्चय करून वेळ येतांच इंद्रानें नमूचि दैत्याचा शिरच्छेद केला; आणि तें इंद्रानें शत्रूशीं वर्तन केलेलें वृद्धांना अर्थात् नीतिमान लोकांना सुद्धां मान्य झालेलें आहे. बिळांत राहणाऱ्या प्राण्याला ज्याप्रमाणें सर्प ग्रासून टाकतो,त्याप्रमाणें कोणाशीं विरोध न करणाऱ्या राजाला आणि प्रवास न करणाऱ्या ब्राह्मणाला पृथ्वीच ग्रासून टाकिते. हे प्रजाधिपते ! पुरुषाला मूळचा शत्रु पहावयास गेलें तर कोणीच नाहीं. आपल्यासारखीच ज्याची उपजीविका असते, तोच आपला शत्रु, दुसरा कोणी नव्हे; शत्रूचा पक्ष वृद्धिंगत होत असलेला पाहूनही जो मोहानें त्याची उपेक्षा करितो, त्याचीं तो शत्रु—वृद्धिंगत झालेल्या रोगाप्रमाणें—पाळेंमुळें खणून काढितो. वृक्षाच्या मुळाशीं एवढेंसें जरी वारूळ वाढलें तरी तें शेवटीं त्या साऱ्या वृक्षाचा फडशा पाडतें; त्याचप्रमाणें, अगदीं क्षुद्र जरी शत्रु असला, तरी तो युक्तिप्रयुक्तीनें वाढत जाऊन आपल्या प्रतिपक्ष्याचा नाश करून टाकितो. ह्याकरितां, हे अजमीढकुलोत्पन्ना, आपणांस शत्रूच्या वैभवानें आनंद होणें इष्ट नाहीं. मी सांगत असलेली ही नीति बुद्धिमान लोकांनाही शिरसा मान्य होण्यासारखी आहे. आपल्या शरीराप्रमाणें आपली द्रव्यवृद्धि व्हावी अशी जो इच्छा धरितो, तोच आपल्या ज्ञातीमध्यें मोठा होतो; ह्यावरून, ज्याच्या योगानें द्रव्याची वृद्धि सत्वर होते तोच खरा पराक्रम होय. पांडवांची संपत्ति दिसलीच नसती, तर मग आम्हेलाही जागाच नव्हती; पण आतां ती संपत्ति मिळवावी तरी एक; किंवा युद्धामध्यें प्राण खर्ची घालून रणभूमीवर पतन पावावें एक; ह्याशिवाय तिसरा मार्ग कांहीं मला उरला नाहीं. तेव्हां, हे प्रजाधिपते ! अशी अवस्था झालेल्या मला आतां जगून तरी काय करावयाचें आहे ! कारण, पांडवांचा एकसारखा उत्कर्ष होत आहे, आणि आमची वाढ अगदीं खुंटून गेलेली आहे !

अध्याय छपन्नावा.

—:०:—

शकुनीची प्रतिज्ञा.

शकुनि म्हणाला:—हे विजयश्रेष्ठा ! हें जें पांडुपुत्र युधिष्ठिराच्या येथें असलेलें वैभव पाहून तूं संतप्त झाला आहेस, तें वैभव द्यूतामध्यें मी हरण करीन. पण, हे राजा, तूं मात्र त्या कुंतीपुत्र युधिष्ठिरास लवकर आव्हान कर. अक्षविद्येंत मी अगदीं पारंगत आहें, तेव्हां कोणत्याही जडजोखमांत तुला पडावयाला नको; युद्धामध्यें तोंडाला तोंड द्यावयाला नको; किंवा अंगाला एक जखम सुद्धां करून घ्यावयाला नको ! त्या अक्षविद्येमध्यें निपुण नसलेल्या पांडवांना मी नुसते फांसे टाकूनच जिंकितों पहा ! दुर्योधना ! 'पण' हींच माझी धनुष्यें; 'फांसे' हेच माझे बाण; 'फांसे फेंकण्याचें चातुर्य' हीच माझी प्रत्यंचा; आणि 'फांसे टाकण्याचें स्थान' हाच माझा रथ आहे, असें तूं समज.

दुर्योधन म्हणाला:—हे तात ! अक्षविद्येंत निपुण असलेला हा शकुनि द्यूताच्या योगानें पांडुपुत्रांचें वैभव हरण करण्याची उमेद बाळगीत आहे. तर त्याला आपण द्यूताविषयीं अनुज्ञा द्यावी.

धृतराष्ट्र म्हणाला:—मी महात्म्या विदुर भ्रात्याच्या आज्ञेंत वागणारा आहें. ह्याकरितां, त्याची

भेट झाल्यानंतर त्या कृत्याविषयीं मी काय तो विचार करीन.

दुर्योधन म्हणालाः—साहस करण्याच्या कामांत विदुर हा नेहमींच मागें घेणारा असल्यामुळें तो आपलें मन फिरवील. कारण, पांडवांच्या हिताकडे त्याचा जसा ओढा आहे, तसा माझ्या हिताकडे नाहीं. कोणींही झालें तरी दुसऱ्याच्या सामर्थ्यावर अवलंबून आपल्या कार्याला आरंभ करूं नये. कारण, एकाच कार्याविषयीं दोघांचें मत सारखें नसतें. आपलें परिपालन करण्याच्या कामांत साहस करण्यास जो भितो, तो पर्जन्यकाळांत भिजलेल्या शुष्क गवताप्रमाणें जागच्या जागींच कुजून जातो. रोग म्हणा किंवा मृत्यु म्हणा, एकदा येऊन ठेपले, म्हणजे त्या मनुष्याची इतिकर्तव्यता संपली किंवा नाहीं, ह्याची कांहीं ते वाट पहात बसत नाहींत. तद्वत्, जोपर्यंत पुरुष हा कल्याण करून घेण्याला समर्थ असेल, तोंपर्यंत त्यानें आपलें कल्याण करून घेतलेंच पाहिजे.

धृतराष्ट्र म्हणालाः—हे पुत्रा! तूं कांहीं जरी म्हटलेंस, तरी बळवंताशीं वैर करणें हें कांहीं मला उचित दिसत नाहीं. कारण, वैर म्हटलें कीं तेथें विकृति उत्पन्न होते. म्हणूनच त्याला 'लोहविरहित शस्त्र' असें म्हटलेलें आहे. हे राजपुत्रा! खरोखर द्यूत हें अनर्थास कारण आहे. असें असतां, त्यांत कांहीं अनर्थ नाहीं अशी तुझी समजूत आहे; परंतु द्यूताची प्रवृत्ति कलह उत्पन्न करण्याकडे अतिशयच असते. तें एकदा सुरू झालें—मग तें मित्रत्वानें सुरू होवो कीं शत्रुत्वानें सुरू होवो—अखेर त्याची मजल तीक्ष्ण खड्गबाणांपर्यंत जाऊन पोहोंचावयाची ती पोहोंचावयाचीच! ती चुकावयाची नाहीं."

दुर्योधनानें उत्तर दिलें:—महाराज,' द्यूत खेळण्याचा प्रघात प्राचीन काळापासून चालत आला आहे. नलराजासारखे पुष्कळ पुरुष द्यूत खेळलेले आहेत. परंतु त्यांच्या द्यूतापासून कोणाचा नाशही झालेला नाहीं, व कोणांमध्यें युद्धही पण उपस्थित झालेलें नाहीं. ह्याकरितां, ह्या" शकुनीच्या म्हणण्याला' अनुमोदन देऊन आपण लवकर सभागृह तयार करण्याला आज्ञा द्या. आम्हां द्यूत खेळणारांना द्यूत हेंच संपत्तीचें द्वार आहे, आणि पांडवांनाही पण तें तसेंच आहे. शिवाय, जय किंवा विजय होण्याचा संभव आम्हांला आणि पांडवांना सारखाच आहे. ह्याकरितां द्यूतास अनुमोदन द्या.

धृतराष्ट्र म्हणालाः—हे राजा! तू जें भाषण केलेंस, तें मला कांहीं संमत नाहीं, याउपर तुला वाटेल तें कर. पण पुढें मात्र तुला माझ्या ह्या बोलण्याचें स्मरण होऊन पश्चात्ताप होईल. कारण, हें तुझें म्हणणें धर्माला अनुसरून नसल्यामुळें, त्यापासून हित होणार नाहीं. सारासारविवेकी व ज्ञानसंपन्न विदुरानें या सर्वांचें भाकित पूर्वीच करून ठेविलेलें आहे; आणि तेंच क्षात्रियप्राणविघातक अरिष्ट, मनःपूत वागणाऱ्या तुझ्यावर कोसळण्याचा रंग दिसत आहे.

वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें बोलून धृतराष्ट्रानें मनामध्यें विचार केला कीं, 'एकंदरींत दैव हें अत्यंत दुस्तर आहे. जें होणार तें कोणाच्यानेंच टाळवत नाहीं.' असो. तदनंतर, दुर्दैवानें पुत्राच्या भाषणानें बुद्धीला भ्रंश झालेल्या ह्या धृतराष्ट्र राजानें, " माझ्याकरितां 'तोरणस्फाटिका' ह्या नांवाचें एक भव्य सभागृह लवकर तयार करा; त्याला एक हजार स्तंभ असून शंभर दारें असावीं. सर्व सभागृह एक कोस लांब, व एक कोस रुंद असें असावें. त्यांत सुवर्णामध्यें वैदूर्यरत्नें बसवून चित्रविचित्र नकशी व वेलबुट्टी काढिलेली असावी," अशी आपल्या सेवकांस आज्ञा केली. ह्याप्रमाणें धृतराष्ट्राची आज्ञा ऐकल्याबरोबर मनामध्यें कसलीही शंका न धरितां हुशार व तत्पर असलेले ते राजसेवक ह्या सभागृ-

हाच्या तयारीला लागले; आणि त्यास लागणारी सर्व प्रकारची द्रव्यसामुग्री जमा करून हजारों कारागीर त्या कामावर लाविले. नंतर, थोडे दिवस गेले नाहींत तोंच त्या राजसेवकांनीं अनेक रत्नें जडवून व वेलपत्ती काढून सुशोभित केलेलीं सुवर्णाचीं सिंहासनें वगैरे जेथल्या तेथें मांडलेली अशी सभा तयार झाल्याबद्दल मोठ्या आनंदानें राजास कळविलें. तेव्हां तो धृतराष्ट्र राजा बुद्धिमान मंत्रिश्रेष्ठ विदुराला म्हणाला, " तूं राजपुत्र युधिष्ठिराकडे जा; आणि जिच्यामध्यें अनेक प्रकारच्या रत्नखचित शय्या, आसनें वगैरे मांडून चित्रविचित्र पदार्थांनीं व मूल्यवान वस्तूंनीं अत्यंत शोभा आणिलेली आहे, अशी ही माझी लोकोत्तर सभा तूं आपल्या बंधुसहवर्तमान एकदा येऊन पाहून जा; आणि त्या सभेमध्यें एक वेळ मित्रत्वाच्या नात्यानें द्यूतक्रीडा कर, असा माझा निरोप सांगून त्याला लवकर इकडे घेऊन ये. "

अध्याय सत्तावन्नावा.

धृतराष्ट्रविदुरसंवाद.

वैशंपायन सांगतात:—पुत्राचें मत मनांत आणून, व दैव हें अनुलंघनीय आहे असें समजून धृतराष्ट्र राजानें तर असें केलें; परंतु ज्ञानसंपन्न विदुरानें धृतराष्ट्राची ती आज्ञा शुद्ध अन्यायाची आहे असें जाणून, आपल्या भावाचें याबद्दल अभिनंदन तर केलें नाहींच; पण उलट तो त्याला असें म्हणाला कीं, "हे राजा! तुझी ही आज्ञा मला बरी दिसत नाहीं. तूं असें करूं नको. ह्याच्या योगानें कुलक्षय होईल, अशी मला भीति वाटते. कारण, तुझे पुत्र भिन्नभावानें वागत असल्यामुळें ह्या द्यूतापासून त्यांचा व पांडवांचा निःसंशय कलह माजून राहील, असा माझा सूर वाहत आहे."

धृतराष्ट्र म्हणाला:—हे विदुरा! प्रारब्ध जर उलट खाणार नसेल, तर कलह होण्याची भीति बाळगण्याचें मला मुळींच कारण नाहीं. कारण, हें जग दैवाधीनच असल्यामुळें, सृष्टिनियंत्या ब्रह्मदेवाच्या योजनेप्रमाणेंच चाललेलें असतें. ललाटरेषेच्या बाहेर त्याला एक पाऊल सुद्धां टाकण्याची शक्ति नाहीं. ह्याकरितां, हे विदुरा, आतां जिंकण्यास दुर्घट अशा त्या कुंतीपुत्र धर्मराजाकडे जा, आणि त्याला लवकर घेऊन ये.

अध्याय अठावन्नावा.

विदुराची व धर्मराजाची भेट.

वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें धृतराष्ट्र राजानें त्या विदुराला पांडवांकडे जाण्याविषयीं आग्रहच केला, तेव्हां तो विचारशील विदुर, नाइलाजास्तव महान वेगवान, व उत्तम प्रकारें शिकविलेल्या खद्या वारूवर आरूढ होऊन पांडवांकडे जाण्यासाठीं निघाला. तो बुद्धिवान विदुर धृतराष्ट्राच्या आज्ञेनें मार्गस्थ होऊन युधिष्ठिराच्या नगरासमीप गेल्यानंतर, ब्राह्मण स्तुतिपाठ करितां करितां तो नगराच्या आंत शिरला; आणि केवळ कुबेराच्या मंदिराप्रमाणें असणाऱ्या त्या टोलेजंग राजवाड्यांत पोहोंचल्यावर तो धर्मात्मा विदुर धर्मपुत्र युधिष्ठिराच्या जवळ गेला. तेव्हां अजातशत्रु, सत्यव्रत, महात्म्या अजमीढवंशज युधिष्ठिर राजानें यथाविधि पूजन वगैरे त्याचा सत्कार करून धृतराष्ट्र व त्याचे पुत्र ह्यांच्या संबंधानें कुशलप्रश्न विचारावयास प्रारंभ केला: तो म्हणाला, "काका, आज तुमचें मन दिसावें तितकें उल्हासयुक्त दिसत नाहीं. तर सर्वांच्या खुशालीचें वर्तमान घेऊन इकडे आलां आहांना ? वृद्ध धृतराष्ट्राचे पुत्र त्याला अनुकूल असून सर्व प्रजा वगैरे त्याच्या अधीन आहेना ? "

विदुर म्हणाला:—हे राजा! सर्व कुटुंबासह-

वर्तमान महात्म्या इंद्राप्रमाणें धृतराष्ट्र हा पुत्रांसह सुखरूप आहे; आणि तो आपल्या पुत्रांचे गुण पाहून विनीत[1], विशोक[2], दृढात्मा[3] आणि आत्मरति[4] असा होऊन राहिलेला आहे; आणि संपूर्ण कुशलप्रश्नपूर्वक तुलाही त्याचा आज असा निरोप आहे कीं, "हे पुत्रा! येथेंही तुझ्या सभेसारखीच तुझ्या भ्रात्यांनीं सभा तयार केलेली आहे. तर ती तूंही एकदा येऊन पाहून जा. हे कुंतीपुत्रा ! तुम्हीही आपल्या दुर्योधनप्रभृति बंधूंना भेटा, आणि येथें मित्रभावानें द्यूत खेळून दोन दिवस करमणूक करा. तुम्ही आलां म्हणजे आम्हांलाही आनंद होईल, आणि सारे कुरुवंशजही एकदा एकत्र जमल्या सारखे होतील." हे राजा ! त्या महात्म्या धृतराष्ट्र राजानें त्या ठिकाणीं जे जे द्यूत खेळणारे जमविलेले आहेत, तेही सारे तुला पहावयाला मिळतील. हें कळविण्याकरितां मी येथें आलों आहें. तर तूं त्याच्या म्हणण्याला मान दे!

युधिष्ठिर म्हणालाः—हे विदुरा ! आम्ही सारे पांडव कांहीं आपल्या आज्ञेच्या बाहेर नाहीं. पण जें मनांत येतें तें मी आपल्याला विचारितों. आम्ही द्यूत खेळूं लागलों कीं आमच्यामध्यें कलह हा ठेवलेलाच ! तो कांहीं चुकावयाचा नाहीं. म्हणूनच शहाणे लोक त्यांत कधीं पडत नाहींत. हेंही असो; पण खुद्द आपल्याला तरी द्यूत खेळणें हें बरें वाटतें काय ?

विदुर बोललाः—द्यूत हें अनर्थाचें मूळ आहे हें तर मी पक्कें जाणतों; व तें टाळण्याविषयीं मींही होता तेवढा प्रयत्न करून पाहिला. परंतु इतकें असूनही धृतराष्ट्र राजानें मला तुझ्याकडे पाठविलें आहे. तेव्हां, हे सुज्ञ युधिष्ठिरा ! मीं जें सांगितलें, त्याचा नीट विचार करून, तुला जें ह्या वेळीं बरें वाटेल तें तूं कर.

युधिष्ठिर विचारतोः—राजा धृतराष्ट्राच्या पुत्रांशिवाय आणखी त्या ठिकाणीं द्यूत खेळण्यांत वाकबगार असे कोण कोण आहेत, तें मी आपणांस विचारतों; तर, विदुरा, तें आपण आम्हांला सांगा. म्हणजे त्यांचाही आम्हांला समागम घडेल, व असंख्य धनानें आम्हीही त्यांच्याशीं द्यूत खेळूं.

विदुर म्हणालाः—हे प्रजाधिपते ! अक्षविद्येंत नांवाजलेला, डावावर हुकमत चालविणारा, व रुळलेल्या हाताचा गांधार देशाचा राजा शकुनि, विविंशति, राजा चित्रसेन, सत्यव्रत, पुरुमित्र व जय हे तेथील—धृतराष्ट्रपुत्रांशिवाय—बाकीचे द्यूत खेळणारे आहेत.

युधिष्ठिर म्हणालाः—एकूण तेथें जमलेले द्यूतकार कपटी, मायावी, अर्थात् महाभयंकर असेच आहेत म्हणावयाचे. पण धृतराष्ट्राच्या आज्ञेपुढें आपला उपाय काय ? असो. विधात्यानें हें सर्व जग दैवाधीन करून ठेविलें आहे. त्याप्रमाणेंच तें सर्व

---

१ हे चारी शब्द द्व्यर्थी असून प्रत्येक अर्थ परस्पराच्या विरुद्ध असल्यामुळें, विदुरानें धृतराष्ट्राच्या अंतःकरणाची एका अर्थानें बाह्यस्थिति सांगून दुसऱ्या अर्थानें अंतःस्थिति व्यक्त केली आहे. हे दोन अर्थ क्रमानें देतोः——

१विनीतः--विनयशील; पक्षीं फारच जेरीस आलेला.

२विशोकः--शोकरहित; पक्षीं अत्यंत शोकाकुल.

३दृढात्माः--दृढनिश्चयी; पक्षीं निर्दय.

४आत्मरतिः--ब्रह्मनिष्ठ; पक्षीं स्वार्थी.

ह्यावरून विदुराचें एक पक्षीं म्हणणें, पुत्रवात्सल्यानें पुत्राचे गुण पाहून धृतराष्ट्र हा मोठा विनयशील, शोकरहित, आनंदयुक्त व दृढनिश्चयी बनलेला आहे. दुसऱ्या पक्षीं पुत्राचे गुण (व्याजोक्तीनें दुर्गुण) पाहून त्याचें अंतःकरण जर्जर झालेलें आहे; तो अत्यंत शोक करीत आहे; व त्यांच्याच नादानें आपस्वार्थी बनून निर्दय होऊन राहिला आहे, हेंही द्यूतास उद्युक्त झाल्यामुळेंच विदुरानें सूचित केलें. पण असें स्पष्ट धर्मराजास सांगणें म्हणजे आपल्या बंधूंची परोक्ष निंदा होईल. एवढ्याकरितां येथें श्लेषात्मक पदें घालून काव्यचमत्कृति साधलेली दिसते.

चालावयाचें. ह्याच्या बाहेर त्याला एक पाऊलही टाकितां येणार नाहीं. एवढीच गोष्ट खरी ! धृतराष्ट्राच्या आज्ञेप्रमाणें, मी द्यूताकडे जाणार नाहीं असें तर कधीं . घडावयाचें नाहीं. त्यांच्या आज्ञेला मान देणें मला भागच आहे. कारण, पुत्राला पिता हा सर्वथा इष्ट होय. ह्याकरितां, हे विदुरा ! ह्याउपर आपण सांगाल तसें करीन. मला हारविण्याचीच इच्छा धरून जर धृतराष्ट्रानें मला सभेमध्यें आव्हान केलें नसेल, तर शकुनी-बरोबरही द्यूत खेळण्यास मी तयार आहें. कारण, कोणींही आव्हान केलें तरी त्यापासून कधींही निवृत्त व्हावयाचें नाहीं, हें तर माझें अक्षय्य व्रत आहे.

धर्माचें आगमन.

वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें धर्मराजानें विदुरास सांगितल्यानंतर, जाण्याची सर्व तयारी करण्याविषयीं युधिष्ठिरानें सेवकांस आज्ञा केली; व दुसरे दिवशीं सकाळींच सर्व बंधु, सेवक व द्रौपदी आदिकरून स्त्रियांसहवर्तमान सर्व स्त्रिया बरोबर घेऊन तो निघाला. राजा, जगाचा नियमच असा आहे कीं, वीज चमकली म्हणजे डोळे दिपून जाऊन ज्याप्रमाणें झांपड पडते, त्याप्रमाणें मनुष्य दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडला म्हणजे त्याची बुद्धि कुंठित होऊन तोही पाशांत बद्ध केल्याप्रमाणें दुर्दैवाच्या अधीन होतो. असो. ह्याप्रमाणें सांगून, शत्रूला जर्जर करून सोडणाऱ्या युधिष्ठिर राजानें त्या धृतराष्ट्राच्या निमंत्रणाची टाळाटाळ न करितां तिकडे जाण्याचाच निश्चय केला; आणि बाल्हीक देशांतील अश्व जोडलेल्या रथांत भ्रात्यांसहवर्तमान बसून तो शत्रुपरिहारक धर्मराज सर्वांस घेऊन निघाला. अशा प्रकारें राजलक्ष्मीनें तेजःपुंज दिसणारा तो युधिष्ठिर धृतराष्ट्राचें आणि कालगतीचें बोलावणें आल्यामुळें ब्राह्मणांना अग्रमान देऊन बाहेर पडला; आणि हस्तिनापुरांत पोहोंचल्या-वर धृतराष्ट्राच्या वाड्यांत जाऊन त्या धर्मात्म्या युधिष्ठिरानें धृतराष्ट्राची भेट घेतली. त्याचप्रमाणें भीष्माचार्य, द्रोणाचार्य, कर्ण, कृपाचार्य व द्रोणाचा पुत्र अश्वत्थामा ह्यांसही तो प्रभु युधिष्ठिर त्यांच्या त्यांच्या नात्याप्रमाणें भेटला. नंतर तो महापराक्रमी व वीर्यवान युधिष्ठिर सोमदत्त, दुर्योधन, शल्य, सुबलपुत्र शकुनि, व तेथें आलेले कित्येक राजे, वीर दुःशासन वगैरे सर्व बंधु, जयद्रथ आणि इतरही सारे भाऊबंद ह्यांना भेटला. नंतर सर्व भ्रात्यांना बरोबर घेऊन तो महापराक्रमी युधिष्ठिर त्या बुद्धिमान धृतराष्ट्राच्या अंतःपुरांत गेला. तेव्हां तेथें पतीला अनुसरून वागणारी, व सभोंवतीं साऱ्या सुंदर सुंदर सुनांचा घोळका असल्यामुळें सदासर्वदा तारकांनीं परिवेष्टित असलेल्या रोहिणीप्रमाणें शोभत असलेली गांधारी त्याच्या दृष्टीस पडली. तेव्हां तिला अभिवंदन करून व तिचा आशीर्वाद घेऊन पुनः तो वृद्ध पितृव्य प्रज्ञाचक्षु धृतराष्ट्र ह्याच्याकडे आला. तेव्हां, हे जनमेजय राजा ! त्या कुरुवंशजांना आनंद देणाऱ्या त्या भीमसेनप्रभृति चारही पांडुपुत्रांचीं धृतराष्ट्र राजानें मस्तकें अवघ्राण केलीं. ज्यांच्या दर्शनानें कोणालाही आनंद वाटे, अशा पुरुषश्रेष्ठ पांडवांना पाहून कुरुवंशजांनाही त्या वेळीं आनंदच झाला. नंतर आज्ञा घेऊन ते त्यांच्याकरितां तयार केलेल्या रत्नमंदिरांत गेले. द्रौपदी आदिकरून तेथें असलेल्या स्त्रियांसही ते येतांना दृष्टीस पडले. परंतु द्रौपदीचें तें डोळे दिपविणारें अतुल वैभव पाहून धृतराष्ट्रांच्या सुनांना मात्र तितकासा आनंद वाटला नाहीं. तेथें त्या पुरुषसिंहांनीं स्त्रियांशीं कांहीं वेळ इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगितल्यानंतर व्यायाम वगैरे करून नित्यविधि आटोपिले. नंतर सर्वांनीं आन्हिक वगैरे उरकून, उत्तम चंदनाची उटी लावून, मनांत कल्याण चिंतणाऱ्या ब्राह्मणांचे आशीर्वाद ग्रहण करून सुग्रास अन्नाचें भोजन केल्यावर

ते विश्रांतिगृहांत गेले. तेथें जातांच स्त्रियांनीं गायनास सुरुवात केली, तेव्हां त्या शत्रुसेनाविजयी पांडवांना त्या गायनानें मोठा आनंद झाला, व त्या गायनाच्या तल्लीनतेमध्येंच त्यांना निद्रा लागली. अशा प्रकारें रतिक्रीडा करणाऱ्या त्या पांडवांची ती रात्र मोठ्या सुखासमाधानांत गेली. ह्याप्रमाणें श्रमाचा परिहार झाल्यानंतर बंदिजन स्तुतिपाठ करूं लागले असतां ते जागे झाले. ह्याप्रमाणें सारी रात्र सुखांत घालविल्यानंतर प्रातःकाळचेंही सर्व आन्हिक आटोपून ठरल्याप्रमाणें ते त्या रमणीय सभेमध्यें गेले. तेव्हां तेथें असलेल्या सर्व द्यूतकारांनीं त्यांचा मोठा आदरसत्कार केला.

अध्याय एकुणसाठावा.

—:०:—

द्यूतास प्रारंभ.

वैशंपायन सांगतात:–युधिष्ठिराला पुढें करून ते सर्व पांडव त्या सभेमध्यें गेले असतां त्या कुंतीपुत्रांनीं सर्व राजांच्या भेटी घेतल्या; व पूजेस योग्य होते, त्यांची पूजा केली; आणि वयोमानाप्रमाणें कोणाला प्रणाम, कोणाला आलिंगन, कोणाला आशीर्वाद वगैरे देऊन स्वागत झाल्यानंतर चित्रविचित्र पसरलेल्या मनोहर बैठकीवर आपापल्या योग्यतेनुसार ते स्थित झाले. अशा प्रकारें ते पांडव व सर्व राजे आपापल्या जागेवर बसले, तेव्हां सुबलपुत्र शकुनीनें युधिष्ठिराला अनुलक्षून बोलण्यास प्रारंभ केला.

शकुनि म्हणाला:–हे राजा! सभेमध्यें हा पट पसरलेला असून आम्ही सारे तुझीच मार्गप्रतीक्षा करीत आहों. ह्यास्तव, हे युधिष्ठिरा! आतां फांसे टाकून द्यूताला प्रारंभ होऊं द्या.

युधिष्ठिर म्हणाला:–बाबारे! पापाला कारणीभूत असलेलें द्यूत म्हणजे निवळ वंचना आहे; ह्यांत कांहीं क्षात्रपराक्रमही नाहीं, व खरी नीतिही पण नाहीं; तेव्हां अशा द्यूताची गोष्ट हवी तरी कशाला? द्यूत खेळणाऱ्या लोकांना कोणी मानही देत नाहीं, व कोणी चांगलेंही पण म्हणत नाहीं; ह्याकरितां, हे शकुने! नीचाप्रमाणें आडमार्गांत शिरून आम्हांला जिंकण्याची इच्छा करूं नको.

शकुनि म्हणाला:—कपटयुक्ति व द्यूतरहस्य ह्यांचें ज्याला ज्ञान आहे, तो द्यूत खेळणारा कसाही फांसा पडला तरी त्याचा खेद मानीत नाहीं. म्हणजे द्यूताचें ज्याला ज्ञान आहे, तो द्यूत खेळण्यास समर्थ होतो. द्यूत हें पातकासही कारण नाहीं. कारण, कुंतीपुत्रा, असें पहा कीं, पण जिंकणें किंवा हुकणें हें सर्वस्वीं फांशांवर अवलंबून आहे; आणि तो पण काय तो आपणांपैकीं कोणाच्या तरी पराभवास कारणीभूत होणार आहे. तेव्हां खरें पाहिलें तर द्यूतामध्यें दोष होतो तो फांशांच्या अधीन असलेल्या पणामुळें होतो. खेळणाराकडे त्या दोषाचा कांहीं संबंध नाहीं. ह्याकरितां, राजा! आपण आतां द्यूत खेळूं या. तूं कोणत्याही प्रकारची मनामध्यें शंका आणूं नको. पणाला जें काय द्रव्य लावावयाचें असेल, तें तूं लाव; आतां उशीर नको.

युधिष्ठिर म्हणाला:—परलोकप्राप्तीच्या साधनांतच निरंतर भ्रमण करणारे मुनिश्रेष्ठ असित व देवल ह्यांनीं असें म्हटलेलें आहे कीं, "द्यूतकारांशीं कपटानें द्यूत खेळणें हें पातक; आणि संग्रामामध्यें धर्मानें जय मिळविणें हें सत्कर्म होय. जयाकरितां द्यूताचें अवलंबन करणें उक्त नव्हे. श्रेष्ठ लोक आहेत ते वाणीनेंही कपट करीत नाहींत, आणि कृतीनेंही कपट करीत नाहींत. कपट न करितां समोरासमोर युद्ध करणें हेंच सत्पुरुषाचें व्रत होय. आपणांस विद्या—धनुर्विद्या, क्षात्रविद्या—प्राप्त व्हावी म्हणून जें वित्त ब्राह्मणांप्रीत्यर्थ खर्च करण्याचा आपण प्रयत्न करितों, तें तूं पणाला लावून द्यूत खेळूं नको; आणि

त्याच्या योगानें दुसऱ्यांना जिंकण्याची इच्छा धरूं नको. कपटानें सुख किंवा द्रव्य मिळविण्याची माझी तर इच्छा नाहीं; आणि कृतकृत्य झालेल्या द्यूतकाराचें वर्तन लोकही प्रशस्त मानीत नाहींत.

शकुनि म्हणाला:—हे युधिष्ठिरा! विजयाची इच्छा हीच जर नीच मानली, तर श्रोत्रिय श्रोत्रियांना जिंकतो, किंवा विद्वान विद्वानांना जिंकतो, तोही नीचकर्मानेंच जिंकतो, असें म्हटलें पाहिजे. परंतु वादामध्यें वगैरे पराजय करण्याच्या कृतीला कपट किंवा नीचकर्म असें म्हणत नाहींत. त्याचप्रमाणें, हे युधिष्ठिरा! ज्या कपटाचें अवलंबन करून अक्षविद्यानिपुण पुरुष द्यूतामध्यें निपुण नसलेल्या पुरुषाला जिंकतो, त्याच कपटानें विद्वान अविद्वानांचा पराभव करितो. त्या विद्वानाच्या कृतीला जर कपट म्हणत नाहींत, तर द्यूतकाराच्या कृतीला तरी कपट कां म्हणावें? अस्त्रामध्यें निपुण असलेला पुरुष अस्त्रविद्येंत निपुण नसलेल्या पुरुषाचा पराभव करितो; व बळवान असतो तो दुर्बळाचा पराभव करितो; ह्याप्रमाणें प्रत्येकाच्या कृतींत पाहिलें तर कपटच आहें; नाहीं कोठें? परंतु विद्वानांनीं अविद्वानांचा पराभव केला म्हणजे त्याला कपट म्हणावयाचें नाहीं एवढेंच काय तें अंतर! ह्याकरितां, तूं या ठिकाणीं येऊनही जर इतरांप्रमाणेंच द्यूत खेळण्याला कपट म्हणत असशील, व तुला हरण्याचें जर भय वाटत असेल, तर तूं द्यूत खेळूं नको.

युधिष्ठिर म्हणाला:—हे राजा! मला कोणी आव्हान केलें कीं त्यांत माघार घ्यावयाची नाहीं, हें तर माझें व्रत ठरलेलें आहे; आणि तूं तर आपला आग्रह सोडीत नाहींस. तेव्हां दैव हें बलवत्तर असून मी सध्यां त्याच्या तावडींत सांपडलों आहें, इतकेंच समजतों. दुसरें काय? असो. आतां ह्या समुदायामध्यें कोणाबरोबर माझें द्यूत होणार, व माझ्याबरोबर पण लावण्याला दुसरा कोण तयार आहे तें समजलें, म्हणजे आम्ही द्यूताला प्रारंभ करूं.

दुर्योधन म्हणाला:—हे प्रजाधिपते धर्मराजा, रत्नें व द्रव्य देणारा मी; आणि माझ्या वतीनें खेळणारे हे आमचे शकुनि मामा!

धर्मराजा म्हणाला:—हे सुज्ञ सुयोधना! एकानें दुसऱ्याकरितां द्यूत खेळणें हें मला बरोबर वाटत नाहीं. तर याचा तूं नीट विचार कर; आणि मग पाहिजे तर तुझ्या म्हणण्याप्रमाणें द्यूत सुरू होऊं दे.

अध्याय साठावा.

—:०:—

द्यूतांत धर्मराजाचा पराभव.

वैशंपायन सांगतात:—द्यूताला प्रारंभ होण्याची वेळ अगदीं येऊन ठेपली, तेव्हां सर्व राजे धृतराष्ट्राला पुढें करून त्या सभेमध्यें प्राप्त झाले. हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया! त्यांच्याबरोबरच भीष्म, द्रोणाचार्य, कृपाचार्य, व महाविवेकी विदुर हेही आले. परंतु ही गोष्ट त्यांना मनापासूनच आवडत नव्हती. नंतर, ज्यांची मान सिंहाप्रमाणें भरदार आहे असे ते महापराक्रमी राजे—कांहीं जोडीजोडीनें व कांहीं निरनिराळे—तेथें असलेल्या चित्रविचित्र असंख्य सिंहासनांवर आरूढ झाले. तेव्हां, हे राजा! मोठमोठे ऐश्वर्यवंत देव एकत्र जमले असतां जसा स्वर्ग शोभिवंत दिसतो, तशी ती सभाही राजांच्या योगानें शोभूं लागली. कारण, ते सारेच वेदवेत्ते व शूर असून दिसण्यांत केवळ अपरसूर्यच होते. असो. ते बसल्यानंतर मित्रभावानें द्यूतास प्रारंभ झाला. नंतर, हे जनमेजया, युधिष्ठिर म्हणाला:—राजा! महासागराच्या भोंवऱ्यामध्यें सांपडलेलें बहुमोल रत्न ज्याच्यामध्यें बसविलेलें आहे, असा हा बावनकशी सोन्यामध्यें गुंफलेला फार मोठ्या किमतीचा रत्नजडित हार आहे. राजा! हेंच माझें पणाला

लावावयाचें द्रव्य आहे. तर आतां, ज्याच्या योगानें तूं माझ्याशीं द्यूत खेळणार, त्या तुझें पणाला लावावयाचें द्रव्य ह्याच्या जोडीला कोणतें तें सांग.

दुर्योधन म्हणाला:—माझ्यापाशीं रत्नेंही आहेत, व द्रव्य तर हवें तितकें आहे. तेव्हां ह्या तुझ्या पणाकरितां मांडून ठेविलेल्या द्रव्याविषयीं, तें तुझें द्रव्य तुला द्यूतांत जिंकून घ्यावें, अशी कांहीं मला मत्सरबुद्धि नाहीं.

वैशंपायन सांगतात:—नंतर, अक्षविद्या जाणणाऱ्या शकुनीनें ते फांसे घेतले. पण त्याचा हात त्या कामांत इतका बसलेला होता कीं, ते टाकण्याचा मात्र अवकाश, कीं लगेच त्यानें युधिष्ठिराला सांगितलें, "हं! हा हार जिंकला! चला पुढें!"

अध्याय एकसष्टावा.

—:०:—

पणास लाविलेल्या वस्तु.

युधिष्ठिर म्हणाला:—हे गर्विष्ठा! ह्या द्यूतामध्यें कपटामुळेंच जर आज माझा पराजय झालेला आहे, तर, हे शकुने! एकमेकांना जिंकण्याकरितां आपण पुनः डाव टाकूं या. हजारों भार सुवर्णानें भरलेल्या उत्तमोत्तम पेट्या माझ्यापाशीं आहेत; आणि त्यांत अस्सल सुवर्णाचा अक्षय्य खजिना भरलेलाच आहे. राजा! हें धन मी आतां पणाला लावून तुझ्याशीं खेळण्याला तयार आहें.

वैशंपायन सांगतात:—इतकें युधिष्ठिरानें त्या शकुनीला सांगितलें मात्र, तोंच, सत्यापासून कधींच च्युत न होणारा व कौरवकुलवर्धक ज्येष्ठ पांडुपुत्र युधिष्ठिर राजा ह्यास त्यानें "हं, जिंकिलें!" एवढेंच सांगितलें. तेव्हां ईर्षेला चढून युधिष्ठिर पुनः म्हणाला, "हा व्याघ्रांबरांनीं मढविलेला असून मोठा नामांकित आहे, व चक्रें वगैरे सामान उत्कृष्ट प्रतीचें घातलेलें असून याची किंमत फार आहे; याला घुंगरूंचे घोंसचे घोंस लाविल्यामुळें त्याचा निरंतर घणघणाट चाललेला असतो. ह्याच राजरथांत बसून आम्ही येथें आलों. हा चालत असला म्हणजे त्याचा दणदणाट असा होतो कीं, जणू काय आकाशांत मेघांचाच गडगडाट होत आहे, किंवा समुद्रच गर्जना करीत आहे, असें वाटतें. शिवाय, हा रथ मोठा यशस्वी आहे. कोणत्याही युद्धांत हा जावो, त्यांत जय हा आपला हटकून ठेविलेला! त्या रथाला वाहून नेणारे अश्व कमळासारख्या कांतीचे असून सर्व राष्ट्रांना केवळ स्पृहणीय असे वाटतात. त्यांचा धावण्याचा वेग तर असा आहे कीं, पायानें चालणारा मनुष्य कितीही लांबीच्या पल्ल्यावर असो, पलीकडे सरतांना त्याची अगदीं त्रेधाच उडून जाते. हा रथ हेंच माझें द्रव्य आतां पणास लावून मी तुझ्याशीं द्यूत खेळावयास तयार आहें.

वैशंपायन सांगतात:—हें युधिष्ठिराचें म्हणणें ऐकून घेऊन, कपटाचा आश्रय केल्यामुळें जिंकण्याची खात्री असलेला तो शकुनि युधिष्ठिराला 'हं, जिंकलें!' एवढें बोलला. तेव्हां युधिष्ठिर बोलूं लागला, "सुवर्णाचीं मंगळसूत्रें व ताईत, हार, चंद्रहार, माळा इत्यादि उरोभूषणें, बाजूबंद, व ठुशा, टिका इत्यादि कंठभूषणें, व इतर उंची उंची अलंकार, मोठमोठीं मूल्यवान पुष्पभूषणें, रत्नांचे व सुवर्णाचे अलंकार हीं धारण करणाऱ्या, उंची उंची वस्त्रें परिधान करून अंगास चंदनाची सुगंधित उटी लावणाऱ्या, चौसष्ट कलांमध्यें प्रवीण, नृत्यगायनांत कुशल, अशा एक लक्ष नवयौवनसंपन्न दासी असून त्या माझ्या आज्ञेनें स्नातक[1], अमात्य व राजे ह्यांची पादप्रक्षालनादि सेवा करीत असतात. हें माझें द्रव्य होय. ह्याकरितां,

१ ब्रह्मचर्यव्रत परिपूर्ण झालेल्या पुरुषाला स्नातक असें म्हणतात.

हे राजा ! त्यांना पणास लावून मी तुझ्याशीं द्यूत खेळतों.

वैशंपायन सांगतातः—हें श्रवण केल्याबरोबर, कपटाचें अवलंबन केल्यामुळें जयाविषयीं निश्चित असलेल्या शकुनीनें 'हं ! जिंकिलें, पुढें.' एवढेच शब्द तात्काळ युधिष्ठिरास सांगितले. त्यावर युधिष्ठिरानें उत्तर दिलें, "तर माझ्याजवळ दुसरे एक लक्ष दास आहेत. ते मोठे विनयसंपन्न, सुखावह, सदासर्वदा उत्तरीय वस्त्र घेऊन उभे राहणारे, बुद्धिमान, सांगितलेलें काम लक्षांत ठेवणारे, जितेंद्रिय, व झगझगीत कुंडलें घातलेले असे असून अतिथीला भोजन देण्याकरितां रात्रंदिवस हातांत ताटें घेऊन उभे असतात. तेव्हां, राजा ! ते आतां द्रव्याच्या रूपानें मी पणास लावण्यास तयार आहें."

वैशंपायन सांगतातः—धूर्ततेचें अवलंबन केल्यामुळें जयाविषयीं खातरी असलेल्या शकुनीनेंही त्याचें भाषण श्रवण करून लागलीच, 'हं; चल आटप, जिंकलें ! पुढें बोल.' हे शब्द उच्चारिले. तेव्हां युधिष्ठिर पुढें बोलूं लागला, सोन्याच्या साखळदंडानें बांधलेले, गंडस्थळावर पदकें वगैरे अलंकार चढविलेले, पद्मादि शुभचिन्हांनीं युक्त, सुवर्णाच्या माळा घालून शृंगारलेले, उत्तम प्रकारें शिकवून तयार केलेले, खासा स्वारीस बसावयास योग्य, युद्धामध्यें कशाचाही शब्द कानीं पडला असतां न बुजणारे, नांगराच्या फाळासारख्या लांब लांब दातांनीं शोभणारे, मोठे धिप्पाड, नूतन मेघासारखे तेजःपुंज, व एकएका टकरीबरोबर शत्रूंचे किल्ले ढांसळून पाडण्यास समर्थ असे एक हजार मदोन्मत्त हत्ती माझ्यापाशीं आहेत; व त्या प्रत्येक बरोबर आठ आठ हत्तिणी आहेत. इतकें माझें हें धन मी आतां पणास लावण्यास तयार आहें.'

वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें युधिष्ठिरानें भाषण केल्यावर, वैर करून राहिलेल्या ह्या दुरात्म्या शकुनीनें तत्काल, "हं ! चल. हें जिंकिलें ! पुढें." हे शब्द उच्चारिले. तेव्हां युधिष्ठिर पुढें बोलूं लागला, "हे राजा ! युद्धांत अजिंक्य असलेल्या चित्ररथ गंधर्वाचा गांडीवधनुर्धारी अर्जुनानें युद्धांत पराभव केला, तेव्हां त्यानें संतुष्ट होऊन तित्तिर पक्ष्यांसारख्या चित्रविचित्र रंगाचे, अबलक, व सुवर्णालंकारांनीं भूषित असलेले जे गांधर्व अश्व त्यास दिले आहेत, तें माझें धन असल्यामुळें तें पणास लावण्यास मी सिद्ध आहें."

वैशंपायन सांगतातः—कपटांत प्रवीण असल्यामुळें जयाविषयीं निर्धास्त असलेल्या शकुनीनेंही पूर्वीप्रमाणेंच तात्काल "हं, जिंकलें, पुढें!" असें उत्तर दिलें. तेव्हां युधिष्ठिर म्हणाला, "माझ्यापाशीं दहादहा हजारांचा एकेक ह्याप्रमाणें रथांचे व गाड्यांचे अनेक समुदाय आहेत. शिवाय, लहान मोठीं वाहनें नेहमीं तयार असतातच. तीं सारी, व शिवाय प्रत्येक जातींतला उत्तम उत्तम पुरुष निवडून काढून जे हजारों वीर जमा केलेले आहेत, व जे सारेच वीरकर्म करणारे आहेत, ते वीर साठ हजार असून त्यांचीं वक्षस्थळें विशाळ आहेत. ते दररोज शाल्योदन भक्षण करून दूध पीत पडले आहेत. तेंही माझें असलेलें द्रव्य मी आतां पणास लावितों."

वैशंपायन सांगतातः—हें श्रवण करून, शठपणा स्वीकारल्यामुळें जयाविषयीं निष्काळजी असलेल्या शकुनीनें "हं ! हें जिंकिलें! पुढें चालूं दे." असे शब्द उच्चारिले. तेव्हां युधिष्ठिर पुढें बोलूं लागला, "एकेकीमध्यें पांच पांच द्रोणीक म्हणजे अडीच अडीच मण-केवळ सोनें भरलेले चारशें निधि असे तोंडांवर मोहरा करून लोखंडाच्या पेटींतून ठेविलेले आहेत; आणि, हे भारता! उत्तम जातीचें शुद्ध सुवर्णच त्यांत भरलेलें आहे. याकरितां, राजा! तें माझें द्रव्य असलेलें मी आतां तुझ्याशीं पणास लावावयास सिद्ध आहें."

वैशंपायन सांगतातः—प्रतारणेचें अवलंबन

केल्यामुळें जयाविषयीं निर्धारित असलेल्या शकुनीनेंही ताकाळ, " हं, जिंकिलें! " हें ठरींव उत्तर युधिष्ठिराच्या कानांवर घातलें !

अध्याय बासष्टावा.

—:०:—

विदुराचा उपदेश.

वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें पांडवांच्या सर्वस्वापहाराचें घोर द्यूत चालू झालें, तेव्हां सर्व संशयाचें निरसन करणारा विदुर बोलूं लागला, " महाराज धृतराष्ट्रा! मरणोन्मुखाला ज्याप्रमाणें औषध घेणें रुचत नाहीं, त्याप्रमाणें माझें भाषण तुला रुचणार नाहीं. तरी पण तें तूं ऐकून ठेव. अरे! जो दुष्ट जन्मास येतांच कोल्ह्याप्रमाणें अमंगल स्वर काढून ओरडूं लागला, तो हा कुलघातकी दुर्योधन, तुम्हां भरतवंशजांच्या नाशाला कारणीभूत होण्यास उद्युक्त झालेला आहे. अरे! हा दुर्योधन नव्हे, हा तुझ्या घरांत कोल्हा शिरलेला आहे.परंतु मोहामुळें तुला तो ओळखत नाहीं.ह्याविषयीं शुक्राचार्यांचें एक वचन आहे तें तुला सांगतों, ऐक, "मध काढणाऱ्या मनुष्याला मध आहे असें दिसलें कीं तुटलेला कडा वगैरे दुसरें कांहींएक त्याला दिसत नाहीं. तो एकदा वर चढला कीं वर असलेल्या मधांत तरी बुडून जातो, नाहीं तर कड्यावरून खालीं तरी पडतो! " त्याचप्रमाणें हा तुझा पुत्र दुर्योधन अक्षद्यूतानें मद्यपानासारखा धुंद होऊन गेला आहे. त्याला मागचें पुढचें कांहींच दिसत नाहीं; आणि महारथी पांडवांशीं वैर करून पुढें येणारें पतनही ह्याला कळत नाहीं. हे महाविचारी धृतराष्ट्रा! प्रजेच्या कल्याणाकरितां पूर्वीं एका भोजदेशांतील राजानेंच आपल्या अयोग्य पुत्राचा त्याग केल्याचें मला माहीत आहे. अंधक, यादव, आणि भोज यांनीं एकत्र होऊन कंसाचा त्याग केला होता. परंतु पुढें सुदैवानें शत्रुघातक कृष्णाच्या हातूनच त्याचा वध झाला, म्हणून त्या कुलांतील लोक शंभर वर्षें आनंदांत राहिले. ह्याकरितां, सुयोधनाचा बंदोबस्त करण्याविषयीं तूं अर्जुनाला आज्ञा कर. ह्या दुष्टाचा बंदोबस्त झाला म्हणजे हे सारे कुरुवंशज खुशाल आनंदांत राहतील. ह्यास्तव, हे राजा! एक कावळा देऊन टाकून अनेक मोर घ्यावे, किंवा एक कोल्हें खर्ची घालून अनेक व्याघ्र विकत घ्यावे, त्याप्रमाणें ह्या एका दुर्योधनाला देऊन टाकून तूं पांडवांना आपलेसे कर. व्यर्थ शोकसागरामध्यें बुडून जाऊं नकोस. "एका कुलाचें रक्षण होत असेल, तर एका पुरुषाचा त्याग करावा; एका ग्रामाचें संरक्षण होत असेल तर एका कुलाचा त्याग करावा; एका देशाकरितां एका ग्रामाचा त्याग करावा; आणि स्वतांच्या संरक्षणाकरितां साऱ्या पृथ्वीचा सुद्धां त्याग करणें भाग पडलें तरी करावा." असें वचन दाखवून सर्वज्ञ, सर्व शत्रूंना भय उत्पन्न करून देणाऱ्या, आणि सर्व प्राण्यांचें हृदय जाणणाऱ्या शुक्राचार्यांनीं सर्व असुरांना जंभासुराचा त्याग करण्याविषयीं सांगितलें होतें. सोन्याची गरळ टाकीत असलेले वनांत राहणारे कांहीं पक्षी एकदा खरोखर राजाच्या घरांत येऊन राहिले होते; व थोडथोडी सुवर्णरूपी गरळ ते प्रत्यहीं त्याच्या येथें टाकीत असत. परंतु ह्यांच्या पोटांत असलेलें सारेंच सुवर्ण काढून घ्यावें, असा त्या राजास लोभ उत्पन्न झाला; आणि, हे शत्रुनाशका धृतराष्ट्रा! लोभानें अंध होऊन त्या राजानें सुवर्णाकरितां त्यांचा वध केला; आणि त्यांच्या पोटांतील सोन्याला व ते प्रत्यहीं देत असत त्या सोन्याला, दोहोंलाही मुकला! ह्याकरितां, राजा! तूंही त्या राजाप्रमाणेंच द्रव्यलोभांत गुंतून पांडवांशीं द्रोह करूं नको. सांप्रत तूं मोहानें ग्रस्त झाल्यामुळें, चाललें आहे हेंच बरें आहे असें तुला वाटत आहे खरें; परंतु पुढें त्या पक्षिघातकी राजाप्रमाणें पश्चात्ताप करीत बसशील. ह्याक-

रितां, हे भरतकुलोत्पन्ना धृतराष्ट्रा ! बागेवर पुनःपुनः प्रेम करणारा माळी ज्याप्रमाणें फूल येईल तेवढें तोडून घेतो, त्याप्रमाणें तूंही पांडवांवर प्रेम करून त्यांच्यापासून जेवढें जेवढें पुष्प प्राप्त होईल तेवढें तेवढें ग्रहण करीत जा. झाडालाच जाळून टाकणाऱ्या कोळसेविक्या लोणाऱ्याप्रमाणें तूं त्यांचा समूळ नाश करूं नको; आणि पुत्र, अमात्य व सैन्य ह्यांसहवर्तमान यमाच्या घरीं जाऊं नको. हे भरतकुलोत्पन्न धृतराष्ट्रा, मरुद्गणांसहवर्तमान देवांचा राजा प्रत्यक्ष इंद्र जरी आला, तरी एकजुटीनें असणाऱ्या पांडवांसमोर युद्धाला उभा राहण्यास कोण समर्थ आहे? ह्याकरितां तूं ह्यांना कपटानें जिंकूं नको.

अध्याय त्रेसष्टावा.

—:०:—

विदुरोपदेश.

विदुर म्हणाला:—द्यूत हें कलहाचें मूळ, परस्परांत वितुष्ट पाडणारें, व परिणामीं महद्भय उपस्थित करणारें आहे; आणि अशाला धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनानें हात घातला आहे, तेव्हां हाही घोर–भयंकर–वैर मात्र उत्पन्न करणार, दुसरें काय ? दुर्योधनाच्या ह्या अनुचित कृतीनें भयंकर सैन्यानें युक्त असलेले प्रतीपकुळांतील व शांतनुकुळांतील पुरुष बाल्हीक देशांतील अधिपतींसहवर्तमान दुर्धर संकटांत मात्र पडतील. माजलेला बैल मस्तीनें जसा आपलें शिंग आपणच मोडून घेतो, तसा हा दुर्योधन आपल्या मदाच्या योगानें साऱ्या राष्ट्राच्या सुखाचा विध्वंस करीत आहे. सुकाणूं धरणारा जर अडाणी असला, तर गलबतांत बसून जाणारे लोक ज्याप्रमाणें समुद्रांत बुडतात, त्याप्रमाणें, राजा धृतराष्ट्रा! ज्ञानी असून वीर असलेला पुरुष आपल्या विचारदृष्टीला गुंडाळून ठेवून दुसऱ्याच्या मनोगताप्रमाणें वागतो, तेव्हां तोही घोर संकटांत गटकळ्या खात बसतो. पांडुपुत्र युधिष्ठिराशीं पण लावून दुर्योधन द्यूत खेळत आहे, आणि त्याचा पुनःपुनः जय होतो म्हणून तूंही आनंदसागरांत हेलकावे खात आहेस; परंतु 'मस्करीची कुस्करी' होते म्हणतात त्याप्रमाणें हा फाजील विनोदच पुढें युद्धस्वरूप बनतो, आणि तोच त्या पुरुषाला धुळीस मिळावयास कारण होतो, हें तूं पक्कें लक्षांत ठेव. ह्या शकुनीनें आणि दुर्योधनानें शब्दरूप आंकड्याचा हा द्यूतरूप फांस तुझ्या अंतःकरणावर फारच शिताफीनें टाकल्यामुळें, तो तेथें घट्ट रुतून तुझ्या अंतःकरणाला चांगलीच ओढ बसली आहे; किंवा सद्‌गुरूंनीं मंत्रोपदेशाचा अनुग्रह केला असतां, मनुष्याला समाधि लागून तो जसा ब्रह्मस्वरूपांत तल्लीन होऊन जातो; अथवा गारुडी लोक सर्पादि प्राण्यांना आपल्या मंत्रसामर्थ्यानें भुरळ घालितात, आणि त्या प्राण्यांना भुरळ पडली म्हणजे ते प्राणी त्या गारुड्याची नागसूर जसजशी वाजेल तसतसे डोलूं लागतात, स्वतांची इच्छा नसली तरी तो गारुडी आज्ञा करील तिकडे जातात, आणि तो सांगेल तसे नाचतात, तद्वत् या उभयतांच्या कानमंत्रानें तुलाही भुरळ पडलेली आहे; तूंही भारला गेला आहेस! म्हणूनच आपल्या स्वजनांशीं कलह करावयाचें तुझ्या मनांतून नव्हतें तरी सुद्धां पांडवांशीं कलह करणें तुला आतां संमत झालें आहे. हे प्रतीपकुलोत्पन्नहो ! हे शांतनुकुलोत्पन्नहो ! कौरवांच्या ह्या सभेमध्यें मीं सांगितलेलें शुक्राचार्यांचें नीतिवचन लक्ष्यांत ठेवा, आणि ह्या मूढ दुर्योधनाच्या नादाला लागून भडकलेल्या भयंकर आगीमध्यें घालून घेऊं नका. अहो ! ह्या अजातशत्रु धर्मराजाला, भीमाला व अर्जुनाला द्यूताचा जोंपर्यंत अंमल चढलेला आहे, व त्यांचा क्रोध जेथपर्यंत आंतल्या आंतच धुमसत आहे, तेथपर्यंत ठीक आहे; पण हा त्यांचा अंमल

उतरला व त्यांचा क्रोधानळ भडकला, म्हणजे घनघोर संग्राम माजून राहील, आणि तुम्ही सारे विपत्तिरूप महासागरांत गटकळ्या खात राहाल. त्या वेळीं तुम्हांला एखाद्या बेटाप्रमाणें थारा तरी कोण देणार बरें ? हे महाराजा धृतराष्ट्रा ! तूं स्वतांच द्रव्याचा निधि आहेस. तूं मनांत आणिलेंस तर द्यूतावांचूनच तुला पाहिजे तितकें द्रव्य मिळण्यासारखें आहे. असें असतां, विपुल संपत्तीनें युक्त अशा पांडवांनाच जिंकून तुला अधिक तें काय मिळणार ? ह्याकरितां तूं येथें दुर्योधनाला खर्चीं घालून पांडवरूप द्रव्य संपादन कर. हे भरतवंशजा धृतराष्ट्रा ! ह्या सुबलपुत्र शकुनीचें द्यूत आम्ही पूर्णपणें जाणून आहों. ह्या पर्वतकदेशाधिपति शकुनीला अक्षविद्येंतले कपट चांगलें अवगत आहे, हेंही आम्हांला माहीत आहे. ह्याकरितां ह्या शकुनीला येथून आला तसा परत जाऊं दे. ह्याच्या पायीं तूं पांडवांशीं युद्ध करण्याचा प्रसंग आणूं नको.

अध्याय चौसष्टावा.

—:०:—

दुर्योधनकृत विदुरनिर्भर्त्सना.

वैशंपायन सांगतात:—राजा, विदुराचें हें भाषण ऐकून दुर्योधनास काय वाटलें असेल तें सांगणें नकोच ! तो अतिशय संतापला, आणि त्या संतापाच्या भरांत त्यानें त्याजवर फार तोंड सोडिलें.

दुर्योधन म्हणाला:—हे विदुरा ! तूं सदासर्वदा आम्हां धृतराष्ट्रपुत्रांची निंदा करितोस, आणि दुसऱ्याच्या कीर्तीचे मात्र पवाडे गात बसतोस. तूं आम्हाला यःकश्चित् पोर समजून आमचा नेहमीं अवमान करतोस; पण तुझ्या गळ्यांतले ताईत कोण आहेत तेही आम्ही पक्कें ओळखून आहों, समजलास ? अरे ! कोणाला कोण प्रिय आहे, हें त्यांनीं केलेल्या निंदेवरून व स्तुतीवरून सहज ओळखितां येतें. तुझ्या मनांत जर विकल्प नसता, तर आमच्याविषयीं तुझ्या मनांत असलेला द्वेष बाहेर व्यक्त करून दाखविण्याला तुझी जिव्हा कशी तयार झाली असती ? मांजराला खावयाला प्यावयाला घालून बाळगलें तरी तें आपल्या धन्याच्याच घाताची इच्छा करितें; त्याप्रमाणें, आजपर्यंत आम्हीं तुझा प्रतिपाळ केला, त्याचें फळ तूं आज आम्हांला मांडीवर सर्प घेतल्याप्रमाणें चांगलेंच दिलेंस म्हणावयाचें! अरे, अशी प्रत्यक्ष बंधूशींच कृतघ्नता करणारा जो तूं, त्या तुला पांडव कदाचित् पातकी म्हणत नसतील, पण तुझ्या मनाला तरी त्या पापाचें भय वाटावें कीं नाहीं?

हे विदुरा ! आम्हीं आज जी एवढी विजयीश्री संपादन केली आहे, ती शत्रूंना जिंकून केलेली आहे. ह्याकरितां, हितशत्रुत्वानें तूं आम्हांला टाकून बोलूं नको. शत्रूंशीं सख्य करण्यांत आनंद मानणारा तूं आमच्यांतच राहिला आहेस, त्यामुळें पुनःपुनः द्वेषाला मात्र पात्र होतोस. कारण, अक्षम्य भाषण करणारा पुरुष द्वेषाला पात्र व्हावयाचाच. म्हणून, शहाणे लोक आहेत ते शत्रूची स्तुति करण्याचा प्रसंग आला तरी सुद्धां मनांतील गुप्त गोष्ट बाहेर बोलून दाखवीत नाहींत; आणि, हे निर्लज्जा ! तूं त्यांच्याच आश्रयाला राहून त्याच राजाला तूं मनास वाटेल तसें बोलून दुःख देत आहेस, तें कां ? हे विदुरा ! तूं असा आम्हांला जेथें तेथें हाणून पाडीत जाऊं नको; तुझें अंतःकरण कसें आहे तें आम्ही पक्कें ओळखून आहों. तुला स्वतांला अक्कल नाहीं, तर दुसऱ्यापासून तरी शिकून घे; वडिलांचें कांहीं तरी नांव राख; आणि शत्रूंचाच गुलामबंदा होऊन बसूं नको. मीच काय तो कर्ता, असें समजून तूं आम्हांला असें चापीत जाऊं नको; आणि असे मर्मभेदक शब्दही पण बोलत जाऊं नको.

हे विदुरा ! माझें हित कशांत आहे, हें मी तुला विचारावयाला येत नाहीं. तूं स्वस्थ रहा.

आम्हां क्षमाशीलांना तूं नको असा छळूं ! पुरुषाला शास्ता असा काय तो एकच: आपण गर्भामध्यें निजलों असतांना जो पढवून ठेवितो, तोच काय तो खरा शास्ता होय. पाणी जसें नेहमीं सखल प्रदेशाकडेच धाव घेतें, त्याप्रमाणें प्राणीही त्याच पुरुषाच्या उपदेशाच्या अनुरोधानेंच नेहमीं जगामध्यें वर्तन करीत असतो. त्याच पुरुषानें गर्भांत मलाही पढविलेलें आहे; आणि त्याच्याच अनुरोधानें मीही वागत आहें. ज्याची आज्ञा झाली कीं पुरे, पुरुष हा मस्तकानें सुद्धां पर्वत फोडून टाकितो, ज्याच्या आज्ञेनें सर्पांचें सुद्धां पोषण होतें, तोच सर्वांतरात्मा प्रेरणेच्या रूपानें आम्हांलाही प्रत्येक काम करावयास आज्ञा करीत असतो.

अरे ! विचारिलें नसतां जो आपण होऊन दुसऱ्याला उपदेश करण्याची खटपट करीत असतो, तो त्याचा शत्रु मात्र होतो. म्हणूनच, शहाणे पुरुष असतात ते मित्रत्वाचें नातें असेल तेथें उपदेश करावयाचें सोडून देतात. हे भरतकुलोत्पन्ना विदुरा ! कापरासारखा ज्वालाग्राही पदार्थ प्रथम आपणच पेटवून दिला, आणि तो जळूं लागल्यावर विझविण्याकरतांही धावलों नाहीं, तर त्याची राख सुद्धां हातांत येण्याला शिल्लक रहावयाची नाहीं. हे विदुरा ! आपला द्वेष करणाऱ्याला, शत्रुपक्षीय पुरुषाला, विशेषत: आपल्याला पाण्यांत पाहणाराला कधींही आपल्या घरांत ठेवूं नये; आणि तूं तर तसा आहेस. ह्याकरितां, तूं आमच्या घरांतून निघून इच्छेस येईल तिकडे चालता हो कसा ! ज्या स्त्रीला व्यभिचाराचीच संवय लागली, ती आज ना उद्यां कधीं तरी उठून जावयाचीच !

विदुराचें दुर्योधनास उत्तर.

विदुर म्हणाला:—हे दुर्योधन राजा ! ह्यावरून, जे मनुष्यालाच टाकावयास तयार होतात, त्यांची मैत्री म्हणजे केवळ आळवावरचें पाणी आहे किंवा नाहीं, तें तूंच सांग. राजांचें चित्त नेहमीं कलुषित असल्यामुळें ते प्रथमत: गोड गोड बोलतात, आणि मागाहून त्याच्या मस्तकांत मुसळ घालून त्याचा प्राण घेतात. हे अक्कलशून्य राजपुत्रा ! आपण मात्र पोर नव्हे आणि मी मात्र पोर आहें, असें तूं समजतोस ! अरे, जो पुरुष प्रथम आपणच एखाद्याला मित्र समजतो, व मागून त्याला दूषण देतो, तो पोर होय. दूषित झालेली स्त्री ज्याप्रमाणें विद्वान ब्राह्मणाच्या घरांत घेतां येत नाहीं, त्याप्रमाणें बेअकली लोकांनाही कल्याणाच्या मार्गाला लावितां येत नाहीं. तेव्हां अर्थातच, मुलीला जसा साठ वर्षांचा म्हातारा जरठ झालेला पति आवडत नाहीं, तसा भरतवंशजांमध्यें कुलदीपक झालेल्या तुलाही माझ्यासारखा हितोपदेश करणारा पुरुष रुचत नाहीं. कल्याणाचें असो कीं अकल्याणाचें असो, साऱ्याच कामांत गोड भाषण आपल्या कानावर यावें, अशीच जर तुझी इच्छा असेल, तर, राजा, तूं असें कर कीं, बायका, आचारी, पाणके, दीन, दुर्बळ, अशांसारखे जे कोणी असतील, त्यांनाच सर्व गोष्टी विचारीत जा, म्हणजे आटोपलें! त्यांजकडून एकही कडू शब्द तुझ्या कानावर यावयाचा नाहीं.

हे दुर्योधना, पण हें पक्कें ध्यानांत ठेव कीं, तोंडावर गोड बोलणारे तोंडपुजे पुरुष आढळतात; पण अप्रिय परंतु हितकर असें भाषण बोलणारा फार दुर्मिळ ! आणि ऐकून घेणारा तर त्याहूनही दुर्मिळ ! आपल्या यजमानाला बरें वाटो किंवा वाईट वाटो, त्याची पर्वा न करितां धर्माला अनुसरून व अप्रिय असल्या तरी हिताच्या गोष्टी जो सांगतो, तोच राजाचा खरा हितकर्ता होय. कुटकीसारख्या कडू द्रव्यांचीं तीक्ष्ण, उष्ण, वीर्यवर्धक, रूक्ष व दुर्गंधि औषधें असमंजस लोक घेत नाहींत; पण तींच औषधें समंजस लोक घेतात, आणि व्याधींपासून मुक्त होतात. तद्वत् तूं-

ही आपला नीचपणा गिळून टाक व स्वस्थ हो. विचित्रवीर्याच्या पुत्रांची कीर्ति व वैभव हीं पुत्रांसहवर्तमान चिरकाल नांदावीं अशी माझी इच्छा आहे. मग तुला काय वाटत असेल तें असो. आतां तूं मला 'इच्छेस येईल तिकडे जा' म्हणतोस, तर तुलाही माझा शेवटचा हाच नमस्कार आहे. ब्राह्मणांचा मला आशीर्वाद असावा म्हणजे झालें. हे कुरुनंदना ! आतां एक शेवटची गोष्ट तुला सांगून ठेवितों कीं, दंश धरून प्राण घेणाऱ्या सर्पांना, व केवळ क्रोधदृष्टीनें भस्म करणाऱ्या ब्राह्मणांना शहाण्यानें कधींही चिडवूं नये, हें मी तुला अगदीं कळवळ्यानें सांगत आहें.

अध्याय पासष्टावा.

—:०:—

युधिष्ठिरशकुनिसंवाद.

शकुनि म्हणतो:–हे युधिष्ठिरा ! आज पांडवांचें द्रव्य तूं पुष्कळच गमाविलेंस. आतां, हे कुंतीपुत्रा ! आणखी कांहीं तुझें द्रव्य शिल्लक राहिलें असेल तर सांग.

युधिष्ठिर म्हणाला:–हे सुबलपुत्र शकुने ! माझ्यापाशीं अपरंपार द्रव्य आहे; आणि तें मला माहीत आहे. हे शकुने ! तूं माझ्या द्रव्यासंबंधानें कां बरें प्रश्न करितोस ? अयुत, शंकु, पद्म, अर्बुद, खर्व, निखर्व, महापद्म, कोटि, मध्य, परार्ध व परार्धाहूनही अधिक असलेलें माझें द्रव्य पणाला लागूं दे. इतकें माझें द्रव्य आहे, आणि तें सारें आतां पणाला लावून मी तुझ्याबरोबर खेळण्याला तयार आहें.

वैशंपायन सांगतात:–हें ऐकून, छलाचा अवलंब केल्यामुळें जयाविषयीं निःसंशय असलेल्या शकुनीनें लागलेंच 'हं ! जिंकिलें !' असें युधिष्ठिराला सांगितलें. तेव्हां युधिष्ठिर म्हणाला, "हे सुबलपुत्रा ! सिंधुनदीच्या पूर्वेपासून पर्णा नदीपर्यंत बैल, घोडे, शेळ्या, मेंढ्या व असंख्य धेनु मिळून जें पशुरूप धन आहे, तेंही सर्व माझें असल्यामुळें मी तें येथें पणाला लावितों."

वैशंपायन सांगतात:—छद्माचा आश्रय केल्यामुळें जय येण्याबद्दल निःशंक असलेल्या शकुनीनें हें भाषण श्रवण केल्याबरोबर 'हं ! जिंकिलें !' इतकेंच युधिष्ठिरास सांगितलें.

युधिष्ठिर म्हणाला:—राजधानी, देश, ब्राह्मणांची मालमत्ता खेरीज करून बाकीची जमीन, आणि ब्राह्मणांशिवाय इतर सर्व पुरुष हें माझें धन अद्यापि शिलक राहिलेलें आहे. ह्याकरितां तें धन आतां मी पणाला लावून तुझ्याशीं खेळावयाला तयार आहें.

वैशंपायन सांगतात:—राजा, कपटावच पतकरिल्यामुळें जयाबद्दल तिळमात्रही शंका मनांत नसलेल्या शकुनीनें हें युधिष्ठिराचें भाषण श्रवण करतांच 'हं ! जिंकिलें !' एवढेच शब्द सांगितले.

युधिष्ठिर म्हणाला:—हे राजा ! जीं भूषणें अंगावर धारण केलीं असतां हे राजपुत्र शोभा पावतात, तीं कुंडलें, कंठभूषणें व बाकीचीं हीं सारीं राजभूषणें हेंही माझें धन आहे. तेंही मी आतां द्यूतामध्यें तुझ्याशीं पणाला लावितों.

वैशंपायन सांगतात:—राजा, हें धर्मराजाचें भाषण ऐकून, कपटाचा अंगीकार केल्यामुळें डाव जिंकण्याची खात्री असलेला तो शकुनि 'हं ! जिंकलें !' एवढेंच युधिष्ठिराला बोलला.

युधिष्ठिर म्हणाला:—सुवर्णासारखी कांति, आरक्तवर्ण नेत्र, सिंहासारखे पुष्ट स्कंध, व महाप्रचंड दोर्दंड यांनीं युक्त असलेला तरुण नकुल हा एकटाच आतांपर्यंत पणाला लाविलेल्या संपत्तीच्या बरोबर आहे ह्याकरितां, आतां हेंच माझें पणाला लावावयाचें द्रव्य आहे असे तूं समज.

शकुनि म्हणाला:–हे युधिष्ठिरा ! राजपुत्र नकुल हा तुझा मोठा आवडता; पण तो तर आतां

आमच्या ताब्यांत आलाच. आतां तूं दुसरें काय पणाला लावणार तेवढें सांग.

वैशंपायन सांगतातः–राजा, इतकें बोलून लागलींच शकुनीनें युधिष्ठिराच्या पुढें फांसे टाकिले,आणि 'हं ! जिंकला !' इतकेंच तो बोलला.

युधिष्ठिर म्हणालाः—आतां हा माझा सहदेव! हा धर्मोपदेशाचें काम करीत असून जगामध्यें पंडित म्हणून गाजलेला आहे. आतां, ह्या राजबिंड्याला पणाला लावणें इष्ट नाहीं; कारण, तो माझा फारच आवडता आहे. तथापि, आज मी त्याला एखादा नावडताच भाऊ असतो त्याप्रमाणें पणाला लावितों.

वैशंपायन सांगतातः—राजा, हातचलाखी साधली गेल्यामुळें जयाविषयीं यत्किंचितही काळजी नसलेला शकुनि युधिष्ठिराचें तें भाषण श्रवण करून 'हं ! जिंकिला ! पुढें !' एवढेंच युधिष्ठिराला बोलला, आणि नंतर तो धर्मराजाला म्हणाला, "हे राजा ! हे तुला आवडते असलेले उभयतां माद्रीपुत्र तर मीं जिंकिलेच. पण भीमसेन व अर्जुन हे तुला जरा अधिक प्रिय आहेत, असें वाटतें." राजा, हें भाषण ऐकून युधिष्ठिर म्हणतो, "मूर्खा ! न्यायाकडे दृष्टि न देतां आतां अधर्मांत शिरून, एकमतानें असलेल्या आमच्यामध्यें तूं वितुष्ट पाडूं पाहतोस काय ?"

शकुनि म्हणालाः–द्यूतामध्यें असो कीं कोठेंही असो, अमर्यादा करणारा पुरुष नरकांत पडतो. एवढेंच नव्हे, तर तो पाषाण होऊन राहतो. ह्याकरितां, हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, तूं ज्येष्ठ असून सर्वांत श्रेष्ठही आहेस. म्हणून कृतापराधाबद्दल मी तुला नमस्कार करितों. हे युधिष्ठिरा! द्यूताची गोष्ट कोठेंही गेलें तरी अशीच ! त्यांत असणारे लोक केवळ बेहोष झालेले असतात, आणि ते असें कांहीं अचावचा तोंड सोडतात कीं, तसली बडबड जागृदवस्थेंत तर काय, पण झोंपेंत किंवा स्वप्नांतही कोणीं केलेली आढळावयाची नाहीं ! ह्याकरितां ती कोणीं कधींही मनावरच घेऊं नये.

युधिष्ठिर म्हणालाः—हे शकुने ! आम्हांला युद्धसागरांतून पार नेण्याची जणू नौकाच, शत्रु हारीला आणण्याच्या कामांत ज्याचा हातखंडा, अत्यंत चपळ, व पणाला लावावयाला निखालस अयोग्य, अशा ह्या राजपुत्र अर्जुनालाही मी आतां पणाला लावून तुझ्याशीं द्यूत खेळण्यास सिद्ध आहें.

वैशंपायन सांगतातः—राजा, कुमार्गाचाच स्वीकार केल्यामुळें जयासंबंधानें निष्काळजी असणाऱ्या शकुनीच्या तोंडून 'हं ! हा जिंकिला !' इतकेच शब्द प्रथम बाहेर आले; आणि नंतर तो म्हणाला, "युधिष्ठिरा, पांडवांपैकीं धनुर्धारी पांडुपुत्र अर्जुन तर हा मीं जिंकून घेतलाच ! आतां तूं आपल्या शिलक राहिलेल्या फार आवडत्या भीमसेनाला पणाला लाव."

युधिष्ठिर म्हणालाः–आतां आमच्यांतील पुढारी; युद्धातला आमचा अग्रणी, व वज्रपाणी इंद्राप्रमाणें राक्षसांचा कट्टा शत्रु, भुंवया खालीं करून वक्रदृष्टीनें पाहणारा, सिंहासारखें भरगच्च दिसणारें ज्याचें गर्दन, आणि सदासर्वदा क्रोधानें जो क्षुब्ध झालेला, बळामध्यें तर ज्याची बरोबरी करणारा पुरुष कोणी मिळावयाचाच नाहीं, पृथ्वींतील साऱ्या गदाधरांमध्यें जो श्रेष्ठ, व शत्रूंचा चेंदामेंदा करून टाकणारा, असा हा राजपुत्र भीमसेन पणाला लावावयाचें केवळ जिवावर येतें; तरी सुद्धां त्याला आतां मी पणाला लावून तुझ्याबरोबर द्यूत खेळण्यास तयार आहें.

वैशंपायन सांगतातः—राजा, कपटाचाच बाणा बाळगिल्यामुळें अपजयाच्या भीतीचा संपर्क सुद्धां ज्याच्या मनांत नव्हता, त्या शकुनीच्या मुखांतून 'हं, जिंकिला !' एवढींच अक्षरें तात्काल बाहेर पडलीं; व तो पुनः धर्मराजाला म्हणाला, 'हे कुंतीपुत्रा ! असंख्य द्रव्य, हत्ती, घोडे–इतकेंच नव्हे, तर हे तुझे सारे भाऊ सुद्धां तूं हरलास. तेव्हां

आणखी कांहीं जिंकल्याशिवाय तुझें म्हणून द्रव्य असल्यास सांग." युधिष्ठिर म्हणाला:–आतां मी, माझ्या सर्व बंधूंना प्रिय असून सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहें. ह्याकरितां, सर्वस्व जाऊन एकटा पराजित झालेला उरलों आहें. तो मी आपण आपल्यालाच पणाला लावून तुझ्याशीं द्यूत खेळण्याला तयार आहें.

वैशंपायन सांगतात:—राजा, कौटिल्याचाच स्वीकार केल्यामुळें जयाविषयीं पंचाईत नसलेल्या शकुनीनें हें युधिष्ठिराचें भाषण श्रवण करून चालू परिपाठाप्रमाणें 'हं ! जिंकलें !' एवढींच अक्षरें तोंडातून बाहेर काढिलीं; आणि म्हटलें, "हे राजा ! छे ! छे ! इतक्यांतच तूं आपल्याला जिंकवून घेतलेंस हें कांहीं ठीक झालें नाहीं. हें निवळ पातक ! कारण, शिलकींत मालमत्ता राहिली असतां आधींच आपल्याला जिंकून घेणें हें पापच आहे !

शकुनिकृत द्रौपदीजय.

वैशंपायन सांगतात:—राजा, ह्याप्रमाणें धर्मराजाशीं बोलून तो शकुनि तेथें बसलेल्या पृथ्वींतील सर्व वीरांकडे तोंड फिरवून त्यांस पृथक् पृथक् म्हणाला, "अहो ! ह्या पांडवांचा पराभव करून मीं ह्या साऱ्यांना जिंकिलें आहे. समजलां ?" नंतर पुनः धर्माकडे वळून म्हणतो, "हे राजा ! तुझ्या प्राणापेक्षांही प्रिय असें एक तुझें द्रव्य अद्यापि पणाला लावायाचें शिलक राहिलेंच आहे ? तें द्रव्य कोणतें म्हणशील तर, पांचालराजाची कन्या द्रौपदी ! तिला तूं आतां पणाला लावून तूर्त तरी तिच्या योगानें स्वतांची दास्यत्वापासून सुटका करून घे."

युधिष्ठिर म्हणाला:—ठीक आहे जी फार ठेंगणी नव्हे, फार उंच नव्हे, फार कृशही नव्हे, फार स्थूलही नव्हे, काळेभोर कुरळ केंश असलेली, शरदृतूंतील कमळांप्रमाणें जिचे नेत्र, शरदृतूंतील कमळांप्रमाणेंच जिच्या अंगाला सुगंध, शरदृतूंतील कमळांचाच उपभोग घेणारी, स्वरूपानें केवळ प्रतिलक्ष्मीच अशाच प्रकारचें जिचें सौंदर्य व शील, अंतःकरणाची कोमल, सर्व गुणांनीं संपन्न, पतीच्या मनाप्रमाणें वागणारी अशी असून बोलण्यांत केवळ मधुर, सर्वांच्या मागून निजावयास जाणें आणि सर्वांच्या आधीं निजून उठणें हाच जिचा परिपाठ, अगदीं धनगर आणि गुरेंराखे यांपर्यंत कोणीं केलें काय, व कोणाचें करावयाचें राहिलें काय हें ध्यानांत असण्याइतकी जिची विचारपूस, जिच्या मुखकमलावर घर्मबिंदु चमकूं लागले म्हणजे मल्लिकेच्या पुष्पांप्रमाणें सुगंधि असलेलें तें मुख जलबिंदु पडलेल्या कमलाप्रमाणें भासतें, वेदीच्या मध्यभागाप्रमाणें जिचा कटिप्रदेश, लांब सडक केश, मुख केवळ रातोत्पलासारखें, आणि जिच्या अंगावर केश फारच विरळ असल्यामुळें तुळतुळीत दिसणारी, सिंहकटी, व मनोरम अवयवांनीं युक्त, अशी पांचालराजाची कन्या द्रौपदी हेंच माझें उरलेलें धन होय. तर, हे सुबलपुत्रा गांधारदेशाधिपते ! तेंच आतां मी पणाला लावून तुझ्याशीं द्यूत खेळण्यास तयार आहें.

वैशंपायन सांगतात:—राजा, धर्मराज खरोखर विचारी असूनही त्यानें जेव्हां अशा प्रकारचें भाषण केलें, तेव्हां सभेंत बसलेल्या थोरथोर लोकांच्या तोंडांतून "धिःकार असो !" असे एकदाच शब्द निघाले; आणि, हे जनमेजय राजा ! त्या सभेंत अगदीं खळबळ उडून राहिली; तेथें बसलेले राजे अत्यंत खेद करूं लागले; भीष्म, द्रोण, कृपाचार्य इत्यादिकांच्या अंगाला तर घामच सुटला ! व विदुर तर गुडघ्यांमध्यें मान घालून मृतप्राय बसला होता. ह्याप्रमाणें थोडा वेळ खालीं मान केल्यानंतर त्यानें सर्पासारखा एक मोठा दुःखाचा सुस्कारा टाकिला. आपला पुत्र पांडवांना जिंकतो आहे, हें ऐकून धृतराष्ट्राला मनांतून आनंदच होत होता.

पण तो इतका वेळपर्यंत बाहेर दाखवीत नसे; आंतल्या आंतच दाबून ठेवी. परंतु त्या वेळीं जी त्याला आनंदाची उकळी आली, ती कांहीं केल्या बाहेर पडल्यावांचून राहीचना. त्यामुळें त्याचें देहभानच सुटलें, आणि तोही ज्याला त्याला "आणखी काय जिंकिलें ?" असें विचारूं लागला. आपल्या मनांतला भाव त्यालाही झांकू न ठेवितां आला नाहीं. धृतराष्ट्राप्रमाणेंच दुर्योधन, कर्ण, दुःशासन इत्यादि मंडळींनाही आनंदाचें भरतें आलें. तें इतकें कीं, जणू काय त्यांना आतां हर्षवायुच होतो! परंतु इतर जे जे कोणी सभेमध्यें बसलेले होते, त्यांच्या डोळ्यांतून टप टप टिपें गळूं लागलीं ! असो. जयानें फुरफुरलेल्या व द्यूतमदानें तर्र झालेल्या त्या सुबलपुत्र शकुनीनें पूर्वी सांगितल्याप्रमाणें धर्मराजाशीं भाषण करून पुनः लगेच 'हं ! जिंकली !' असें म्हणून फांसे हातांत घेतले !

अध्याय सहासष्टावा.

—:०:—

विदुरकृत दुर्योधनानिर्भर्त्सना.

वैशंपायन सांगतातः—राजा, हें पाहतांच दुर्योधन म्हणाला, "अरे ए दासीपुत्रा विदुरा ! पाहतोस काय ? चल उठ. तुझ्या त्या लाडक्या नांवाजलेल्या पांडवांच्या प्रिय पत्नीला इकडे घेऊन ये; आणि लाव तिला आमचें घर झाडावयाला पाहूं ! राहूं दे त्या दुराचरणीला या आमच्या बटकींमध्यें !

विदुर म्हणालाः—तुझ्यासारख्याला हे दुःशब्द तोंडांतून काढावयाला कांहीं वेळ लागला नाहीं; पण, हे मूर्खा ! मृत्यूचे पाश येऊन तुझ्या गळ्यांत पडले, हें तूं विसरलास ! तूं यःकश्चित् कोल्हा असून त्या व्याघ्रांना डिवचतो आहेस, पण या गोष्टीनें तूं कड्यावर लोंबकळत राहून आपटण्याच्या बेतांत आला आहेस, ह्याचें मात्र तुला भान नाहीं. महान विषारी व क्रोधानें अगदीं बेहोष झालेले हे सर्प तुझ्या अगदीं मस्तकावर बसलेले आहेत; आणि, हे मूर्खशिरोमणे ! त्यांना तूं पुनःपुनः डिवचून यमसदनाची वाट धरूं नको. अरे, द्रौपदी तर तुझ्या दासत्वाला मुळींच पात्र होत नाहीं. कारण, धर्मराजानें तिला जी पणाला लावली आहे, ती तो परवशस्थितींत असतांना लावली; म्हणजे आपण स्वतः हरल्यानंतर लाविलेली आहे! तेव्हां ती पणास लावितेवेळीं तिच्यावर त्याची मुळींच सत्ता नव्हती, असें माझें मत आहे. आपलें सारें वेटच्या वेट नाश करून टाकणारें बीज वेळू जसें धारण करितो, त्याप्रमाणेंच ह्या धृतराष्ट्रपुत्र दुर्योधन राजानें महाभयंकर वैर उत्पन्न करणाऱ्या द्यूताचा अंगीकार केला आहे. पण ह्याच्या योगानें आपला मृत्यु अगदीं जवळ येत चालला आहे हें त्याला धुंदी चढल्यामुळें दिसत नाहीं !

बा दुर्योधना, मर्मभेदक व कठोर असें भाषण करूं नये; नीच मार्गानें शत्रूला जिंकूं नये; आणि जिच्या योगानें दुसऱ्यास उद्वेग प्राप्त होईल, अशी संतापजनक व नरकाची वाट दाखवून देणारी वाणी कधींही उच्चारूं नये. मर्मभेदक शब्द उच्चारून दुसऱ्याला ताडन केलें असतां त्याच्या मनांत द्वेष उत्पन्न होतो; इतकेंच नव्हे, तर तो रात्रंदिवस झुरणीस लागतो. कारण, असल्या शब्दांनीं दुसऱ्याच्या काळजाला घरें पडणार नाहींत, असें तर कधींच घडणार नाहीं. ह्याकरितां, शहाण्यानें अशा दुःशब्दांचा कधींच कोणावर भडिमार करूं नये.

दुर्योधना, एकदा कोणीएक बोकड, एक शस्त्र पडलें होतें तें घेऊन गिळूं लागला, पण तें त्याला गिळतां येईना. म्हणून त्यानें खालीं पडून आपलें मस्तक जमिनीवर टेंकलें, आणि पुढच्या पायांनीं तें शस्त्र उचलून तो पुनः तें

गिळण्याच्या खटपटीस लागला. तेव्हां त्या तीक्ष्ण धारेच्या शस्त्रानें तोंडांतून सरळ जात जात त्याचा गळा सुद्धां चिरून पार केला! अशा प्रकारें त्यानें आपला आपणच घात करून घेतला! ह्याकरितां, पांडव आहेत ते ह्या शस्त्रासारखे पाणीदार आहेत. तेव्हां त्यांच्याशीं वैर करण्याच्या भरीस पडून तूं आपला घात करून घेऊं नको. बाबारे, ह्या जगामध्यें कांहीं लोक कुत्र्यासारखे असतात. एखादा कुटुंबवत्सल गृहस्थ असो, किंवा अरण्यांत राहणारा एखादा योगी असो, तपाचरण करणारा तपस्वी असो, कीं मोठा शास्त्रपारंगत विद्वान असो, कोणीही कां असेना, सतत त्याच्या अंगावर एकसारखें भोंकत सुटावयाचें हें त्यांचें व्रत असतें. तद्वत्, तुम्ही पाहिजे तितकी वटवट करीत आहां; परंतु पांडव हे किती धीराचे व सहनशील आहेत पहा! इतका प्रसंग गुदरला तरी त्यांच्या तोंडांतून म्हणून अद्यापि एक चकार शब्द निघत नाहीं. द्यूतामध्यें फत्ते झाली खरी! पण तिच्याबरोबर नरकाचे महाभयंकर चोरदरवाजे खुले झाले, हें दुर्योधनाच्या, दुःशासनाच्या आणि त्यांच्या इतर अनुयायांच्याही ध्यानांत येत नाहीं. प्रसंगवशात भोपळे सुद्धां पाण्यांत बुडतील, दगड सुद्धां पाण्यावर तरंगत राहतील, किंवा नौका सुद्धां पाण्यावर अखंड खिळून बसतील, पण हा मूर्ख धृतराष्ट्राचा पुत्र राजा दुर्योधन, त्याच्याच हिताचें मीं सांगितलेलें भाषण कधीं ऐकावयाचा नाहीं. येथें आज ज्या अर्थीं लोभाचेंच प्राबल्य माजलेलें आहे, आणि शुक्राचार्यांसारख्यांचीं वचनें, व इष्टआप्तांनी त्यांच्याच हिताच्या सांगितलेल्या गोष्टी कोणी ऐकत नाहींत, त्या अर्थीं अत्यंत भयंकर सर्वस्वापहाराची व कुरुवंशजांचा संमूळ नाश होण्याची शेवटचीच वेळ येऊन ठेपली, ह्यांत शंका नाहीं!

अध्याय सदुसष्टावा.

—:०:—

द्रौपदीला सभेंत आणण्याविषयीं प्रातिकामीला आज्ञा.

वैशंपायन सांगतातः—राजा, तें विदुराचें भाषण ऐकून, त्या गर्वानें मदोन्मत्त झालेल्या धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनानें त्याचा अगदीं धिःकार केला; व नंतर त्या सभेमध्यें उभा राहिलेल्या प्रातिकामी नामक सारथ्याकडे वळून सर्वांदेखत मोठ्यानें म्हणाला, "अरे ए प्रातिकामी! अरे ह्या दासीपुत्र विदुराला पांडवांची मोठी दहशत वाटत असून त्यांच्या भयानें ह्याच्या अंगांत पहा कसें कांपरें भरलें आहे तें! व त्यामुळें हा अशी बडबड करीत आहे. अरे! केव्हांही पाहिलें तरी आमच्या उत्कर्षाची वेळ आली कीं ह्याच्या कपाळाला तिडीक चढलीच! ह्याच्यानें काय होणार आहे? रडतराऊत घोड्यावर बसवून कोठें शिकार साधत असते कीं काय? ह्याकरितां तूंच जा, आणि त्या द्रौपदीला इकडे घेऊन ये. पांडवांना भिण्याचें तुला मुळींच कारण नाहीं. कारण, तुझ्याकडे वाकड्या डोळ्यांनीं नुसतें पाहण्याची सुद्धां त्यांची प्राज्ञा नाहीं, समजलास? चल, जा लवकर."

राजा जनमेजया, अशी दुर्योधनाचीं आज्ञा ऐकतांच तो प्रातिकामी सारथि लागलाच तेथून निघाला, व सिंहाच्या जाळींत कुत्रें शिरल्याप्रमाणें तो पांडवपत्नी द्रौपदी बसली होती तेथें जाऊन तिच्याशीं बोलूं लागला.

प्रातिकामी म्हणालाः—राणीसाहेब! युधिष्ठिर महाराज द्यूताच्या नादानें केवळ बेहोष होऊन गेले आहेत, व दुर्योधन महाराजांनीं आपणांस जिंकिलें आहे. तर आपण आतां धृतराष्ट्र महाराजांच्या घरीं चला. मी आपणांला दास्यत्व करण्याकरितां तिकडे न्यावयास आलों आहें.

द्रौपदी म्हणतेः—अरे प्रातिकामी ! तूं हें असें भलभलतें काय बोलतोस ? अरे, स्त्री पणाला लावून कधीं कोणी राजपुत्र द्यूत खेळतात का ? जा, युधिष्ठिर महाराजांना द्यूताचा अंमल चढून त्यांनां शुद्ध राहिली नाहीं, आणि त्यांनीं स्त्री म्हणे पणाला लाविली ! स्त्रीवांचून पणाला लावाव-याला त्यांच्यापाशीं दुसरी कांहींच चीजवस्त नव्हती कीं काय ?

प्रातिकामी म्हणालाः—राणीसाहेब, पणाला ला-वावयाला त्यांच्यापाशीं दुसरें कांहींच शिल्लक रा-हिलें नव्हतें, तेव्हांच अजातशत्रु धर्मराज महा-राजांनीं आपणांस पणाला लावून ते द्यूत खेळले. महाराजांनीं प्रथमतः आपले सारे भाऊ पणाला ला-विले, नंतर आपणा स्वतांला त्यांनीं पणाला लावून घेतलें, आणि आपण स्वतः जेव्हां हरले, तेव्हां, बाईसाहेब ! त्यांनीं आपणांस पणाला लाविलें.

द्रौपदी म्हणतेः—तर, हे सूतपुत्रा, तूं आतां परत जा, आणि त्या द्यूत खेळणाऱ्या आमच्या महाराजांना माझ्या वतीनें असें विचार कीं, 'तुम्हीं प्रथमतः आपणांस हरवून घेतलें, का प्रथम मला हरविलें ?' आणि त्याचें उत्तर ते काय दे-तात तें मला येऊन सांग. युधिष्ठिर महाराजांचीच तशी इच्छा असल्याचें समजलें, म्हणजे मजवर कितीही दुःखाचे पर्वत कोसळले तरी मला तेथें येणें भाग आहे !

वैशंपायन सांगतातः—राजा, द्रौपदीनें असें सांगितलें असतां प्रातिकामी सभेमध्यें परत आला; आणि सर्व राजांमध्यें बसलेल्या त्या युधिष्ठिराला त्यानें द्रौपदीचा निरोप सांगितला. तो म्हणाला, "द्रौपदीबाईसाहेबांनीं आपणांस असें विचारिलें आहे कीं, प्रथम आपण आपणां स्वतांला जिंकवून घेतलें कीं प्रथम मला हरविलें ?" तर ह्याचें काय तें उत्तर द्या, म्हणजे मी त्यांना तें जाऊन सांगेन.

राजा जनमेजया, हा द्रौपदीचा प्रश्न ऐकून युधिष्ठिराचे हातपाय तर अगदींच गळाले. तो चित्रासारखा केवळ तटस्थ बसला; व त्यानें त्या सूताला बरें किंवा वाईट असें कांहींच उत्तर दिलें नाहीं. तेव्हां दुर्योधन म्हणाला, "अरे प्रातिकामी, त्या पांचालीला जाऊन सांग कीं, तूं स्वतांच येथें येऊन हा प्रश्न विचार, म्हणजे युधिष्ठिर तुला तुझ्या प्रश्नाचें येथेंच उत्तर देईल, व तें सर्वांनाच ऐकावयास मिळेल."

राजा, तो सारथि प्रातिकामी दुर्योधनाचा अंकित असल्यामुळें निरुपायानें राजवाड्यांत गेला, आणि मोठ्या खेदानें द्रौपदीस म्हणाला, "बाईसाहेब ! दुर्योधन महाराज तिकडे आप-णांस सभेंतच बोलावति आहेत ! तेव्हां मला तर आतां कौरवांची धडगत दिसत नाहीं. कारण, आपल्यासारख्या राजकन्येला ज्या अर्थीं दुर्योधन सभेमध्यें नेण्याची इच्छा करीत आहे, त्या अर्थीं तो आतां राजलक्ष्मीला पायानें लोटून अक्का-बाई घरांत घेणार ह्यांत शंका नाहीं."

द्रौपदी म्हणालीः—मला जर सभेमध्यें बो-लावीत आहेत, तर मग तें विधात्यानेंच माझ्या नशिबीं लिहून ठेविलेलें आहे, असें म्हटलें पाहिजे. इष्ट आणि अनिष्ट ही जोडी आबाल-वृद्धांच्या मागें लागलेलीच आहे. परंतु जगामध्यें धर्म हा श्रेष्ठ आहे असें म्हणतात; व त्याचें संर-क्षण केलें असतां तो सर्वांचें कल्याण करतो. तेव्हां कौरवांकडून त्या सर्वश्रेष्ठ धर्माचें उल्लंघन होऊं नये; ह्याकरितां, तूं पुनः त्या सभेमध्यें जा, आणि हा माझा धर्मास अनुसरून असलेला प्रश्न तेथें भीष्मांसारखे मोठमोठे धर्मात्मे व नीतिमान सभासद आहेत त्यांना विचार, म्हणजे ते त्याचा निश्चय सांगतील; आणि ते सांगतील त्या-प्रमाणें मी करीन.

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, हें त्या द्रौपदीचें भाषण श्रवण करून तो सारथि तत्काळ त्या सभेमध्यें गेला, आणि तिचें म्हणणें

त्यानें तेथील सर्व सभासदांस कळविलें. परंतु द्रौपदीस सभेंत आणिल्यावांचून रहावयाचेंच नाहीं, असा दुर्योधनाचा कृतनिश्चय पाहून, खालीं माना घालून बसलेल्या सभासदांनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. हा प्रकार पाहून व द्रौपदीला सभेंत आणिल्यावांचून रहावयाचेंच नाहीं अशी दुर्योधनाची इच्छा जाणून, युधिष्ठिरानें द्रौपदीच्या एका मर्जींतल्या दूताबरोबरच तिला निरोप पाठविला कीं, "हे द्रौपदि, तूं रजस्वला असल्यामुळें एकच वस्त्र परिधान केलेलें असून तेंही अगदीं विगलित झालें असेल; तेव्हां तशीच तूं रडत रडत येऊन ह्या सभेमध्यें तुझे मामाजी धृतराष्ट्र ह्यांच्यापुढें उभी रहा, म्हणजे तुझ्यासारख्या राजकन्येची ती दशा पाहून सभेंतील सर्व लोक धृतराष्ट्रपुत्र सुयोधनाची निदान मनामध्यें तरी छी थू करितील!" हे जनमेजय राजा! अशी युधिष्ठिराची आज्ञा होतांच तो दूत लवकर लवकर द्रौपदी बसली होती त्या मंदिरांत गेला. आणि त्या हुशार सेवकानें धर्मराजाचें काय म्हणणें होतें तें तिला नीट कळविलें.

असो; इकडे, पांडवांचीं तोंडें अगदीं उतरलीं होतीं; आणि दुःखामुळें ते अगदीं व्याकूळ होऊन गेले होते. ते सत्यानें अगदीं जखडून गेल्यामुळें त्यांच्यानें वर तोंड करून सुद्धां पाहवेना. तेव्हां राजा दुर्योधनास त्यांच्या तोंडाकडे पाहून आनंदाचें अगदीं भरतें आलें; व तो सारथ्याला पुनः म्हणाला, "अरे ए प्रातिकाम्या! जा, जा, तिला समक्षच येथें येऊन काय बोलावयाचें असेल तें बोलूं दे!" राजा, हा सारथि दुर्योधनाचा दास होता; तेव्हां त्यानें खरें म्हटलें म्हणजे दुर्योधनाच्या तोंडून आज्ञा बाहेर पडतांच तेथून निघायाला पाहिजे होतें. परंतु द्रौपदीही कांहीं सामान्य नव्हती. तेव्हां ती जर रागावली तर आपलें काय होईल व काय नाहीं ह्याचा नेम नाहीं, ही भीति त्या सारथ्याचा पोटांत उत्पन्न होऊन तो अगदीं गांगरून गेला; आणि दुर्योधनाची आज्ञा तशीच ठेवून तो पुनः विचारूं लागला कीं, "काय म्हटलें महाराज? द्रौपदीबाईसाहेबांना काय सांगूं?" ही त्याची कावरीबावरी झालेली स्थिति पाहून दुर्योधन दुःशासनाकडे वळून म्हणाला, "हे दुःशासना! हें मूर्ख सारथ्याचें पोर त्या वृकोदराला भितें! याच्या हातून काय काम होणार? ह्याकरितां, तूंच स्वतः जा कसा, आणि द्रौपदीला धरून घेऊन ये पाहूं? अरे, हे आतां आपल्या तावडींत सांपडलेले शत्रु काय करणार? चल जा, ऊठ!

द्रौपदीकेशाकर्षण.

राजा, ही बंधूची आज्ञा श्रवण करितांच तो राजपुत्र दुःशासन लाल डोळे करूनच उठला, आणि त्या महारथी पांडवांच्या वसतीगृहांत जाऊन राजकुमारी द्रौपदीला म्हणाला, "हे द्रौपदि, चल–चल–तुला आम्हीं जिंकिलें आहे! हे कृष्णे! तूं आतां अगदीं लाजलज्जा सोडून देऊन दुर्योधनाकडे खुशाल पहा. हे कमलनयने! तूं आतां आम्हां कौरवांनाच धरून रहा. कारण, तूं आज आम्हांला धर्मानेंच प्राप्त झाली आहेस. ह्याकरितां, तूं आतां सभेचा मार्ग धर."

राजा, दुःशासनाच्या तोंडचे शब्द ऐकतांच द्रौपदीच्या उरांत एकदम धडकी भरली, आणि तसेंच उठून तिनें अश्रूंनीं भिजलेलें आपलें तोंड हातानें एकदा पुसलें; आणि दुःखाकुल होऊन, कुरुकुलाधिपति वृद्ध धृतराष्ट्राच्या स्त्रिया बसल्या होत्या, तिकडे तिनें धाव घेतली. द्रौपदी पळाली हें पाहतांच क्रोधानें तो दुरात्मा दुःशासन मोठ्या वेगानें तिच्या पाठोपाठ धावला, व तिला गांठून तिचे लांबसडक व काळेकुळकुळीत असलेले कुरळ केश धरून त्यानें तिला जोरानें एकदम हिसडा दिला! हरहर! राजसूयासारख्या महान यज्ञामध्यें अवभृथस्नानाच्या वेळीं मंत्रांनीं

पुनीत झालेल्या उदकाचें ज्यावर सिंचन झालेलें, त्या केसांना, पांडवांचा सारा पराक्रम कपटानें खुंटवून टाकून त्या धृतराष्ट्रपुत्र दुःशासनानें बलात्कारानें स्पर्श केला!

राजा, नंतर, त्या पायांपर्यंत लांबसडक केश असलेल्या द्रौपदीला त्या दुःशासनानें ओढीत ओढीत त्या सभेमध्यें आणिलें; आणि वायु जसा केळीला हाकवून सोडितो, तसा तो दुःशासन तिला हिसडे देऊन गदगद हालवूं लागला. आपण सभेच्या अगदीं समोर आलों, तरी अद्यापि आपल्याला हा दुष्ट ओढीत आहे, हें पाहून ती दीन झालेली द्रौपदी त्याला म्हणाली, "अरे मूर्खा! मी रजस्वला असल्यामुळें एकवस्त्रा आहें, ह्याकरितां मला सभेंत नेणें तुला योग्य नाहीं."

राजा, इतकें बोलून, "हे कृष्णा! हे विष्णो! हे हरे, हे नरवरा, मला ह्या संकटांतून सोडव.' असें म्हणून ती आक्रोश करूं लागली. तेव्हां बलात्कारानें पुनः तिचे केश धरून दुःशासन तिला म्हणाला, "हे द्रौपदि! तूं रजस्वला अस, कीं वस्त्ररहित अस, किंवा एकवस्त्रा अस, तुला द्यूतामध्यें जिंकून आम्हीं दासी केलेली आहे; आणि दासीच्या अंगावर वस्त्र एक ठेवावें का दोन ठेवावीं, का मुळींच ठेवूं नये, ही धन्याच्या खुषीची गोष्ट आहे."

वैशंपायन सांगतातः—दुःशासनाच्या ओढण्यामुळें केश अस्ताव्यस्त असलेली व पदर खालीं आलेली, लज्जायुक्त होऊन थरथरथर कांपत असलेली, व क्रोधानें जिच्या सर्वांगाचा भडका झालेला आहे, अशा त्या राजकन्या द्रौपदीनें त्या दुःशासनापाशीं असें भाषण केलें.

द्रौपदी म्हणालीः—अरे, ह्या सभेमध्यें शास्त्र पढलेले, कर्मठ, कर्तृत्ववान, केवळ इंद्राच्या बरोबरीचे, गुरुसमान व वडील असे लोक बसले आहेत. तेव्हां त्यांच्या समोर असें उभें राहणें मला प्रशस्त दिसत नाहीं. अरे दुष्टा दुःशासना! माझें वस्त्र फेडूं नको, व मला अशी फरफर फरफर ओढूं नको. इंद्रासहवर्तमान देव जरी तुझ्या साह्याला आले, तरी हे राजपुत्र पांडव हें तुझें कृत्य सहन करणार नाहींत. हा धर्मपुत्र युधिष्ठिर सदासर्वदा धर्मानेंच वागणारा आहे; आणि धर्म तर इतका सूक्ष्म आहे कीं, त्याचें स्वरूप त्यांत निपुण असलेल्या पुरुषालाच कळतें. ह्याकरितां, माझा भर्ता युधिष्ठिर ह्याचे गुण बाजूस सारून, त्याला अणुरेणु एवढा दोष शब्दानें सुद्धां लावायाचें माझ्या मनांत येत नाहीं. अरे! ह्या कौरववीरांमध्यें, मी केवळ बायको माणूस, त्यांतून रजस्वला असतां, तूं मला फरफर ओढीत घेऊन चालला आहेस, हें केवढें बरें तुझें निंद्य कृत्य आहे! आणि त्याबद्दल तुला कोणी चकार शब्द सुद्धां बोलत नाहीं, त्या अर्थीं हे सारे तुझ्याच कूटांत सामील झाले आहेत, असें मला वाटतें. अहो! भरसभेंत कुरुवंशजांकडूनच ही अशी धर्माची पायमल्ली होत असलेली प्रत्यक्ष पाहूनही त्यांस ज्या अर्थीं कोणी दोष देत नाहीं, त्या अर्थीं क्षत्रियधर्मवेत्त्या भरतवंशजांच्या नष्ट झालेल्या त्या धर्माला आणि त्यांच्या ह्या करणीला धिक्कार असो! अरे, हा राजा धृतराष्ट्र असा धडधडीत व महाभयंकर अधर्म करीत असलेला कुरुकुलांतील प्रमुख असलेल्या वृद्धांच्या सुद्धां लक्षांत येत नाहीं काय? त्या अर्थीं ह्या भीष्मांत व ह्या द्रोणांत सुद्धां आतां सत्त्व राहिलेलें दिसत नाहीं हें खास! आणि हा महात्मा विदुरही त्यांच्याच माळिकेंत सांपडला आहे असें वाटतें!

वैशंपायन सांगतातः—राजा, अशा प्रकारें करुणस्वरानें बोलतां बोलतां त्या सौंदर्यसंपन्न द्रौपदीनें आपल्या क्रुद्ध झालेल्या पतींकडे नेत्रकटाक्षानें अवलोकन केलें; आणि आधींच क्रोधानें पेटलेल्या त्या पांडवांच्या अंतःकरणाचा अगदीं भडका उडवून दिला! सारें राज्य गमाविलें, सारी संपत्ति गेली, मोठमोठीं रत्नें नाहींतशीं झालीं, पण

त्यामुळेंही पांडवांना दुःख झालें नाहीं; परंतु त्या द्रौपदीचे ते लज्जायुक्त व कोपयुक्त नेत्रकटाक्ष पहातांच त्यांना जें दुःख झालें, त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. राजा, अधोवदन करून बसलेल्या त्या पांडवांकडे द्रौपदी अवलोकन करीत आहे, असें पाहतांच दुःशासनानें तिच्या केशांना पुनः एक झटका दिला. तेव्हां तर ती लटलट कांपूं लागली, व त्या दुःसह विटंबनेनें तिचें देहभानच नाहींसें झालें. आणि तशांत तो दुष्ट दुःशासन तर 'अग ए बटकी ! अग ए बटकी !' म्हणून तिला हसत हसत मोठमोठ्यानें हाका मारूं लागला. दुःशासनाचे ते शब्द ऐकून कर्णाला बरें वाटून त्याला हसूं आलें; आणि 'दुःशासना ! शाबास ! वाहवा !' असें म्हणून तो मोठ्या आनंदानें डुलूं लागला. जणू काय आनंदानें त्याला गुदगुल्याच होत आहेत ! गांधार देशचा राजा सुबलपुत्र शकुनिही दुःशासनाची मोठी तारीफ करूं लागला. परंतु धृतराष्ट्रपुत्र दुर्योधन, कर्ण व शकुनि ह्यांवांचून इतर जे सभासद तेथें बसले होते, त्यांना द्रौपदीला ओढीत सभेमध्यें आणिलेलें पाहून अत्यंत वाईट वाटलें. नंतर भीष्मांनीं बोलण्यास सुरुवात केली.

भीष्म म्हणाले:—हे कल्याणि, ज्याच्यावर आपली सत्ता नाहीं, असें द्रव्य पणाला लावितां येत नाहीं; आणि पति कोणत्याही स्थितींत असला तरी त्याची स्त्रीवरची सत्ता नाहींशी होत नाहीं. ह्या दोन गोष्टींचा विचार करून धर्मनिर्णय करणें हें काम फार नाजूक आहे. ह्याकरितां, तुझ्या प्रश्नाचें निश्चित असें आम्हांस उत्तर देतां येत नाहीं. दुसरें—या धनधान्यांनीं भरलेल्या साऱ्या पृथ्वीचा सुद्धां हा युधिष्ठिर त्याग करील, पण धर्मत्याग करणार नाहीं; आणि तो धर्म तर प्रत्यक्ष आपल्याच तोंडानें कबूल करीत आहे कीं, "मला ह्यांनीं हरविलें तें अगदीं बरोबर आहे." तेव्हां ह्यावर आम्हांला कांहींच बोलतां येत नाहीं. ह्याहून साऱ्या मनुष्यांमध्यें द्यूत खेळण्यांत शकुनीच्या तोडीला लागणारा एकही मनुष्य नाहीं; आणि त्याची हौस कुंतीपुत्र युधिष्ठिरानें परिपूर्ण केली आहे. पण त्यांत या शकुनीचें कपट आहे, असें युधिष्ठिराला मुळींच वाटत नाहीं; म्हणून आम्हांलाही कांहींच बोलतां येत नाहीं.

द्रौपदी म्हणते:—सभेंत आव्हान करणारें मंडळ द्यूताचें भक्त, त्या कामांत पटाईत, कपटी, नीच व दुष्ट; आणि धर्मराजा तर द्यूतांत कांहीं इतका प्रवीण नाहीं. असें असतां तो अशा लोकांची हौस पूर्ण करण्याच्या भरीला कां पडला ? दुसरी गोष्ट—कौरवपांडवांमध्यें श्रेष्ठ, व कपट म्हणून कसलें असतें तें ज्याला माहीत सुद्धां नाहीं, अशा त्या धर्मराजाला केवळ दुष्ट बुद्धीनें कपटास प्रवृत्त झालेल्या सर्वांनीं मिळून आधीं जिंकिलें आहे, आणि नंतर त्यानें मला पणाला लाविलें आहे, ह्या गोष्टीचाही विचार करून सर्वांनींच माझ्या प्रश्नाचें यथायोग्य असलेलें उत्तर द्यावें. येथें असलेले हे सर्व कुरुवंशज मला वडील असून त्यांनाही मुलगे व सुना आहेत !

वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें करुणस्वरानें बोलून रडत रडत ती आपल्या अनाथ पतींकडे पाहूं लागली असतां, दुःशासन तिला कर्ककटु आणि अभद्र शब्द बोलूं लागला. तेव्हां ती द्रौपदी रजस्वला असतां व तिचा पदर गळून खालीं पडला असतां, तिला ओढण्याचें तें दुःशासनाचें अनुचित कर्म पाहून भीमाच्या काळजाला घरेंच पडलें; आणि तो क्रोधानें अगदीं लाल होऊन धर्मराजाकडे पाहून बोलूं लागला.

अध्याय अडुसष्टावा.

—:०:—

भीमाचा कोप.

भीमसेन म्हणाला:—हे धर्मराजा, जुवेबाज लोकांच्या घरीं हव्या तितक्या नाटकशाळा असतात; पण त्यांना सुद्धां ते कधीं पणाला लावीत नाहींत. कारण, त्यांच्या मनांत त्यांजविषयीं दया उत्पन्न होते, आणि तूं तर आपली आवडती भार्याही पणाला लावलीस, तेव्हां तुला काय म्हणावें? काशिराजानें आणिलेलें धन, दुसरीही बहुमोल संपत्ति, त्याचप्रमाणें इतर राजांनीं आणिलेलीं असंख्य रत्नें, रथ, अश्व, गज इत्यादि वाहनें, मोहरा, पुतळ्या, कवचें, शस्त्रें, राज्य, इतकेंच नव्हे तर तूं स्वत: व आम्ही इतकें तूं पणाला लाविलेंस, आणि शत्रूंनीं कपटानें त्याचा अपहार केला, तरी सुद्धां मला राग आला नाहीं. कारण, आमचा सर्वांचा प्रभु तूंच आहेस. पण तूं द्रौपदी पणाला लाविलीस, हें मात्र तूं आपल्या अधिकाराच्या बाहेरचें कृत्य केलेंस, असें मला वाटतें. पांडवांना महद्भाग्यानें प्राप्त झालेली ही राजकन्या द्रौपदी—हिला क्लेश म्हणून कसे असतात ते जन्मापासूनही माहीत नाहींत. असें असूनही हे क्षुद्र व महामूर्ख कौरवाधम तिला जे इतके क्लेश देत आहेत, त्याला कारण एक तूं! ह्याकरितां,हे राजा, तिच्या प्रीत्यर्थ मी हा आपला सारा राग तुझ्यावरच काढितों; आणि ज्या हातांनीं तूं हें अनर्थकर द्यूत खेळलास, ते तुझे हातच जाळून टाकितों! सहदेवा, जा ऊठ, अग्नि घेऊन ये पाहूं!

अर्जुन म्हणाला:—हे भीमसेना, असे शब्द तुझ्या वाणींतून ह्यापूर्वीं कधींच निघालेले नाहींत. ह्यावरून, शत्रूंनीं आपल्या कृतीनें खरोखर तुझ्या ठायीं असलेलें धर्मौदार्य अगदीं नाहींसेंच करून टाकिल्याचें दिसतें. पण तो शत्रूचा उद्देश तडीस जाऊं देतां उपयोगी नाहीं; ह्याकरितां तूं सद्धर्माचरणानेंच वाग. त्याला ढळूं नको. अरे, आधीं प्रत्यक्ष भाऊ, त्यांत ज्येष्ठ, आणि धर्मात्म्यांमध्यें श्रेष्ठ, अशाची अमर्यादा करणें हें उचित आहे काय? बा भीमा, धर्मराजा द्यूत खेळावयास आला तो कांहीं आपण होऊन आला नाहीं, तर त्याला शत्रूंनीं बोलाविलें म्हणून आला; आणि कोणीं बोलाविलें असतां त्यास मान देणें हें क्षत्रियांचें व्रत आहे हें मनांत आणूनच तो द्यूताला उद्युक्त झाला. तेव्हां हें आपल्या कीर्तीला अधिकच भूषणावह आहे!

भीमसेन म्हणाला:—अर्जुना, ही गोष्ट मला माहीत आहे व म्हणूनच मी केवळ शब्दांनीं बोलून राहिलों. नाहीं तर खरोखर प्रज्वलित झालेल्या अग्नींत त्याचे दोन्ही हात एकदम जाळून भस्म करून टाकिले असते!

वैशंपायन म्हणाले:—ह्याप्रमाणें त्या पांडवांना अत्यंत विव्हल झालेले अवलोकन करून आणि त्या द्रौपदीची ती विटंबना पाहून धृतराष्ट्राचा विकर्ण नामक पुत्र बोलूं लागला.

विकर्णाचें भाषण.

विकर्ण म्हणाला:—राजेलोकहो! ह्या याज्ञसेनीनें आपणां सर्वांस जो प्रश्न केला आहे, त्याचें उत्तर देणें भाग आहे. तिचा प्रश्न आपण अंगाबाहेर टाकाल तर आपणांस खरोखर नरकास जावें लागेल! भीष्म व धृतराष्ट्र हे दोघे तर कुरुवंशजांमध्यें अत्यंत वयोवृद्ध आहेत. असें असतां तेही कांहीं बोलत नाहींत; किंवा विदुर मोठा विचारी असूनही तो कांहीं बोलत नाहीं; त्याचप्रमाणें, भरद्वाजांचे पुत्र द्रोणाचार्य व कृपाचार्य हे उभयतां पाहिले तर सर्वांचेच आचार्य आहेत; असें असून तेही स्वस्थ बसले आहेत, तेव्हां आतां निरनिराळ्या देशांतील जे अनेक राजे येथें जमलेले आहेत, त्यांनीं तरी कामक्रोध एके बाजूस ठेवून यथामत्या द्रौपदीच्या प्रश्नाचें

उत्तर द्यावें. हे भूपालहो! ह्या साध्वी द्रौपदीनें जो पुनः प्रश्न केला आहे, त्याचा विचार करून, ज्याचें जें मत असेल तें त्यानें स्पष्ट सांगावें.


राजा जनमेजया, ह्याप्रमाणें तेथील सभासदांस उद्देशून त्या विकर्णानें परोपरीनें भाषण केलें. परंतु त्यांपैकीं कोणीही अनुकूल किंवा प्रतिकूल असें कांहींच उत्तर देईना. तेव्हां सर्वथैव निराशा झालेली पाहून तेथील त्या सर्व राजांस उद्देशून पुनः पहिल्याप्रमाणेंच तो बोलला. तरीही कोणी तोंडांतून एक चकार शब्दही काढिला नाहीं. तेव्हां त्यानें दुःखाचा एक मोठा सुस्कारा टाकिला; आणि संतापानें हात चोळून त्यानें आपल्या मनाला जें खरें खरें वाटलें तें त्या सभेमध्यें स्पष्टपणें सांगितलें.

विकर्ण म्हणालाः—हे भूपालहो! तुम्ही ह्या द्रौपदीच्या प्रश्नाचें उत्तर द्या किंवा देऊं नका. हे कौरवहो! मला जें या वेळीं न्याय्य वाटत आहे, तें मी स्पष्टपणें सांगून टाकितों, ऐका. मृगया, मद्यपान द्यूत आणि स्त्रीसंगाची अतिरेकता हीं चार राजव्यसनें होत, असें मोठमोठ्या लोकांनीं म्हटलेलें आहे; आणि ह्या चार व्यसनांत जो पुरुष आसक्त होतो, तो धर्म सोडूनच वागत असतो. त्या अयोग्य पुरुषानें केलेलें कोणतेंही कृत्य लोक पसंत करीत नाहींत. शिवाय, ह्या पांडुपुत्र धर्मराजाला द्यूतकारांनीं आव्हान केल्यामुळें तो व्यसनाधीन बनून त्यानें द्रौपदीला पणास लाविली आहे. आणखी, जिला नांव ठेवावयाला जागा म्हणून कसली ती नाहींच, अशी ही द्रौपदी पांच पांडवांची समाईक आहे. तेव्हां तिच्यावर त्यांच्यापैकीं कोणाही एकट्याचा हक्क नाहीं. शिवाय, ह्या धर्मराजानें तिला जी पणाला लावली, ती प्रथम आपल्याला हरवून घेतल्यानतर लाविलेली आहे, व तीही सुबलपुत्र शकुनि ह्यानें तिला पणाला लाव असें म्हटल्यावरून लाविली आहे. तात्पर्य, युधिष्ठिर राजा द्यूत खेळावयास उद्युक्त झाला, तो आपण होऊन झाला नसून कपटपटु द्यूतपारंगत शकुनीच्या आग्रहानें झाला आहे; तो व्यसनाधीन झाल्यामुळें त्याची बुद्धि नष्ट झाली आहे; तो प्रथमच जिंकला गेल्यामुळें त्याच्या स्वतांच्या देहावर सुद्धां त्याची सत्ता राहिली नाहीं, मग द्रौपदीवर राहिली नाहीं हें उघडच आहे. शिवाय, द्रौपदीवर पांचही पांडवांचा सारखा अधिकार असल्यामुळें, युधिष्ठिराला एकट्यालाच तिला पणाला लावावयाचा अधिकार नाहीं; आणि तिला जी पणाला लावली, ती त्यानें आपल्या इच्छेनें लाविली नसून शकुनीच्या इच्छेनें लावली आहे. तेव्हां हा पण न्याय्य आहे असें म्हणतां येत नाहीं. ह्या एकंदर गोष्टींचा विचार करून मी असें स्पष्ट म्हणतों कीं, ही द्रौपदी कांहीं जिंकलेली नाहीं.

राजा, हें विकर्णाचें भाषण कानांवर पडतांच, 'शाबास! शाबास' असें म्हणून सभेंतील सर्व लोकांनीं एकच गजर केला; व जे ते विकर्णाची प्रशंसा आणि सुबलपुत्र शकुनीची निंदा करूं लागले. परंतु ही गोष्ट कर्णाला सहन झाली नाहीं; आणि तो मोठ्या आवेशानें उठून उभा राहून बोलूं लागला.

कर्णाचें भाषण.

कर्ण म्हणालाः—हे विकर्णा! ह्या जगामध्यें विपरीत प्रकार अनेक दिसून येतात. अरे, अग्नि हा अरणीपासून उत्पन्न होऊन तिच्याच नाशाला कारण होतो, त्याप्रमाणें तूंही एक 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' झाला आहेस. अरे शहाण्या, प्रत्यक्ष ह्या द्रौपदीनें ह्या सभासदांस प्रश्न केला असतांही येथें असलेल्या भीष्मादिकांसारख्यांनीं सुद्धां त्याच्यावर कांहीं उत्तर दिलें नाहीं; ह्यावरूनच, तिला आम्हीं जिंकलें ते न्यायानेंच जिंकलें असें त्यांचेंही मत असल्याचें उघड होत आहे. असें असतां, हे धृतराष्ट्रपुत्रा! दुःखानें जणूं काय होरपळल्यासारखें दाखवून जो तूं



द्रौपदी-वस्त्रहरण.

पोक्तपणाचा भाव आणिला आहेस, तो तुझा निखालस मूर्खपणा होय. अरे, किती केलें तरी तूं लहान ! दुर्योधनाला तुझ्यापेक्षां थोडे दिवस तरी अधिक गेलेले आहेत. असें असतां आपण शहाणा व तो मूर्ख, असें तूं समजतोस हा चमत्कार नाहीं का ? खरोखर द्रौपदीला जिंकलें असूनही 'ती जिंकली नाहीं,' असें तूं तोंडभर सर्वांना सांगत सुटला आहेस, ह्यावरून, तुला धर्म म्हणजे काय तें काडीभर सुद्धां माहीत नाहीं असेंच म्हणावें लागतें. हे धृतराष्ट्रपुत्रा ! पांडवांतील श्रेष्ठ पांडव जो युधिष्ठिर, त्यानें आपलें सर्वस्वच जर पणाला लाविलें होतें, तर द्रौपदी तेवढी जिंकली नाहीं म्हणतोस तें कसें काय ? अरे दीर्घ शहाण्या, युधिष्ठिराच्या सर्वस्वांतच जर द्रौपदी आहे, आणि त्याचें सर्वस्व जर जिंकलें आहे, तर द्रौपदीही त्यांत जिंकली गेली हें उघड आहे. शिवाय, द्रौपदी जिंकली हें सभेमध्यें सर्वांनीं धडधडीत सांगितलें, व प्रत्यक्ष पांडवांनींही तें कबूल केलें. आतां, तिला एक वस्त्रानिशीं सभेमध्यें आणिलें हा मोठा अधर्म झाला, असें जर तुला वाटत असेल, तर त्यावर माझें काय म्हणणें आहे तें ऐक. हे कुरुनंदना ! जगांतील कोणत्याही कुलीन स्त्रियेला पहा, देवानें एकच भ्रतार नेमून दिलेला असतो; आणि ही तर एकाला नव्हे, कीं दोघांना नव्हे, अनेकांना वश होऊन राहिली आहे. तेव्हां ही पक्की वेश्या आहे, यांत शंका नाहीं! मग अशा स्त्रियेला सभेमध्यें एकच वस्त्रानें नव्हे, तर निर्वस्त्र अशी आणिली तरी सुद्धां त्यांत कांहीं विचित्र आहे, असें मला वाटत नाहीं ! विकर्णा, ह्या पांडवांची सर्व संपत्ति, ही द्रौपदी, आणि स्वतः हे सारे पांडव हें सर्व सुबलपुत्र शकुनीनें धर्मानेंच द्यूतामध्यें जिंकून मिळविलेलें धन आहे बरें ! समजलास ?

राजा, याप्रमाणें बोलून नंतर कर्ण दुःशासनाला म्हणाला, "दुःशासना ! हा शहाणपणाचा तोरा मिरविणारा विकर्ण पोरापेक्षां पोर आहे. ह्याच्या बोलण्याचा विचार करण्यांत अर्थ काय ? हूं ! चल घे ह्या पांडवांचीं वस्त्रें हिसकावून ! आणि फेड त्या द्रौपदीचें लुगडें !" जनमेजय राजा ! कर्णाच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच सारे पांडव उठले, आणि त्यांनीं आपआपलीं वस्त्रें टाकून देऊन ते पुनः आपआपल्या जाग्यावर बसले. इकडे दुःशासन द्रौपदीच्या नेसलेल्या लुगड्याला हिसडा देऊन भरसभेमध्यें तें फेडूं लागला !

द्रौपदीवस्त्रहरण !

वैशंपायन सांगतातः—द्रौपदीच्या वस्त्रालाच जेव्हां त्या निर्दयानें हात घातला, तेव्हां तो निर्वाणीचाच प्रसंग जाणून त्या साध्वी व दीन झालेल्या द्रौपदीनें, ह्या प्रसंगीं पांच भ्रतार एकापेक्षां एक धुरंधर असूनही त्यांचा या वेळीं कांहीं उपयोग नाहीं असें पाहून, भक्तकैवारी भगवान श्रीकृष्णाचा मनामध्यें धावा केला.

द्रौपदीचा धावा.

द्रौपद्युवाच—

गोविन्द द्वारकावासिन्कृष्ण गोपीजनप्रिय ।
कौरवैः परिभूतां मां किं न जानासि केशव ॥
हे नाथ हे रमानाथ व्रजनाथार्तिनाशन ।
कौरवार्णवमग्नां मामुद्धरस्व जनार्दन ॥
कृष्ण कृष्ण महायोगिन्विश्वात्मन्विश्वभावन ।
प्रपन्नां पाहि गोविन्द कुरुमध्येवसीदतीम् ॥

द्रौपदी म्हणालीः—हे गोविंदा ! द्वारकानिवासी श्रीकृष्णा ! हे गोपीजनप्रिया केशवा ! हे नाथा ! हे लक्ष्मीपते ! हे व्रजनाथा ! हे दुःखविमोचना ! हे जनार्दना ! ह्या कौरवसागरामध्यें मी बुडत आहें, त्यांतून माझा उद्धार कर! हे कृष्णा, हे योगेश्वरा ! हे सर्वांतर्यामी विश्वंभरा ! ह्या कुरुवंशामध्यें नाश पावत असलेल्या मज शरणागतेचें तूं रक्षण कर.

हे राजा, ह्याप्रमाणें त्रिभुवनाधीश भगवान श्रीकृष्ण ह्याचें मनामध्यें स्मरण करून ती अत्यंत दु:खानें गांजलेली द्रौपदी हातानें आपलें तोंड झांकून घेऊन मोठ्यानें रडूं लागली. तेव्हां श्रीकृष्ण हे द्वारकेंत होते, त्यांच्या कानावर अत्यंत हृदयद्रावक असा हा द्रौपदीचा करुणस्वर जातांच ते एकदम खडबडून उठले. द्रौपदीची ती स्थिति मनांत येतांच त्यांस गहिंवर आला, व त्यानें शय्या व आसन पायांनीं लोटून देऊन तो दयाळू भगवान गुप्तरूपानें तिच्या समीप येऊन उभा राहिला! असल्या ह्या दुर्धर संकटांतून मुक्त करण्याकरितां 'हे कृष्णा! हे विष्णो! हे हरे! हे नरवरा!' असा एकसारखा द्रौपदीनें आक्रोश मांडिला, तेव्हां तो धर्मस्वरूप महात्मा भगवान स्वतांच परोपरीचीं वस्त्रें बनला, आणि त्या नानाप्रकारच्या उत्तम उत्तम वस्त्रांनीं त्या द्रौपदीला त्यानें झांकून टाकिलें!

जनमेजय राजा! दु:शासनानें जेव्हां द्रौपदीच्या वस्त्रास हात घालून तें फेडलें, तेव्हां त्याच्याच सारखें दुसरें वस्त्र पुन:पुन: आंत निघूं लागलें. हे प्रभो जनमेजय राजा! धर्माचें परिपालन केल्यामुळें तेथें केवढा चमत्कार झाला पहा! नानाप्रकारचीं चित्रविचित्र अशीं शेंकडों वस्त्रें एकाच्या आंत एक अशीं निघूं लागलीं! इतक्यांत त्या सभेमध्यें पोटांत धडकीच भरेल असा मोठा हाहाकार उडाला! हा अद्भुत चमत्कार झालेला पाहून तेथें जमलेले सर्व राजे 'धन्य धन्य द्रौपदी!' म्हणून द्रौपदीची प्रशंसा करूं लागले. द्रौपदीच्या निरीला दु:शासनानें हात घातलेला पहातांच भीमसेन क्रोधानें केवळ चवताळून गेला; त्याचे ओंठ थरथर कांपूं लागले; आणि हातावर हात चोळून त्यानें त्या राजांमध्यें मोठ्यानें गर्जना करून भयंकर प्रतिज्ञा केली!

भीमाची प्रतिज्ञा.

भीमसेन म्हणाला:—हे भूमंडलावरील क्षत्रिय वीरहो, तुम्ही माझी प्रतिज्ञा ऐकून ठेवा. असें भाषण आजपर्यंत दुसऱ्या कोणत्याही पुरुषानें केलेलें नाहीं, व पुढेंही कोणी करणार नाहीं. हे भूपहो, मी बोलतों आहें त्याप्रमाणें जर न करीन, तर माझ्या पूर्वजांना जी उत्तम गति प्राप्त झाली, ती मला कधींही प्राप्त होणार नाहीं. ती प्रतिज्ञा हीच कीं, ह्या भरतकुलकलंक्या पापी दुष्ट दु:शासनाचें वक्षस्थल युद्धामध्यें विदारण करून मी त्याचें रक्त प्राशन करीन! व तसें न करीन तर पूर्वीं सांगितल्याप्रमाणें मी अधोगतीला जाईन!

वैशंपायन सांगतात:—त्याचें तें भयंकर प्रतिज्ञेचें भाषण ऐकून सभासदांच्या अंगावर कांटाच उभा राहिला; व सर्व लोक भीमसेनाची प्रशंसा व दु:शासनाची निंदा करूं लागले. इकडे दु:शासन द्रौपदीचीं लुगडीं फेडतां फेडतां त्या सभेमध्यें लुगड्यांची रासच्या रास झाली, व दु:शासन अगदीं थकून जाऊन तो लाजून खालीं बसला! आपलीं वस्त्रें बाजूस ठेवून पांडव जेव्हां सभेमध्यें उघडे होऊन बसलेले पाहिले, तेव्हां तेथें बसलेल्या सर्व लोकांनीं एकदम "धिक्कार असो! धिक्कार असो!" असा एकच हलकल्लोळ करून सोडिला. तो ऐकून प्रत्येकाच्या अंगावर रोमांच उभे राहिले. "अहो! ह्या द्रौपदीच्या प्रश्नाचें उत्तर कुरुवंशजांतील पुरुष कोणीच देत नाहींत!" असें तो जो म्हणत म्हणत धृतराष्ट्राला नांवें ठेवी; ह्यामुळें सारा एकच गोंधळ माजून राहिला. तेव्हां सर्वधर्मवेत्त्या विदुरानें दोन्ही हात वर करून सर्व सभासदांस जरा स्तब्ध राहण्यास सूचना केली; व गडबड बंद झाल्यानंतर त्यानें बोलण्यास प्रारंभ केला.

विदुराचें भाषण.

विदुर म्हणाला:—अहो सभ्य गृहस्थहो!

आपणांस अशा प्रकारचा यथायोग्य प्रश्न करून ही बिचारी द्रौपदी एखाद्या अनाथासारखी हंबरडा फोडून धाय मोकलून रडत आहे; आणि तुम्ही तर तिच्या प्रश्नाचें उत्तर देत नाहीं. पण ह्या तुमच्या मुग्धमतीनेंच धर्माला बट्टा लागत आहे. त्रस्त झालेला मनुष्य सभेकडे आपलें गाऱ्हाणें सांगावयास येतो, तो अगदीं पेटलेल्या अग्नीसारखा तप्त झालेला असतो. त्याला सत्य, न्याय व धर्म यांणेंकरून शांत करणें हें सभेंतील लोकांचें कर्तव्य आहे. ह्याकरितां, श्रेष्ठ पुरुषानें धर्मसंबंधी प्रश्नाचें सत्याला अनुसरून उत्तर द्यावें. मात्र कामक्रोधांला वश होऊन त्या प्रश्नाचें उत्तर देतां कामा नये. हे नृपश्रेष्ठहो, विकर्णाच्या मनाला जसें वाटलें तसें त्यानें उत्तर दिलें आहे. तसं आपणही आतां ह्या तिच्या प्रश्नाचें यथामति सुचेल तें उत्तर द्या. सभेला गेलेला मनुष्य, धर्माचें ज्ञान असूनही जर अशा प्रश्नाचें उत्तर न देईल, तर असत्य भाषण केलेल्या पातकांपैकीं पापाचा अर्धा हिस्सा तरी त्याच्या माथ्यावर बसतोच. कारण, धर्माला अनुकूल असें स्पष्ट न बोलणें म्हणजे अधर्माला संमति दिल्याप्रमाणेंच समजतात. जो धर्मज्ञ पुरुष सभेस जाऊन अशा प्रश्नाचें उत्तर लपंडावीचें देतो, त्याला असत्य भाषणाचें संपूर्ण फल प्राप्त होतें, असा धर्मशास्त्रानेंच निश्चय करून ठविलेला आहे. त्याच्या उदाहरणाकरितां, प्राचीनकालीं प्रऱ्हाद व आंगिरस ऋषि ह्यांच्यामध्यें झालेल्या संवादाचा इतिहास सांगतात. तो मी तुम्हास सांगतों, तो ऐका.

सुधन्व्याची कथा.

दैत्यांचा राजा जो प्रऱ्हाद, त्याला एक पुत्र होता. त्याचें नांव विरोचन. तो व आंगिरस ऋषीचा पुत्र सुधन्वा ह्या उभयतांना, ‘ तुम्हांपैकीं जो कोणी श्रेष्ठ असेल त्याला मी वरीन. ’ असें केशिनी नामक राजकन्येनें सांगितलें होतें. ह्यास्तव सुधन्व्याच्या अंगावर विरोचन हा धावून गेला, व ‘ मी श्रेष्ठ, मी श्रेष्ठ, ’ असें म्हणूं लागला. सुधन्व्याही कांहीं केल्या ऐकेना. तो म्हणे, ‘ मी श्रेष्ठ !’ ह्याप्रमाणें त्या परस्परांनीं बरीच बाचाबाच केल्यानंतर दोघांनीं असा पण केला कीं, आपल्यापैकीं जो कोणी श्रेष्ठ ठरेल, त्यानें दुसऱ्याच्या प्राणाचा धनी व्हावें. नंतर, आतां श्रेष्ठ कोण ? हा वाद त्यांच्यामध्यें उपस्थित झाला. तो कांहीं दोघांत मिटेना. तेव्हां तो न्याय तोडण्याकरितां एक तिऱ्हाईत घेणें भाग पडलें. पुढें ते उभयतांही प्रऱ्हादाकडे गेले, आणि त्यांनीं त्यास प्रश्न केला कीं, “ आम्हां उभयतांपैकीं श्रेष्ठ कोण, या प्रश्नाचें सत्य स्मरून उत्तर सांग. असत्य बोलूं नको. ” तेव्हां त्यानें सुधन्व्याकडे पाहिलें; पण त्याला पाहतांच तो अगदीं गांगरून गेला. मग असत्य भाषण करण्याची गोष्ट कोठची ! कारण, प्रत्यक्ष ब्रह्मदेवानें निर्माण केलेल्या कालदंडाप्रमाणें तो सुधन्वा अगदीं क्रोधानें संतप्त होऊन त्या प्रऱ्हादास म्हणाला, “ हे प्रऱ्हादा ! पहा, तूं जर का खोटें सांगशील, किंवा मुळींच कांहीं उत्तर देणार नाहींस, तर देवाचा राजा इंद्र आपल्या वज्रानें तुझ्या मस्तकाचे तुकडे तुकडे करून टाकील. ध्यानांत ठेव.” अशी त्या सुधन्वा ब्राह्मणानें जेव्हां धमकी दिली, तेव्हां तो दैत्य प्रऱ्हाद पिंपळाच्या पानाप्रमाणें भयानें लटलट कांपूं लागला; व आतां ह्या प्रश्नाचें उत्तर काय द्यावें ह्या विवंचनेंत पडला शेवटीं, आतां आपण ह्या कामीं महातेजस्वी कश्यप मुनींकडून काय तो निश्चय करून घ्यावा असें मनांत आणून तो त्यांच्याकडे गेला, आणि म्हणाला:—हे महासमर्थ कश्यप मुने ! देव आणि दैत्य ह्या दोघांच्याही धर्माचे आपण ज्ञाते आहां. ह्याकरितां, ह्या ब्राह्मणाची धर्मसंबंधानें उपस्थित झालेली अडचण आपण ऐकून घ्यावी; आणि दुसराही आपणांस असा एक प्रश्न आहे कीं, कोणाच्याही प्रश्नाचें

उत्तर एखाद्यानें मुळींच दिलें नाहीं, किंवा असत्य दिलें, तर त्याला दुसरे कोणकोणते लोक प्राप्त होतात, हेंही कृपा करून सांगावें.

कश्यपांनीं केलेला निर्णय.

कश्यप म्हणाले:—आपल्याला माहीत असूनही लोभांत गुंतून, किंवा क्रोधाला वश होऊन, किंवा मनांत भय बाळगून जो कोणी प्रश्नाचें उत्तर असत्य सांगतो, तो वरुणाचे एक हजार पाश आपल्या गळ्यामध्यें अडकवून घेतो. किंवा खरें उत्तर माहीत असूनही गाईच्या कानाप्रमाणें एकदा एका बाजूला, व एकदा दुसऱ्या बाजूला वळून दोन्ही डगरींवर हात ठेवितो, तोही वरुणाचे एक हजार पाश आपल्या गळ्यांत अडकवून घेण्यास पात्र होतो. अशा बद्ध स्थितींत एक संपूर्ण संवत्सर घालवावा, तेव्हां एकेक पाश सुटतो. ह्याकरितां, सत्तत्त्व जाणणारांनीं नेहमीं सत्य भाषणच करीत असावें. एखाद्या सभेमध्यें अधर्मानें धर्माचा पाडाव करण्याचा प्रसंग आला असतां ती अडचण सभासदांनीं दूर केली नाहीं, तर ते सारे सभासदही अधर्माला भागीदार होतात; त्या सभेमध्यें जो अध्यक्ष असतो, तो अर्ध्या अधर्माचा भागीदार होतो; स्वतः अधर्म करणाराकडे त्याचा चौथा हिस्सा राहतो; आणि खरोखर ज्या गोष्टीची निंदाच करणें योग्य त्या गोष्टीची जे निंदा करीत नाहींत, व मुकाट्यानें स्तब्ध बसतात, अशा सभासदांकडे अधर्माचा चौथा हिस्सा जातो; आणि निंदा करण्यासच पात्र असलेल्या पुरुषाची ज्या सभेमध्यें निंदा केली जाते, त्या सभेंतील अध्यक्ष व सारे सभासदही पातकापासून अलिप्त राहतात; आणि साऱ्या पातकाचा भार त्या कर्त्यावरच बसतो.

हे प्रऱ्हादा! जे कोणी धर्मविषयक प्रश्न विचारणाराला उडवाउडवीचें उत्तर देतात, ते इष्ट फलाला तर मुकतातच; पण शिवाय, त्यांच्या मागच्या व पुढच्या सात पिढ्यांना अधोगति प्राप्त होते. सर्वतोपरी नागवलेला, पुत्रशोक झालेला, ब्रह्मस्वानें गांजलेला, कोणत्याच कामांत ज्याला यश येत नाहीं असा, विधवा, राजानें जर्जर केलेला, निपुत्रिक स्त्री, व्याघ्राच्या जबड्यांत सांपडलेला प्राणी, सवत असलेली पत्नी, आणि साक्षीदारांनीं बुडविलेला पक्षकार हीं सारीं समदुःखी आहेत, असें देवांनीं म्हटलेलें आहे. जो साक्षीदार कोणतीही गोष्ट प्रत्यक्ष पाहिली असून, किंवा विश्वासू मनुष्याच्या तोंडून ऐकिली असून, किंवा स्वतांची पक्की खात्री असूनही, सांगतांना त्याच्या विरुद्ध सांगतो, त्याला हीं सर्व दुःखें प्राप्त होतात. ह्याकरितां, कोणत्याही साक्षीदारानें सत्य असेल तेंच भाषण करावें; म्हणजे धर्माचा किंवा अधर्माचा—कशाचाच नाश होत नाहीं.

हें कश्यप ऋषींचें भाषण श्रवण करून प्रऱ्हाद आपल्या पुत्राला म्हणाला, "हे पुत्रा! सुधन्वा हा तुझ्यापेक्षां श्रेष्ठ असून, ह्याचा पिता अंगिरा ऋषि माझ्यापेक्षां श्रेष्ठ, व ह्याची माताही तुझ्या मातेपेक्षां श्रेष्ठ होय. ह्याकरितां, हे विरोचना! सुधन्वा हाच आज तुझ्या प्राणाचा धनी आहे. त्यानें तुझ्या प्राणाचें कांहीं केलें तरी तूं तें सहन केलें पाहिजेस." राजा, हें प्रऱ्हादाचें निःस्पृह भाषण श्रवण करून सुधन्वा फारच प्रसन्न झाला आणि म्हणाला:—हे प्रऱ्हादा! पुत्रप्रेम एका बाजूस ठेवून प्रश्नाचें उत्तर देतांना तूं ज्या अर्थीं धर्माकडे वळून धर्माची बाजू राखलीस, त्या अर्थीं तुझ्या पुत्राच्या प्राणावरचें स्वामित्व मी मोठ्या आनंदानें सोडून देतों. तो आतां शतायु होवो, अशी माझी इच्छा आहे.

विदुर म्हणतो:—हे सर्व सभासदहो! हा मीं सांगितलेला श्रेष्ठ धर्म आपण ऐकलाच; तेव्हां आतां आपणही, 'मी जिंकलें गेलें किंवा नाहीं?' हा जो द्रौपदीनें आपणांस प्रश्न केला आहे, त्याचा नीट विचार करून काय तें उत्तर द्या.

वैशंपायन सांगतात:—अशा प्रकारचें विदुराचें

भाषण ऐकूनही त्यांतील सभासदांनीं कांहीं उत्तर दिलें नाहीं, पण कर्ण मात्र दुःशासनाला म्हणाला, "जा, ह्या दासी द्रौपदीला घरांत घेऊन जा !" तेव्हां त्या बिचाऱ्या लज्जित झालेल्या द्रौपदीच्या अंगांत कांपरें भरलें; आणि तिनें पांडवांच्या नांवानें मोठा हंबरडा फोडिला ! तरी ह्या पाषाणहृदयी दुःशासनाच्या मनाला यत्किंचितही घाम फुटला नाहीं ! तो तिला तशीच फरफर फरफर ओढूं लागला.

अध्याय एकुणसत्तरावा.

—:०:—

द्रौपदीचा शोक.

द्रौपदी म्हणाली:—हे नराधमा ! हे दुर्बुद्धे दुःशासना, थोडा दम धर. मीं पूर्वीच केलें पाहिजे होतें असें एक महत्त्वाचें काम, तूं माझ्याशीं धिंगामस्ती करून मला ओढून विव्हल केल्यामुळें राहिलें आहे, तें मला आतां तरी करूं दे. ह्या कुरुवंशजांच्या सभेमध्यें येतांच ह्या परममान्य कुरुवंशजांना अभिवंदन करणें माझें कर्तव्य होतें, पण तें मजकडून घडलें नाहीं. तर तें मी आतां करितें. मीं प्रथम तें केलें नाहीं, हा कांहीं माझा अपराध नव्हे.

वैशंपायन सांगतात:—द्रौपदीच्या मुखांतून हे शब्द बाहेर पडतात न पडतात, तोंच ह्या दुःशासनानें तिला एक जोरानें हिसडा मारला.तेव्हां ती केवळ गाय ! धाडकर जमिनीवर पडली! आणि खरोखर ज्या साध्वीला सभेंत येण्याचा प्रसंग कधींच येणारा नव्हे, अशी ती राजबाला दुःखानें विलाप करूं लागली.

द्रौपदी म्हणाली:—हाय ! हाय ! माझ्या स्वयंवरसमयीं सारे राजे जमले होते, त्याच वेळीं जी काय त्यांनीं मला पाहिली असेल तेवढीच. ह्यानंतर दुसऱ्या कोठें कोणाच्याही दृष्टीस माझें नख देखील पडलें नाहीं ! ती मी आज ह्या पुरुषांच्या भरसभेंत अशा ह्या स्थितीनें येऊन पडलें आहेना ? मी अंतःपुरांतच नेहमीं राहत असल्यामुळें ज्या माझें दर्शन वायूला किंवा सूर्यालाही झालें नाहीं, तीच मी आज ह्या सभेमध्यें हजारों पुरुषांत उघडीवाघडी पडलें ना ? नारायणा, मी घरांत असतांना मला वायूचा स्पर्श झालेला सुद्धां पांडवांना खपत नसे, त्याच मला हा दुष्ट दुःशासन झोंबतो आहे, हें प्रत्यक्ष पाहून ते सहन करतात ना ? मी केवळ ज्यांना सुनेप्रमाणें व लेंकीप्रमाणें असल्यामुळें कोणत्याही प्रकारें दुःख भोगण्यास पात्र नव्हें, ती मी ही या भीष्मप्रभृति वयोवृद्ध कुरुवृद्धांपुढें हालअपेष्टा भोगीत असतांही ते मुकाट्यानें सहन करीत आहेत, तेव्हां सारा काळच उलट फिरला असें म्हणावें, दुसरें काय ? मी शुद्धाचरणानें वागणारी, पतिव्रता, जातीनें केवळ अबला; असें असून पुरुषांच्या सभेमध्यें आज आलें आहे, ह्यापेक्षां आणखी दुःखप्रद गोष्ट ती कोणती ? देवा ! ह्या साऱ्या राजांचा धर्म तरी आज कोठें गेला ? धार्मिक स्त्रीला पूर्वी कधींच सभेमध्यें नेत नसत, असें ऐकतें; आणि आज तर हा प्रकार त्याच्या अगदीं उलटच घडला आहे ! ह्यावरून कुरुवंशजांतला सनातन धर्म तो आज नष्ट झाला आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. नाहीं तर ही पांडवांची धर्मपत्नी, धृष्टद्युम्नाची भगिनी, आणि प्रत्यक्ष वासुदेवाची मैत्रीण ह्या राजसभेमध्यें कशी आली असती ?

कौरवहो ! अशा स्थितीस असलेली मी धर्मराजाची भार्या, खरोखर दासी झालें किंवा नाहीं, तेवढें तरी सांगा ! म्हणजे मी त्याप्रमाणेंच वागण्यास तयार होईन. हे कौरवहो ! तुमच्या कीर्तीला काळिमा लावणारा हा नीच दुःशासन माझा मनस्वी छळ करीत आहे, तो आतां माझ्यानें फार वेळ सोसवणार नाहीं. ह्याकरितां, हे नृपहो !

मी जित आहें किंवा अजित आहें, हें आपण ठरवा; आणि त्याचप्रमाणें, हे कौरवहो ! तुम्हीही माझ्या प्रश्नाचें काय तें उत्तर द्या. म्हणजे मी त्या मार्गाला लागेन.

भीष्म म्हणाले:—हे कल्याणि, मीं पूर्वीच सांगितलें आहे कीं, ह्या प्रसंगीं धर्माचा निर्णय करणें हें फार कठिण आहे. कारण, बलिष्ठाची जिकडे प्रवृत्ति असते, तो अधर्म असला तरी सुद्धां तो लोकमान्य धर्म होतो; आणि इतर दनिदुबळ्यांचा धर्म खरा असला तरी तो अर्थातच मोडला जाऊन खऱ्या धर्माचा पाडाव होत असतो, अशी जगांतील रूढि आहे. ह्याकरितां, तुझा हा प्रश्न फारच बिकट, अत्यंत नाजूक, अतिशय महत्त्वाचा, व गहन विचाराचा असल्यामुळें, त्याचें निश्चयात्मक उत्तर सांगण्यास मी असमर्थ आहें. मला एवढें मात्र खचीत दिसतें कीं, ज्या अर्थी हे सर्व कुरुवंशज लोभाच्या व मोहाच्या सपाट्यांत सांपडले आहेत, त्या अर्थी हें कुरुकुल फार दिवस रहावयाचें लक्षण दिसत नाहीं. तें लवकरच लयास जाणार! हे कल्याणि, ज्या आमच्या पांडवांची तूं धर्मपत्नी आहेस, ते पांडव अत्यंत कुलीन आहेत, म्हणूनच एवढें दुर्धर संकट कोसळलें असतांही ते धर्माच्या मार्गापासून ढळत नाहींत. तेव्हां, हे पांचालि ! तूं तरी त्यांच्याबाहेर कशी जाशील? तुझ्यावरही एवढें दुर्धर संकट कोसळलें असतां तुझ्या बुद्धीचा कल तूं धर्माकडे राखला आहेस, हेंही योग्यच आहे. असो. आतां येथें जे द्रोणाचार्यासारखे धर्मज्ञ व वयोवृद्ध लोक आहेत, ते तर खालीं मान घालून गतप्राण झाल्यासारखे तटस्थ होऊन बसले आहेत. तेव्हां मी म्हणतों कीं, ह्या तुझ्या प्रश्नाचा निर्णय करण्याचें काम धर्मराजाकडेसच सोंपवावें. तूं जिंकली गेली आहेस कीं नाहींस, हें त्यानें स्वतांच सांगावें हेंच बरें दिसतें !

अध्याय सत्तरावा.

—:०:—

दुर्योधनाचा मानभावीपणा.

वैशंपायन सांगतात:—राजा, ती राजपत्नी द्रौपदी ह्याप्रमाणें दुःखानें अत्यंत विव्हल होऊन कुररीपक्षिणीप्रमाणें एकसारखी रडत होती, हें तेथें असलेले सर्व राजे आपल्या डोळ्यांनीं पहात होते; पण धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनाच्या भीतीमुळें ते बरें किंवा वाईट असें कांहींच उत्तर देईनात. कोणी कांहीच उत्तर देत नाहीं हें धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनानें पाहिलें, तेव्हां पांचाल राजाची कन्या द्रौपदी हिला पांच पति असल्यामुळें तो तिला लागण्यासारखें बोलूं लागला.

दुर्योधन म्हणाला:—हे उदार द्रौपदि ! मला वाटतें, तूं आपला हा प्रश्न भीम, अर्जुन व तुझे दुसरे पति आहेत, त्यांच्यावरच ठेव. हे पांचालि! तुला सुटावयाला आतां मला एकच मार्ग दिसतो. तो हा कीं, हे तुझे सारे बाकीचे पति ह्या पराधीन झालेल्या धर्मराजाला खोटा ठरवूं देत. कारण, तूं जिंकली नाहींस असें ह्यांनीं म्हटलें कीं तो खोटा ठरला. म्हणजे तूं आमच्या दास्यत्वापासून मुक्त झालीस. किंवा पाहिजे असेल तर 'तुझा मालक मी आहें' किंवा 'नाहीं' हें महात्म्या इंद्रतुल्य, धर्मनिष्ठ व धर्मपुत्र युधिष्ठिरालाच सांगूं दे, म्हणजे तुलाही कोणता तो एक मार्ग लवकर धरितां येईल. सांप्रत ह्या सभेंतील सर्व कौरव तुझ्या दुःखाच्या विचारामध्यें गढून गेले आहेत. ह्यामुळें तुझ्या हतभाग्य पतींकडे पाहून त्या सत्वशील पुरुषांना स्पष्ट असें कांहींच मत देववत नाहीं.

वैशंपायन म्हणाले:—कुरुराज दुर्योधनाच्या ह्या भाषणाची सभेंत बसलेल्या बऱ्याच सभासदांनीं फार प्रशंसा केली; व कित्येकांनीं तर आपलीं उपवस्त्रें उडवून आपली सहानुभूतिही

दाखविली. कांहींजणांनीं मात्र 'हाय हाय!' असे उद्गार काढिले. त्यांत जे सज्जन होते, त्यांस असें वाटलें कीं, धर्मराजा हा कोणतेंही संकट आलें तरी सत्यापासून ढळणारा नव्हे; आणि त्यानें तर द्रौपदीला स्वमुखानें पणाला लाविलेली आहे. तेव्हां त्याच्या मुखांतून हिला 'मीं पणाला लावली नाहीं,' किंवा 'हिला तुम्हीं जिंकली नाहीं' अशीं अक्षरें कधींच निघणार नाहींत. इतकेंच नव्हे, तर उलट द्रौपदीला कौरवांनीं जिंकली हेंच सत्य आहे, असें म्हणावयास तो चुकणार नाहीं, इतका तो साधुपुरुष आहे; व मग हे दुरात्मे धृतराष्ट्राचे पुत्र गर्वानें अधिकच उन्मत्त होऊन त्या बिचाऱ्या गाईची फारच दुर्दशा करतील! हा विचार मनांत उभा राहिल्यामुळें हाय हाय करूं लागले; व दुर्जन अर्थात् दुर्योधनाच्या पक्षाचे जे होते, त्यांच्यापैकीं कित्येकांच्या मनांत असें आलें कीं, भीम, अर्जुन वगैरे क्रोधानें आधींच खवळलेले आहेत, ते कदाचित् 'द्रौपदीला जिंकिलें नाहीं,' असें म्हणतील; आणि त्यांनीं तसें म्हटलें कीं द्रौपदीची दास्यत्वापासून मुक्तता होऊन ही आयती हातांत सांपडलेली शिकार जाईल; हें मनांत आल्यामुळें तेही हाय हाय करूं लागले. तथापि एकंदरींत, दुर्योधनाचें मनमोहक भाषण श्रवण करून सभेंतील कौरवांना मोठा आनंद झाला; आणि तेथें असलेल्या सर्व राजांनीं 'हा कौरवश्रेष्ठ दुर्योधनही मोठा धार्मिक आहे!' असें म्हणून त्याची मनःपूर्वक प्रशंसा केली.

असो. राजा, असा प्रकार झाल्यानंतर तेथें असलेले सर्व लोक, आतां धर्मराज काय उत्तर देतो तें ऐकण्याच्या उत्सुकतेनें त्याच्याकडे टक लावून पाहूं लागले. त्याचप्रमाणें, युद्धामध्यें कधींच हार न जाणारा असा पांडुपुत्र अर्जुन, व भीमसेन, नकुल व सहदेव हे तरी काय म्हणतात ह्याविषयींही त्यांना उत्कंठा लागून राहिली. नंतर सारा गलबला शांत झाल्यावर, चंदनाची उटी लाविलेला आपला गोंडस हात पुढें करून भीमसेन बोलूं लागला.

भीमाचें भाषण.

भीमसेन म्हणालाः—काय करावें! आम्हांला गुरुस्थानीं असलेला हा महात्मा धर्मराज खरोखर जर आमच्या ह्या कुळाचा अधिपति नसता, तर इतकें हें आम्हीं कधीं सहनच केलें नसतें! आमच्या पुण्याचा व आमच्या तपाचाही तोच अधिकारी आहे; इतकेंच नव्हे, तर आमच्या प्राणांचाही अधिपति तोच आहे. द्रौपदीला पणास लावण्यापूर्वींच आपणा स्वतांला जिंकिलें असें जर तो समजत असेल, तर द्रौपदीसंबंधानें आम्ही विजयींच आहों. कारण, तो प्रथम जिंकल्यावर त्याची द्रौपदी पणाला लावण्याची सत्ताच उरत नाहीं, आणि मग द्रौपदीही जिंकली गेली असें होत नाहीं, हें उघड आहे; आणि जर असेंच ठरेल, तर मग भूमीवर कोणत्याही प्राण्यानें द्रौपदीच्या केसाला जरा धक्का लावला, तर तो माझ्या हातून कधीं जिवंत सुटणार नाहीं. अहो! मुद्गराच्या जोडीसारखे पीळदार असलेले माझे हे भुज एकदा पाहून तर ठेवा. ह्यांची मगरमिठी एकदा का पडली, कीं तींतून इंद्राची सुद्धां निसटून जाण्याची प्राज्ञा नाहीं! पण काय करूं हो? ह्या महात्म्या धर्माच्या पाशामध्यें मी अगदीं जखडून गेलों आहें, अर्जुनाच्या प्रतिबंधानें अडकलों गेलों आहें, व धर्माखालीं मान वांकविली आहे, म्हणून ह्या संकटांतून पार पडतां येत नाहीं. नाहीं तर धर्मराजाला आज्ञा तर देऊं द्या, कीं जसा सिंह एखाद्या यःकश्चित् कोल्ह्याचा चेंदामेंदा करून टाकितो, तसा ह्या पातकी धृतराष्ट्रपुत्रांचा मी ह्या माझ्या तळहातरूपी तरवारीनेंच चुराडा उडवून सोडतों!

वैशंपायन सांगतातः—राजा, हें भीमसेनाचें भाषण श्रवण करून भीष्म, द्रोण व विदुरादिक

ना भीमास म्हणाले:—हे भीमसेना! तूर्त राहूं दे. ह्या प्रसंगीं तूं त्यांना क्षमा कर. कारण, पुढें जो सारा सोहळा व्हावयाचा आहे, तो तुझ्या हातूनच व्हावयाचा आहे!

अध्याय एकाहत्तरावा.

—:०:—

कर्णाचे वाग्बाण.

कर्ण म्हणाला:–अहो, ह्या सभेमध्यें भीष्म, विदुर आणि कौरवांचे गुरु द्रोणाचार्य हे तिघेच काय ते धर्माला झुगारून देणारे आहेत. कारण, ते आपल्या धन्यालाच मुळीं दुष्टांतला दुष्ट म्हणावयाला कमी करीत नाहींत. धन्याची भरभराट ह्यांना तर पाहवत नाहींच, पण उलट तो रसातळाला कधीं जाईल, हीच ह्यांची इच्छा आहे. तेव्हां स्वामिद्रोहासारख्या महापातकाची सुद्धां ज्यांना क्षिति नाहीं, ते धर्माची पर्वा किती बाळगणार? हे द्रौपदि! दास, पुत्र, आणि स्त्री हीं तिघेही, मालक, पिता व पति असेपर्यंत नेहमींच निष्कांचन व परस्वाधीन असतात; आणि एखादा पुरुष दास होण्यापूर्वींची त्याची पत्नी किंवा द्रव्य जें काय असेल तें सर्व त्या दासाच्या धन्याकडेच जातें. ह्याकरितां, तूं आतां राजवाड्यांत जाऊन राजाच्या परिवारांत राहून कामकाज करीत जा. एवढेंच काय तें आतां तुला करावयाचें राहिलें आहे. हे राजकन्ये! आतां कुंतीचे पुत्र तुझे धनी नसून आजपासून धृतराष्ट्रपुत्र तुझे धनी झाले आहेत. हे स्वेच्छाचारी द्रौपदि! आतां द्यूतापासून पुनरपि तुला दास्यत्व प्राप्त होणार नाहीं असा एखादा दुसरा पति तूं कर. पण पति केला म्हणजे स्त्रियांना हवें तसें वागतां येत नाहीं, व दासीपणांत असल्यानें नेहमीं यथेष्ट वर्तन केलें तरी त्याला कांहीं प्रतिबंध नसतो, हेंही तुझ्या लक्षांत असूं दे. हे द्रौपदि! युधिष्ठिर, भीमसेन, अर्जुन, नकुल आणि सहदेव ह्यांचा आज पराभव होऊन तूं दासी झाली आहेस; आणि आतां त्यांचा तुझ्यावर कांहींच हक्क उरला नाहीं. अहो! 'द्रुपदराजाची कन्या द्रौपदी हिच्यासारखी दिव्य स्त्री आपण आज द्यूतामध्यें पणाला लावली, तेव्हां ह्यापेक्षां जन्मास आल्याचें आणखी सार्थक तें कोणतें? ह्याच्यापेक्षां आणखी मोठा पराक्रम व पुरुषार्थ तो कोणता?' अशी धर्मराजालाही आज धन्यता वाटत असेल!

वैशंपायन सांगतात:—हें कर्णाचें उपरोधिक भाषण भीमसेनाच्या तर काळजालाच जाऊन झोंबलें; आणि त्याच्या अंगांत क्रोधाचा संचार झाल्यामुळें त्याचे नेत्र लालभडक झाले. तेव्हां तो असा दिसूं लागला कीं, जणू काय तो आतां कर्णाची राखरांगोळीच करून टाकील. परंतु धर्माच्या आज्ञेबाहेर पाऊल टाकावयाचें नसल्यामुळें, आणि धर्मपाशाला धक्का न लावण्याचा निश्चय असल्यामुळें तो भीमसेन दुःखाचे मोठमोठे सुस्कारे टाकीत टाकीत म्हणाला:–हे धर्मराजा! या सूतपुत्र कर्णाचा मला मुळींच राग येत नाहीं. कारण, 'ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी' अशी म्हणच आहे. हें चाकराचें कामच आहे. तेव्हां हा दुर्योधनाचा मिंधा असल्यामुळें त्याच्या तोंडासारखें बोलतो आहे ह्यांत नवल तें काय? परंतु, धर्मराजा, तूं जर ही द्रौपदी पणाला लावली नसतीस, तर असें मर्मभेदक भाषण करून माझ्या काळजास घरें पाडण्याची शत्रूची काय प्राज्ञा होती?

दुर्योधनाचा नीचपणा व भीमाची प्रतिज्ञा.

वैशंपायन सांगतात:—राजा, भीमसेनाचें हें भाषण श्रवण केल्यानंतर, निश्चेष्ट होऊन स्तब्ध बसलेल्या धर्मराजास राजा दुर्योधन म्हणाला, "हे राजा, भीम, अर्जुन, नकुल व सहदेव हे सर्व तुझ्या आज्ञेंत आहेतच. ह्याकरितां, द्रौपदीला आम्हीं जिंकलें नाहीं असें वाटत असेल, तर तसेंच तिच्या प्रश्नाचें उत्तर दे." जनमेजया,

एवढें धर्मराजाशीं बोलून त्या दुर्योधनानें आपल्या मांडीवरचें धोतर एके बाजूस सारलें, आणि ऐश्वर्यमदानें धुंद होऊन हसत हसत, आणि कर्णाच्या अंतःकरणाला गुदगुल्या व्हाव्या. व भीमसेनाचें काळीज दुःखानें विदीर्ण व्हावें या उद्देशानें द्रौपदीकडे पाहून, त्यानें केळीच्या खुंटासारखी वाटोळी गरगरीत, गजशुंडेसारखी मुरडलेली, सर्वलक्षणसंपन्न, व वज्राप्रमाणें कठोर अशी आपली डावी मांडी हातानें थोपटून तिला दाखविली! हा त्याचा नीचपणा भीमानें पाहतांच आपले तांबडे लाल झालेले डोळे वटारून, जणू काय सर्व सभेचें समाधान करावें म्हणून दुर्योधनाला म्हटलें, "हे दुर्योधना, घनघोर मातलेल्या रणकंदनांत तुझी हीच मांडी मी जर ह्या माझ्या गदेनें न फोडीन, तर ह्या भीमसेनाला, त्याच्या पूर्वजांना मिळालेली सद्गति कधींही मिळणार नाहीं, हें पक्कें लक्ष्यांत ठेव!" राजा, क्रोधानें संतप्त झालेल्या भीमसेनाचें तें भाषण चाललें असतां धाडधाड पेटत असलेल्या वृक्षाच्या ढोलींतून ज्वाळा बाहेर पडत असतां जसा तो दिसतो, तसा तो भीमसेन दिसूं लागला!

विदुरानें केलेली कानउघडणी.

विदुर म्हणालाः—हे प्रतीपकुलोत्पन्न राजेलोकहो! ही भीमसेनाची महाभयंकर प्रतिज्ञा ऐकून तरी तुम्ही शुद्धीवर या. हाय हाय! खरोखर ह्या भरतवंशजांचें दुर्दैव पूर्णपणें ओढवलेलें आहे असें दिसतें. ह्यांच्यावर लवकरच कांहीं तरी भयंकर अरिष्ट कोसळणार, ह्यांत शंका नाहीं. हे धृतराष्ट्रपुत्र दुर्योधना! तुम्हीं ज्या अर्थी सभेमध्यें स्त्रीशींच हुजत घालीत बसलां आहां, त्या अर्थी तुमच्या द्यूताचा आतां कळसच झाला म्हणावयाचा! अरे, तुमचीं कुष्णकारस्थानें सारखीं सुरू आहेत. परंतु अज्ञानें नवीन वैभव प्राप्त होण्याचें तर लांबच राहिलें, पण असलेलेंही धुळीस मिळण्याचा संभव आहे. ह्याकरितां, हे कौरवहो! धर्म म्हणजे काय तें लवकर शिकून तरी घ्या. कारण, धर्माचा विध्वंस झाला तर या सभेला मोठें लांच्छन लागेल. अहो! द्यूत खेळण्यास प्रवृत्त झालेल्या युधिष्ठिरानें, आपण जिंकून घेण्यापूर्वीं जर ह्या द्रौपदीला पणाला लाविली असती, तर त्यांत कांहीं तरी अर्थ होता. कारण त्या वेळीं तो स्वतः पराजित झाला नसल्यामुळें, तिला पणास लावण्यास तो समर्थ होता. पण ज्या धनावर आपली सत्ताच नाहीं, तें जर एखाद्यानें पणास लाविलें, आणि तें दुसऱ्यानें जिंकिलें, तर तें स्वप्नांत जिंकल्याप्रमाणें व्यर्थ होय, असें मला वाटतें. तर, हे कौरवहो! ह्या गांधारदेशाधिपति शकुनीचें म्हणणें ऐकून तुम्ही धर्माची पायमल्ली करूं नका.

अर्जुनाचा अभिप्राय व अपशकुन.

दुर्योधन म्हणालाः—हे द्रौपदि! भीम, अर्जुन किंवा नकुल-सहदेव ह्यांच्याच म्हणण्याची मी आतां वाट पहात बसलों आहें. तर तुला पणाला लाविते वेळीं युधिष्ठिर हा तुझा मालक नव्हता, असें एकदा त्यांच्या तोंडांतून निघूं दे, म्हणजे तूं आमच्या दास्यत्वांतून सुटलीस!

अर्जुन म्हणालाः—हे कौरवहो, हा कुंतीपुत्र धर्मराज, आपण हरण्यापूर्वीं आम्हांला पणाला लावावयास समर्थ होता, हें उघडच आहे. परंतु स्वतांचा देहच हरवून बसल्यानंतर मग तो कोणाचा मालक असणार? हें सारें तुम्हांसही माहीत आहेच! तेव्हां द्रौपदी जिंकली गेली नाहीं, हें मी आणखी तें काय सांगणार?

वैशंपायन सांगतातः—हे जनमेजय राजा! हें अर्जुनाचें भाषण पुरतें संपतें न संपतें तोंच धृतराष्ट्राच्या मंदिरांत अगदीं अग्निकुंडाच्या जवळच एक कोल्हें ओरडलें! आणि त्याच्याच बरोबर एका गर्दभानेंही पण आपला कर्कश ध्वनि सुरू केला! त्याचप्रमाणें, अभद्र पक्ष्यांनींही जिकडे तिकडे

एकच कलकलाट करून सोडला ! तेव्हां तत्त्वज्ञानी विदुर, सुबलकन्या गांधारी, भीष्म, द्रोणाचार्य व गौतमकुलांत उत्पन्न झालेला ज्ञानसंपन्न कृपाचार्य ह्यांनाही तो घोर शब्द स्पष्ट ऐकूं आला. तेव्हां त्या सर्वांच्या मनाला एकदम चरका बसून त्यांनी 'स्वस्ति, स्वस्ति' असे मंगलशब्द अरिष्टशांत्यर्थ मोठ्यानें उच्चारिले. बिचाऱ्या विदुराला व गांधारीला, हें कांहीं तरी मोठें अरिष्ट असावें असें वाटून त्यांनीं धावऱ्या धावऱ्या जाऊन ती गोष्ट धृतराष्ट्र राजाला कळविली. तेव्हां धृतराष्ट्रानें बोलण्यास प्रारंभ केला.

धृतराष्ट्राचें भाषण व वरप्रदान.

धृतराष्ट्र म्हणाला:—हे मूढा दुर्योधना ! झाला, तुझा सर्वस्वीं घात झाला ! तुझ्या मस्तीनेंच तूं ठार बुडालास. मूर्खा ! भरसभेमध्यें, कुरुवंशांतच उत्पन्न झालेल्या पांडवाच्या स्त्रीशीं, आणि त्यांतूनही धर्मपत्नी द्रौपदीशीं अशी बाचाबाच करीत बसला आहेस काय? कोण हा तुझा उद्धटपणा !

राजा, ह्याप्रमाणें सांगून, तत्त्वाशीं गांठ घालणारा तो समंजस धृतराष्ट्र आपल्या पुत्रांचें कल्याण व्हावें म्हणून आपल्या जागेवरून उठला, आणि द्रौपदीच्या जवळ जाऊन मोठ्या धोरणानें सांत्वनपूर्वक तिचा गौरव करण्याकरितां तिला म्हणाला, "हे पांचालि ! तूं मोठी धार्मिक व पतिव्रता असल्यामुळें तूं मला माझ्या सर्व सुनांहून फार आवडती आहेस. तर तुला जो काय पाहिजे असेल तो वर माझ्यापासून मागून घे."

द्रौपदी म्हणाली:—हे भरतवंशजश्रेष्ठा ! आपण मला वर देतों म्हणतां, त्या अर्थीं, "सर्वस्वीं धर्मानें वागणारा हा वैभवशाली युधिष्ठिर दास नसो एवढेंच माझें मागणें आहे." नाहीं तर अज्ञान मुलांना कांहीं समजत नाहीं; तीं ह्या माझ्या युधिष्ठिरापासून झालेल्या प्रतिविंध्य नामक पुत्राला, "तूं दासीपुत्र आहेस," असें म्हणून हिणवितील; तर तसा प्रसंग येऊं नये. कारण, हा पहिल्यापासून राजसुखांत वाढलेला असून केवळ राजबिंडा आहे. ह्याच्याइतका भाग्यवान पुरुष क्वचितच आढळेल. शिवाय, आजपर्यंत राजानेंच ह्याचे लाड पुरविलेले आहेत. तेव्हां अशा सुकुमाराला दासीपुत्रत्व येणें हा मोठा कमीपणा आहे !

धृतराष्ट्र म्हणाला:—हे कल्याणि ! तूं म्हणतेस त्याचप्रमाणें होईल. कांहीं काळजी करूं नको. हे भद्रे ! आतां तुला दुसराही वर मी देतों; तर तुला काय पाहिजे असेल तें मागून घे. तुला वर देण्याविषयीं माझें मन कसें अगदीं उतावळें झालें आहे. कारण एकच वर दिल्यानें माझें कांहीं समाधान होत नाहीं.

द्रौपदी म्हणाली:—हे राजा ! तर मग भीमसेन व अर्जुन, तसेंच नकुल व सहदेव हेही आपल्या रथधनुष्यांसहवर्तमान दास्यत्वांतून मुक्त होऊन स्वतंत्र व्हावे, हाच वर मी मागतें.

धृतराष्ट्र म्हणतो:—हे कल्याणि ! हे महाभाग्यवति द्रौपदि, हेंही सर्व तुझ्या इच्छेप्रमाणें घडेल. पण हे आनंदवल्लरि ! ह्या दोन वरांनींही तुझा यथायोग्य सत्कार झाला असें मला वाटत नाहीं. ह्याकरितां तूं माझ्यापासून तिसरा वर मागून घे. कारण, तूं माझ्या सर्व सुनांमध्यें श्रेष्ठ असून धर्मानें वागणारी आहेस.

द्रौपदी म्हणाली:—हे भगवन्, जगामध्यें लोभ हा फार वाईट आहे. धर्माच्या नाशाला कारण तोच. ह्याकरितां, हे राजाधिराज, तिसरा वर घेण्यास मी अयोग्य असल्यामुळें तो मागावयाला माझें मन धजावत नाहीं. कारण, वैश्याला एक वर, क्षत्रियांच्या स्त्रियांना दोन वर, राजाला तीन वर आणि ब्राह्मणांना शंभर वर मागण्याचा अधिकार आहे. ह्याकरितां, निकृष्टावस्थेला पोंहोचलेले माझे पति संकटांतून मुक्त झाले, हें कांहीं थोडें

झालें नाहीं. तेवढें पुरे. आतां, हे राजा! ते आपल्या पवित्राचरणानें भाग्याला चढतील!

अध्याय बहात्तरावा.

—:०:—

कर्णाची व भीमाची वाचावाच.

कर्ण म्हणाला:—रूपामध्यें नाणावलेल्या पुष्कळ स्त्रिया मनुष्यांमध्यें असलेल्या ऐकिवांत आहेत. पण त्यांच्यापैकीं एकीच्याही अंगीं एवढी कर्तृत्वशक्ति असल्याचें आपल्या कधीं कानांवर सुद्धां आलेलें नाहीं! धृतराष्ट्राचे पुत्र कौरव आणि कुंतीचे पुत्र पांडव हे उभयतांही क्रोधानें संतप्त झाले असतां, पांडवांची शांति करण्यास ही द्रौपदी कांहीं कारण झाली! नौका नसलेल्या जलामध्यें सांपडलेल्या किंवा विपत्तिरूप महासागरामध्यें बुडत असलेल्या पांडवांना पैलतीरास नेणारी ही द्रौपदी एक नौकाच झाली म्हणावयाची!

वैशंपायन सांगतातः—तें कर्णाचें भाषण भीमसेनाला सहन झालें नाहीं; व तो मनामध्यें अत्यंत खिन्न होऊन त्या कौरवांमध्यें बोलूं लागला.

भीमसेन म्हणतोः—एकूण पांडुपुत्रांना तारणारी स्त्री अं? ठीकच आहे! देवल ऋषींनीं असें म्हटलेलें आहे कीं, अपत्य, कर्म आणि उपासना ह्या तीन साधनांनीच पुरुषाला सद्गति प्राप्त होते. कारण, सर्व सृष्टीच्या उत्पत्तीला हीं तीनच कारणीभूत आहेत. हा गतप्राण झालेला अमंगल देह आपल्या जातिबांधवांनीं एकदा बाहेर टाकून दिला, म्हणजे मग त्या जिवाला हीं तीनच काय तीं उपयोगीं पडतात; परंतु, अर्जुना, धृतराष्ट्रपुत्रांच्या ह्या परदारापकर्षणरूप दुराचरणावरून, ही शुद्ध संतति आहेसें दिसत नाहीं. तेव्हां अर्थातच शुद्ध संततीपासून प्राप्त होणाऱ्या परलोकाला हा धृतराष्ट्र मुकल्याचें उघड होत आहे!

अर्जुन म्हणाला:—हे भरतकुलोत्पन्ना भीमसेना, कोणी वाईट म्हणो कीं चांगलें म्हणो, उत्तम पुरुष असतात ते कधींच कोणाला कठोर शब्दांनीं उत्तर देत नाहींत. तसेंच, कोणीं वैर केलें तर त्याचा प्रतिकार करण्याचें माहीत असूनही तें मनांत न आणितां त्याचे असलेले उपकार मात्र स्मरतात, आणि आपल्याच गुणांनीं लोकांत पूज्य होतात.

भीमसेन म्हणाला:—हे भरतकुलोत्पन्ना नृपश्रेष्ठा धर्मराजा, येथें जुळलेल्या ह्या सर्व शत्रूंना मी येथच्या येथें एका क्षणांत मारून टाकितों; किंवा येथें नको असेल तर त्यांना बाहेर पडूं दे, म्हणजे मग त्यांचा समूळ उच्छेद करीन. हे भारता धर्मराजा! ह्यांच्याशीं बोलण्यांत किंवा वादविवाद करण्यांत अर्थ काय? आतांच मी ह्यांचा वध करितों, आणि तूं ह्या पृथ्वीचें राज्य कर कसें!

राजा, ह्याप्रमाणें बोलून तो भीमसेन, मृगामध्यें सिंह असतो, त्याप्रमाणें आपल्या कनिष्ठ भ्रात्यांसहवर्तमान वरचेवर डोकावून पाहूं लागला. तो संतप्त झालेला पाहून सदाचरणी कुंतीपुत्र अर्जुनानें त्याचें सांत्वन केलें. तरी तो महान पराक्रमी वीर्यवान आंतल्या आंत जळतच होता. हे जनमेजय राजा! भीमसेन जेव्हां रागानें असा संतप्त झाला, तेव्हां त्याच्या कर्णादि इंद्रियांच्या द्वारांतून धूर, ज्वाला व ठिणग्या ह्यांसहवर्तमान अग्निच निघेल कीं काय, असें सर्वांना वाटूं लागलें; आणि त्यानें भुंवया चढविल्यामुळें त्याचें मुख तर कल्पांतसमयीं प्रकट होणाऱ्या कृतांतकालाच्या मुखाप्रमाणें पहावयालाही मोठें कठिण झालें! तेव्हां, हे जनमेजय राजा! युधिष्ठिरानें त्या महाबलिष्ठ भीमसेनाला आपल्या हातांनीं आवरून धरिलें, आणि तो त्याला म्हणाला, "बाबारे! असें करूं नको. जरा स्वस्थ रहा." ह्याप्रमाणें त्या क्रोधानें आरक्त नेत्र केलेल्या बलशाली भीमसेनाची समजूत केल्यावर, राजा युधि-

ष्ठिर आपला चुलता जो धृतराष्ट्र त्याच्यापुढें जाऊन हात जोडून उभा राहिला, आणि त्याच्याशीं तो बोलूं लागला.

अध्याय त्र्याहात्तरावा.

—:०:—

पांडवांचें प्रयाण.

युधिष्ठिर म्हणालाः—हे भरतकुलोत्पन्ना राजा, आम्हीं आतां काय करावें, ह्याची आपणच काय ती आज्ञा करा. कारण, आपण आमचे प्रभु असल्यामुळें निरंतर आपल्याच आज्ञेंत राहण्याची आमची इच्छा आहे.

धृतराष्ट्र म्हणालाः—हे अजातशत्रो धर्मराजा! तुमचें कल्याण असो. आतां मी तुम्हां सर्वांना आपल्या नगरीस परत जाण्याविषयीं अनुज्ञा देतों; तर तुम्ही आतां आपल्या सर्व वैभवासहवर्तमान निर्विघ्नपणें खुशाल परत जाऊन आपलें राज्य करा. शिवाय, माझें वृद्धाचें आणखी एक तुम्हांला सांगणें आहे, तें तुम्ही नीट लक्षांत ठेवा. कारण, मी जें जें काय तुम्हांला सांगतों, तें तें सारें तुमच्या अत्यंत कल्याणाचें असून पथ्यकर असेंच असतें. बा ज्ञानसंपन्न युधिष्ठिरा! तूंही शास्त्रपारंगत असून वृद्धांचा समागम करणारा आहेस. तेव्हां धर्मामध्यें किती नाजूक गोष्टींचा विचार येतो, हें तुला माहीतच आहे. हे भारता, जेथें ज्ञान असतें, तेथें शांति असावयाचीच. ह्याकरितां, तूं आतां शांत हो. पण हें तुला सांगण्याची सुद्धां गरज नाहीं. कारण, लांकडासारखा मऊ पदार्थच नसेल तेथें कुऱ्हाडीचा घाव बसणार कसा? लांकूड असेल तेथेंच तो बसणार! सारांश, दुर्योधनाच्या दुर्भाषणासंबंधानें तुझ्यासारख्या धैर्यशाली पुरुषाच्या मनांत कांहीं देखील किल्मिष राहणार नाहीं! उत्तम पुरुष हे दोषांकडे दृष्टि मुळींच न देतां गुणांचें मात्र ग्रहण करितात; वैरभाव मनांत आणीत नाहींत, व द्वेषही मनांत धरीत नाहींत. जे सज्जन असतात, त्यांच्याशीं कोणीं वैर केलेलें असलें तरी त्याची त्यांना आठवणही नसते पण त्यानें केलेल्या उपकारांचें मात्र ते वारंवार स्मरण करीत असतात; आणि प्रत्युपकाराची अपेक्षा न धरितां निरंतर परोपकारच करीत असतात. हे युधिष्ठिरा! नीच लोक असतात ते वादविवादांमध्यें अद्वातद्वा बडबड करितात; मध्यम पुरुष असतात ते जशास तसें उत्तर देतात; आणि उत्तम पुरुष असतात ते कोणीं मर्मभेदक भाषण केलें तरी कठोर उत्तर म्हणून कधीं देतच नाहींत. कठोर भाषणानें आपल्या अंतःकरणास कशा वेदना लागतात ह्याचा सज्जनांस पुरा अनुभव असल्यामुळें, दुसऱ्याच्या अपकाराचा प्रतिकार कसा करावा हें त्यांस माहीत असतांनाही दुसऱ्याच्या सत्कृतीचेंच ते स्मरण करीत राहतात; दुसऱ्याच्या अपकाराचें त्यांना स्मरणही होत नाहीं. ज्यांचें दर्शन झालें पुरे, कीं आनंदाचें भरतेंच येतें, असे जे साधु असतात, ते शिष्टमर्यादेचें कधींच उल्लंघन करीत नाहींत. अशाच साधुवृंदापैकीं तूंही एक असल्यामुळें, अशा प्रसंगीं यथायोग्यच वर्तन केलेंस. तेव्हां, बा युधिष्ठिरा! दुर्योधनाचें कठोर भाषण तूं कांहीं आतां मनांत ठेवूं नको. हे भारता! तुला सद्गुणांची मोठी आवड आहे. ह्याकरितां, मातृतुल्य गांधारी आणि पितृतुल्य असणारा वृद्ध व अंध होऊन बसलेला मी, ह्या आम्हांकडे तूं लक्ष दे. स्नेहीसुहृदांची गांठ पडेल आणि पुत्रांचेंही बलाबल कळेल, म्हणून 'करीनात का द्यूत?' असा मीं विचार केला. पण तें द्यूत इतक्या थराला पोहोंचेल हें माझ्या ध्यानींमनीं सुद्धां नव्हतें!

असो; आतां, हे राजा! तुझ्यासारखा शास्ता; आणि सर्वशास्त्रविशारद व विचारशील असा विदुर

मंत्री, ही जोडी मिळाल्यामुळें आम्हां कुरुवंशाजांना कशाची काळजी म्हणून उरली नाहीं. अ त सर्व कांहीं निर्धास्त झालें आहे. तुझ्यामध्यें धर्म, अर्जुनांत धैर्य, भीमाच्या ठिकाणीं पराक्रम, आणि पुरुषश्रेष्ठ नकुलसहदेवांमध्यें गुरू नी उत्तम सेवा हीं वास्तव्य करीत आहेत. ह्याकरितां, हे अजातशत्रो धर्मराजा! तुझें कल्याण असो. आतां तूं खांडवप्रस्थाला जा. दुर्योधनादि भ्रात्यांवरची तुझी बंधुप्रीति कायम राहो, व तुझ्या मनाचा कल धर्माकडेच असो.

वैशंपायन सांगतातः—हे जनमेजया! ह्याप्रमाणें धृतराष्ट्र राजानें सांगितलेल्या सर्व गोष्टी धर्मराज युधिष्ठिरानें मान्य केल्या; व तो आपले भ्रा त अ द्रौपदी यांसहवर्तमान, मेघगर्जनेसारखा ध्वनि करणाऱ्या रथांत बसून मोठ्या आनंदानें आपल्या इंद्रप्रस्थ नगराला निघून गेला.



अनुद्यूतपर्व.

अध्याय चौऱ्याहत्तरावा.

—:०:—

द्यूताचा पुनः विचार.

जनमेजय विचारतोः—हे ब्रह्मन्, सर्व संपत्ति घेऊन पांडवांना इंद्रप्रस्थाला जाण्याविषयीं धृतराष्ट्रानें आज्ञा दिली, असें समजल्यावर त्या धृतराष्ट्राच्या पुत्रांना काय बरें वाटलें असेल?

वैशंपायन सांगतातः—हे जनमेजय राजा, बुद्धिमान धृतराष्ट्र राजानें त्यांना जाण्याची आज्ञा दिली, असें समजतांच दुःशासन लवकर लवकर आपल्या भावाकडे गेला; आणि अमात्यांसहवर्तमान बसलेल्या दुर्योधनाजवळ जाऊन तो घाबऱ्या घाबऱ्या म्हणालाः—हे रथी–महारथीहो! एवढ्या श्रमानें आम्हीं जुळवून आणिलेला सारा घाट आमच्याच त्या थेरड्यानें पार ढांसळून टाकिला! त्यानें होतें नव्हतें तेवढें सर्व द्रव्य आमच्या शत्रूंच्या स्वाधीन करून त्यांनाही हातचें दवाडिलें!

हें दुःशासनाचें भाषण ऐकतांच दुर्योधन, कर्ण, सुबलपुत्र शकुनि वगैरे पांडवद्वेष्ट्यांनीं परस्परांच्या भेटी घेतल्या; आणि ते सारे एके ठिकाणीं जमून तात्काळ धृतराष्ट्राकडे गेले, व त्यांनीं आपल्या मोहक भाषणाला सुरुवात केली.

दुर्योधन म्हणालाः—हे राजा! देवांचा गुरु विद्वान बृहस्पति ह्यानें इंद्राला नीति सांगत असतां काय काय म्हटलें आहे तें आपल्या ऐकण्यांत नाहीं का? हे शत्रुनाशका! 'युद्ध करून म्हणा, किंवा युद्ध न करितां अन्य उपायांनी म्हणा, जे कोणी आपलें अनहित करितात, त्या शत्रूंचा हरप्रयत्नानें तूं घात कर,' असें स्वतः बृहस्पतींचें म्हणणें आहे. तर मग त्या पांडवांच्याच द्रव्यानें सर्व राजांस संतुष्ट करून, ते वश झाल्यावर पांडवांशीं आम्हीं युद्धच केलें तर त्यांत आमचा तोटा काय? अहो, ज्याच्या दांतांत विष भरलेलें आहे, असे क्रुद्ध सर्प प्राणघातास उद्युक्त झाले असतां त्यांना गळ्यांत बांधून अथवा पाठीवर घेऊन सोडून देण्याचा कोणी तरी विचार करील काय? बाबा! सर्पाच्या शेपटीवर आधीं पाय देऊं नये; आणि दिलाच तर त्याला जिवंत तरी ठेवूं नये. तीच गोष्ट पांडवांना लागू आहे. अहो! हे पांडव तर आतां क्रोधाला चढलेलेच आहेत. ते जर का आपलीं शस्त्रास्त्रें घेऊन रथावर चढले, तर चिडलेल्या सर्पाप्रमाणें आमचा अगदीं नायनाट करून टाकतील. अर्जुनानें तर अंगांत कवच घालून पाठीवर अक्षय्य भाते लटकाविलेले होते, व पुनःपुनः गांडीव धनुष्याला हात घालून दुःखाचे सुस्कारे टाकीत टाकीत तो कावऱ्याबावऱ्या इकडे तिकडे पहातच चालला होता. स्वतांचा रथ जोडून ती प्रचंड गदा उगारून भीमसेन मोठ्या लगबगीनें चालता झाला, असें ऐकितों. नकुलही आपला खड्ग व अर्धचंद्रयुक्त ढाल घेऊन गेला, व सहदेव आणि धर्मराज हे तर आपल्या मुद्रेवरून आपल्या मनांतील हृद्गत व्यक्त करून दाखवीत होते, असें म्हणतात. रथ्यांचे आणि महारथ्यांचे थवेच्या थवे रसातळास घालविणारे ते पांडव विपुल शस्त्रें व इतर युद्धसामुग्री घेऊन रथांत बसून सैन्य जुळविण्याकरितां गेले आहेत, ह्यांत काडीमात्र शंका नाहीं. कारण, आम्हीं त्यांचा भरसभेंत असाच कांहीं अपराध केला आहे कीं, त्याची आम्हांस ते कधींच क्षमा करणार नाहींत. त्याचप्रमाणें, द्रौपदीचे जे आम्हीं हाल हाल केले, ते त्यांच्यापैकीं कोणाला बरें सहन होतील? याकरितां, हे पुरुषश्रेष्ठा! आपलें कल्याण व्हावें एतदर्थ वनवासाचा पण लावून पुनः आम्ही पांडवांशीं द्यूत खेळतों. कारण, त्याच कल्पनेनें त्यांचा पाडाव करण्याला आम्ही समर्थ आहों. ह्या द्यूतांत त्यांचा पराजय झाल्यास त्यांनीं, व आमचा पराजय झाल्यास

आम्हीं—आजिनें परिधान करून घोर अरण्यांत जावें; आणि बारा वर्षे वनांत राहून नंतर सजातीयांच्या समजण्यांत न येतां तरावें वर्ष अज्ञातवासांत काढावें. आणखी त्या वर्षाच्या अवधींत जर कोणीं ओळखिलें, तर पुनः बारा वर्षें—त्यांनीं किंवा आम्हीं—वनवासास जावें, असा पण करून आतां द्यूताला आरंभ होऊं द्या; आणि त्या पांडवांना पुनः फांसे टाकून द्यूत खेळूं द्या. हे राजाधिराजा, आम्हांला असेंच केलें पाहिजे. कारण, आपल्या ह्या शकुनीला वशीकरण विद्येसह फांशांचें चांगलें ज्ञान आहे. यामुळें या कामीं आम्हांसच जय मिळणार ही आम्हांला खात्री आहे. मग आम्ही त्या तेरा वर्षांच्या अवधींत हवे तेवढे मित्र जुळवूं; व शत्रूला कधींही हार जाणार नाहीं अशा अफाट सैन्याची कडेकोट तयारी करून आपलें राज्य अगदीं अकुतोभय करून टाकूं. म्हणजे तितक्याही व्रतस्थपणानें राहून जरी कदाचित् त्यांनीं तेरावें वर्षही पार पाडलेंच, तरी, हे शत्रुतापका, आम्ही त्यांना जिंकून टाकूं. ह्याकरितां ह्या गोष्टीला तूं आपली संमति दे.

धृतराष्ट्राच्या चंचल वृत्तीचा कळस !

धृतराष्ट्र म्हणाला:—हं हं ! असें काय ! तर मग पांडव कितीही लांब गेले असले तरी त्यांना परत आणा; आणि तुम्ही म्हणतां असें द्यूत पुनः होऊं द्याच !

वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें धृतराष्ट्रानें आज्ञा दिली हें पाहतांच द्रोणाचार्य, सोमदत्त, बाल्हीक, कृपाचार्य, विदुर, अश्वत्थामा, पराक्रमी वैश्यापुत्र युयुत्सु, भूरिश्रवा, भीष्म आणि महारथी विकर्ण ह्या सर्वांनीं त्यास सांगितलें कीं, "पुनः द्यूताच्या फंदांत पडूं नका. आतां पुरे करा, आणि मुकाट्यानें रहा!" परंतु त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. पूर्वी सांगितलेल्या मोठमोठ्या हितचिंतक सुहृदांची इच्छा नसतांही त्या पुत्रप्रेमबद्ध धृतराष्ट्रानें त्या पांडवांना पुनः आव्हान केलेंच !

अध्याय पंचाहत्तरावा.

—:०:—

गांधारीधृतराष्ट्रसंवाद.

वैशंपायन सांगतात:—हे राजा जनमेजया ! नंतर, शोकानें विव्हळ झालेली धर्माचरणी गांधारी, पुत्रप्रेमानें प्रजाधिपति धृतराष्ट्राला म्हणाली:—अहो ! हा दुर्योधन जन्मास आला तेव्हांच त्या दूरदर्शी विदुरानें सांगितलें होतें कीं, 'ह्या कुलकलंक्याला खुशाल परलोकची वाट दाखवा !' कारण, हा उपजतांच कोल्ह्याप्रमाणें आरडला! यास्तव, हे भारता, हा कुरुकुलाचा घात करणारा आहे हें खास समजा. अहो ! आपल्याच दोषानें अगाध जलसंचयांत बुडून जाऊं नका. हे प्रभो ! मूर्ख व नीच लोकांच्या मतांच्या अभिमानाला पेटून आपल्या कुलाच्या भयंकर नाशाला आपणच करणीभूत होऊं नये. अहो ! बांधलेला बांध कोणी फोडून टाकील काय ? अथवा विझलेली आग वारा घालून पुनः कोणी पेटवील काय ? त्याचप्रमाणें, हे भरतवंशजश्रेष्ठा, अपराध गिळून मुकाट्यानें गेलेल्या कुंतीपुत्र पांडवांना पुनः खिजवावें हें उचित आहे काय ? आपण सर्व कांहीं जाणतच आहां. तथापि, आपणांला पुनः मी एका गोष्टीची आठवण देतें. ती गोष्ट हीच कीं, स्वभावतः ज्याची बुद्धि दुष्ट आहे, तो शास्त्राच्या किंवा कशाच्याच योगानें चांगल्या मार्गाला लागणें शक्य नाहीं. ह्याकरितां, वृद्धांनीं तरी असल्या मूर्खांच्या नादीं लागूं नये. आपल्या आज्ञेमध्यें आपले पुत्र असावे, पुत्राच्या आज्ञेमध्यें आपण राहूं नये. तुमच्यापासून मर्यादेचें उल्लंघन करावयास शिकून अखेर प्राणास मुकून तुम्हांस त्यांनीं सोडून जाऊं नये, एवढीच माझी इच्छा आहे. म्हणून

म्हणतें कीं, आपण ह्या कुळघातक दुर्योधनाचा त्याग करावा! महाराज, पूर्वी विदुरानें सांगितल्याप्रमाणें आपण केलें नाहीं, त्यामुळेंच हें आतां सर्व कुळाचा नाश करणारें फळ वाढून आलें आहे, यांत शंका नाहीं. महाराज, शांति, धर्म आणि न्याय ह्यांनीं युक्त असलेली बुद्धिच आपली कायम रहावी; तींत प्रमाद होऊं नये.कारण, ज्यांचें अंतःकरण क्रूर असतें, त्यांची लक्ष्मी नष्ट होते; आणि ज्यांचें अंतःकरण सत्त्वस्थ असतें, त्यांची लक्ष्मी वृद्धिंगत होऊन ती पुत्रपौत्रादिकांनाही प्राप्त होत असते.

राजा, ह्याप्रमाणें धर्मावर दृष्टि देऊन त्या गांधारीनें धृतराष्ट्राची प्रार्थना केली खरी; पण ती सारी व्यर्थ झाली. धृतराष्ट्रानें तिला साफ सांगितलें कीं, कुलाचा नाश होतो ना! खुशाल होऊं दे. त्याला आडकाठी करावयाला मी असमर्थ आहें. ह्या दुर्योधनप्रभृति मुलांच्या जर मनांत आहे, तर त्याप्रमाणेंच होऊं दे, आणि पांडवांना परत आणून त्यांच्याशीं माझ्या मुलांना द्यूत खेळूं दे.

अध्याय शहात्तरावा.

—:०:—

युधिष्ठिराचा पुनः पराभव!

वैशंपायन सांगतातः—राजा, इतकें होई पावेतों पांडव हे हस्तिनापुरापासून बऱ्याच लांबीच्या पल्ल्यावर जाऊन पोहोंचले होते. तरी तेथपर्यंत जाऊन प्रातिकामी नामक सारथ्यानें युधिष्ठिराला सांगितलें कीं, "हे भरतकुलोत्पन्ना! पित्याचा तुला असा निरोप आहे कीं, सभेमध्यें पट मांडून ठेविला आहे, तर तूं परत येऊन फांसे टाक, आणि पुनः द्यूत खेळ." राजा, हें ऐकून युधिष्ठिर म्हणालाः—हं! एकूण हा द्यूत खेळण्याचा प्रसंग ज्या अर्थी पुनः येऊन गुदरला, त्या अर्थी एवढीच गोष्ट खरी कीं, प्राण्यावर जे बऱ्यावाईटाचे प्रसंग येतात, ते केवळ दैवयोगानें येतात, आणि तो दैवयोग कशानेंच टाळतां येत नाहीं. हें द्यूताचें जें वृद्धाकडून आमंत्रण आलें आहे, तें साऱ्यांच्याच क्षयाला कारण आहे, हें मी पक्कें जाणून आहें. तरी सुद्धां त्याच्या आज्ञेचें उल्लंघन करण्यास माझें धैर्य होत नाहीं.

वैशंपायन सांगतातः—राजा, "सोन्याचा मृग कधीं कोणीं ऐकलाही नाहीं व पाहिलाही नाहीं. असें असतांही रामाला त्याचा लोभ उत्पन्न झाला, ह्यावरून विनाशकाल आला असतां पुरुषाच्या बुद्धीला विपर्यास पडतो हेंच खचीत!" असें बोलत बोलत पांडुपुत्र धर्मराज आपल्या भ्रात्यांसहवर्तमान परत फिरला, आणि शकुनीचें कपट जाणत असूनही तो कुंतीपुत्र पुनः द्यूताकडे वळला. राजा, ते पांडव पुनः जेव्हां त्या सभेंत आलेले दृष्टीस पडले, तेव्हां तेथें असलेल्या आप्तसुहृदांच्या मनाला फारच वाईट वाटलें. असो. पुढें ते दैवाच्या फेऱ्यांत सांपडलेले पांडव सर्व लोकांच्या नाशास कारणीभूत होणारें द्यूत पुनः केव्हां सुरू होतें म्हणून वाट पहात बसले. तेव्हां शकुनीनें बोलण्यास प्रारंभ केला.

शकुनि म्हणालाः—वयोवृद्ध धृतराष्ट्रानें तुमचें द्रव्य तुम्हांला परत दिलें, तें आम्हांला शिरसा वंद्य आहे. आतां, हे भरतवंशजश्रेष्ठा! एकाच महाधनाचा पण लावावयाचा आहे, तो ऐकून घे. तुम्हीं जर द्यूतामध्यें आमचा पराभव केला, तर रुरु नामक मृगाचीं अजिनें परिधान करून बारा वर्षेंपर्यंत आम्हीं घोर अरण्यांत निघून जावें; आणि कोणाच्या समजण्यांत न येईल अशा रीतीनें तेराव्या वर्षीं सजातीयांमध्यें रहावें. त्याचप्रमाणें, आम्हीं जर तुमचा पराभव केला, तर तुम्हींही अजिनें परिधान करून द्रौपदीसहवर्तमान बारा वर्षेंपर्यंत वनांत वास्तव्य करावें; व कोणाच्या समजण्यांत न येतां तेरावें वर्ष सजाती-

यांमध्यें काढावें; व त्या तेराव्या वर्षांत कोणी ओळखल्यास पुनः बारा वर्षें वनवास भोगावा; आणि जर तेरावें वर्ष कोणाच्या ओळखींत न येतां पार पडलें, तर मग यथायोग्य रीतीनें खुशाल तुम्हीं म्हणा किंवा आम्हीं म्हणा—पुनः आपलें राज्य भोगावें. तर, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा! अशा पणानें फांसे टाकून आमच्याशीं तूं पुनः द्यूत खेळ.

राजा, हें शकुनीचें भाषण संपतांच सभेंतील सभासदांनीं एकदम आपआपले हात वर केले; आणि मनामध्यें अत्यंत उद्विग्न होऊन ते म्हणाले, "ह्या द्यूताचा परिणाम मोठा भयंकर होईल. ह्या दुर्योधनाला कोणीच कांहीं सांगत नाहीं! तेव्हां धिक्कार असो ह्या त्याच्या बांधवांना!"

वैशंपायन सांगतातः—राजा, असे नानाप्रकारचे लोकापवाद कानांवर पडत असतांही, द्यूतास बोलाविलें असतां मी गेलों नाहीं तर लोक मला काय म्हणतील याची लाज बाळगून तो कुंतीपुत्र धर्मराजा फिरून त्या द्यूतास प्रवृत्त झाला; आणि वनवासांतही तीर्थाटन, सत्समागम वगैरे धर्मच होण्याचा संभव आहे, असें त्यानें मनांत आणिलें. राजा, तो महाबुद्धिमान युधिष्ठिर, याचा काय परिणाम होणार हें पूर्णपणें जाणत होता, तरी कौरवांचा विनाशकाल जवळच आला आहे असें मनांत म्हणत म्हणत तो द्यूतास प्रवृत्त झाला.

युधिष्ठिर म्हणतोः—स्वधर्माचें संरक्षण करणाऱ्या माझ्यासारख्या राजानें आव्हान झालें असतां त्याला पराङ्मुख कसें व्हावें? ह्याकरितां, हे शकुने, तुझ्याशीं मी द्यूत खेळतों.

शकुनि म्हणालाः—बैल, घोडे, असंख्य धेनु, अगणित शेळ्यामेंढ्या, हत्ती, खजिने, सुवर्ण, दासी सर्व कांहीं असेल तेवढें टाकून वनवासास जाण्याचा आमचा हा आतां एकच पण आहे. तुम्ही किंवा आम्ही जो कोणी हरेल, त्यानें बारा वर्षें वनवास करावा, आणि तेरावें वर्ष आपल्या सजातीयामध्यें राहून अज्ञातवासांत काढावें. तर, हे पुरुषश्रेष्ठहो! ह्याच पणानें आपण उभयतां आतां द्यूत खेळूं.

जनमेजया राजा, ह्याप्रमाणें शकुनीनें एक वेळ सांगतांच कुंतीपुत्र धर्मराजानें तो पण कबूल केला; आणि सुबलपुत्र शकुनि ह्यानें फांसा टाकिला. पण ती काय त्याच्या केवळ हातची गोष्ट! फांसा त्याला अनुकूल असा पडतांच, 'हं, बस. चला जिंकलें!' इतकेंच शब्द त्यानें तात्काळ युधिष्ठिराला सांगितले.

अध्याय सत्याहत्तरावा.

—:०:—

दुःशासनानें दुःखावर दिलेले डाग.

वैशंपायन सांगतातः—तदनंतर, पराजित झालेले ते पांडव वनवासास जावयास तयार झाले, तेव्हां त्यांनीं अनुक्रमानेंच आपआपलीं अजिनें परिधान केलीं. तेव्हां शत्रूंच्या नरडीचा घोंट घेण्याचें सामर्थ्य असलेले ते पांडव, राज्याचा अपहार झाल्यामुळें कमरेला अजिनें गुंडाळून वनवासास निघाले असें पाहतांच दुःशासनाच्या तोंडाची खीळ निघाली!

दुःशासन म्हणालाः—हें ठीक झालें! आजपासून ह्या आमच्या महात्म्या दुर्योधनाचें राज्य सुरू झालें. कारण, पांडव पराजित होऊन काळचक्राच्या फेऱ्यांत सांपडले आहेत. आमच्या ह्या शत्रूंपेक्षां आम्ही गुणानें श्रेष्ठ व वयानेंही ज्येष्ठ आहों, हें जाणूनच आज पहा—गुप्तमार्गानें सारे देवच आमच्याकडे येऊन आमचे पाठिराखे झाले आहेत, असें आम्हांस वाटतें! नाहीं तर त्यावांचून कां ह्या गोष्टी घडावयाच्या? अहो, ज्यांत बुडी मारली तर ठाव सुद्धां लागावयाचा नाहीं, अशा खोल नरकामध्यें ह्या पांडवांना आम्हीं कायमचेच ढकलून दिलें म्हणून समजा. आतां राजविलासांचें कीं राज्याचें फिरून त्यांनीं नांव सुद्धां काढाव-

याला नको. राशींच्या राशी सुवर्णाच्या व रत्नांच्या पाहिल्या, तेव्हां त्यांचे डोळे फिरून गेले होते; त्यांच्या डोळ्यावर धूर चढला होता; त्यांच्या अंगांत माज आला होता. त्या वेळेस 'ही ही' करून दांत काढून आम्हां धृतराष्ट्राच्या पुत्रांना हसलेले पांडव ते हेच बरें का? तेच आज कफ-ल्लक होऊन रानोमाळ भटकायला चालले आहेत! ह्याकरितां, ह्यांना आतां हीं चित्रविचित्र चिलखतें व पाजळलेलीं हत्यारें. कशाला पाहिजेत? काय आणला आहे शूरत्वाचा आव! घ्या हिसकून तीं सारीं! आणि हे झोंकदार अंगरखे, लकलकीत मुकुट, झकपक श्रीमंती थाटाचीं धोतरेंपातरें तरी त्यांना कशाला हवीं? शकुनीनें पणामध्यें घातलेल्या शर्तीप्रमाणें त्यांचीं हीं वस्त्रेंभूषणें घ्या काढून, आणि लावा त्यांना हीं चामडीं नेसावयाला. पाहातां काय? कायहो आजपर्यंत ह्या पांडवांचा तोरा! 'आमच्यासारखे पुरुष साऱ्या त्रैलोक्यांत नाहींत' अशी सदानकदा ह्यांना घमेंडी असे. ह्यांना आज आपण केवळ पोंचट तिळाप्रमाणें निःसत्त्व आहों, या आपल्या स्वरूपाची ओळख पटूं द्या. यज्ञाची दीक्षा घेतली, आणि यज्ञकर्ते यजमान उदारबुद्धीचे असले, तर त्यांच्यामध्यें चर्मांबरें परिधान करण्याची चाल असलेली कधीं कधीं दृष्टीस पडते. पण आज बळाची शेखी मिरविणारे पांडव यज्ञाची दीक्षा वगैरे कांहींएक घेतली नसतांही कसे चामडीं नेसून बसले आहेत पहा! अहो, हे कुंतीचे पुत्र आपण द्रौपदीचे पति म्हणवितात, पण हे खरोखर नपुंसक आहेत! आणि सोमक कुलांत उत्पन्न झालेला द्रुपद राजा तर आपल्याला केवढा शहाणा समजतो! पण त्या खुळ्यानें आपली सोन्यासारखी कन्या द्रौपदी या पांडवांसारख्या षंढांना देऊन तिच्या जन्माची माती मात्र करून टाकिली! कोणताच अर्थ साधला नाहीं! अहाहा पांचालराजकन्ये द्रौपदी! हे भिकारी, दुर्बळ, अंगाभोंवतीं लकतऱ्या गुंडाळून बसलेले अशा ह्या पतींचें तूं वनामध्यें दर्शन घेतलेंस, म्हणजे तुझा आत्मा किती पण गारीगार होईल म्हणतेस? आणि तुझ्या मनाला काय पण आनंद वाटेल? आतां तुला मी एक युक्ति सांगतों. ती ही कीं, तूं आतां येथल्या येथेंच तुला वाटेल तो दुसरा नवरा करून घे. तो हुडकून काढावयाला तुला कांहीं लांब जावयाला नको. हे येथें जमलेले सारे कौरव मोठे क्षमाशील, कट्टे जितेंद्रिय, आणि उत्कृष्टवैभवसंपन्न आहेत. ह्यांतून कोणालाही तूं पतीच्या नात्यानें पसंत कर. म्हणजे ह्यांच्या बरोबर तुला हालअपेष्टा भोगावयाला नकोत. अग! न उगवणारे तीळ, पेंढा भरलेलीं जनावरें, किंवा वांझ झालेले यव जसे निष्फळ—पोंचट, तसेच हे पांडवही केवळ पोंचट आहेत. तेव्हां अशांना धरून राहिल्यानें तुझ्या पदरीं फळ तें काय पडणार? खरोखर ह्या नपुंसकांचा समागम करून तुला व्यर्थ कष्ट मात्र भोगावे लागतील!

भीमसेनाची भयंकर प्रतिज्ञा.

वैशंपायन सांगतातः—राजा, ह्याप्रमाणें त्या दुष्ट धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनानें पांडवांच्या कर्णपटलावर मर्मभेदक शब्दांचा सारखा वर्षाव चालविला, तेव्हां अत्यंत असहिष्णु भीमसेनाच्यानें तें सहन करवेना. त्याच्या हृदयाला अगदीं कींव आल्यामुळें त्यानें उच्च स्वरानें त्याची निर्भर्त्सना करून बोलतां बोलतां त्याला थांबविलें; आणि हिमालय पर्वतावरील सिंह जसा कोल्ह्यावर तुटून पडतो, तशा रीतीनें तो भीमसेन एकदम त्याच्या अंगावर चवताळून जाऊन त्याला म्हणाला, "अरे! तूं जी ही शुष्क बडबड चालविली आहेस, ती दुष्ट व क्रूर लोकांच्या तोंडीं शोभण्यासारखी आहे. अरे! गांधारदेशाधिपति शकुनीच्या कपटयुक्त अक्षविद्येच्या जोरावरच तुझ्या साऱ्या फुशारक्या ना? पण शब्दरूप बा-

णांनीं ज्याप्रमाणें सांप्रत तूं आमच्या काळजाला घरें पाडीत आहेस, त्याचप्रमाणें युद्धामध्यें तुझें मी खरोखरीच काळीज फोडूं लागलों असतां तुला ह्या तुझ्या कृत्याचें चांगलें स्मरण देईन, हें पक्कें लक्ष्यांत ठेव; आणि एवढ्यानेंच ह्या गोष्टीचा शेवट होईल असें तूं समजूं नको. तर क्रोध व लोभ ह्यांचे गुलाम बनून तुझ्यापुढें जे कोणी लांगूलचालन करून तुला पाठीशीं घालणारे आहेत, त्यांना सुद्धां सहकुटुंब सहपरिवार यमसदनास रवाना करीन, हें तूं पक्कें समजून ठेव."

वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें अजिनें परिधान केलेला भीमसेन बोलूं लागला असतां, दुःशासनानें त्याच्याच सारखे हातवारे करून त्याची टवाळी आरंभिली; आणि ह्याचा शत्रुवधाचा मार्ग केवळ धर्मांत गुंतून पडल्यामुळेंच कुंठित झाला आहे, अशी संधि पाहून तो उर्मट दांडगा दुःशासन त्याची अधिकाधिकच कुचेष्टा करूं लागला;आणि "अहो बैलोबा!अहो नंदीबैल!" अशा निर्लज्जपणानें त्याला हांका मारूं लागला !

कौरववधार्थ पांडवप्रतिज्ञा.

भीमसेन म्हणालाः—दुष्टा दुःशासना ! हें काळजास झोंबणारें भाषण तुझें तुलाच शोभतें. नाहीं तरी भामटेगिरी करून डल्ला मारिलेल्या द्रव्यावर बढाया मारण्यास दुसरा कोण तयार होणार? अरे ! समरांगणामध्यें हा कुंतीपुत्र भीमसेन तुझें वक्षस्थळ फोडून त्यांतील रक्त जर घटाघट न प्याला, तर तो पुण्यवान लोकांच्या स्थानाला जाणारच नाहीं ! समजलास ? सान्या धनुर्धान्यांच्या डोळ्यांसमक्ष सर्व धृतराष्ट्रपुत्रांचा संग्रामामध्यें वध करून मला समाधान करून घेण्याची वेळ लवकर येईल हें सत्य सत्य सांगून ठेवतों !

वैशंपायन सांगतातः—सभेंतून पांडव जाऊं लागले, तेव्हां राजा दुर्योधनाच्या हृदयांत तर काय आनंदाच्या उकळ्यावर उकळ्या फुटूं लागल्या! तो त्याच्या भरांत असतां, भीमसेन सिंहगतीनें चाललेला पाहून दुर्योधन त्याच्या पाठीमागें हळूच जाऊन व त्याच्याचसारखें अंग हालवून त्याच्यामागें तो त्याची कुचेष्टा करूं लागला. तेव्हां किंचित् मागें मुरडून भीमसेन म्हणाला, "एवढ्यानेंच शेफारून जाऊन कृतकृत्य झालों असें समजूं नको. तूं अद्यापि काय पाहिलें आहेस? मूर्खा ! ह्याचें उत्तर तुला मी लवकरच तुझ्या परिवारासह ठार मारूनच देईन, समजलास ?" इतकेंच उत्तर देऊन त्या धर्मराजाच्या पाठीमागून चालत असलेल्या मानी व बलाढ्य भीमसेनानें सर्व अपमान सहन करून क्रोध आवरून धरिला, तथापि पुनः राहवेना म्हणून थोडासा कौरवसभेकडे वळून तो पुनः बोलूं लागला.

भीमसेन म्हणालाः—अहो ! या दुर्योधनाचा प्राण मी घेईन, कर्णाचा समाचार अर्जुन घेईल, व कपटानें द्यूत खेळणाऱ्या शकुनीला हा सहदेव यमसदनास पाठवील. आमचें जर कौरवांशीं युद्ध झालें, तर ही माझी प्रतिज्ञा देव खचीत शेवटास नेईल ह्यांत तिळमात्र शंका नाहीं. हें माझें भाषण असें तसें नव्हे; तर मोठ्या महत्वाचें आहे, हेंही मी ह्या सभेला सांगून ठेवितों. या पातकी दुर्योधनाचा मी युद्धामध्यें गदेनें वध करीन; त्याचें मस्तक मातींत घालून पायानें कचाकच तुडवीन; आणि या बडबडबिर्येत शूर असलेल्या कठोरभाषणी दुरात्म्या दुःशासनाचें रक्त मृगराज सिंहाप्रमाणें घटाघट प्राशन करीन !"

अर्जुन म्हणालाः—हे भीमसेना ! सज्जनांच्या मनांतील उद्देश करावयाच्या आधीं तोंडातून कधींच बाहेर पडत नसतो. ह्याकरितां कोणतीच गोष्ट आज बोलून दाखविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आजपासून चौदाव्या वर्षी काय काय होईल तें साऱ्यांना दिसेलच !

भीमसेन म्हणालाः—आणखी तें काय दिसणार ? दुर्योधन, कर्ण, दुरात्मा शकुनि आणि

आणि चौथा दुःशासन ह्या चौघांचें रक्त ही भूमि यथेच्छ प्राशन करणार !

अर्जुन म्हणाला:—हे भीमसेना ! हा मत्सरानें भरलेला, आमचें होईल तितकें वाईट करण्याविषयीं दुसन्यास भर देणारा, आणि पक्का बडबड्या जो कर्ण, त्याचा तुझ्या आज्ञेवरून मी युद्धांत शिरच्छेद करीन. हे सभासदहो ! भीमसेनाचा मनोरथ सिद्धीस नेण्याकरितां हा अर्जुन प्रतिज्ञा करतो आहे ही ऐकून ठेवा. कर्ण आणि कर्णाचे अनुयायी ह्यांचा मी आपल्या बाणांच्या योगानें संग्रामामध्यें वध करीन. ह्याप्रमाणें बुद्धीला भुरळ पडून जे कोणी राजे माझ्याशीं युद्ध करावयास येतील, त्या सर्वांनाही मी आपल्या बाणांच्या योगेंकरून यमसदनास पाठवीन. अहो, हिमालय पर्वत जर आपली जागा सोडून दुसरीकडे जाईल, सहस्ररश्मि सूर्य जर काळाठिक्कर पडेल, चंद्रांतील शीतलपणा जाऊन तो जर जळजळीत गोळा बनेल, तरच माझ्या सत्यप्रतिज्ञेचा भंग होईल ! आजपासून चौदाव्या वर्षी दुर्योधनानें सत्कारपूर्वक जर आमचें राज्य आम्हांस दिलें नाहीं, तर इतक्या गोष्टी निःसंशय घडून येतील !

वैशंपायन सांगतात:—राजा, ह्याप्रमाणें कुंतीपुत्र अर्जुनानें प्रतिज्ञा केलेली ऐकून, सुबलपुत्र शकुनीचा प्राण घेऊं इच्छिणारा अतुलप्रतापी व महान वैभवशाली माद्रीचा पुत्र सहदेव क्रोधानें आरक्त नेत्र करून सर्पाप्रमाणें सुस्कारे टाकीत टाकीतच बोलूं लागला.

सहदेव म्हणाला:—हे मूर्ख शकुने ! तुझ्या हातांत आहेत ते फांसे आहेत असें वाटतात खरे; पण तो तुझा निवळ भ्रम होय. ते फांसे नव्हेत रे नव्हेत ! हे गांधारकुलाच्या शुभ्र यशःपटावर काजळाचा बोळा फिरविणाऱ्या शकुने ! समरांगणामध्यें यमयातनांतून लवकर सुटका होण्यासाठीं हे तीक्ष्ण बाण तूं वर म्हणून मागून घेतलेले आहेस, ह्याची आतां तरी तुला नीट ओळख पटूं दे. अरे ! आमच्या भीमसेनानें आपल्या बंधूंसहवर्तमान तुला अनुलक्षून जितकें जितकें म्हणून बजावून ठेविलें आहे, तितकें तितकें कर्म पूर्णपणें शेवटास नेण्याचें काम माझें आहे. ह्याकरितां, ह्या लोकांतील जीं जीं कांहीं कृत्यें करून घ्यावयाचीं तुझीं शिल्लक राहिलीं असतील, तीं तीं सर्व लवकर उरकून घे ! कारण, हे सुबलपुत्रा, तूं जर क्षात्रधर्माला अनुसरून माझ्यापुढें समरांगणांत उभा राहशील, तर मी आपल्या सामर्थ्यानें तुला तुझ्या बांधवांसहवर्तमान होतास की नव्हतास असें करून टाकीन, हें नीट लक्षांत ठेव !

हे लोकाधिपते जनमेजया ! सहदेवाचें हें भाषण श्रवण केल्यानंतर, मनुष्यांमध्यें अतिशयच सुंदर जो नकुल, त्यानें बोलावयास सुरुवात केली.

नकुल म्हणाला:—दुर्योधनाची मर्जी संपादन करण्याकरितां उतावीळ झालेल्या ज्या धृतराष्ट्रपुत्रांनीं ह्या द्यूतामध्यें द्रुपदकन्येला अनुलक्षून मर्मभेदक भाषणें केलीं आहेत, ते लोक काळाच्या जबड्यांत सांपडलेले असल्यामुळें मरणाच्या दारीं तर बसलेलेच आहेत. त्या बहुतेक धृतराष्ट्रपुत्रांना मी यमसदनास पाठवीन. द्रौपदी जितकी धर्मराजाच्या आज्ञेंत वागते, तितकाच मीही त्याच्या आज्ञेंत वागणारा आहें. याकरितां, त्यांची जर आज्ञा होईल, तर थोडक्याच काळांत पृथ्वीवर धृतराष्ट्राचा पुत्र म्हणून ठेवणार नाहीं !

वैशंपायन सांगतात:—राजा, ह्याप्रमाणें दुर्धर प्रतिज्ञा केल्यानंतर ते सर्व महान पराक्रमी पुरुषश्रेष्ठ पांडव धृतराष्ट्राच्या जवळ गेले.

अध्याय अठ्याहत्तरावा.

—:०:—

पांडवांस विदुराचा उपदेश.

युधिष्ठिर म्हणाला:—हे भरतवंशजश्रेष्ठ राजा

धृतराष्ट्रा, अहो वृद्ध आजोबा भीष्म, अहो विदुर काका, गुरुवर्य द्रोणाचार्य, अहो कृपाचार्य, हे अश्वत्थामन्, हे सर्व धृतराष्ट्रपुत्रहो, हे युयुत्सो, हे राजा सोमदत्ता, महाराज बाल्हीका व इतर सभासदहो, आम्ही आज आपणां सर्वांचा निरोप घेऊन वनामध्यें जातों. परत आल्यावर आतां आपली व आमची भेट !

वैशंपायन सांगतातः—राजा, ह्याप्रमाणें युधिष्ठिरानें निरोप घेतला असतां, लज्जेनें खालीं मान घातलेल्या भीष्मप्रभृतींनीं तोंडांतून एकही चकार शब्द काढिला नाहीं, त्यांनीं मनामध्यें मात्र त्या विचारशील धर्मराजाचें कल्याण चिंतिलें.

विदुर म्हणालाः—हे कुंतीपुत्रहो ! ही तुमची माता महासाध्वी राजकन्या कुंती शरिरानें अत्यंत सुकुमार असून जन्मापासून तिनें राजसुखांतच दिवस काढिलेले आहेत. तेव्हां तिनें अरण्यांत जाणें हें मला प्रशस्त दिसत नाहीं. ह्याकरितां तिला माझ्या घरीं राहूं द्या. तिचा होईल तेवढा मानमरातब मी राखीन. तुम्ही सदासर्वदा सुखरूप असा.

राजा, हें विदुराचें बोलणें ऐकून ते सर्व पांडव त्याला म्हणालेः—हे निष्पापा ! आपण म्हणतां त्याप्रमाणें कुंतीला खुशाल येथें राहूं द्या. आपण आमचे चुलते असल्यानें पितृसमानच आहां; आणि आम्हीही सर्व आपले अंकित आहों. आम्हांला आपलाच काय तो सर्वस्वीं आधार आहे. यास्तव, हे ज्ञानवर्य ! आपल्या आज्ञेप्रमाणें वागण्यास आम्ही सिद्ध आहों. विशेषतः आम्हांला वडील आपणच आहां. तस्मात्, हे महामते, आणखी जें कांहीं आमच्या हातून होण्यासारखें असेल, त्याची आज्ञा व्हावी.

विदुर म्हणालाः—हे भरतकुलभूषणा युधिष्ठिरा! हें माझें म्हणणें तूं नीट ध्यानांत ठेव. अरे ! केवळ अधर्मानेंच जो पुरुष जिंकिला गेलेला असतो, तो पराजयाचें मुळींच दुःख मानीत नाहीं. तूं धर्मज्ञानांत प्रवीण आहेस, अर्जुन युद्धामध्यें हटकून विजय संपादणारा आहे, भीमसेन शत्रूंचे प्राण घेण्यांत पारंगत आहे, नकुल धनसंचय करणारा आहे, त्याचप्रमाणें सहदेव मोठा निग्रही आहे, धौम्य ऋषि ब्रह्मज्ञानामध्यें अग्रगण्य आहेत, आणि धर्मानें वागणारी द्रौपदी तर धर्म व अर्थ ह्या दोहोंमध्येंही कुशल आहे. शिवाय, तुम्ही एकमेकांवर जीव कीं प्राण करणारे आहां. त्यामुळें एकमेकांच्या दर्शनानें सुद्धां तुम्हांला आनंदच होतो; आणि असल्या स्थितींत तुम्ही संतोषानें राहणारे असल्यामुळें, तुमच्यामध्यें फूट पाडावयालाही शत्रूला जागा मिळावयाची नाहीं. तेव्हां असे जे तुम्ही, त्या तुमच्याकडे मन ओढवणार नाहीं असा या पृथ्वीच्या पाठीवर कोण आहे?

हे भरतकुलभूषणा युधिष्ठिरा ! मनाची शांति ढळूं न देणें हा जो तुझा नियम, तोच तुझ्या सर्व प्रकारच्या कल्याणास कारणीभूत होणार आहे. त्याच्यापुढें इंद्रासारखा शत्रु आला तरी देखील त्याचें कांहीं चालणार नाहीं. महर्षीसारख्या ज्ञानीजनांची तर तुझ्यावर अतोनात कृपा आहे. पूर्वी हिमालय पर्वतावर तुला मेरुसावर्णीनें उपदेश केला; वारणावत नगरामध्यें कृष्णद्वैपायनांनीं तुला ज्ञान सांगितलें; भृगुतुंग पर्वतावर तुला परशुरामाचा अनुग्रह झाला; दृषद्वती नदीच्या तीरीं शंकरांनीं तुला तत्वज्ञान सांगितलें; अंजन पर्वतावर असित महर्षींपासूनही तूं कांहीं रहस्य श्रवण केलेंसच; कल्माष नदीच्या तीरीं असलेल्या भृगु महर्षींचें तर तूं शिष्यत्वच पतकरिलें आहेस; नारद मुनींना तर तुला वारंवार भेटण्यावांचून चैनच पडत नाहीं; आणि धौम्य मुनि तर प्रत्यक्ष तुझे पुरोहित—कुलगुरुच—आहेत. आणखी तें काय पाहिजे ? तेव्हां अशा महर्षींच्या कृपाप्रसादानें तुला जी अनुपमेय पारलौकिक बुद्धीची जोड मिळाली आहे, तिचा तूं त्याग करूं नको.

हे धर्मराजा ! तुझी पारलौकिक बुद्धि कीर्ति

बरें अप्रतिम आहे? खरोखर तिच्यामध्यें तूं इला-पुत्र पुरूरव्याला सुद्धां मागें सारशील! सामर्थ्यानें तर तूं इतर राजांना जिंकणारा आहेस; धर्माचरणामध्यें तुझी बरोबरी मोठमोठ्या ऋषींनाही करणें परम दुर्घट! इतकें सर्व तर तुझ्या अंगीं आहेच; पण एवढ्यानेंच सारें संपलें असें मात्र तूं समजूं नको. तर इंद्रापासून जय, यमापासून क्रोधाचें संयमन, कुबेरापासून दातृत्व, आणि वरुणापासून वशीकरण, हे गुण प्राप्त करून, घेण्याकडे तुझ्या मनाचा ओढा असूं दे. स्वार्थत्याग, सौम्यपणा व परोपजीवन हे गुण तूं जलापासून शिकून घे. तसेंच पृथ्वीपासून क्षमा, सूर्यमंडलापासून सर्व प्रकारचें तेज, वायूपासून बल, आणि आकाशापासून मनाची उदारता, हीं तूं संपादन कर.

असो. आतां तुम्हांला सदासर्वदा आरोग्य प्राप्त होवो; आणि तुमचें कल्याण असो. तुम्ही परत आलां म्हणजे मी तुम्हांला भेटेनच. हे युधिष्ठिरा! विपत्ति आली म्हणजे धर्म व अर्थ ह्यांसंबंधाचीं संकटें वारंवार उद्भवतात. ह्याकरितां, जें जें कार्य करावयाचें, तें तें प्रसंग पाहून करीत असावें. हे कुंतीपुत्रा! जा तर आतां. हे भरतकुलभूषणा! तुझें कल्याण असो. आतां आम्हीं तुला कृतकृत्य होत्साता सुखरूप परत आलेला पहावा, एवढीच इच्छा आहे. अरे! तुम्हीं पूर्वी कोणाचें कधीं कांहीं वाईट केलें नाहीं. यामुळें, परत आल्यावर सर्व प्रजाजनांचीं अंतःकरणें तुमच्याकडे ओढतील याविषयीं शंका नको.

राजा, याप्रमाणें विदुरानें केलेला उपदेशानुग्रह पांडुपुत्र युधिष्ठिरानें शिरसा वंद्य केला; आणि 'आज्ञेप्रमाणेंच चालेन,' असें सांगून तो अमोघ पराक्रमी युधिष्ठिर, भीष्म व द्रोणाचार्य यांस नमस्कार करून अरण्यांत जाण्याकरितां निघाला.

अध्याय एकुणऐशींवा.

—:०:—

सर्वांचा निरोप.

वैशंपायन सांगतातः—राजा, युधिष्ठिर जेव्हां वनांत जावयास निघाला, तेव्हां द्रौपदी ही यशस्विनी कुंतीकडे गेली; आणि अत्यंत दुःखाकुल होऊन तिनें त्या कुंतीचा व इतर स्त्रियांचाही निरोप घेतला. नंतर, वयोमानाप्रमाणें कोणाला नमस्कार व कोणाला आलिंगन वगैरे देऊन ती जाऊं लागली, तेव्हां पांडवांच्या अंतःपुरामध्यें मोठीच रडारड सुरू झाली. द्रौपदीला निघालेली पाहतांच कुंतीला तर पराकाष्ठेचें दुःख झालें; आणि गहिंवर दाटून आल्यामुळें तिच्या तोंडून एक अक्षरही निघेना. सरतेशेवटीं कांपऱ्या कांपऱ्या स्वरानें ती बोलूं लागली

कुंती म्हणालीः—मुली! खरोखर हा तुझ्यावर केवढा तरी प्रसंग ओढवला आहे? प्रारब्धच फिरलें त्याला काय करावयाचें! म्हणून आलेला हुंदका गिळून टांक; व शोक करीत बसूं नको. स्त्रीधर्म जाणणारी तुझ्यासारखी दुसरी कोण आहे? सुशीलपणा आणि सदाचरण तर तुझ्या अगदीं अंगवळणींच पडलेलें आहे. केव्हांही तुझ्याकडे पहा! तूं आपली प्रसन्न आणि हसतमुखच असावयाची! तेव्हां भ्रताराशीं कसें वागावें हें तुला सांगावयाची गरजच नाहीं. आणखी तुझ्या अंगांत किती तरी सद्गुण आहेत! हे साध्वी! खरोखरच तूं आपलीं दोन्ही कुलें भूषणभूत केलीं आहेस. हे द्रौपदि! तुझ्या कीर्तिरूप शुभ्रपटावर कालिमेचा एक छटाही कधीं आला नाहीं. तुझें तेज कांहीं अपूर्व आहे. तुझ्या क्रोधानलानें हे कौरव दग्ध झाले नाहींत, हें तरी त्यांचें भाग्यच समजलें पाहिजे. आतां माझ्या अभीष्टचिंतनाच्या पाठबलावर मार्गांतून तूं निर्विघ्नपणें

जा. अपरिहार्य गोष्टींबद्दल साध्वी स्त्रिया कधींच दुःख करीत नाहींत. तूं तर महान धर्माचें संरक्षण केलेलें आहेस; तेव्हां तूं ह्या संकटांतून लवकरच मुक्त होशील. वनामध्यें जाऊन तुम्हीं रहाल त्या वेळीं ह्या माझ्या सहदेवाकडे तूं निरंतर लक्ष ठेवीत जा. म्हणजे त्या बुद्धिमान पुत्राचा अशा संकटांतही धीर खचणार नाहीं!

राजा, ह्याप्रमाणें कुंतीनें सांगितलें असतां, 'आज्ञा' असें म्हणून ती राजपत्नी द्रौपदी चालूं लागली. त्या वेळीं तिच्या नेत्रांतून एकसारख्या अश्रूंच्या धारा वहात असल्यामुळें तिचें सर्वांग भिजून चिंब झालें होतें. शिवाय ती रजस्वला असल्यामुळें तिचे केंस पाठीवर मोकळे सुटले होते; व वस्त्रही एकच असून तें अशुद्धानें लिडबिडलें होतें! अशा स्थितींत द्रौपदी रडत रडत जाऊं लागली, तेव्हां कुंतीही डोळे पुशीत पुशीत तिच्या मागोमाग गेली. तों, ज्यांचीं वस्त्रें व भूषणें हिरावून घेतलीं आहेत, हरणांचीं कातडीं ज्यांनीं कमरेभोंवतीं गुंडाळलेलीं आहेत, लज्जेनें ज्यांनीं आपल्या माना किंचित् खालीं घातल्या आहेत, हर्षानें तल्लीन झालेल्या शत्रूंनीं ज्यांच्या भोंवतीं गराडा दिला आहे, आणि स्नेहीसुहृद् ज्यांच्याकरितां धाय मोकलून रडत आहेत, असे आपले सर्व पुत्र तिच्या दृष्टीस पडले. राजा, आपल्या मुलांची ती दुर्दशा पाहून त्या माऊलीला काय बरें वाटलें असेल? ते राजबिंडे प्रत्यहीं रत्नजडित अलंकारांनीं व राजचिन्हांनीं युक्त असलेले प्रसन्नमुद्रेनें पुढें यावयाचे, तेच ह्या वेळीं केवळ भणंगभिकाऱ्यांसारखे दीन झालेले पाहून कुंतीच्या काळजानें ठाव सोडिला ह्यांत आश्चर्य तें कशाचें? तिच्या अंतःकरणाला एकदम दुःखाचा कढ आला, आणि ती प्रत्येक मुलाला कवटाळून धरून विलाप करूं लागली.

कुंतीचा विलाप.

कुंती म्हणाली:—बाबांनो! कोणी याचक आला तर असलेला पदार्थ उचलून द्यावयाला तुमचा हात सदासर्वदा पुढें असे; तुमची भक्ति पाहिली तर देवब्राह्मणांवर कशी अगदीं निस्सीम; देवाची पूजाअर्चा तर तुमच्या हातून कधींच टळलेली नाहीं; पूर्वेचा सूर्य एक वेळ पश्चिमेस उगवेल, पण असत्य भाषण तुमच्या मुखांतून कधींही निघावयाचें नाहीं; सदाचार, सद्धर्म, नीति ह्यांचें तेज तर तुमच्या अंगीं सदोदीत झळकत राहत असे; अशा तुम्हांवर कशानें रे हें एवढें संकट ओढवलें! काय तरी दैवाची गति विचित्र! तुमच्या वाईटासाठीं कोणरे जपमाळ घेऊन बसले होते म्हणून त्याचें हें फळ तुम्हांपुढें दत्त म्हणून उभें राहिलें अशी मी मनाची समजूत करूं? तुम्हांला जन्म देणाऱ्या मज पापी चांडाळणीच्या नशिबाचा तर हा दोष नसेलना? नाहीं तर, सारे गुण तुमच्या अंगीं ओतप्रोत भरलेले असतां तुम्हांस इतकें दुःख व क्लेश कां भोगावे लागते? तुमची लक्ष्मी जरी सर्वस्वीं गेली आहे, तरी वीर्य, धैर्य, बळ, उत्साह व तेज ह्यांत कांहीं कधीं तुम्हांला झीज लागावयाची नाहीं, ही गोष्ट खरी आहे. पण शरिरानें जर तुम्ही झिजत चाललां, तर त्या अरण्यांतील खडतर जाग्यांत कसेरे रहाल? तुमच्या नशीबात वनवास आहे हें जर मला पूर्वींच कळलें असतें, तर पांडु राजा मरण पावल्यानंतर शतशृंग पर्वतावरून मी परतच आलें नसतें! पुत्रांचें दुःख पाहिल्याशिवायच ज्याला स्वर्गास जाण्याची इच्छा झाली, तो तुमचा पिता धन्य, असें मला वाटतें. पण जिनें [1]रति, मति व गति ह्यांत मला फसवून, व आप-

१ कुंतीचें म्हणणें—माझ्याहून पांडु राजाला माद्री हीच फार प्रिय होती. कारण, तीच नेहमीं त्यांच्या जवळ असे; आणि अंतसमयीं तरी तिनें आपल्या पतीच्या रतिसुखाचा उपभोग घेतला; आणि मला अभागिनीला तेंही सुख मिळालें नाहीं, म्हणून तिनें मला

त्या पुत्रांना पुढें अशी आपत्ति भोगावी लागणार असें भाकित जाणूनच कीं काय, सर्वोत्कृष्ट सतीच्या मार्गाचेंच अवलंबन केलें, त्या महाभाग्यवती अतींद्रियज्ञानी धर्मवेत्त्या माद्रीची तर त्यांच्याहूनही धन्य म्हटली पाहिजे! मी किती दुर्दैवी पहा ! तिच्यामागें जगून हें असें दुःख पाहण्याचें माझ्या नशीबीं आलें आहे ! कोण तरी जिवाची आवड ? धिक्कार असो मला ! आणि आग लागो त्या माझ्या जिवाच्या आवडीला ! बाळांनो, तुम्हांला प्राप्त करून घेतांना कितीरे नवस आणि कोणरे सायास पडले ! आणि तुमचे ते सद्गुण पाहिले म्हणजे असें वाटतें कीं,हे सारे प्राण सुद्धां तुमच्यावरून ओंवाळून टाकावे. ह्याकरितां, तुम्हांला सोडून मी नाहींरे रहावयाची ! चला, मीही तुमच्याबरोबर येतें. द्रौपदि ! तूं सुद्धां काग मला सोडून जातेस ? आयुष्य हें क्षणभंगुर आहे असें म्हणतात. असें असतां माझ्याच आयुष्याचा शेवट कोठें गेला? मला तर वाटतें, ब्रह्मदेवानें माझा जन्म मात्र माझ्या भालपटावर लिहिला, आणि त्याची शेवटची मर्यादा कोठें तें लिहिण्याचें तो विसरला !अरेरे ! केवढी ही त्याची चूक ! हे कृष्णा ! हे द्वारकानिवासा ! हे बलरामाच्या कनिष्ठ बंधो ! तूं कोठेंरे गेलास? तूं मला व माझ्या ह्या पुरुषश्रेष्ठ बाळांना ह्या दुर्धर संकटांतून कांरे मुक्त करीत नाहींस? अनादि अनंत असणाऱ्या तुझें जे कोणी सदासर्वदा स्मरण करितात, त्यांचा तूं प्रतिपाळ करितोस, असें साधुसंत सांगत आले आहेत; आणि आजच त्याला तूं हरताळ कसा लाविलास? माझे हे मुलगे सद्धर्म, मोठेपणा, कीर्ति व वीर्य ह्यांनीं संपन्न असल्यामुळें त्यांना असें संकट भोगावयास लावणें हें तुला योग्य नाहीं. ह्याकरितां असें करूं नको. त्यांची खरोखर तुला दया येऊं दे. नीतिशास्त्रांत व अर्थशास्त्रांत प्रवीण असलेले भीष्म, द्रोणाचार्य,कृपाचार्य वगैरे कुरुकुलनायक विद्यमान असतां माझ्या बाळांवर हें संकट कोठून आलें हो ! हायहाय ! हे पांडो ! हे महाराजा ! आपण तरी कोठें आहां ? शत्रूंनीं केवळ द्यूतामध्यें तुमच्या गरीब कुमारांना जिंकून वनांत घालवून दिलें तरी सुद्धां अद्यापि आपण डोळेझांक कशी करतां ? अरे सहदेवा बाळा ! तूं तरी माघारा फीर! तूं माझ्या देहापेक्षांही मला प्रिय आहेस ! हे माद्रीपुत्रा, मी तुझी सावत्र आई, असें मनांत आणून एखाद्या निर्दय मुलाप्रमाणें मला तूंही टाकून जाऊं नको. अरे, हे तुझे भाऊ कडकडीत सत्यव्रत पाळणारे असले तर त्यांनाच वनामध्यें जाऊं दे; आणि तूं येथेंच राहून माझें संरक्षण कर व पुण्य जोड !

वैशंपायन सांगतातः—राजा, ह्याप्रमाणें कुंती जेव्हां पाषाणासही पाझर फुटेल अशा प्रकारचा हृदयद्रावक विलाप करूं लागली, तेव्हां, ज्यांचा आनंद अगदीं लयास गेला आहे अशा पांडवांनीं तिचें समाधान केलें. ते म्हणाले, “ आई, प्रारब्धांत असेल तें सुखदुःख भोगलेंच पाहिजे, तें चुकावयाचें नाहीं. ह्याकरितां, कृपा करून तूं आतां कोणत्याही प्रकारचें दुःख करूं नको. आम्ही वनवासांत असलों किंवा कोठेंही असलों, तरी तुझ्या आशीर्वादानें आम्हांस कोणतीच अडचण पडणार नाहीं. याकरितां, तूं आमच्याबरोबर ये-

रतिसुखांतही फसविलें ! आणि ह्या मृत्युलोकीं —मुलाबाळांच्या—संसारांत कुजत राहण्यापेक्षां अक्षय्य कीर्तीस पात्र व्हावें म्हणून तिनें सहगमन करण्याचा निश्चय केला; आणि मी पहा ह्या संसारसमुद्रांतच घोंटाळत बसलें आहें! तेव्हां तिनें ह्या मतीमध्यें म्हणजे सद्बुद्धींतही मला फसविलें; आणि अखेर तिनें आपल्या मनाप्रमाणें करून उत्तम गति प्राप्त करून घेतली; आणि मी ह्या अशा पुत्रदुःख डोळ्यांनीं पाहणाच्या दुर्गतीला पोहोंचलें आहें, तेव्हां तिनें गतीमध्येंही मला हात दाखविलाच !

ण्याचें मनांत न आणितां विदुराच्या येथेंच कालक्रमणा कर. अधिक मोहांत पडूं नको!"

राजा, ह्याप्रमाणें पांडवांनीं आपल्या प्रियकर मातुःश्रीची प्रार्थना केली; आणि सद्गदित अंतःकरणानें तिला प्रणाम करून त्यांनीं वनाकडे जाण्याचा मार्ग धरिला. तेव्हां विदुरानें, त्या शोकविव्हल झालेल्या कुंतीचें, दैव हें किती बलवत्तर ह्याबद्दल चारदोन गोष्टी सांगून सांत्वन केलें; आणि तिला बरोबर घेऊन खिन्न अंतःकरणानें हळू हळू तो आपल्या घरीं आला. द्रौपदीच्या अंगाला झोंबणें, तिला राजवाड्यांतून काढून देऊन वनवासाला पाठविणें, हे जुवेबाज मंडळीचे प्रकार पाहून दुर्योधनदुःशासनादिकांच्या स्त्रियांही त्या चांडाळचौकडीवर बोटें मोडूं लागल्या; त्यांच्या सुद्धां पोटांत भडभडून आलें; त्या सुद्धां मोठ्यानें गळा काढून रडूं लागल्या; आणि चिंताक्रांत होऊन बसल्या. राजा धृतराष्ट्रालाही, "पोरांनीं हें मोठें अनन्वित कृत्य केलें; ह्याचा परिणाम चांगला होण्याचें कांहीं लक्षण दिसत नाहीं; उलट मोठा अनर्थ ओढवण्याचें लक्षण दिसतें!" असें वाटून त्याचें मन उद्विग्न झालें; आणि त्याच्याही जिवाला तळमळ लागून राहिली. अशा प्रकारें शोकानें व्याकुल होऊन तो एकांतांत विचार करीत बसला असतां त्यानें विदुरास निरोप पाठविला कीं, "तूं लवकर इकडे निघून ये." तो धृतराष्ट्राचा निरोप येऊन पोहोंचतांच विदुर धृतराष्ट्राच्या वाड्यामध्यें आला. तेव्हां त्या उदास झालेल्या धृतराष्ट्रानें त्याच्यापाशीं विचारपूस करावयास सुरुवात केली.

अध्याय ऐशींवा.

—:०:—

पांडव वनवासांत जातांना घडलेले प्रकार व उत्पात.

वैशंपायन सांगतातः—राजा, तो दूरदर्शी विदुर निरोपाबरोबर येऊन पोहोंचला असें पाहून, अंबिकापुत्र धृतराष्ट्र यास त्याचेंच मन खाऊं लागल्यामुळें, त्यानें त्यास थोडासा भीतभीतच प्रश्न केला.

धृतराष्ट्र म्हणतोः—हे विदुरा! कुंतीनंदन धर्मपुत्र युधिष्ठिर, भीमसेन, सव्यासाची अर्जुन, माद्रीपुत्र पांडुनंदन नकुल-सहदेव, धौम्य आणि यशस्विनी द्रौपदी हीं कसकशीं वनांत केलीं, त्यांनीं जातांना काय काय केलें, त्यांच्या चर्येवरून व कृतीवरून त्यांच्या मनांतील काय काय भाव व्यक्त होत होता, तें सर्व ऐकण्याची मला फार उत्कंठा आहे. तर तें तूं मला इत्थंभूत सांग.

विदुर म्हणालाः—हे धृतराष्ट्रा! तें कसे गेले म्हणून काय विचारतोस? कुंतीपुत्र युधिष्ठिरानें तोंडावरून बुरखा घेतला होता; भीमसेन आपल्या विशाल बाहूंकडे पहात पहात निघून गेला; सव्यसाची अर्जुन वाळू टाकीत टाकीत युधिष्ठिराच्या मागून गेला; माद्रीपुत्र सहदेव तोंडाला राख सारवून आपल्या मार्गानें गेला; व जगामध्यें अत्यंत सुंदर असलेला व मनांत अत्यंत खिन्न झालेला नकुल आपलें सारें अंग धुळीनें भरून धर्माच्या मागोमाग चालता झाला. विशालनेत्री व लावण्यखाणी अशी जी द्रौपदी, ती तोंडावर केस आणून धर्माच्या मागोमाग रडत रडत जात होती; आणि, हे प्रजाधिपते धृतराष्ट्रा! हातांत दर्भ घेऊन धौम्य मुनि हे यमदैवताला उद्देशून असलेलीं व इतर भयंकर सामें म्हणत म्हणत प्रयाण करीत होते!

धृतराष्ट्र म्हणालाः—विदुरा! ह्या ज्या त्यांनीं निरनिराळ्या कृति केल्या, त्या कां बरें केल्या? त्यांवरून त्यांच्या मनांतील काय बरें भाव व्यक्त होत होते?

विदुर म्हणालाः—त्यांतील भावार्थ आणखी तो काय असणार? तुझ्या पुत्रांनीं धर्मराजाला कपटानें जिंकून राज्याचा व संपत्तीचा जरी

अपहार केला, तरी त्या दूरदर्शी धर्मराजाची बुद्धि धर्मापासून चळली नाहीं. हे भरतकुलोत्पन्न धृतराष्ट्रा ! तुझ्या पुत्रांवर निरंतर दयाच करणारा जो धर्मराज, त्याला कपटाचा आश्रय करून तुझ्याच पुत्रांनीं सर्वस्वीं नागविलें, तेव्हां क्रोध बाहेर पडूं नये म्हणून धर्मराजानें डोळे उघडे ठेविले नाहींत; क्रोधयुक्त दृष्टीनें सारे लोक क्षुब्ध होण्यास आपण कारण होऊं नये, म्हणून धर्मराजा हा आपलें तोंड झांकून निघून गेला. हे भरतवंशजश्रेष्ठा धृतराष्ट्रा ! "बाहुबलामध्यें माझी बरोबरी करणारा दुसरा कोणी नाहीं" असा भुजबळसंपत्तीचा अभिमान बाळगणारा भीमसेन, आपल्या भुजबळसंपत्तीला योग्य असेंच कांहीं शौर्यकर्म शत्रूंशीं करण्याच्या इच्छेनें आपले विशाल दंड बाहेर काढून चालला होता. दोन्ही हातांनीं सारखे बाण सोडणारा कुंतीपुत्र अर्जुन बाणांची वृष्टि कशी करीन ते दाखविण्याकरितां वाळू टाकीत टाकीत धर्माच्या मागोमाग चालला होता. म्हणजे त्यांतील भावार्थ इतकाच कीं, त्याचे वाळूचे खडे ज्याप्रमाणें अप्रतिहत पडत होते, त्याप्रमाणेंच तो आपल्या शत्रूंवर अप्रतिहत बाणांचा वर्षाव करणार ! हे धृतराष्ट्रा ! अशा निकृष्टावस्थेमध्यें आपलें तोंड कोणाच्या दृष्टीस पडूं नये म्हणून सहदेवानेंही तोंडाला राख फांसली होती. हे प्रभो धृतराष्ट्रा ! मार्गांतून जातांना पाहून स्त्रियांचें मन आपल्यावर जाऊं नये म्हणून आपल्या साऱ्या अंगावर धूळ उधळून नकुल आपल्या वाटेनें जात होता. रजस्वला असल्यामुळें जिच्या शरिरावर एकच वस्त्र असून तेंही अशुद्धानें लिडबिडलेलें होतें, अशी केंस मोकळे सोडून रडत जात असलेली जी द्रौपदी, तिनें तर असें बोलून दाखविलें कीं, "ज्यांच्यामुळें मला हें दुःख प्राप्त झालें आहे, त्यांच्या भायका आजपासून चौदाव्या वर्षीं रजस्वला असतांनाच पति, पुत्र, बंधु व सुहृद् ह्यांचा वध होऊन त्यांच्या रक्तानेंच त्यांची अंगें थबथबत असतांच त्या स्त्रिया आपआपल्या नवऱ्यांच्या वगैरे नांवानें अंगें धुऊन व तिलांजलि देऊन असे माझ्यासारखे केंस मोकळे असतांना हस्तिनापुरामध्यें शिरतील ! हे भरतकुलोत्पन्ना धृतराष्ट्रा ! धर्मराजाचे पुरोहित विद्वान धौम्य ऋषि निर्ऋति दिशेला दर्भ टाकून यमदेवतेला उद्देशून सामें म्हणत म्हणत पुढें गेले, त्यांतील भावार्थ हा कीं, भरतकुलोत्पन्न कौरवांचा संग्रामामध्यें वध झाल्यानंतर कौरवांचे उपाध्यायही ह्याचप्रमाणें सामें म्हणतील ! एवढाच हेतु दर्शविण्याकरितां धौम्य मुनींनीं तशा रीतीनें प्रयाण केलें.

राजा, ही त्यांच्या जाण्यासंबंधानें गोष्ट झाली. पण इकडे नगरामध्यें काय प्रकार झाला तो ऐक. "हाय हाय! आमचे प्रभु असलेले पांडव अशा प्रकारचें संकट प्राप्त होऊन अरण्यांत जावेना ! अहो ! जे केवळ राज्याच्या लोभानेंच ह्या पांडुपुत्रांना हांकून देत आहेत, त्या ह्या पोरकट बुद्धीच्या वयोवृद्ध कौरवांना धिक्कार असो ! पांडव गेल्यामुळें आम्ही सर्व आज अनाथ होऊन पडलों ! अशा त्या निर्दय व लोभी कौरवांमध्यें राहण्यास आम्हांला बरें तरी कसें वाटणार ?" ह्याप्रमाणें नागरिकजन अत्यंत दुःखाकुल होऊन वारंवार आक्रोश करीत आहेत ! राजा, अत्यंत विचारी कुंतीपुत्र पांडव वनांत गेले, तेव्हां इतके इतके प्रकार घडले; व त्यांपासून इतका इतका भावार्थ व्यक्त झाला.

धृतराष्ट्रा ! एवढ्यानेंच भागलें असें नाहीं. तर ते पुरुषश्रेष्ठ हस्तिनापुरांतून बाहेर पडले मात्र, तोंच आकाशामध्यें मेघ वगैरे कांहींएक नसतांनाच विजा चमकूं लागल्या, व धरणीकंप होऊं लागला ! त्याचप्रमाणें, हे धृतराष्ट्रा, पर्व नसतांनाच सूर्याला ग्रहण लागलें; आणि एक अ-

रिष्टसूचक उल्का नगरीला उजवी प्रदक्षिणा घालून विझून गेली. गिधाड, कोल्हे, कावळे वगैरे मांसभक्षक प्राणी हे देवालयें, मार्गावरचे वृक्ष, वाडे, आणि गच्या ह्यांवर बसून भयसूचक शब्द करूं लागले. असो. पांडव वनांत गेले तेव्हां हे भरतवंशजांचा क्षय सुचविणारे आणि टाळण्यास दुर्घट असे उत्पात झाले! आणि इतक्या सगळ्याला कारण काय? तर तूं पुत्रास दिलेली वाईट सल्ला!

वैशंपायन सांगतात:—राजा, ह्याप्रमाणें राजा धृतराष्ट्राच्या घरीं धृतराष्ट्र व परम बुद्धिमान विदुर ह्यांचा संवाद चालला आहे, तोंच इकडे कौरवांच्या सभेंत ब्रह्मतेजानें झळकत असलेले नारद मुनि अग्रस्थानीं विराजमान झाले होते, व त्यांच्या सभोंवार महर्षींचा मेळा होता, अशा ह्या भरसभेंत त्या नारद मुनींनीं, "आजपासून चौदाव्या वर्षी ह्या दुर्योधनाच्या अपराधामुळें भीमार्जुनांच्या बलानें ह्या भूमंडलावर सर्व कौरवांचा निःपात होईल!" असें भयंकर भाषण केलें; आणि लगेच स्वर्गाचा मार्ग धरून ते अंतर्धान पावले.

असो; ह्याप्रमाणें सर्व निश्चित झाल्यानंतर, द्रोणाचार्य हेच आपल्याला आश्रयभूत आहेत असें ठरवून, दुर्योधन, कर्ण व सुबल राजाचा पुत्र शकुनि ह्यांनीं सर्वानुमतानें त्यांस राज्य अर्पण केलें. तेव्हां परोत्कर्षासहिष्णु दुर्योधन, दुःशासन, कर्ण व इतरही सर्व कौरव ह्यांस अनुलक्षून द्रोणाचार्यांनीं भाषणास आरंभ केला.

द्रोणाचार्यांचें भाषण.

द्रोणाचार्य म्हणाले:—अहो! पांडव हे साधारण मनुष्य नव्हेत; ते साक्षात् देवांचे पुत्र आहेत. त्यांचा वध करण्याचें सामर्थ्य कोणासच नाहीं ही गोष्ट ब्राह्मणांनीं पूर्वींच कथन केलेली आहे. तथापि, जो कोणी मला शरण येईल, त्याला यथाशक्ति साहाय्य करणें हें माझें कर्तव्य आहे, असें मी समजतों; आणि राजासहवर्तमान हे धृतराष्ट्राचे पुत्र मला शरण आलेले आहेत, तेव्हां मीही त्यांच्या मनाप्रमाणेंच वागेन. ह्यांचा अव्हेर करण्याला माझें मन धजत नाहीं. तेव्हां दैव हेंच बलवत्तर आहे, असें म्हणावयाचें! द्यूतामध्यें पराजित झालेले पांडव धर्मावर दृष्टि ठेवून वनामध्यें गेले आहेत, व दिलेल्या वचनाप्रमाणें बारा वर्षें ते वनांत राहतील, ह्यांत शंका नाहीं. तथापि, त्यांच्यामध्यें ज्याप्रमाणें क्षमा आहे, त्याचप्रमाणें क्रोधही आहे, हें लक्षांत असूं द्या. ते त्या वनामध्यें ब्रह्मचर्यव्रतानें राहून पुढें तुमच्या ह्या महावैराचा सूड उगवतील, तेव्हां तुम्हाला दुःख होईल. ही गोष्ट ठरलेली आहे. राजा दुर्योधना! द्रुपद राजा हा माझा बाळमित्र असतांही मीं त्याच्याशीं युद्ध करून त्याला राज्यावरून पदच्युत केलें. तेव्हां त्याला क्रोध येणें ही रीतीचीच गोष्ट आहे. त्यानें माझा शिरच्छेद करणारा असा एखादा पुत्र व्हावा ह्या हेतूनें मोठा यज्ञ केला, तेव्हां याज व उपयाज ह्या दोन ऋषींच्या तपोबलानें अग्नीपासून धृष्टद्युम्न नांवाचा पुत्र व वेदीपासून सौंदर्यसंपन्न द्रौपदी अशीं दोन अपत्यें झालीं. त्यांतून धृष्टद्युम्न हा पांडवांचा मेहुणा असून त्या परस्परांतील प्रेम केवळ अपूर्व आहे. पांडवांच्या हिताची जी जी गोष्ट असेल, ती ती करण्याविषयीं तो रात्रंदिवस तत्पर असतो. ह्यामुळें त्याचा मला मोठा धाक वाटतो. त्याला धनुष्य, बाण, कवच व अग्नीप्रमाणें तेज हीं परमेश्वरानें उपजतच दिलेलीं असल्यामुळें, तो मनुष्यरूपानें माझा मूर्तिमंत काळच होऊन राहिलेला आहे. असा शत्रूकडील वीरांचा निःपात करणारा तो धृष्टद्युम्न पांडवांच्या पक्षाला मिळालेला आहे ही एक गोष्ट; दुसरें—रथी व अतिरथी यांच्या समुदायांत शिरोमणि शोभणारा तरुण अर्जुन ह्याच्यांशीं जर जिवापाड संग्राम करण्याचा प्रसंग आला, तर, कौरवहो! त्याच्यापेक्षां अधिक दुःसह दुःख तें जगामध्यें

कोणतें उरलें? "धृष्टद्युम्न म्हणजे द्रोणाचा मृत्यु" ही म्हण तर सर्वतोमुखीं आहे; आणि माझा प्राण घेण्याकरितांच त्याचा जन्म आहे, हें त्याला स्वतांलाही माहीत आहे, आणि साऱ्या जगालाही पण माहीत आहे. आणखी हा सारा परिणाम तुमच्या कृतीमुळें भोगावयाचें माझ्या कपाळीं आलें आहे! असो; त्या गोष्टी मनांत आणण्यांत आतां कांहीं अर्थ नाहीं. तर आतां ज्याच्या योगानें तुमचें कल्याण होईल, असें जें जें काम करावयाचें असेल तें तें लवकर करून घ्या. पांडवांना वनांत पाठविलें, तेवढ्यानेंच तुमचें कल्याण झालें असें समजूं नका. अरे, हें आज तुम्हांला मिळालेंसें वाटत असलेलें सुख, हेमंत ऋतूंतल्या ताडाच्या छायेसारखें केवळ क्षणभंगुर आहे. ह्याकरितां, यज्ञयागादिक जें जें काय तुम्हांला करावयाचें असेल, तें तें लवकर करून घ्या; काय दानधर्म करून घेणें असेल तो करून घ्या; आणि जे जे भोग प्राप्त होतील, ते ते भोग व विलास भोगून घ्या. कारण, आजपासून चौदा वर्षांनीं तुम्हांवर मोठें अरिष्ट कोसळणार आहे.

धृतराष्ट्र म्हणाला:–विदुरा! द्रोणाचार्य अगदीं यथार्थ बोलले. तर मग तूं जा, व पांडवांना परत तरी घेऊन ये; आणि ते जर परत न आले, तर त्या पुत्रांसमान असलेल्या पांडवांना शस्त्रें, रथ, पायदळ व नानाप्रकारचे उपयोगाचे पदार्थ त्यांच्या बरोबर देऊन त्यांना सन्मानानें तरी अरण्यांत पाठवा.

अध्याय एक्यायशींवा.

संजयधृतराष्ट्रसंवाद.

वैशंपायन सांगतात:—हे जनमेजया! द्यूतामध्यें पराजित होऊन पांडव वनामध्यें गेले, तेव्हां धृतराष्ट्राच्या मनामध्यें मोठी चिंता उद्भवली; आणि तो उदासीन होऊन दीर्घ सुस्कारे टाकीत चिंताग्रस्त होऊन बसला. तेव्हां संजय त्याला म्हणाला:—हे पृथ्वीपते, राज्यावरून पदच्युत करून पांडवांना तूं वनवासास पाठविलेंस, आणि राज्यलक्ष्मीनें भरलेली सर्व पृथ्वी तुझ्या वशांत उतरली. मग आतां तुला वाईट कां वाटतें?

धृतराष्ट्र म्हणाला:—युद्धामध्यें जयशाली, बलाढ्यांतले बलाढ्य, आणि महारथी अशा पांडवांबरोबर ज्यांनीं ज्यांनीं म्हणून वैर बांधिलें आहे, त्यांना त्यांना दुःखरहित स्थिति मिळणार कोठून?

संजय म्हणाला:–महाराज! महात्म्या पांडवांशीं प्रचंड वैर उत्पन्न झालें, ह्याला तुझीच कृति कारण झाली. आतां ह्या गोष्टीचा परिणाम–पृथ्वीवरील सर्व राजांचा आणि त्यांच्या वंशजांचा क्षय हाच होईल. अरे, भीष्म, द्रोणाचार्य व विदुर हे वारंवार नको नको म्हणून सांगत होते, पण त्यांच्या सांगण्याकडे लक्ष न देतां तुझ्या निर्लज्ज दुर्योधनानें प्रातिकामी नामक सूतपुत्रास पांडवांची प्रिय भार्या धर्माचरणी द्रौपदी हिच्याकडे पाठविलें, आणि "जा, तिला सभेमध्यें घेऊन ये." म्हणून त्याला सांगितलें. बाबारे, विनाशकाल प्राप्त झाला म्हणजे तो कांहीं प्रत्यक्ष हातांत शस्त्र घेऊन येऊन कोणाचा शिरच्छेद करीत नाहीं, तर बुद्धीला भ्रंश पाडून विपरीत प्रकार भासविणें हेंच त्याचें काम आहे. अर्थात् असा बुद्धिभ्रंश झाला म्हणजे अर्थ हा अनर्थ, आणि अनर्थ हा अर्थ असें भासूं लागतें, आणि त्याचीच मनाला आवड उत्पन्न होऊन तीच शेवटीं त्याच्या नाशाला कारणीभूत होते. अरे, तपोनिष्ठ पांचालीला सभेमध्यें ओढून आणणारांनीं अंगावर कांटा उभा राहण्यासारखें हें घोर संकट आपण होऊन ओढून घेतलें आहे! अरे, केवढी त्या द्रौपदीची योग्यता! जी मूळची अयोनिसंभव, रूपानें केवळ अप्रतिम, प्रत्यक्ष अग्नीतून उत्पन्न झालेली, महान यशस्वी, व सर्वधर्मपारंगत, तिला तुझ्या पुत्रासारख्या जुवेबाजांशिवाय दुसरा कोण वरें सभेमध्यें आणील? बरें, ती तरी

चांगल्या स्थितींत असावयाची होती ? तर तसेंही नाहीं! ती रजस्वला व एकवस्त्रा, आणि तें वस्त्रही अशुद्धानें परिप्लुत असें! हर हर! अशा स्थितींत ती बापडी दीनवाणीनें आपल्या प्रिय पतींकडे ते आपल्यांस कांहीं साह्य करितील ह्या आशेनें पाहूं लागली, तों तेही संपत्ति, राज्य, वैभव, वस्त्रेंपात्रें इत्यादिकांनीं रहित होऊन दास्यत्व पावल्यामुळें पराक्रमहीन असे होते. तेव्हां तिला काय बरें वाटलें असेल ! एवढा प्रसंग गुदरला असतां त्या क्रुद्ध व दुःखाकुल झालेल्या द्रौपदीला त्या वेळीं आणखी दुःखावर डाग दिल्याप्रमाणें कटु भाषण करणें अगदींच गैर होतें! असें असतांही कौरवांच्या भरसभेमध्यें दुर्योधन व कर्ण ह्या उभयतांनीं गम न खातां तोही विधि उरकून घेतला! ह्यावरून, राजा ! मला तर हा सारा प्रकार विपरीत दिसतो! कारण, ती महासाध्वी द्रौपदी खरोखरच जर क्रोधानलानें व्याप्त झाली, तर काय होईल आणि काय न होईल, हें कांहीं माझ्यानें सांगवत नाहीं !

धृतराष्ट्र म्हणाला:—होय, खरेंच; द्रौपदीनें क्रोधानलानें पेटलेला एक डावा डोळा जरी उघडला, तरी ही सारी पृथ्वी जळून खाक होईल ! पण, कायरे संजया ! तसें झालें तर माझ्या मुलांपैकीं एखादा तरी शिल्लक राहील का नाहींरे? अरे, खरोखरच ती द्रौपदी गेल्यापासून काय काय झालें आहे, समजलास का ? अरे, ह्या द्रौपदीला जेव्हां सभेंत नेल्याचें पाहिलें, तेव्हां गांधारीसहवर्तमान सर्व बायकांनीं एके ठिकाणीं जमून रडून रडून जो आकांत केला, तो कांहीं पुसूं नये ! आणखी ह्या आमच्या बायका, त्यांना कोणी भेटावयास आलें असतां, त्यांच्यापाशीं त्या रूपयौवनसंपन्न धर्मनिष्ठ धर्मपत्नी द्रौपदीचे गुणानुवाद गात बसतात; व तिच्यावर आलेला प्रसंग आठवून नेहमीं रडत बसतात ! आणखी आतांशा एक चमत्कार होतो. तो हा कीं, अग्नीमध्यें हवन केलें असतां त्यांतील हव्याचें व्हावें तसें दहनच होत नाहीं ! खरोखरच द्रौपदीला जेव्हां सभेमध्यें ओढून नेलें, त्या वेळीं ब्राह्मण क्षुब्ध झाले; प्रचंड वायु वाहूं लागला; पर्व नसतांही ग्रहण लागलें; आणि त्यावरून प्रजेला अत्यंत घोर भय उत्पन्न होणार असल्याचें त्यानें सुचविलें! त्याचप्रमाणें, रथशाळेला आग लागली, आणि भारत वंशाचा पराभव होण्याचें सुचविण्याकरितां ध्वजही मोडून पडले. दुर्योधनाच्या गृह्याग्नीजवळ भालूंनीं हृदयांत धडकी भरेल असा भयंकर शब्द केला; व लागलीच दाही दिशांना गर्दभ ओरडत सुटून आपल्या प्रतिध्वनीनें त्यांनीं त्यांस प्रत्युत्तर दिलें ! संजया, असे भयंकर उत्पात पाहिल्याबरोबर द्रोणाचार्यांसहवर्तमान भीष्म, कृपाचार्य, सोमदत्त व उदारबुद्धि बाल्हीक हे सभेंतून उठून गेले. तेव्हां विदुराच्या सांगण्यावरून मीं द्रौपदीला म्हटलें, 'तुझ्या इच्छेस येईल तो वर माग, मी तुला देतों.' तेव्हां तिनें 'पांडव हे रथ व धनुष्य ह्यांसहवर्तमान दास्यत्वापासून मुक्त होवोत' असा वर मागितला; व मींही त्याला अनुमोदन दिलें. नंतर अत्यंत बुद्धिमान व सर्वधर्मज्ञ विदुरानें बुद्धिवाद सांगितला.

विदुर म्हणाला:—अरे! ही द्रौपदी ज्या दिवशीं सभेंत ओढून आणिली, त्याच दिवशीं ह्या भरतवंशाला कीड लागली म्हणून समजा. तोच त्यांच्या निर्मूलनाचा आरंभ! अरे, ही पांचाल राजाची कन्या द्रौपदी म्हणजे सामान्य नव्हे. ती साक्षात् अनुपम अशी लक्ष्मी आहे हें ध्यानांत ठेवा. ती साक्षात् देवानें उत्पन्न केलेली आहे ! द्रौपदी ही आज पांडवांबरोबर वनवासाला जात आहे ! तिचा हा असा झालेला छळ, अपमान सहन न करणाऱ्या पांडवांनाचसा काय, पण धनुर्धारी वृष्णि, किंवा महारथी पांचाल ह्यांना सुद्धां सहन होणार नाहीं; शिवाय, सत्यप्रतिज्ञ श्रीकृष्ण त्या सर्वांचें संरक्षण करणारा समर्थ

आहेच. तेव्हां तोही कांहीं स्वस्थ बसणारा नव्हे. पांचालांना बरोबर घेऊन अर्जुन चाल करून येईल, त्याच्याच बरोबर कालदंड उगारून येणारा साक्षात् मृत्युच कीं काय असा महाधनुर्धारी व बलशाली भीमसेन गरगर गदा फिरवीत येईल, तेव्हां त्या बुद्धिमान अर्जुनाच्या गांडीवाचा नुसता टणत्कार व भीमसेनाच्या गदेच्या वेगाची नुसती घुमरी सुरू झाली पुरे, तेवढा नाद सुद्धां कौरवपक्षाच्या राजांना सहन करण्याची छाती होणार नाहीं! समजलास? म्हणून, मी म्हणतों, पांडवांबरोबर कलह न करितां नेहमीं सामोपचारानेंच वागावें तें बरें! कारण, कौरवांपेक्षां पांडव हे केव्हांही बलिष्ठ आहेत, असें माझें मत आहे. अरे, असें पहा—जरासंध म्हणजे काय सामान्य प्रकरण? तो केवढा बलाढ्य! आणि त्याचा दरारा तरी किती! पण त्याला सुद्धां भीमसेनानें केवळ मल्लयुद्धांत एका कोंपरखळीनेंच ठार केलें; आणि, हे भरतवंशजश्रेष्ठा, तूं तर सान्याच बाजूनें लंगडा! तेव्हां तुला पांडवांशीं सख्य करणेंच इष्ट आहे. तसें करण्यांत, तुझेंच नव्हे तर उभयपक्षांचेंही हितच आहे. ह्याकरितां, कोणतीही शंका मनांत न आणितां तूं पांडवांशीं सख्य कर. महाराज! येवढें कराल तर आपलें कोटकल्याण होईल!

हे गवल्गणपुत्रा संजया! ह्याप्रमाणें धर्माला व अर्थाला अनुसरून विदुरानें मला परोपरीनें उपदेश केला. पण मी पुत्रप्रेमाच्या नादांत गुंतल्यामुळें माझ्यानें त्याचें ग्रहण झालें नाहीं!

सभापर्व समाप्त.